
# विश्व वनवासींचे !




भास्कर गिरधारी

# प्रकाशकाचे मनोगत

देश स्वतंत्र झाल्यानंतर गेल्या ७० वर्षांमध्ये भारतीय सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टीने जे बदल घडून आले आहेत त्या सर्वांचा विचार करताना सामान्यपणे देशामधील शहरी व ग्रामीण जनतेचा विचार केला जात असल्याचे दिसून येते. आजही देशामधील एकूण लोकसंख्येच्या १५ ते २० टक्के असलेल्या वनवासी समाजाकडे ज्या प्रमाणात लक्ष जावयास पाहिजे तसे जाताना दिसत नाही. एकूणच वनवासी विश्व उपेक्षितच राहिले आहे. काही गैर सरकारी संघटना व विशेष करून वनवासी कल्याण आश्रम गेली ६० वर्षांहून जास्त वनवासी क्षेत्रांमध्ये कार्य करून वनवासींचे जीवनमान उंचावण्यास यशस्वीरित्या मदत करीत आहे.

वनवासी समाजाचीपण एक वैशिष्ट्यपूर्ण लोकसंस्कृती आहे. त्यांचेपण एक सांस्कृतिक जीवन आहे. त्यांचे लोकसाहित्य आहे, लोकसंगीत व लोकनृत्य आहे. वैशिष्ट्यपूर्ण अशी त्यांची नीतिमत्ता व सौंदर्यशास्त्र आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने वनवासींच्या ह्या जीवनाची अन्य समाजाला ओळख होणे आज अत्यावश्यक आहे. डॉ. भास्कर गिरधारी हे नोकरी निमित्ताने १० वर्षे जव्हारला होते. त्या काळात त्यांनी वनवासींचे जीवन जवळून पाहिले, त्याचा अभ्यास केला व त्याचे फलित म्हणजे त्यांनी लिहिलेले 'वनवासी विश्व' नावाचे पुस्तक.

उर्वरित समाजाला वनवासींचे जीवन, त्यांची जीवनशैली इत्यादींची ओळख होण्यास डॉ. गिरधारींचे पुस्तक अत्यंत उपयुक्त आहे असे वाटल्यामुळे आम्ही हे पुस्तक प्रकाशित करीत आहोत. वाचक ह्याचे चांगले स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

**भारतीय विचार साधना प्रकाशन**

भाविसा भवन, १२१४/१२१५, सदाशिव पेठ,
पेरूगेट भावे हायस्कूल परिसर, पुणे - ३०.
दूरभाष : ०२०-२४४८७२२५
ई-मेल : bhavisapune@gmail.com,
bhavisa@bookbharati.com

# विश्व वनवासींचे

डॉ. भास्कर गिरधारी

भारतीय विचार साधना प्रकाशन, पुणे.

❖ **विश्व वनवासींचे**
**Vishwa Vanvasinche**

© **Dr. Bhaskar Girdhari**

© **डॉ. भास्कर गिरधारी**

❖ **प्रकाशक**
भारतीय विचार साधना पुणे,
मोतीबाग, ३०९ शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.

भाविसा भवन, १२१४/१२१५
सदाशिव पेठ, पेरूगेट भावे हायस्कूल परिसर,
पुणे ४११०३०.

❖ **प्रथमावृत्ती**
१ जानेवारी २०१८

❖ **मुद्रक**
प्रकाश ऑफसेट
पर्वती, पुणे ९.

❖ **अक्षरजुळणी आणि सजावट**
पौर्णिमा एंटरप्रायजेस, पुणे - ४३
**फोन :** ९४२२००८३२७

❖ **मुखपृष्ठ**
व्ही.डी. वेलणकर

❖ **सहभाग मूल्य**
२०० रुपये

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | मनोगत | ५ |
| २) | वनवासी : नैतिक, सौंदर्यशास्त्रीय आणि सामाजिक परिमाणे | ७ |
| ३) | वनवासी साहित्य : एक दृष्टिक्षेप | १५ |
| ४) | वनवासी लोकसाहित्याचे स्वरूप | १९ |
| ५) | वनवासी लोकनृत्य | ३० |
| ६) | वनवासींचा मांदोळ नाच | ३८ |
| ७) | वारली लोकसंस्कृतीचे विशेष | ४२ |
| ८) | वनवासींची पर्यावरण जाण | ४९ |
| ९) | नाशिक : वनवासी लोकसाहित्य | ५४ |
| १०) | ठाणे : वनवासी लोकसंस्कृती | ५८ |
| ११) | वनवासींचा होलिकोत्सव | ६५ |
| १२) | वनवासींच्या पाऊलखुणा | ६९ |
| १३) | समाज विकासक | ७३ |
| १४) | मा. बाळासाहेब देशपांडे | ७७ |
| १५) | भास्करराव कळंबी | ८६ |
| १६) | स्व. रामभाऊ गोडबोले | ८९ |
| १७) | सरोजिनी बाबर | ९२ |

१८) दादासाहेब बिडकर ९६
१९) डॉ. भीमराव गस्ती ९७
२०) अपूर्व पूर्वांचल वनयात्रा १००
२१) वनवासी कोकणा शब्दकोश : प्रस्तावना १०३
२२) रिंगण : प्रस्तावना १०६
२३) जांभूळपाडा : प्रस्तावना ११०
२४) क्रांतिवीर राघोजी भांगरे : प्रस्तावना ११४
२५) जंगल बोलींचा वेध : प्रस्तावना ११७
२६) वनवासी महिला शिक्षण संशोधन : संकल्पचित्र १२०
२७) वनवासी विद्यार्थी मराठी सुधार : संकल्पचित्र १२४
२८) वनवासी प्राथमिक विद्यार्थ्यांशी सुसंवाद १३२
२९) लोकसाहित्याच्या अभ्यासाची नवी दिशा १४३
३०) वनवासी समाज : रामायण आणि महाभारत कथा १५६

❋ ❋ ❋

# मनोगत

"विश्व वनवासींचे" हे माझे वनवासी विषयाला वाहिलेले दुसरे पुस्तक आहे. "आरसा आदिवासी जीवन शैलीचा" या पूर्वीच्या पुस्तकाची उपयुक्तता आजही तेवढीच आहे. वनवासी लोकजीवन आणि संस्कृतीच्या जिज्ञासेपोटी, नागरीजनांनी ती जाणून घेण्याची आणि त्यांच्या विकासासाठी प्रयत्नशील राहण्याची नितांत गरज आहे. हे लक्षात घेऊन या वनवासीविषयक लेख संग्रहाचे प्रकाशन केले आहे. हा लेखसंग्रह सर्व वनवासी अभ्यासकांना, संशोधकांना उपयुक्त ठरेल याची खात्री आहे.

प्रस्तुत ग्रंथात वनवासींच्या अनेक लक्षित आणि अलक्षित पैलूंना विश्व वनवासींचे जाणून घेताना उजळा देण्याचा प्रयत्न केला आहे. वेळोवेळी झालेले हे लेखन येथे एकत्र आणल्याने अभ्यासकांना, नगरवासीयांना ते उपयुक्त ठरणार आहे. हे लेखन प्रत्यक्ष अनुभवावर आधारित आहे त्यामुळे त्यात एक जिवंत रसरशीतपण अवतरले आहे. त्यातून वाचकांना वनवासी बंधू भगिनींची मानसिकता, स्थितीगती लक्षात येईल.

यातील बहुतेक लेख पूर्वी विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले आहेत, पण या विखुरलेल्या लेखनाला एकत्र आणणे अत्यावश्यक वाटले, त्याला उत्तम प्रतिसाद मिळेल असा विश्वास आहे, त्यासाठी नवभारत (वाई), परामर्श (पुणे), शिक्षण आणि समाज (पुणे), शिक्षण समीक्षा (नागपूर), जनस्थान (नाशिक), शब्ददर्वळ (इंदोर), भा.वि.सा. (पुणे), वनवार्ता (नाशिक), मयुरवृत्त (नाशिक), वनपुण्याई (पुणे), लोकप्रज्ञा (औरंगाबाद), सा. विवेक, भूषणराज, सांस्कृतिक वार्तापत्र, समरसता पत्रिका, या सर्व नियतकालिकांच्या संपादकांचे, प्रकाशकांचे, संदर्भदात्यांचे मी मनापासून ऋण मान्य करतो. नाशिक, पुणे, मुंबई आकाशवाणीचा, त्याचप्रमाणे विविध ठिकाणी लोक साहित्यावर चर्चासत्रे, व्याख्याने आयोजकांचा, ग्रंथ प्रविष्ट प्रस्तावना-लेख प्रसिद्ध करणाऱ्यांचाही मी आभारी आहे.

वेगवेळ्या वेळी हे लेखन झाल्यामुळे काही लेखात पुनरुक्ती करावी लागलेली आहे.

महाराष्ट्र शासन शिक्षण संस्था आणि बालभारती यांच्या मार्गदर्शनाने संशोधन-संकल्प पूर्तीसाठी, त्यांचे आभार मानतो.
ठाणे व नाशिक जिल्ह्यातील वनवासी क्षेत्रात माझे वास्तव्य आणि वावर जाणून श्री. सुरेशराव कुलकर्णी (पंढरपूर) यांनी वनवासी कल्याण प्रांताच्या कामाशी आग्रहाने मला जोडले, त्याचे हे फलित मी मानतो.

शिवाय प्रकाशक, मुद्रक, मुखपृष्ठ, अक्षर जुळणी, यांचाही मी आभारी आहे. विशेषत: भारतीय विचारसाधना यांनी प्रकाशनार्थ हा ग्रंथ स्वीकारला हा मी माझ्यावरील अनुग्रह मानतो.

या ग्रंथावर अभिप्राय देणाऱ्या आदरणीय यशवंतराव लेले या मान्यवरां विषयीची कृतज्ञता व्यक्त करतो.

हा ग्रंथ सिद्ध करीत असताना, वनवासींबद्दल विशेष आस्था बाळगणारी माझी धाकटी बहिण "स्मिता लीलाधर निजामपूरकर" हिचे दु:खद निधन झाले, तिला आणि वनवासी क्षेत्रात जीवाचे रान करून सतत कार्यमग्न असणाऱ्या नगरवासी-वनवासी कार्यकर्त्यांना हा ग्रंथ मी अर्पण करतो. वनयोगी बाळासाहेब देशपांडे जयंती २६ डिसेंबर, २०१७ला नुकतीच साजरी झाली आहे त्याचे हे स्मरण.

**- भास्कर गिरधारी**

- चलभाष : ९८२३०१२३०१

bvgirdhari@gmail.com

१ जानेवारी, २०१८

❋❋❋

# वनवासी : नैतिक, सौंदर्यशास्त्रीय आणि सामाजिक परिमाणे

परिमाणे याचा अर्थ निकष किंवा मोजमाप. वनवासींची नैतिक परिमाणे म्हणजे त्यांच्या नीतिविषयक कल्पना. ते करीत असलेली, नीतिमूल्यांची जपवणूक त्यांच्या जीवनातील नैतिकतेचा विचार होय. याच पद्धतीने वनवासींच्या सौंदर्यविषयक संकल्पना, त्यांच्या सौंदर्यशास्त्रीय जाणिवा, कलादृष्टी आणि त्यांचे एकूण कलाविश्व त्याचा परामर्श येथे घ्यावयाचा आहे. सामाजिक परिमाणांमध्ये,वनवासींची समाजमनस्कता, समाजातील जागरूकता आणि सामाजिक जीवनाची विविध वैशिष्ट्ये येथे लक्षात घ्यावयाची आहेत.

तेव्हा नैतिकतेचे वनवासींचे निकष कोणते? आणि त्याचा प्रत्यय त्यांच्या दैनंदिन जीवनातून कसा येतो, याचा विचार प्रारंभी करता येईल.

वनवासी भागात सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या एका पांढरपेशा कार्यकर्तीला प्रश्न विचारला जातो, तुला हे काम करणे कसे शक्य होते? त्यावर तिचे उत्तर आहे. एक वेळ, पुण्यामध्ये रात्री एकटे रिक्षातून जायला आम्ही घाबरतो. पण वनवासी पाड्यावर आम्हाला रात्रीसुद्धा यायची वेळ आली, तर कधीच भीती वाटत नाही. मला वाटते या उत्तरातच वनवासींच्या जीवनमानातील नैतिकतेचे स्थान स्पष्ट झाले आहे. याचा अर्थ एकट्या, शहरी महिलेला या वनवासी पाड्यांमध्ये निर्भयपणाने वावरता येते, ते रात्रीच्या वेळीही ! याची ग्वाही एका कार्यकर्ती महिलेने आवर्जून येथे दिलेली आहे. हे स्त्रीदाक्षिण्याचे अव्यक्त, स्त्रियांबद्दलच्या, सुप्त आदराचे प्रतीक- उदाहरण आहे.

वनवासींमध्ये मातृसत्ताक पद्धतीला (मेट्रिआर्कल सिस्टीमला) अद्यापही वाव आहे. म्हणूनच वनवासींमध्ये विवाह ठरताना मुलीच्या पित्याला 'दहेज', धान्य, जमेल त्या धान्यांच्या स्वरूपात, निदान

भाताची २ पोती तरी देण्याची प्रथा रूढ आहे. त्यासाठी मुलाला, मुलाच्या पित्याला, लग्नाआधीच जमवाजमव, तरतूद करून ठेवावी लागते. कधी कधी तेवढ्यासाठी हे लग्न खोळंबूनही राहते. जेव्हा ही जुळवाजुळव, आर्थिक तरतूद होते, तेव्हा लग्नसोहळा साजरा होतो. समजा हे शक्य झाले नाही, तर 'घरजावई' 'घरोंदा' पद्धती रूढ आहेच. त्यात मुलीच्या घरी ठरलेला कालावधी, मग २/३ वर्षे मुलाने राहायचे, त्याच्या शेतीत राबायचे, कष्ट उपसायचे आणि आगळ्या तऱ्हेने ही परतफेड करायची. यातला आशय हा की 'स्त्री'ला कुटुंबात प्रमुख महत्त्वाचे स्थान आहे. समजा, त्या मुलाचा ठराविक कालावधी पूर्ण झाला तर तू आणखी राहशील का मुलीच्या बापाकडे? असे विचारल्यावर तोही स्वाभिमानाने सांगतो, मी एक दिवसही जास्तीचा राहणार नाही. लगेच मुलीला घेऊन घरी येईन. काही कारणाने हेही शक्य झाले नाही तर पुन्हा दोघेही परस्पर सम्मतीने विवाहापूर्वी, निष्ठेने एकत्र राहतात. प्रसंगी अपत्येही जन्माला घालतात आणि नंतर विवाहविधी, आर्थिक स्थिती बरी झाल्यावर पार पाडतात.

वनवासींमध्ये मुलीला कधीही सासुरवास, छळ हा प्रकार ऐकिवात नाही. फार तर न पटले तर 'तुझ्या आईकडे जाऊन तू खुशाल राहा.' हा मार्ग येथे आहे. पटलेच नाही आणि एकमेकांचा विश्वास गमावला, दुसरीकडे लक्ष गेलेच तर जातपंचायत बसवून सरळ शब्दशः 'काडीमोड'मार्ग दोघांनाही खुला असतो.

एका वनवासी कार्यकर्त्याला लग्नासाठी पैसे हवे असतात. त्याने ते स्वयंसेवी संस्था चालकांकडे मागितलेलेही असतात. पण त्याला पैसे द्यायचे, या ना त्या कारणाने राहून जाते. जेव्हा पुन्हा आठवण होते तेव्हा तो कार्यकर्ता म्हणतो, 'जर मला लवकर पैसे दिले तर बरे होईल.' याचे कारण तो सांगतो...सांगताना लाजतो... 'आता फक्त चार महिने उरले आहेत. थोडी घाई केली पाहिजे.' इतक्या निःसंकोचपणे ते एकत्र राहू शकतात. वनवासी तरुण तृप्त असतात. ते वखवखलेले नसतात. त्यामुळे नीतिमूल्यांची चाड, स्वाभाविकपणेच राखली जाते. वनवासींमध्ये 'ओढ्या' या नावाची एक कल्पनाही आढळली. पुनर्विवाह करताना, स्त्री जर पूर्वीच्या पतीपासून गरोदर

असेल आणि तरीही तिचे मन अन्य प्रियकराशी जुळले असेल, तर तो वनवासी प्रियकर तिचा त्याही स्थितीत स्वीकार करतो आणि त्या पूर्वीच्या पतीपासून होणाऱ्या मुलाला सांभाळतो. हे होणारे अपत्य 'ओढ्या'!! बाईबरोबर ओढत आलेले; म्हणून ओळखले जाते.यापेक्षा कोणताही मोठा स्त्रीत्वाचा आदर असू शकत नाही; याचा नैतिकतेच्या संदर्भात विचार 'आदर्श' म्हणूनच केला गेला पाहिजे.

या सगळ्या उदहरणांच्यामधून आदिवासींचा स्त्रीकडे पाहण्याचा उदार आणि उदात्त दृष्टिकोण जो शहरी संस्कृतीत दुर्मिळ झालेला आहे. तो स्पष्टपणे लक्षात येतो. ही नैतिकता अनेक बाबतीत इतरत्रही आढळते.

अवर्षणाने किंवा अतिवृष्टीने (ओला दुष्काळ) एखादे गाव जर दुष्काळग्रस्त झाले, आपल्या घरातील धान्य संपल्यावर बिनदिक्कतपणे ते कुटुंब, ज्याच्याकडे धान्य आहे, त्याच्याकडे राहायला जाते, ते नातेवाईक वा परिचित असतील, तेही परिस्थिती जाणून एकमेकांना आधार देतात. पण दोन्ही कुटुंबाचे धान्य संपले तर दोन्हीही कुटुंबे मिळून तिसऱ्या धनधान्य संपन्नाकडे जातात. हा परस्पर सद्भाव नैतिकतेचा द्योतक आहे.

नैतिकतेचा एक आगळा आदर्श म्हणजे गावचे, पाड्याचे एखादे महत्त्वाचे काम होत असेल, उत्सव असेल, मंदिर, शाळा, आरोग्यकेंद्राचे बांधकाम असेल, पण द्यायला तर देणगीसाठी धान्य, पैसा नाही, अशा स्थितीत तो गरीब वनवासी सधनाच्या शेतात ठराविक दिवस मोलमजुरी पत्करतो आणि त्याचा मोबदला तो त्याचा निधी म्हणून देतो. असा कष्टाने वनवासी स्वाभिमान जपतो.

वनवासींनाही आपले देवधर्म आहेत. दैवते आहेत. वेताळ, झोटिंग, मावल्या, वाघोबा, हिरवा देव, म्हसोबा, कान्होबा, कणसरी (नागली) या ग्रामदैवतांना त्याने आपल्या देव्हाऱ्यात स्थान दिलेले आहे.

वनवासी भागातून, देवाची पालखी चालली तरी दर्शनाला झोपडीबाहेर वनवासी येत नाही, तेव्हा प्रश्न पडला, असे का? प्रसाद घेऊन त्यांच्या झोपडीत गेलो. 'निदान प्रसाद तरी घ्या, खा.' म्हटले, तेव्हा दर्शनाला न येण्याचे कारण उलगडले. देवाला दिव्यात वाहायला

तेल पाहिजे आणि निदान पै-पैसा देवापुढे ठेवला पाहिजे. आमच्या घरी तेलही नाही आणि पैसाही नाही म्हणून आम्ही दर्शन घेत नाही, हे ऐकून अवाक झालो.

येथे वनवासींच्या दारिद्र्यांचे दर्शन घडत असले तरी अडाणीपणाने नाही. उलट ते किती सुसंस्कृत विचार करतात, हे आढळते.

"तुम्ही कोरा चहा - काळा चहा का पिता?" असा विचारलेला प्रश्न. पण त्याचे उत्तर सर्वांना अंतर्मुख करणारे आहे. "गाईचे दूध हे तिच्या वासरासाठी असते. ते आम्ही राखून ठेवतो त्या वासरासाठीच! माणसाला ते पिण्याचा अधिकार नाही."

वनवासी झोपडी बांधतानासुद्धा आधी सुरक्षित जनावरांचा गोठा बांधतात. आणि मग उरलेल्या जागेत माणसांना राहण्याची जागा बांधतात. त्यांचे पशुधन सर्वस्व आहे, त्यांची जपवणूक ही माणसाइतकीच केली जाते. ही वनवासींची परंपरा, वनवासींची ही 'दानत' लक्षणीय आहे.

सामुदायिक विवाह जसे होतात तसाच त्यांचा 'काज' हा सामुदायिक श्राद्धाचा प्रकार आहे. पाड्यावरचा बऱ्यापैकी सधन शेतकरी डाका वाजवून 'काज' पुकारतो. त्या वर्षभरातील मृत व्यक्तीच्या नावाने हा विधी होतो. भात पिकविणाऱ्या वनवासीला मात्र मातीचेच पिंडदान करावे लागते. मृत व्यक्तीच्या आवडीच्या वस्तूंचे प्रदान भगत-वीरांना होते. पण एवढ्यावर 'काज' संपत नाही. शेतीची आणि कुटुंबाची गरज म्हणून विधुर पुरुष आणि विधवा स्त्री यांच्या जोड्या, स्त्रीच्या पदरात, केवळ बंदा रुपया बांधून जमविल्या जातात. अत्यंत करुण प्रसंग परंतु तेवढ्याच आस्थेने कुटुंबांचे पुनर्वसन 'काज'मध्ये होते.

वनवासी, म्हणजे जंगलचे राजे! पूर्वापार त्यांचे निसर्गाशी नाते चालत आलेले आहे. या वनातूनच त्याचा महोदार दृष्टिकोण विकसित झालेला आहे. निसर्गाला ते देव मानतात आणि या वनोपजावरही खरा अधिकार त्यांच्याच आहे. वनस्पतींशी त्यांनी सदैव जवळीक साधल्यामुळे त्यांना पारंपरिक वनौषधींची माहिती झालेली आहे. पण याच निसर्गाने त्यांना परोपकार शिकविलेला आहे. ते वनौषधी देतील, पण त्याचा मोबदला मागणार नाहीत. मग 'पैसा, मोबदला घेतल्यावर ती वनौषधी गुणकारी प्रभावी होत नाही.' अशा अंधश्रद्धेत का त्याचे

रूपांतर होईना! पण आपण कृतज्ञच राहायचे ही त्या वनवासींची मुळातली खरी मानसिकता आहे. उपाशी असला तरी कधीही वनवासी मालकाला सांगणार नाही. कष्ट उपसीतच राहील. चोरी करायची नाही. भीक मागायची नाही ही वनवासींची जीवनमूल्ये आहेत. पण त्यांच्या नशिबी या मुक्या आचरणातूनच वेठबिगारी लादली गेली. हे सावकारांच्या आणि तथाकथित उच्चभ्रूंच्या नैतिकतेचे धिंडवडेच म्हणावे लागतील. या उलट दिलेल्या शब्दाला प्रामाणिकपणे जागणे, हे वनवासीचे जगणे आहे.

आता वनवासींच्या सौंदर्यदृष्टीचा विचार केला तर असे लक्षात येते की, त्यांना निश्चित निसर्ग सहवासानेच, सौंदर्यदृष्टी आलेली आहेच. या सौंदर्याबद्दल त्यांची जाणीव उपजतच आहे.

वनवासी स्वत: सुंदर आहेत, पण कष्टाच्या घामाच्या धर्मबिंदूत त्यांना त्यांच्या स्वत:च्या या अपूर्व सौंदर्याचे भानही नसते. किंबहुना आपल्या सौंदर्याबद्दलची जाणीव (कॉन्शसनेस) त्यांच्याजवळ नसल्याने त्यांचे हे सौंदर्य अधिकच खुलून दिसते. पण त्यांच्या त्या बेभान धुंदीतही सौंदर्यशास्त्रीय परिमाणे गवसतात. निसर्गसापेक्ष त्यांच्या या सौंदर्यविषयक जाणिवा आहेत. निसर्गाशी मनापासून एकरूप झालेल्या वनवासींनी सचेतन आणि अचेतन अशा दोन्हीतही पुरेपूर सौंदर्य पाहिले आणि आपली नकळत का होईना पण सौंदर्यदृष्टी प्रत्येक गोष्टीत ओतलेली आहे. म्हणूनच उघड्याने आंघोळ करणाऱ्या वनवासी स्त्रीला लाज वाटत नाही. तिच्या दृष्टीने पाहणाऱ्याच्या नजरेत पाप आहे.

वनांचे-जंगलांचे स्वरूप, सौंदर्य अबाधित राहावे, त्यासाठी झाडतोड होऊ नये असे त्यांना वाटते. केवळ 'राब' तोडणे-कापणे वेगळे आणि जंगल झाडे तोडून उजाड करणे वेगळे. तेव्हा वनांचे संरक्षण व्हावे किंबहुना वनोपजावरच आपले संपूर्ण जीवन आणि चरितार्थ अवलंबून आहे म्हणून निसर्गाचा पूजक आणि सृष्टी सौंदर्याचा भोक्ता-उपासक वनवासी वनांना जपतो-राखतो. तेवढ्यासाठी 'देवराई'ची कल्पनाही समजून घेतली पाहिजे. देवासाठी राखलेली फळे कोणी उतरवीत नाही. देवाच्या नावावर ती आमराई आणि अन्य फळ-झाडे सोडलेली असतात म्हणूनच तिला 'देवराई' म्हटले आहे. ही कल्पना या वनांच्या संरक्षणातूनच रुजलेली असणार यात संदेह नाही.

जंगलातील पाने, रंगीबेरंगी फुले, पक्ष्यांची पिसे यातले सौंदर्य वनवासींनी टिपले आणि त्याचा उपयोग त्यांनी दगिन्यांपेक्षाही सरस पद्धतीने प्रत्यक्षात केलेला आहे. 'जव्हार'चा दसरा पाहण्यासारखा असतो. रंगीबेरंगी फुलांनी नटलेल्या वनवासी स्त्रिया वाद्यांच्या गजरात मोठ्या तालासुरात नाचत पाड्यापाड्यांतून निघून जव्हारच्या 'हनुमान पॉईंट'वर अजूनही त्याच श्रद्धेने एकत्र येतात. तेव्हा वनवासींच्या आगळ्या सौंदर्यदृष्टीची आणि साधनेची ओळख पटते.

वनवासीच्या सौंदर्यशास्त्रीय परिमाणांचा विचार करताना त्यांच्या अंगभूत कलागुणांचा आविष्कार महत्त्वाचा ठरतो. वनवासींची लाकडी-भांडी, मातीच्या बनविलेल्या वस्तू, मुखवटे, बांबूंच्या वस्तू, झाडपाल्यापासून विविध नैसर्गिक रंग तयार करण्याची पद्धती, भांड्यांवरील नक्षीकाम, विणकाम, भरतकाम, चटया, टोपल्या, त्यांचे आकार पाहिले म्हणजे याची पुरेपूर कल्पना येते. सोन्याच्या दागिन्यांपेक्षा - कदाचित ते त्यांना परवडत नाही म्हणूनच - पर्यायी दागिने - मोरपिसे, कवड्या, शिंपले, प्राण्यांची शिंगे यापासून ते तयार करतात. निसर्गाची पूजा एकीकडे बांधणारा हा वनवासी ऊन, पाऊस, वारा, वादळ यांना सतत सामोरा जात असतो.

वनवासींजवळ सौंदर्यदृष्टी आहे. मात्र तिला समृद्धीची आणि पारंगत करणारी कौशल्ये देण्याची जोड नाही. आज त्या त्या क्षेत्रांतील जाणकारांकडून प्रशिक्षण त्यांना मिळत नाही. कलेच्या सादरीकरणाचीही सुव्यवस्था नाही. या साऱ्यांच्या अभावीदेखील वनवासींची कलोपासना सद्गुणसम्पन्न आणि अव्यभिचारी निष्ठेने चालूच आहे. यात त्यांच्या सर्वच ललित कलांचा समावेश करावा लागेल. त्यात नाट्य, संगीत, चित्र, शिल्प, साहित्य यांचा समावेश होतो. वनवासींची नृत्ये, वाद्ये, चित्रकला, शिल्पकला, कसरतीचे नाच, संवादनाट्य सारेच मनोरंजनाच्या भक्तिभावाने तल्लीनतेमधून साकार झालेले आहे. मग तो तारपा नाच असो, नाही तर ढोल नाच असो. बोहाड्यातील विविध देवदेवतांना मिरवतानाचे वेगवेगळ्या प्रकारचे नाच असोत; उपाशी पोटीही ही धुंदी बेहोषी एक दुर्मिळ कला आहे.

वनवासींच्या हस्तकलेचे, वारली चित्रकलेचे, समूह नृत्याचे,

शिल्पकलेचे त्यांच्या नकळत 'मार्केटिंग' आंतरराष्ट्रीय पातळीवरील करणारे 'गट' - दलाल यातूनच निर्माण झालेले आहेत. पंचतारांकित हॉटेलमध्ये आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील वारली पेंटीग्ज महत्त्व पावली आहेत. हा आदिवासींच्या सौंदर्यदृष्टीचा ठोस पुरावा आहे. तांदळाच्या पीठाने शेणाच्या झोपडीवर काडीने उमटवलेली, रेखाटलेली ही चित्रकला, हेच ठसे आंतरराष्ट्रीय मान्यता पावले आहेत.

वनवासींचे लोकसाहित्य मौखिक परंपरेने चालत आलेले आणि जतन केलेले आहे. त्यांच्या विवाहातील गाणी, रीती, धवल गीते, कामडी-गौरी गीते, कथा श्रवणीय आहेत. या माध्यमांतून निसर्गाच्या साक्षीने हे सौंदर्यशास्त्र ओसंडते आहे. भावना आणि संकेत यांचा हा मेळ आहे. देव्हाऱ्यात ठेवूनच ते तारपा, वाद्ये आणि चित्रे पुजितात; ही श्रद्धा त्यांच्या मुळाशी आहे. गीतांमध्ये सौंदर्य लय आहे. अंतर्गत लय आणि नाद आहे. याचे हे उदाहरण पहा...

**'नंदा रडू नको गं मनामधी । तुला दिल नाही गं वनामधी ।।**
**तुझी सासू आहे गं आईवानी । तुला वागवीन गं लेकीवानी ।।**

मुलगी सासरी जात असतानाचे ही गीत भावसौंदर्य परिपूर्ण आहे.

वनवासींच्या 'थाळगाना'चीही किमया अशीच आहे. हे थाळगान सौंदर्यशास्त्रीय दृष्टीचेच द्योतक आहे. काशाचा थाळा, काळे मेण, सोराट्याची पोकळ २/३ फूट उंचीची काडी ही त्याची सामग्री. काशाच्या थाळ्यात मेण मध्यभागी चिकटवितात. त्यात सोराट्याची काडी रोवतात आणि कथेकरी आपल्या दोन्ही हातांच्या आंगठा आणि तर्जनीचा वापर करून वरपासून खालपर्यंत त्या काठीवर हात फिरवून थाळीतून सुमधुर स्वरकंपने काढतात आणि धार्मिक कथा लावतात. तो कथाकार मध्यभागी आणि श्रोते गोलाकार सभोवती बसून म्हणाल तितक्या वेळ नादमय - स्वरबद्ध कथा ऐकतात. हे सारे सुंदर आहे.

वनवासींच्या सामाजिक परिमाणांचा, निकषांचा समावेश त्यांच्या नैतिकतेचा आणि सौंदर्यशास्त्रीय दृष्टीचा विचार करताना स्वाभाविकपणेच ओघात झालेला आहे. वस्तुतः त्याचे वेगळे विवेचन करण्याची फारशी आवश्यकताही नाही. पण वनवासींचे सण, उत्सव, प्रथा, म्हणी, शब्दकळा, उखाणे, वाक्प्रचार सगळेच लक्षवेधी आहे. त्यांचे पर्यावरणशास्त्र

म्हणीत सामावलेले आहे.

भाया बसविणे, कंदोरी करणे, वाघबारस, वीर नाचवणे, काज करणे, पडकाई, कवळी भाजी, कणसरी कथा या सगळ्यात वनवासींच्या सांघिक, सामूहिक कृती-उक्तीचे प्रत्यंतर येते.

गवताचे छप्पर आणि कुडाच्या भिंतीच्या या घरात राहणारा वनवासी वाडी, वस्ती करून राहतो. झाडपाला, कंदमुळे, सापाचा कंद, हालिंद कंद-वनस्पती रोजच्या आहारात खातो. वनवासी स्त्रिया धांदुक (अर्धे लुगडे) फडकी वापरतात. माणसाला किती कमी गरजात जगता येते याचे उदाहरण म्हणजे 'फडकं घे, मडकं घे अन् सूट...' ही बोलकी म्हण आहे. लाज राखायला फडके आणि पाणी प्यायला, अन्न शिजवायला एक मडके पुरे- ! उद्याचा– भवितव्याचा विचार करायला कष्टकरींना वेळच नाही. भावी पिढ्यांचीही काळजी नाही. 'मध' आणि 'डिंक' विकून मीठ आणि (भारंभार) कांदे विकत अजूनही ते बाजारातून घेतात.

रंगावरून नोटा मोजतात आणि सावकारांकडून नाडले जातात. वैद्यकीय उपचार घेत नाहीत - भगतावर अवलंबून मृत्युपंथाला लागतात. अजूनही मागासलेल्या जाती, ढोर कोळी, कातकरी किंवा काथोडी मेलेल्या गुरांचे मांस खातात आणि डोळ्यांतला मोतिबिंदू बाभळीच्या काट्याने काढतात. कुपोषणाने लहान मुलांचे मृत्यू होतात. समाजधुरीण वनवासींना मुख्य प्रवाहात आणण्याची भाषा वापरतात.

आज वनवासी समाजात फक्त महादेव कोळी आणि कोकणा या दोन उपजाती तुलनेने पुढारलेल्या दिसतात. पण मल्हार कोळी, वारली, 'क' ठाकूर, 'म' ठाकूर, भिल्ल/कातकरी, पारधी, टोकरा, सूर्यवंशी, चुंबळी, पखाली, पानकरी कोळी आणि कोरकू-गोंड या मागेच आहेत.

वनवासींची उदार, उदात्त अशी नैतिकता, सौंदर्यदृष्टी आणि सामाजिकता यांना अबाधित ठेवून त्यांच्या सांस्कृतिक मूल्यांचे जतन करूनच त्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. आज आपण त्यांची मूळ-कृषि आणि वन-संस्कृती टिकवून; अज्ञान आणि दारिद्र्य नाहिसे करू शकलो, तरच धन्य होता येईल.

❋❋❋

# वनवासी साहित्य : एक दृष्टिक्षेप

साहित्य वर्तुळात आता वनवासी साहित्य हे एक स्वतंत्र दालन प्रस्थापित झाले आहे. लोकशिक्षणाबरोबरच वनवासींमधील लेखकही जागृत होऊन लिहू लागले आहेत. मराठीमध्ये अन्य साहित्यिकाप्रमाणेच हा एक जोमदार साहित्य प्रवाह ठरत आहे. हे लक्षात घेता वनवासी साहित्य हे समीक्षकांच्याही चिंतनाचा विषय झाला आहे.

**ललित साहित्य निर्मिती**

आता वनवासी साहित्याच्या प्रवाहाने आजवरच्या वैचारिक साहित्याच्या जोडीला ललित साहित्य निर्मितीसाठी विशेष जोर धरलेला आहे. मराठीमध्ये १९६० नंतरच्या ग्रामीण आणि दलित साहित्याच्या एका जोरकस प्रवाहात हा वनवासी साहित्याचा प्रवाह क्षीण होता. परंतु अलिकडील १९८०च्या दशकात व त्यानंतर वनवासी लेखक-साहित्यिकांनी बरीच मोठी मजल गाठली आहे हे स्पष्टपणे दिसून येते. त्यावेळच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीतून या वनवासी साहित्य निर्मितीलाही प्रेरणा मिळत गेलेली आहे. याचे कारण मागास, उपेक्षित, दुर्गम डोंगराळ भागात राहून दऱ्या खोऱ्यात वावरणारेसुद्धा संथ गतीने का होईना पण सुशिक्षित झाले. त्यामुळे त्यांनी आपल्या भाव भावनांना मुखरित केले. किंबहुना त्या भावना स्वाभाविकपणे मुखरित झाल्या असे म्हणता येईल. त्यातूनच मग वनवासी लेखकांची एक पिढी निर्माण झाली. या वनवासी साहित्यिकांच्या प्रेरणा नेमक्या कोणकोणत्या आहेत; वनवासी साहित्याचे स्वरूप कसे आहे, त्याची वाटचाल कशी होत आहे, वनवासींच्या मौखिक परंपरेतील लोकगीते, लोककला, लोकनृत्ये, लोकजागर त्याचबरोबर आधुनिक वाङ्मय प्रकारातील कविता, कादंबरी, चरित्र-आत्मचरित्र सदृश साहित्य यांचा समाज शास्त्रीय समीक्षादृष्टीने अभ्यास होऊ लागला.

## वनवासींचे जीवनमान आणि राहणीमान

वनवासींच्या विविध जाती, उपजातीं बरोबरच त्यांच्या विविध बोली, त्या बोलींचे व्याकरण इत्यादी अनेक अंगाने अभ्यासकांना विचार करायला भाग पाडले आहे. त्यामध्ये वनवासींचा इतिहास, त्यांची पूर्व परंपरा, वनवासींमधील गत क्रांतिकारक, या वनवासींचा स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील विविध चळवळीतील वनवासी क्रांतीकारक आणि स्वातंत्र्यलढ्यातील वनवासी सैनिक यांचा शोध घेऊन संशोधनपर ग्रंथांच्या निर्मितीला प्रारंभ झाला आहे. वनवासींचे चालत आलेले भारतीय संस्कृती जोपासणारे जीवनमान आणि राहणीमान याचे मूलगामी चिंतन होत आहे. पर्यावरण, वनौषधी, लोकसमजुती, लोकवैद्यक याचा सखोल अभ्यास करण्याची गरज लक्षात आली आहे. भारतीय विचारवंतांप्रमाणेच विदेशी अभ्यासकही या वनवासींच्या राहणीमानात आणि जीवनमानाच्या अभ्यासाकडे आकृष्ट झाले आहेत. त्यामुळे वनवासींच्या वैचारिक साहित्यातही सतत भर पडत आहे.

## वनवासी आणि बिगर वनवासी

वनवासी साहित्य निर्मिती, प्रेरणा, स्वरूप आणि भवितव्य याबाबत विचार करताना या लेखक वा साहित्यिकांचे आपोआप दोन गट लक्षात येतात. एक वनवासी समाजात जन्मलेले वाढलेले लेखक साहित्यिक आणि दुसरा वनवासींबद्दल कमालीची आत्मीयता, आपुलकी, बंधुभाव आणि अभ्यास केलेले परंतु बिगर वनवासी लेखक आणि साहित्यिक होय. त्यात समाजशास्त्र आणि इतिहास संशोधकही आहेत. या सगळ्या बिगर वनवासी आणि वनवासी लेखकांच्या नामोल्लेखांची येथे आवश्यकता नाही. त्यापेक्षा प्रथम वनवासी साहित्याची व्याख्या आपण सिद्ध केली पाहिजे. दलित साहित्याची व्याख्या ज्या पद्धतीने केली गेली त्याचप्रमाणे वनवासी साहित्याची व्याख्या होईल. "जो स्वत: जन्माने वनवासी आहे अशा वनवासी समाजातील लेखक-साहित्यिक त्याने लिहिलेले साहित्य त्याला वनवासी साहित्य म्हणावे." बिगर वनवासींनीही विपुल साहित्य या वनवासींबद्दल निर्माण केलेले

आहे पण त्याचा येथे वनवासी साहित्य विश्वात समावेश करता येत नाही. अन्यथा अशा प्रकारच्या साहित्याच्या संदर्भात व्याख्यांचाही पुनर्विचार आपल्याला करावा लागेल. तेव्हा 'जन्माने वनवासी असून त्याने निर्माण केलेले साहित्य' ते वनवासी साहित्य ही व्याख्या गृहीत धरावी लागते. मात्र वनवासीहून इतर लेखकांनी जाणीवपूर्वक वनवासींबद्दल केलेल्या निष्ठापूर्वक लेखनाचे भान ठेवावे लागणार आहे. अशा या मर्यादांमध्येच वनवासी साहित्यविचार करावा लागतो.

**प्रकाशित वनवासी साहित्य :**

आज वनवासींच्या प्रकाशित साहित्याने लक्ष वेधले आहे म्हणूनच वनवासी मेळावे आणि साहित्य संमेलने भरत आहेत. विदर्भ महाराष्ट्रातील वनवासी बहुल भागाचा त्यात पुढाकार आहे. वनवासी नियतकालिके रुजत आहेत. वनवासींच्या आज उपलब्ध झालेल्या प्रकाशित लेखनातून पूर्वीच्या वनवासींच्या इतिहासाचे स्मरण, व्यक्तिगत पातळीवरील जीवनानुभव, राष्ट्रप्रेम, अस्मिता जागरण, संघर्ष, आत्मभान, स्वत:च्या संस्कृतीचे वेगळेपण आणि जपवणूक, सात्विक संतापाचे प्रगटीकरण, समाज प्रबोधन अशा अनेक मुद्द्यांना आविष्कृत केलेले आहे.

दलित साहित्याच्या गदारोळात वनवासींचे शोषण, वेठबिगारी, वेदना, व्यथा याचा फारसा विचार झालेला नाही. दऱ्या खोऱ्यातील एक्कलकोंड्या जीवनाची दखल घेतली गेली नाही. निसर्गाच्या सान्निध्यात एकीकडे निसर्गाला तोंड देत वनवासींनी साधलेला सुसंवाद आलेला नाही. त्याचा परिणाम म्हणजे वनवासींच्या साहित्याने फारशी जवळीक अन्य साहित्य प्रवाहाशी साधलेली दिसत नाही. वनवासी स्वत:च्या संस्कृतीत रमले, त्यातील सम्पन्नता त्यांना जाणवली. नागरी जीवनापासून त्यांना दूर राहावे लागले. सामाजिक न्यूनगंडापासून वनवासी अलिप्त राहिला. स्पृश्यास्पृश्याचा प्रश्नही उद्‌भवला नाही म्हणून त्या वनवासींच्या साहित्यात विद्रोहाची भाषा तीव्र नाही, सर्रास आढळत नाही. मात्र आधुनिक विकासात त्याला स्थान लाभले नाही याची खंत मात्र त्यांच्या साहित्यातून प्रगट झाली आहे. त्यांची स्वत्वाची जाणिव सतत

तेवत आहे. नागवले गेल्याची त्यांना चीड आहे. धर्म, संस्कृतीपासून आपल्याला वंचित ठेवल्याची त्यांची भावना नाही. निसर्ग हाच देव आणि विकासापासून कोसोदूर राहण्यातच त्यांनी बेधुंद आनंद मानला. माणसाच्या स्वतंत्र समतेचा निर्भय पुरस्कार असे स्वरूप वनवासी साहित्याला प्राप्त झाले आहे.

## व्यक्तिगत आणि समूह अनुभवाची अभिव्यक्ती

वनवासी कविता या अनुभूतीच्या संदर्भात तपासावी लागेल. अदिवासी कविता (१९७६), मोहोळ (१९८२), वनवासी (१९८४), गोधड (१९८७), गोंडवन पेटले आहे (१९८७), उलगुलान (१९९७), इंद्रियारण्य (१९९०), वणसूर्य (१९९१), जागवा मने पेटवा मशाली (१९९१), आरडऽगे कुहुबाय ऽऽ (२०१२) या भुजंग मेश्राम, उत्तमराव धोंडगे, वाहरू सोनवणे, विनायक तुमराम, नीलकांत कुलसंगे, पुरुषोत्तम शेळमाके, वामन शेळमाके, लक्ष्मण टोपले इत्यादींच्या कवितांमधून याच व्यक्तिगत आणि सामुदायिक अनुभवाची प्रतिभाजनित कलात्म पातळीवरील अभिव्यक्ती होताना जाणवते. त्यात भवितव्याबद्दलचा आत्मविश्वास आढळून येतो. याशिवाय प्रभू राजगडकर, अमित गडकर, उषाकिरण अत्राम, नरेंद्र पोयाम, एस्.री. मडावी, बाबाराव मडावी इत्यादी कवींच्या कवितातूनही वनवासींची हीच मनोवस्था दिसते. वनवासींच्या समृद्ध सांस्कृतिक व कलात्मक जीवनाचा साक्षात्कार अद्याप या कवितेने प्रगट करावयाचा आहे. केवळ वेदना, विद्रोह, धर्मनिष्ठा, दांभिक सांप्रदायिकता मांडून काव्यात्मकतेला पारखे होऊन चालणार नाही. संस्कृतीचा समृद्ध वारसा जपत, प्रतिभेचा विमुक्त अविष्कारच वनवासी कवितेला आमूलाग्र श्रेष्ठ कलामूल्यांचे जतन करायला भाग पाडील असा विश्वास ही कविता देते. अशीच प्रचिती वनवासींच्या काथात्मक, नाट्यात्म, स्वकथनात्म साहित्यातून येते. त्याचा स्वतंत्रपणे विचार व्हावा.

❋❋❋

# वनवासी लोकसाहित्याचे स्वरूप

खऱ्या अर्थाने लोकसाहित्याचे स्वरूप उलगडवून दाखविण्याची क्षमता असलेले वनवासी लोकसाहित्य आहे. ते 'आदिम' म्हणजे अतिप्राचीन तर आहेच, त्याचे कूळ आणि मूळ शोधणेही अवघड आहे. ते मौखिक स्वरूपातच आजही आढळते. लिखित लोकसाहित्यात वनवासी साहित्याचा फारसा समावेश झालेला दिसत नाही. शासनाच्या लोकसाहित्य संकलन समितीने हे काम जाणीवपूर्वक हाती घेणे गरजेचे आहे.

**लोकमानस आविष्कार**

वनवासी लोकसाहित्यात लोकमानस उत्कटतेने आणि प्रभावीपणे आविष्कृत झालेले आहे. लोक समूहाची ती सांधिक निर्मिती आहे. समूहाचे मन त्यातून अभिव्यक्त होते. समुदायाच्या भावना त्यातून साकार होतात. वनवासी लोकसाहित्यात लोकसंस्कृती जतन करून ठेवलेली आहे. हा अनमोल ठेवा एवढ्यासाठीच जपला पाहिजे. आता तो लिखित स्वरूपात प्रकाशित होण्याची तीव्र गरज आहे. वनवासी जीवनमान आणि राहणीमानाची त्यातून सुयोग्य कल्पना येऊ शकेल. वनवासी समाजाचे जगणे, सकाळपासून संध्याकाळपर्यंतची दिनचर्या त्यातून स्पष्ट होईल. तसेच त्यांचे सण, वार, जन्म, विवाह आणि मर्तिकाचे संस्कार, व्यवहार कळतील. त्यांची श्रद्धास्थाने, देव देवता, उपचार तंत्र, विश्वास, समज अपसमज कळतील. तत्कालीन रूढी, लोककलेचेही ज्ञान त्यांतून होईल.

**वनवासी लोकसाहित्यातील लोकतत्त्व**

आज लोकतत्त्व (Folk elements) विचाराला साहित्यात विशेष महत्त्व आले आहे. त्यातूनच लोकतत्त्वीय समीक्षा आकार घेत आहे. लोकसाहित्यात हे लोकतत्त्व अनुस्यूत आहे आणि समर्थ, कसदार साहित्यात या लोकतत्त्वाचा प्रत्यय येतो. वनवासी साहित्यात विशेष रूपात या लोकतत्त्वांची जाणीव होते. लोकसाहित्यातील लोकतत्त्वांच्या अभ्यासाला आता गती येत आहे. प्राचीन मराठी वाङ्मयातील लोकतत्त्व

हा अभ्यास ग्रंथरूपात डॉ. सौ.अमिता मुजुमदार यांनी १९८८ मध्येच मांडलेला आहे. वनवासींचे लोकसाहित्य लोकनिर्मित असून ते लोकांसाठीच आहे. लोकांचे, लोकांसाठी वनवासी लोकांकडून निर्माण झालेले हे लोकसाहित्य आहे. लोकतत्त्वाने ते भारलेले, झापटलेले साहित्य आहे. त्यातून वनवासींच्या स्व-लोकाभिमुखतेचा अनुभव येतो. वनवासी समाज, धर्मजीवन आणि साहित्याचे आकलन होण्यासाठी या वनवासींच्या लोकसाहित्याची फार मोठी मदत निश्चित होऊ शकेल. वनवासींच्या सांस्कृतिक इतिहासाला त्यांच्या लोक साहित्याच्या अभ्यासाने अधिक उजाळा मिळेल. लोकभ्रम, लोकविधी, लोकश्रद्धा आणि लोकविद्या, वनवासी लोक दैवतांचा बोध होईल. समूह मनाच्या या आविष्काराला असलेल्या परंपरेची ओढ स्पष्ट होईल. यासाठी वनवासी लोकसाहित्यातील लोकतत्त्व आकलनाला आणि लोकमाध्यमाच्या अभ्यासाला महत्त्व आहे.

**आदिवासींचे मौखिक साहित्य**

वनवासी लोकसाहित्य, लोकसाहित्याचे वैशिष्ट्य म्हणून मौखिक परंपरेनेच आपल्यापर्यंत येऊन पोहचले आहे. त्याला जनसाहित्य म्हणता येईल. त्यात लोककथा, लोकगीते, जानपदगीते, देवा माणसांच्या जन्म मरणाच्या कथा, म्हणी, वाक्प्रचार, कोडी, उखाणे, सर्व प्रकारच्या लोकविद्या यांचा समावेश होतो. या साहित्याचे शब्दसौंदर्य, भावसौंदर्य, अर्थसौंदर्य अभ्यासण्याजोगे आहे.

वनवासींची निसर्गावरील भक्ती, बोली भाषेचे लोभस आणि लाघवी स्वरूप, नाते-संबंधाच्या वर्णनातील जिव्हाळा, लोकसमज साहित्याला अस्सल देशीवळणाने नेणारे आहे. निसर्गाशीच वनवासी मुक्तसंवाद साधीत असे. त्यामुळे वनवासी लोकसाहित्यात विविधता आढळते. वनवासींच्या परंपरेने चालत आलेल्या काही समजुती आणि आडाखे लक्षात घेण्याजोगे आहेत. 'मुंग्या आपली अंडी वर घेऊन चालल्या की समजावे यंदा भरपूर पाऊस पडेल. कारण त्या मुंग्या आपली अंडी सुरक्षित जागी हलवितात.' कावळ्याने घरटा शेंड्यावर बांधला की समजावे यंदा पाऊस कमी पडणार. झाडाच्या मध्यावर खोडाशी बांधला तर पाऊस वारा, वावधान जास्ती होईल. जमिनीत कीडेकीटक झाले, पिंपळ हिरवागार झाला, गुलमोहर आगीसारखा

फुलला, पळसाला केशरी रंगाची फुले आली तर मग पावसाळा सुरू होणार. वारूळाच्या वरच्या कंगोऱ्यावरून उत्तर दक्षिण दिशा होकायंत्रासारखी ते ओळखतात. या वनवासींच्या समजूती अभ्यासनीय ठराव्यात.

**वनवासी लोकसाहित्यातील 'देशी' पणा**

वनवासी लोकसाहित्यातील पाळेमुळे खणून काढली, शोधली तर त्यात अस्सल देशीवादाची प्रचिती अभ्यासकाला येऊ शकेल. प्रतिक्रिया म्हणूनच देशीपणा साहित्यात अवतरत असतो. परकी संस्कृती संघर्ष त्याला कारणीभूत असतो आणि अशा संघर्षाला वनवासी लोकसमूहाने निश्चितच सामना केला असेल. त्या परकीय संस्कृतीच्या आक्रमणाला प्रत्युत्तर म्हणून आपल्या देवदेवता, आचार-विचार संस्काराच्या कल्पना, श्रद्धा, अंधश्रद्धा, आपल्याला अवगत असलेल्या पारंपरिक विद्या एतद्देशीय म्हणून भारतीय संस्कृतीशी असलेले नाते, जोडली गेलेली नाळ स्पष्टपणे या वनवासी लोकसाहित्यात अवश्य जपली असली पाहिजे. याची उदाहरणे अनेक देता येतील. वनवासींच्या लोकसाहित्यात ती प्रतिबिंबित झालेली आहे. 'देशी'पणाची आवाहकताही या साहित्यात आढळते. या लोकसाहित्याच्या आकलनासाठी समाजशास्त्रीय दृष्टिकोण आणि समीक्षा पद्धती विशेष उपयुक्त ठरू शकेल. मग या साहित्यातून देशी सत्त्वाचा प्रत्यय घेता येईल. देशीवादाच्या स्वीकाराने हे आकलन अधिक चांगले होईल असे वाटते.

अडाणी गरीब दरिद्री असला तरीही कोणताही माणूस एकाकी, आयसोलेटेड, संस्कृती विरहित जीवन जगू शकत नाही. यास्तव धर्मविधी, देवदेवता, ग्रामदेवता निर्माण करून त्यांना आपल्या श्रद्धा आणि निष्ठा वाहाव्या लागतात. वनवासींनी आपले जीवन सुसह्य करण्यासाठी ग्रामदेवता मानलेल्या दिसतात. ग्रामदैवत अख्ख्या गावाचे होते. पाड्यावरही त्याची यात्रा भरते. उत्सव होतो. या ग्रामदैवताचा त्याने स्वत:ला धाक घालून घेतलेला आहे. दुष्काळ, बर्बादी टळून पीकपाणी यावे म्हणून तो ग्रामदेवताला भजत असतो. त्याआधारे हितसंबंधही जपले जातात. भाबड्या मनाला विराम मिळतो. ग्रामदेवतांच्या उत्सवात कोठेही भेदभाव नसतो. भस्मदेव, मरीमाता, वराई माता, वाघदेव, शिवल्या देव, नागदेव, खंडोबा, आसरा, भैरोबा, दुल्हादेव,

बडादेव या ग्रामदेवतांची वनवासी पूजा बांधतात.

**समृद्ध लोकसंस्कृती आणि प्रतिमा विश्व**

वनवासी लोकसाहित्यातून निर्मात्याच्या समृद्ध प्रतिमा विश्वाचा प्रत्यय येतो. त्याचप्रमाणे समृद्ध लोकसंस्कृतीचीही जाणीव होते. मौखिक परंपरेने चालत आलेल्या वनवासींच्या लोकसाहित्यातून लोककथा, लोकगीते, म्हणी, वाक्प्रचारातून, लोकविधी आणि लोकश्रद्धांमधून वनवासींची आगळी जीवनशैली आणि संस्कृती आपण समजून घेऊ शकतो. त्यांच्या संस्कृतीची पाळेमुळे मौखिक साहित्यातील प्रतिमाविश्वात दडलेली आहेत. एक व्यापक वैश्विक मानवतावादी अशी ही संस्कृती आहे. या संस्कृतीत आतिथ्यशीलता, समरसता, माणुसकीचा गहिंवर आणि एकात्मता जाणवते. याला लोकसाहित्याचा पुरावा आणि वारसा आहे. वनवासींचा डोंगऱ्या देव म्हणजे डोंगरातला महादेवच आहे किंवा त्यांच्या विवाह संस्कारातील विवाहापूर्वी गायिले जाणारे 'ढवळगाण' व 'ढवळी' स्त्री म्हणजे धवलगिरी पर्वतावरील शंकर पार्वतीच्या लागलेल्या लग्नाच्यावेळचे ते गाणे आहे.

भिल्लांच्या बोलीभाषेतील बारशाच्या लोकगीतात स्त्रीयांनी देवाधर्माचे स्तवन केले आहे. हे एक धार्मिक गीत आहे. "वरखडीला जीवानी गाडी सजने शंकरदेवजी पार्वती नटती लक्ष्म्या आईने पूजा भोपनी शंकर देवनी पूजा थोपवी."

डॉ.रमेश कुबल यांनी वनवासी नाटक या लेखात नमूद केल्याप्रमाणे 'वनवासींच्या धर्माचरणात भक्तीबरोबरच सर्जन आणि आस्वाद या क्रिया एकाचवेळी घडत असल्यामुळे वनवासींचे धर्माचरण विधी, कलाप्रकार कलाविष्कार म्हणून ओळखले जातात.' यांत यात्वात्मकता, प्रतीकात्मकता, प्राकृतिकता, मंत्रशरणता आणि आविष्कारातील हर्षनिर्भरता हे वनवासी धाटीचे पंचप्राण म्हणून त्यांनी उल्लेखिलेले आहेत. त्यात वनवासींची धार्मिकता, सामाजिकता सामावलेली आहे. त्यांचे हे धार्मिक पूजाविधी नृत्य, गायन, वादन, नाट्य, नाद, लय संगीताने भारलेले असतात. बोहाडा, कांबडनाच, ढोलनाच, तारपानृत्य, थाळगानात कणसरी पूजन, काज असे नाट्यात्मक विधी आणि विधीनाट्ये वनवासी संस्कृतीत आहेत. या साऱ्यांचे दर्शन

त्यांच्या लोकसाहित्यातून घडते. ही लोकसाहित्याची जुनी आणि समृद्ध परंपरा आहे. त्यांचे नाच गाणे म्हणजे जगणेच असते. त्यांचे जगणे हीच कला आहे; आणि त्यांच्या लोककला हेच जीवन आहे.

**वनवासींच्या लोककथा**

लोकसाहित्यात ग्रामीण लोकमानस साक्षात झालेले असते. जात्यावरच्या ओव्या, खेळगीते, सण, उत्सव, गीते, विविध नाच, जागरण, दंडार, भारूड, गोंधळ इत्यादी प्रसंगानुकूल गीते या लोकसाहित्यात वास्तवरुपात प्रतिबिंबित झालेले असते. लोककलांचा-लोकवाद्ये, लोकनृत्ये, लोकश्रद्धा यांचा समावेश लोकसाहित्याची महत्त्वाची अंगे म्हणून करता येतो. मांदोळ, नाच, काज, थाळगान, बोहाडा, लगीनगीत, गौरीगीत, भोंडल्याचा नि टिपऱ्यांचा नाच, मर्तिक नाच, तोरण व सवण, डोंगरच्या मावल्या, डाका, तारपा, हस्तकला, चित्रकला, ढोलनाच यांची गणना लोककलात होते.

गाईच्या शेणानं सावरलेल्या कुडाच्या लिंपलेल्या भिंती असलेल्या झोपड्यांवर तांदळाच्या पीठाने रेखाटलेली ही चित्रकला वारली पेंटीग्ज म्हणून प्रसिद्ध आहे. त्यात रेखांचे सामर्थ्य, प्रत्ययाला येते. बांबूच्या, घायपाताच्या धाग्यातून विणलेल्या टोपल्या, चटया, टोप्या, पिशव्या वनवासींच्या हस्तकलेचे नमुने आहेत. त्यातही सूक्ष्मता आणि कमालीचे सौंदर्य आहे. त्यांची कोडी, कूटे, नृत्यकला आणि त्यातील कसरतीचे खेळ अनुभवण्यासारखे आहेत.

**वनवासींची लोकनृत्ये आणि वाद्ये**

वनवासींच्या जीवनामध्ये एकूणच लोकसाहित्याला आणि त्यातल्या त्यात लोकगीतांना फार महत्त्व आहे. ही लोकगीते जीवनातील बहुतेक सर्व महत्त्वाच्या घटनाप्रसंगांना आणि संस्कारांना उद्देशून रचलेली आहेत. वनवासी निसर्गपूजक असल्यामुळे आणि कृषी हेच त्यांचे जगणे असल्यामुळे ते पावसाला 'परमेसर' मानतात. धान्य पिकवणाऱ्या जमिनीला 'धरतरी' शेतीकामात उपयोगी पडणाऱ्या गायत्रीला 'गावतरी'तर कणसाला 'कणसरी' अशा देवताच मानतात. चंद्र, सूर्य, वीज, ढग हे सारेच त्यांना पूजनीय देव आहेत. कणसरी या अन्नधान्य देणाऱ्या

देवतेच्या प्रार्थनेच्या वेळी मुख्यत: वारली लोक 'ढाक' हे लोकवाद्य वाजवतात. ढाक हा विशिष्ट प्रकारचा ढोलच आहे. मोठ्या डमरूच्या आकाराचा तो असतो. ठाणे आणि नाशिक जिल्ह्यात हे वाद्य विशेष करून पाहायला मिळते. कळंब झाडाचे पोकळ लाकडी खोड आणि बोकडाची कातडी यापासून हे वाद्य बनते. कातडीच्या दोन्ही कुंडांना ७/७ छिद्रे असतात. त्यातून ही कातडी घट्ट ओढून विधीपूर्वक वाद्य तयार केले जाते. हे वाद्य सजवून समूहगानात वाजवले जाते.

या वाद्याच्या तालावर बेफाम होऊन भगत नाचतो. कणसरी देवीच्या प्रार्थनेची ही परंपरा आहे.

घांगळी हे वनवासी लोकनृत्यात वाजविले जाणारे पारंपारिक वाद्य आहे. सणवार, भूमाता आणि कणसरी देवता या उत्सवात विशेषत: वारली समाज साजश्रृंगार लेवून नृत्य करतात. भूमातेकडून मिळालेलं वाद्य घांगळी आहे अशी वनवासींची श्रद्धा आहे. घांगळी वाजवताना गाण्यासोबत कथाही लावली जाते. मोरपिसे, काचेच्या रंगीत बांगड्या, आरसा किंवा बोटांच्या साहाय्याने घांगळी हे तंतुवाद्य वाजवले जाते.

भांगसरथळा हे वाद्य 'सरपट' नावाच्या झाडाच्या काठीच्या खालच्या टोकाला एक विशेष प्रकारचे मेण लावून ती काशाच्या थाळीच्या पृष्ठभागावर चिकटवून बनवितात. वरपासून खालपर्यंत काठीवर अंगठा आणि तर्जनीने कंपन निर्माण करून त्याच्या लयीवर वनवासी कथा सांगतो. याला थाळगान म्हणतात. वारली आणि कोकणा समाजात ठाणे, नाशिक जिल्ह्यात थाळगान सर्रास रूढ आहे.

वनवासी स्त्रीपुरुष सुगीच्या दिवसात मोठ्या उत्साहाने ढोलनाच करतात. वनवासींमध्ये विविध प्रकारचे आणि आकाराचे ढोल ढोलक्या प्रचारात आहेत. माडिया लोकांचे ढोल तीन-साडेतीन मीटर लांबीचे असतात आणि दोन ते तीन फूट व्यासाचे असतात. त्याच्या मध्यभागी चिक्कणमाती लावलेली असते. हा ढोल वाजवताना गव्याचे शिंग असलेले शिरस्त्राण डोक्यावर धारण करतात. बांबूंच्या कामट्यांवर हे शिरस्त्राण बसवून त्याला मागच्या बाजूने मोरपिसे, कोंबडीची पिसे आणि पुढच्या बाजूला गव्याची शिंगे मढवलेली असतात. पारंपारिक

नृत्यानंतर त्याचे भाग सुटे करून बांबूंच्या पेटीत ठेवले जातात. माडीयांच्या या प्रथेप्रमाणेच वनवासी कसरतींसह ढोलनाच करतात आणि त्याच्या तालात गीतगायन होते.

महाराष्ट्रातील मल्हार कोळी, ढोर कोळी, ठाकूर, कातकरी या वनवासींच्या पारंपारिक नृत्याला ढोलाची साथ लागतेच. गोकुळाष्टमी, वाघबारस, शिमगा या सणाला या नृत्याला बहर येतो. शंकर, पार्वती, विष्णू, भूमाता, चंद्र, सूर्य यांना वंदन करून नृत्याची अखेर होते.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध लोकवाद्य म्हणजे वनवासींचे 'तारपा' हे होय. तारपा हे वाद्य सुक्या दुधी भोपळ्यापासून तयार केलेले असते. त्याला बांबू जोडून तारपा हे वाद्य बनविले जाते. भोपळ्याची लांबी मोठी असते. ताडाच्या पानापासून मेण लावून बासरीसारख्या नळ्या आणि कर्णा बसविलेला असतो. नारददेवाने तारपावाद्य दिले असा समज वारली मानतात. सुगीच्या दिवसात निघालेल्या पिकाचा आनंद लुटण्यासाठी वनवासी स्त्री पुरुष रिंगणात फेर धरून तारपाच्या तालावर मनसोक्त रात्र जागवितात. वनवासींच्या तारपानृत्यात पावलं टाकण्याच्या पद्धतीला महत्त्व आहे.

वनवासींनाही आपले देवधर्म आहेत. लोकदैवते आहेत. वेताळ झोटींग, माऊल्या, वाघोबा, हिरवा देव, म्हसोबा, कान्होबा, कणसरी, दुंदुर्भा, सारजा, नृसिंह, बहिरोबा, अहिरावण, गावदेवी या ग्रामदेवतांना त्यांनी आपल्या देव्हाऱ्यात स्थान दिलेले आहे. वनवासींना निसर्गाच्या सहवासाने सौंदर्यदृष्टी उपजतच लाभलेली आहे. त्यांच्या सौंदर्यविषयक जाणिवा निसर्गसापेक्ष आहेत. 'देवराईची' कल्पना निसर्गपूजक वनवासींनीच जपलेली आहे. वनवासींच्या बोहाड्यातही देव देवतांना मिरवताना विविध प्रकारची नृत्ये तल्लीन होऊन करतात.

### वनवासींच्या लोकसाहित्यातून प्रतीत होणारा उदात्त दृष्टिकोण

वनवासींमध्ये मातृसत्ताक पद्धतीचा प्रभाव अद्यापही टिकून आहे. म्हणूनच वनवासींच्या विवाहात मुलीच्या पित्याला देहज (धान्य, दोन पोती भात, चांदी रूप्याचे दागिने) देण्याची प्रथा रूढ आहे. त्यासाठी मुलाला ही सगळी जुळवाजुळव आर्थिक तरतूद करून करावी लागते. काहीवेळा हे शक्य नसल्यास घरोंदा (घरजावई) म्हणून काही

वर्ष तो मुलीकडे राहून शेतीकाम करतो. काहीवेळा तर विवाह न करता एकत्र राहून संसार करून अनुकूल परिस्थिती झाल्यावर विवाहसोहळा साजरा करतात.

## वनवासींची मौखिक संपदा

वनवासींचे लोकसाहित्य मौखिक परंपरेनेच चालत आलेले आहे. हे लोकसाहित्य लोकजीवनातूनच अवतरले आहे. लोकसाहित्याने लोकसंस्कृतीतील इष्टाचा पुरस्कार आणि अनिष्टाचा परिहार केलेला आहे. लोकभाषेतील लोकमनाचा हा अविष्कार आहे.

वनवासी लोकगीतांतून सुंदर भावचित्रे रेखाटलेली आहेत. लग्नसोहळा प्रत्येक विधीप्रसंगात भावपूर्ण गीते आढळतात. वरमाईची गाणी, झालझेंड्याची गाणी, तेलवणाचे गीत लक्षणीय आहेत. कुटुंबातील नाती लोकगीतांतून उत्कटपणे दिवाळी, दसरा, होळी या सणांच्या निमित्ताने अभिव्यक्त होतात. उखाणे, म्हणी, कोडी, वाक्प्रचार असे विपुल अक्षरधन बोलीभाषेत गोवलेले लोकसाहित्यात आढळते. यातु-विद्या, चित्रकला, लोककथा, नक्षीकाम अशा लोकविद्यांचा समावेश लोकसाहित्यात होतो. बोहाडा, काज, कवळीभाजी, मांदोळनाच, भोंडल्या, टिपऱ्यानाच, मर्तिकनाच, हस्तकला यांचाही समावेश वनवासी लोककला विचारात होतो.

वनवासी लोकसाहित्यात म्हणी महत्त्वाच्या आहेत. 'फडकं घे, मडकं घे, सूट' या म्हणीत उपजिविकेसाठी केवळ एक मडके आणि फडके माणसाला पुरे होते. मर्यादित गरजांत जगण्याचा आदर्श या म्हणीतून सूचित होतो. आणखी काही म्हणी पुढीलप्रमाणे निर्देशिता येतील.

**'कणगीत दाणा तं भील उताणा'**

**'निलाजऱ्याला मारला पिढा तं म्हणे बसाया दिला'**

**'लाज मरे तो भुके मरे' इ.**

आता उखाणे पहा -

**'जात कावळ्याची रगत माणसाचा' - करवंद**

**'एक दोरी टाकली तर बारा बैल बांधात' - काकडी**

**'दिवसभर गुरांच्या मागं हिंड रातचे खोपाला राहं' - काठी**

वनवासींची लोकगीतं बोलकी आहेत. माहेरवाशीण सासरी

जाते तेव्हा ती व्याकुळ होते. तिला आपले घर आणि नातीगोती आठवतात. त्यावेळी केलेला उपदेश -

**'सासरच्या घरी गं बाई मी, बाबा कुणाला म्हणू ।**
**म्हण गं म्हण गं लेकी, तुझ्याच गं सासऱ्याला ।।**
**सासरच्या घरी गं बाई मी, आई कुणाला म्हणू ।**
**म्हण गं म्हण गं लेकी, तुझ्याच गं सासूला ।।'**

हीच नाती पुराणातही गुंफली आहेत.

**'सीता गेली वारूळे तळेला सोनु कंबळायला ।**
**हाक मारिते दशरथाला गं तिच्या सासऱ्याला ।**
**हाक मारिते कौसल्याला गं तिच्या सासूला ।**
**हाक मारिते लक्ष्युमणाला गं तिच्या दिराला ।**
**हाक मारिते रामयाला गं तिच्या नवऱ्याला ।।**

वनवासींच्या लोकसाहित्यातील ही पारंपारिक लोकगीते विस्मृतीत जाऊ नये म्हणून ती छापील स्वरूपात उपलब्ध करून दिली पाहिजेत! या गीतात रामायणातील सीतामाई वारूळ नावाच्या पाड्यावरील एका तळ्यात कमळे आणायला गेली ही कल्पना असून सीता, सासरा दशरथ, सासू कौशल्या, दीर लक्ष्मण आणि पती राम यांना हाक देते. सोनू हे गाणारीच्या मैत्रिणीचे नाव आहे. वनवासी लोकगीतात अशी आपल्या आप्तांची आणि परिचितांची नावे गोवता येतात आणि पुनरावृत्तीने गीताची लांबण ही लावता येते.

उदा. कुंतीचे गाणे पहा -

**'सांगते देवाला रे कुंती सांगते कृष्णाला ।**
**रे कर्ण पांडव रे पहिला, रे कर्ण हा पांडव पाहिला रे ।**
**फुलं तोडण्यासाठी गेले जल देवीला**
**सूर्य मंत्राची आठवण मजला**
**सूर्य मंत्र जपीला रे देवा सूर्यमंत्र जपीला**
**रे कर्ण हा पांडव रे पहिला ।।'**

असे हे 'रामायण-महाभारतही' वनवासी लोकसाहित्यात मुरलेले आहे. अशी शेकडो लोकगीते उद्धृत करता येतील.

या गीतात पुढे -

**‘नव महिने गर्भ जपिला**
**सूर्य मंत्रानी कर्ण हा आला**
**काळा कर्ण अवतरला**
**रे देवा काळा कर्ण अवतरला’**

यात कुंती आपले दुःख कृष्णाला सांगते कर्ण सूर्य मंत्राने नऊ महिने गर्भ जपून अवतरला, पण प्रेमाविना तो गंगेला अर्पण करावा लागला. सूर्याच्या प्रखर तेजापासून मात्र हा काळा कर्ण अवतरला ही अत्यंत सूचक कल्पना आहे.

**लोकसाहित्याचे भाषिक विशेष**

‘काज’ म्हणजे कामकाज यातले कार्य या अर्थाने आहे. ‘काज’ हा सामुदायिक श्राद्धविधी वनवासी विधुर आणि विधवा यांच्या कौटुंबिक पुनर्वसनासाठी विधी आहे. मृतात्म्यांना संतुष्ट करण्याबरोबरच कृषिसंस्कृतीची गरज म्हणून ते कौटुंबिक पुनर्संघटन-पुनर्वसन होत असावे.

पर्यावरणशास्त्राच्या दृष्टीनेही वनवासींची लोकभाषा लक्ष वेधून घेणारी आहे. उदाहरणार्थ -

**‘जेठ अन पाण्याची भेट’**
**‘मादवा अन हांडी मडकी वाजवा’**
**‘पुस करी हुस’**
**‘चैत म्हणजे दैत’**
**‘पडल उतरा त हाल खाइना कुतरा’**
**‘पडतील स्वाती तर पिकतील मोती’**
**‘पडल्या मघा नाही तर वरती बघा’**
**पडल हाती त करील अन्नाची माती’**
**‘झाड तठ वारा...बरसती पाण्याच्या धारा’**
**‘तण....खाई धन’**
**‘जळो...पण पिको’ (जमीन जाळण्याच्या प्रथेवरून) राब**
**‘पोट हाय संग त काय पडल मागं’**

**'होळी जळाली अन थंडी पळाली'**
**'काम ये ना मये अन घमेले येऊन पये'**
**'सुकेतळ्याला पाखरे फडफडती' (उत्तर : लाह्या)**
**'आरवत कोंबडा तरंगत जाय....चारशिंग दहा पाय'**
**(उत्तर : नांगर, दोन बैल, नांगरधारी)**
**'काळी गाय काटे खाय....पाण्याला पाहून उभी राहाय'**
**(उत्तर : चप्पल/वहाण)**
**'माही बीजा....कोंबजाशिजा**
**'पोषापाषांनो...उगाच निजा'** यात शृंगार सूचनेची झलक आहे.

घरौंदा म्हणजे घरजावई, मेढिगा - लग्न लावणारी स्त्री, गरोदर स्त्री म्हणजे 'दोनजीवी', गोडा दिवस म्हणजे सोमवार, मोडा दिवस म्हणजे मंगळवार, 'उगवती' म्हणजे पूर्व आणि मावळती म्हणजे पश्चिम दिशा अशी ही त्यांची सरळ, सोपी वस्तुस्थिती निदर्शक लोकभाषा आहे. लोकवास्तवाचा परिपोष करणारी आहे.

अशा वनवासी लोकसाहित्याचे संवर्धन व्हावे, जतन व्हावे ही आजची आपली सांस्कृतिक गरज आहे. केवळ तोंडी, मौखिक स्वरूपात आजही अस्तित्वात असलेल्या या लोकसाहित्याचा आपल्या देशी समृद्ध परंपरेचे आपल्याला सुयोग्य भान येण्यासाठी, संशोधन, संकलन आणि विवेचक, चिकित्सक अभ्यास करून तो ग्रंथरूपात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

## -महत्त्वाचे संदर्भ -


आदिवासी नाटक (लेख) डॉ. रमेश कुबल, मराठी मित्र, शिवळे, मार्च २००४.

प्राचीन मराठी वाङ्मयातील लोकतत्त्व : डॉ.सौ.अमिता मुजुमदार, सविता प्रकाशन, औरंगाबाद, १९८८.

आरसा : आदिवासी जीवन शैलीचा, डॉ. भा.व्यं.गिरधारी, युगांतर प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, २००४.

महाराष्ट्र दर्शन दिनदर्शिका : महाराष्ट्रातील लोकवाद्ये, सविता शेलार, २००५.


❋❋❋

# वनवासी लोकनृत्य

वनवासी लोकनृत्य (Tribal Folklore) यात 'लोक' शब्द जोडलेला असल्याने समूहनृत्य विचार येथे अभिप्रेत आहे. लोकविद्या, लोकसाहित्य, लोकसंस्कृतीचे एक अंग म्हणूनच या लोकनृत्य कलेचा विचार येथे प्रस्तुत आहे.

वनवासींचे जीवनमान आणि राहणीमान लक्षात घेता, सामूहिक भावनेला कटाक्षाने जपणारा हा समाज आणि त्याची संस्कृती आहे.

**लोकनृत्याचा मनसोक्त आविष्कार**

वनवासी लोकजीवनामध्ये लोकनृत्यकलेला फार मोठे श्रद्धेचे स्थान आहे. लोकनृत्य हा त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य, अपरिहार्य घटक आहे. नाचगाणे ही त्यांची जीवनशैली बनली आहे. त्यामुळे लोकनृत्याचा मन:पूत, मुक्त आविष्कार त्यांच्या जीवनात अनुभवायला मिळतो.

कृषिसंस्कृतीमधील शेतमजुराचे, ग्रामीण व्यवसायांमधील मासेमारीचे किंवा शहरी रोजगार हमीचे, धरणाच्या, वीटभट्टीच्या कामावरचे, काबाड कष्टाचे जिणे शिवाय कमालीचे दारिद्र्य आदिवासींच्या वाट्याला आले आहे.

**'काम काम बघू काम कुठंच भरेना**
**बाई पोटातील आग, आग कुठं इझना'**
**शेवटी - 'ओल्या डोळ्यांनीच पोरं निजवावी लागतात.'**

असा हा वनवासी माणूस दारिद्र्यातच जन्मतो, वाढतो आणि शेवटी दारिद्र्यातच मरतो. तरीही वनवासी माणसांनी गीत-नृत्य-संगीतातील चैतन्य टिकवून ठेवले आहे. दु:ख विसरायला लावणारी, जीवनातला आनंद देणारी, बेहोषी, एक विरंगुळा, श्रमपरिहार करणारी ही लोकनृत्यकला त्यांनी जोपासली, आजतागायत जपली आहे. निसर्गाशी सुसंवाद साधणारे, आगळे स्वरूप हे या कलेचे वैशिष्ट्य आहे. नृत्यकलेतील वैभव ही वनवासी लोकनृत्यकला ठरू शकेल. ताल कसा धरावा, लय कशी पकडावी, नाद कसा साधावा, ठेका

कसा सांभाळावा, वाद्यांच्या साथीने धुंद नाचावे कसे, ढोल, संबळ इ. लोकवाद्यांचा डांगोरा कसा पिटावा, झोकात पावलं कशी टाकावीत, खांद्याला - पाठीला हाताच्या विळख्यांची घट्ट पकड कशी बांधावी, हुर्ये ऽऽऽ उद्‌गार चित्कार घोषणांचा जल्लोष कसा करावा, मनोरे-कसरतीची-चमत्कृतीची नृत्याला जोड कशी द्यावी, वेषभूषा - रंगभूषेतील वैचित्र्य कसे राखावे, नाचात वाघ, सिंह, मोर यासारख्या पशू -पक्षांची सोंगे कशी वठवावीत, नृत्याच्या धुंदीने भावनेने, संकोच सोडून, फेर धरून, मुक्तपणे कसे नाचावे, हे सारे वनवासी लोकनृत्यातून शिकण्यासारखे म्हणूनच अनुकरणीय आहे.

**वनवासी लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब**

'आम्ही जंगलचं राजं वनवासी' आधीपासून जंगलात राहणारे जंगलचे राजे, वन निवासी म्हणून वनवासी, डोंगर-गिरिदऱ्यात राहणारे म्हणून गिरिजन, वनउपजावर जगणारे खरे स्वावलंबी-स्वयंपूर्ण असे आहेत. साऱ्या सभ्यता पाळून कळपाने, टोळीने, एकोप्याने सामुदायिक जीवन ते जगत आलेले आहेत. याच वनवासी लोकसंस्कृतीची गडद छाया त्यांच्या लोकनृत्य कलेवर पडलेली आहे. वनवासींच्या सांस्कृतिक जीवनापासून कलेच्या कक्षा अलग होत नाहीत. त्यांच्या कलांचा रसस्वाद म्हणूनच त्यांच्या धर्मश्रद्धा, रूढी, परंपरा, लोकनृत्य, लोकगीते, लोककथा या लोकविद्यांच्या संदर्भातच घ्यावा लागतो.

**वनवासी लोकनृत्याचा आविष्कार**

वनवासींमधील तीन पिढ्या आजोबा, मुलगा आणि नातू असे आबालवृद्ध स्त्री-पुरुष लोकनृत्याच्या या फेऱ्यात पूर्णतः गुंतलेले असतात. त्या नृत्याचा मनसोक्त आनंद ते मुक्तपणाने लुटतात. त्यांच्या फेर धरून नाचण्यातील अंगविक्षेप, पदन्यास, वेषभूषा - रंगभूषा सजावट सारेच प्रेक्षणीय असते. फेरातील परिचित-अपरिचित भाव विसरून, स्त्री-पुरुषांनी नाचतांना खांद्यावर किंवा कमरेत हात गुंफलेले असतात. नाचता नाचता ते घामाघूम होतात, बेभान होतात तरीही कमरेतील हातांचा विळखा- खांद्यावरची घट्ट पकड कधी सैल होत नाही. यावेळी मनात कोणतेही किल्मिष नसते. कोणताही दुर्भाव नसतो. पाश्चात्त्यांच्या

नृत्यातील ‘समारोप’ येथे नसतो. सगळ्यांच्या सहभागाने साजरे होणारे हे नृत्य त्यांच्यात जन्मापासूनच भिनलेले असते. ही नृत्यकला वनवासींचा अविभाज्य धर्मच बनली आहे. रंगात आलेल्या या लोकनृत्यात वनवासींचे ‘हुर्ररऽऽ’, हुर्योऽऽ’ या आरोळ्या, चित्कार लोकनृत्याची लज्जत आणखी वाढवतात. सारा गाव जागा होतो.

**‘शिवू शिवू कुठं बाई, सारं आभाळ फाटलं**
**अन् तान्ह बाई माझं, ओल्या डोळ्यानं निजलं’**

अतिग्रामीण भागात, अर्धपोटी ठेवणाऱ्या दारिद्र्याच्या आगीत होरपळणाऱ्या वनवासींना ही लोकनृत्ये आधार बनतात. जीवनाला उभारी, मोठा दिलासा देतात. कष्टकऱ्यांचा कष्टाचा भार हलका होतो. नृत्यांची धुंदी तारून नेते, सावरते.

**वनवासी लोकनृत्याला निसर्गाचे वरदान**

वनवासी लोकगीत आणि लोकनृत्याला निसर्गाचा लय, ताल, सूर, नाद, स्वर, सादरीकरण या सगळ्याच बाबतीत ‘वरदहस्त’ आहे. याच निसर्गाच्या सान्निध्यातून आणि अनुकरणातून त्यांना लोकनृत्य - गीतांचा बाज गवसलेला आहे. निसर्गाचे वरदान म्हणूनच त्यांचे लोकसंगीतही अवतरलेले आहे.

वनवासींचा ‘निसर्ग’ हाच गुरू असून ते त्याचे पुजारी आहेत. निसर्गरम्य आनंदाचा ठेवा म्हणजे वनवासी लोकनृत्य होय. अभ्यास आणि संशोधन याची खात्री पटविते. लोकपरंपरेने, लोकधाटीतील, लोकसृष्टीतील हे आविष्कार परस्परपूरक आणि संबद्ध आहेत. वनवासींना निसर्गातून जे काही उपलब्ध होते त्याचाच वापर ते आपल्या साजशृंगारात करतात. जंगलातली फुले, बिया, रंगीबेरंगी दगड, कातडी, मणी, गुंजा, झाडांच्या साली, वाळलेली पाने, मुळ्या यांच्यापासूनच त्यांचे दागदागिने बनतात.

वनवासी-संस्कृतीच्या जडणघडणीत निसर्गाचा मोठा वाटा आहे. निसर्गाने वनवासींची पारंपरिक जीवनपद्धती आपल्या संगीताने राखली आहे. वनवासी आणि निसर्ग असे अन्योन्याश्रयी आहेत; लोकनृत्ये याची साक्ष, ग्वाही देतात. वनवासी माणूस निसर्गाचेच जणू

अपत्य आहे. निसर्गाच्याच साथीने त्यांच्या लोकनृत्याच्या आविष्काराला ताजेपणा, नित्यनूतनता, नवता लाभली आहे. त्यांच्या कलानिर्मितीचे सारे रहस्य सृष्टी देवतेतच सापडते.

मी या धरतीला, मायमातीला पाय कसा लावू? मग मी नाचू कुठे? धरणी माझी काळी आई आहे; हा वनवासीला पडलेला पहिला प्रश्न आहे.

**'हत नाचू....का तथं....नाचू**
**कुठं मी नाचू.... कसा मी नाचू?'**
**धरतरी माझी माय हाय....'**

ज्या धरतीवर नृत्य साजरे व्हायचे त्याविषयीची ही या निसर्गपुत्रांची श्रद्धा, निसर्गाला त्यांच्या लोक जीवनात लाभलेल्या श्रेष्ठ स्थानाचे प्रतीक आहे. पावसाळ्यात होणारी अविरत बरसात, अखंड पाऊस, धारांचा वर्षाव, आकाशात मेघांचा गडगडाट, मेघगर्जना, श्रावणमासातील सोनेरी पिवळी उन्हे, पाऊसाची मधून भूरभूर, गार शिडकावे, हिरवीगार वनश्री, भरास आलेल्या पिकांचे डोलणे, वाहत्या वाऱ्यांचे ध्वनी, सृष्टीतील वादळवारा, गारांचा वर्षाव, विविध पशू, पक्षी, कीटक यांच्या विभिन्न हालचाली या विषयीची वनवासींची निरीक्षणे त्यांच्या लोकनृत्यात टिपली गेली आहेत.

साप, नाग, शेलाटी, धामण यांचे फुत्कार, वळसे घेणे, सरपटणे, विळखे घेणे, त्यांचे आकार या नृत्यात साकार झाले आहेत. पशुपक्ष्यांच्या हालचाली, आवाज चित्कार याचे अलौकिक अनुकरण या लोकनृत्यात आहे. मोकळ्या मनाने हे निसर्गाने दिलेले धडे त्यांनी गिरविले आहेत.

## लोकनृत्याला पूरक लोकगीते

वनवासी लोकनृत्यात गायली जाणारी लोकगीते नृत्याला पोषक असतात. वाद्यांच्या गजरात मात्र गाणे हरवून जाते. या गाण्याचे शब्द कळत नाहीत. तसे गाणे पुनरूक्तीने भरलेले फारसे अर्थपूर्ण असतेच असे नाही. गीत स्वतंत्रपणे शब्दार्थासह आपल्याला समजून घ्यावे लागते. गीतातील शब्दयोजना गतिशील आणि नृत्यातील जोश-

जल्लोष वाढविणारी असते. नृत्याला पूरक असते. अनेकदा नृत्यगीतांचा आशय हा प्रत्यक्ष सादरीकरणातून त्यावेळच्या अभिनयातून अभिव्यक्त केला जातो.

**'किल्ल्याना भिल्लनी, खेळ करनी ।**
**आम्ही डोळाम, काजळ घालनासी ।।१।।**
**आम्ही डोळा, मोडी मोडी नाचनारनी ।**
**आम्ही नाक म नथ घालणानारनी ।।२।।'**

अशी ही लोकगीतातील शब्दांची ठेवण, त्यांची लय आणि नर्तकांचे कायिक हावभाव यातून ते संपूर्ण नृत्याचे दृश्य सादर होते. बारश्याच्या प्रसंगीही असेच नाचत मुलाच्या घरी गाणे म्हणतात. नृत्यगानाचा आनंद लुटतात.

**'वरखडीत जावानी गाडी सजणे, शंकर देवानी**
**पार्वती नटनी लक्ष्म्या आईने पूजा थोपनी ।**
**शंकर देवानी पूजा थोपनी, धावत या कोणी**
**पळत या आईला गावात न्या ।।'**

## वनवासी लोकनृत्यातील विविधता

वनवासींच्या एकेका लोकनृत्यात सुसंघटितपणा एकमेळ, एककृती, समान पदन्यास असले तरी त्याचे विविध प्रकार आहेत. त्यात वैचित्र्य आणि विविधता आहे. वनवासींमध्ये भावनिक एकजूट, एकात्मता निर्माण करणारी ही नृत्ये आहेत. त्यात चपळाई असते. जलद हालचाली असतात. पारंपरिक रुढींशी आणि विधींशी या नृत्याचा संबंध असतो. त्यात मनोरे, पिरॅमिडस्, व्यायामाचे प्रकार अनेक पद्धतींचे खेळ असतात. बैठकीचे खेळ असतात. स्पर्धा आणि चुरस असते. काही नृत्ये शक्ती सामर्थ्याची तर काही शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ सुचविणारी असतात. कोडे घालून उलगडविणारी असतात. निसर्गाच्या सान्निध्यात ही नृत्ये असल्याने त्यात कोणत्याही प्रकारचा बंदिस्तपणा नसतो. वातावरण मुक्त असते. मने मोकळी असतात. पौर्णिमेची वा चांदणी रात्र असते. वेगळी कृत्रिम प्रकाश योजना करावी लागत नाही. वनवासींनीच तयार केलेल्या विविध वाद्यांच्या प्रतिसादात स्वाभाविकपणे ही नृत्ये

सादर होतात.

वनवासींची 'करमा', 'बिहू', 'परब' इत्यादी नृत्ये प्रसिद्ध आहेत. निसर्गाला संतुष्ट करण्याचा त्यांचा हेतू असतो. 'बोहाडा'सारखी नृत्ये धार्मिक भावनेने सादर करतात. देवकृपा होते, पीकपाणी चांगले येते, शिकार मिळते ही श्रद्धा त्याच्या मुळाशी आहे. वनवासींमध्ये जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या सगळ्याच संस्कारांशी संबंधित-संयोजित, नृत्ये आहेत. सण उत्सवात याचे प्रत्यंतर येते. होळी पौर्णिमेच्या सणाला वनवासी त्यांच्या परंपरागत नृत्यगान उत्सवात धार्मिकता म्हणून, असतील तेथून गावी, पाड्यावर येतात आणि नृत्यसोहळा साजरा करतात. दिवाळी, आखाती, दसरा, मकरसंक्रांत, पोळा, नागपंचमी आणि बीजा या सणात नृत्ये सादर होतात. राष्ट्रीय आश्विनच्या 'शुद्धातल्या पंचमी पासून वद्यातील चतुर्थी' हा कालावधी नृत्याला अनुकूल असतो. देवतांच्या आराधनेचे साधनही नृत्यच असते आणि आनंदाच्या प्रसंगात नृत्याला वाव असतो. नृत्याचा उगमच देवापासून त्यांनी मानला. 'नारनदेव', कनसरी देवीने कोंबडनाच, बडादेवाने 'राजनेरीबाना' परधानांना सांगितला. भिवसनदेवाचा 'दंडार'. तात्पर्य - ईश्वराला ही लोकनृत्ये समर्पित असतात. 'तारपा' वाद्यही देव्हाऱ्यात इतरवेळी ठेवतात. वनवासी नृत्याचे शौर्य वीरश्रीयुक्त नृत्ये, धार्मिक स्वरूपाची नृत्ये आणि सांस्कृतिक, ऋतुमानाप्रमाणे सादर होणारी नृत्ये असे तीन प्रकार मानलेले आहेत. विशिष्ट देवदेवता, झाड - वृक्ष, बळीचा पशू यांच्याभोवती हे धर्मनृत्य करतात. 'डिंडण', 'गावबांधणी', 'भिवसन पूजा' अशी ही नृत्ये सादर होतात. वनवासींच्या वेगवेगळ्या जमातींचे वेगळेपण लक्षात आणून देणारी ही नृत्ये असतात. 'भिल्ल' धरतीपूजा 'डिंडण' नाचात बांधतात. 'कोलम' दिवाळीत 'दंडार' करतात. दंडरात पहिले नमन मारुतीला असते. तसेच 'टेमसा' हे जागरूक नृत्य आहे. 'कारसाड', 'मरकी' नाच मृतात्म्यासाठी असतो तर करमणूकीसाठी रेव्हॉ, सोंगाडी, गंमत, झगडा हे नृत्य प्रकार आहेत. टिपऱ्या, मांदोळ - ढोल, कांबड असे विविध नाचाचे प्रकार आहेत. झगा, फेर, गदा, तलवारी,लेहंगा, चाळ, घुंगरू अशी वेशभूषा परिधान करून नृत्य सादर होते. होळी-पौर्णिमा, धूलिवंदन झाले की 'बोहाडा' उत्सवाची

तयारी होते. आदिमाता जगदंबा तिचा हा उत्सव, विविध मुखवटे घालून सोंगे नाचवून तो साजरा होतो. संबळ, तुतारी, सूरवाद्यांच्या तालात देवदेवता व इतर अशी मिळून ३०/४० सोंगे, स्वीकृत अवतारानुसार, वेगवेगळ्या पद्धतीने नाचून मिरवतात. सोंगानुसार नृत्याची चाल आणि वाद्यांची आतषबाजी असते. छोटेखानी स्वरूपात त्या गावात यात्राच या बोहाड्याच्या निमित्ताने भरते. गणपती, बहिरोबा, हिरवा देव, जगदंबा असे मुखवटे असतात. 'बोहाडा' लोकनृत्य माध्यमातून केलेली श्रद्धायुक्त करमणूक असते. त्यामुळे वनवासींना नवा हुरूप येतो. नवी उभारी आणि उमेद येते.

'तारपा' हे वनवासींचे अत्यंत लोकप्रिय नृत्य आहे. 'काठ्या' त्याच्या काठीला घुंगरं असतात, यालाच 'म्होरक्या' किंवा 'मांदोळ्या' असेही म्हणतात. त्याच्या सूचक हालचाली, इशाऱ्याने तालबद्ध फेर धरून नाचतात. स्त्री-पुरुषांचे पदन्यास विलोभनीय असतात. तारपा वाजवणारा दमदार, ताकदवान गडी लागतो. तरुणींनाही तो आवडतो. बेहोषी आणि धुंदीचा आगळा अनुभव 'तारपा' नृत्यात येतो. म्हणून 'बर्ट्रांड रसेल'सारखा तत्त्ववेत्ता म्हणतो की, 'तुमची ही बेहोषी माझ्या वाट्याला आली तर मी माझे सगळे तत्त्वज्ञान आणि ग्रंथ वनवासींना अर्पण करायला तयार आहे.'

त्याचप्रमाणे 'पावरी' नृत्यात लांब वक्राकार भोपळा, बासऱ्या बैलाचे शिंग, मोरपिसे यांचे 'पावरी' वाद्य तयार केले जाते. वनवासी पावरीला देवासमान मानतात. पावरीचा सुमधुर सूर, टाळ्यांचा नाद, खरारा, काठ्यांची घुंगरे आणि पावलांचा ताल या ध्वनिमेळात हा नृत्याविष्कार होतो. त्यात कृष्णावतार स्वरूप एकजण 'खुट्या' असतो. मावल्यांना सांभाळणे, दिशा दाखविणे हे त्याचे कार्य. मोरपिसाचा कुंचा हाती घेऊन तो नृत्यातील दिमाख सावरतो. चुका करू देत नाही.

**'वरल्या माळीला उन्ह्या पावा वाजव वं, उन्ह्या पावा वाजव वं'**
**'रंग दिला व दिला शेंदवड गोळाला वं शेंदवड गोळाला'**

पावरीच्या सुरात अशी ही गाणी गात लयबद्ध नृत्य सादर होते.

### लोकनृत्य कलेचे जतन आणि संवर्धन

यापुढील काळात आता वनवासी समाज हा आदिम, वनवासी,

गिरीजन राहणार नसून तो ग्रामीण जीवनात सामावला आहे. नागरी जीवनाकडे त्याची वाटचाल आहे. सुशिक्षित व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊ पाहतो आहे. त्यामुळे हा वनवासी लोकनृत्य कलेचा ठेवा कसा जतन केला जाईल? आणि त्याचे संवर्धन कसे होईल? याची काळजी आहे. तथापि वनवासी समाजांची प्रगती अवश्य व्हावी, पण त्यांच्यात संस्काराला, परंपरेला जे प्राधान्य आहे; त्यानुसार त्यांना ती जतन करावीशी वाटेल, तिचे ते संवर्धन करतील अशी अपेक्षा आहे.

नोकरी - मजुरीनिमित्त जरी ते आपापल्या पाड्यापासून दूर असले तरी कोणत्याही परिस्थितीत शिमग्याला ते नफा-नुकसानीचा विचार न करता हमखास पाड्यावर गावाकडे मोकळं नाचण्यासाठी, हुंदडण्यासाठी परततातच.

वनवासी जीवनातील या लोकनृत्य कलेचे, तिच्या उच्च दर्जाचे स्थान अबाधित राहण्यासाठी कलासंवर्धनासाठी 'सुविधा' उपलब्ध झाल्या पाहिजे. उदा. महोत्सव, लोकनृत्य सभागृह, वाद्य साज सामग्रीची उपलब्धी इ.

वनवासींच्या जीवनातील लोक संगीत-नृत्य हरपले तर ते जीवन निरानंद-भकास होईल. उलट त्यांच्या या लोकनृत्यकलेला संशोधनपूर्वक शास्त्रीय अभ्यासाची जोड लाभल्यास ही कला विकसित होईल. वनवासींच्या आनंदाची परिसीमा ही लोकनृत्यकला आहे.

**संदर्भ :**


१. भारतीय संस्कृति कोश (प्रथम खंड),
संपादक : महदेवशास्त्री जोशी द्वि. आ. १९८२.
२. विश्वकोश खंड १ व २ प्रमुख संपादक : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.
३. आदिवासी कला : डॉ. गोविंद गारे व उत्तमराव सोनावणे, ग.म.भ.न. प्रकाशन पुणे प.आ. १९९३.
४. आदिवासी लोकरंगभूमी : डॉ. सुदाम जाधव, सुलबा प्रकाशन, औरंगाबाद २००४.
५. आदिवासी स्त्रियांचे भावविश्व : सौ. सुमन मुठे, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, २००६.
६. आरसा : आदिवासी जीवनशैलीचा : डॉ. भास्कर गिरीधारी, युगांतर प्रकाशन, नाशिक दु. आ. २००४.

# वनवासींचा मांदोळ नाच

भारतीय जनजातीचे कलात्मक आविष्कार विविध परीने झालेले आहेत. तांदळाच्या पीठाने वारली चित्रकला साकार करण्यापासून तो विविध प्रकारची लोकनृत्ये सादर करण्यापर्यंत आपल्याला हरखून टाकणारे त्यांचे लोकाविष्कार आहेत.

भारतीय जनजाती या आविष्कारात आपली तहान-भूक विसरतात. पिळवणूक विसरतात, गरिबी विसरतात, अडाणीपण विसरतात, दिवसभराचे उपसलेले कष्टही विसरतात. असे हे जालीम कलाविष्कार त्यांचे आहेत.

**वनवासींची नृत्यकला**

जनजाती म्हटले, की नृत्य आणि तेही सामूहिक हे त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेले आहे. परंपरेने चालत आलेली ही लोकनृत्ये आहेत. मागच्या पिढीचे पुढची पिढी रास्त अनुकरण करते आणि ही लोकनृत्याची परंपरा अबाधित राहते. नृत्ये सादर होण्यास फार काही घडावे लागत नाही. कोणत्याही प्रसंगाच्या निमित्ताने लोक एकत्र जमतात आणि मनोरंजनासाठी बेभान होऊन नाचतात. मात्र कृषिसंस्कृतीतल्या सुगीच्या दिवसात, विवाह समारंभात, होळी-दिवाळीच्या सणाच्या दिवसात या लोकनृत्याच्या आविष्काराला बहर येतो.

वनवासी नृत्यामध्ये तारपा, पावरीनाच, तूरनाच, गौरीनाच, कांबडनाच, घोरनाच, ढोलनाच, स्त्री-पुरुष एकत्र नाचून धुंद होतात. अर्थात काही नाचात फक्त पुरुषच असतात. विशेषत: कसरती, कवायती ज्या नाचात असतात त्यात पुरुषांनाच प्राधान्य मिळते. एरव्ही 'गौरीनाच' स्त्रियाच रंगतदारपणे सादर करातात. तारपा नृत्यात तर स्त्री-पुरुष परस्परांच्या कमरेला घट्ट विळखे घालूनच नाचतात. शुद्धमनाने आणि निर्मळ अंत:करणाने ही कला साधना त्यांची चालू असते. किंबहुना आपले हे काही कलाआविष्कार कलात्मक आहेत हे सुद्धा बिचाऱ्या

जनजातींच्या गावीही नसते.

**बोहाडा**

बोहाडा, 'भवाडा' हा त्यांचा एक उत्सवच असतो. याला देवाचा उत्सव म्हणावे. वेताळ, बहिरोबा, खंडोबा, जगदंबा, गणपती, महादेव अशा देवांचे मुखवटे परिधान करून रात्रभर वाद्याच्या तालावर, गाण्याच्या सुस्वरात ते नाचत असतात. परंपरेने घराण्यात आलेले ते देवाचे सोंग असते. प्रत्येक देवाची पुन्हा नाचण्याची पद्धत स्वतंत्र, वेगवेगळी असते. मुखवटे तयार करण्याची कला या वनवासींनी आत्मसात केलेली आहे. आणि निसर्गाच्या सान्निध्यात राहून झाडांच्या पानांपासून रंग आणि मुखवट्याचा लगदा, झाडाचाच डीग घालून तयार करण्याचे त्यांचे कसब आहे. आता हे मुखवटे ते उसनवारीने बोहाड्यासाठी शेजारच्या पाड्याला वापरायला देतात. एरव्ही वाद्ये, मुखवटे या सगळ्यांनाच त्यांच्या देव्हाऱ्यात स्थान असते. आणि वर्षभरात कधीतरी ते ठरलेल्या वेळी बाहेर काढतात. या बोहाडा उत्सवाला आता जत्रेचे स्वरूप आले त्यात आदिवासी युवक युवतींच्या सहभागही सहेतुक वाढला आहे.

**मांदळ नाच**

या लेखातः मांदळाच्या संदर्भात विशेष तपशीलाने विचार करावयाचा आहे. मांदळ यालाच 'मांदोळ', 'मादळ', मांदळ' असे वनवासी बोलभाषेमध्ये म्हटले जाते. बोहाडा, ढोलनाच, टिपरी नाच, दंडार, डिंडण, गोसई, करमा, घांगळी, कोंबड या नृत्याच्या विविध प्रकारांप्रमाणेच हा एक वनवासींच्या नाचाचा प्रकार आहे.

शिमगा, होळी याच दिवसात 'मांदोळ' या नृत्याला बहर येतो. यात एक भला मोठ्ठा ढोल असतो आणि या प्रचंड ढोलाच्या नादात तालावर फेर धरून लोक दंग होऊन नाचत असतात. लोक स्वत: होऊन त्यांना बक्षिसी, बिदागी देतात. पण भीक मागण्यासाठी ही वनवासींची नृत्ये नाहीत. ती आहेत स्वान्तसुखाय आणि फारतर लोकहिताय! 'मांदळ'मध्ये साधारणपणे १२ ते १५ लोक सहभागी

असतात. त्यात शक्यतो स्त्रिया या कमी प्रमाणात असतातच. पुरुषांचाच नाच निदान मी कानोसा घेतलेल्या भागात तरी आहे. या 'मांदळा'त नकला केल्या जातात; काही कसरतीही सादर केल्या जातात.

त्यांच्या त्या ढोलाच्या आवाजात आपल्याला गाणे-लोकगीते हरवलेली भासतात. मांदळ नाच, नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुका परिसरात खूप लोकप्रिय आहे. 'मांदोळ वाजे धोबींग कींग धींग असे म्हणत मांदळ नृत्य सादर होते. या नृत्यासह विविध प्रकारचे संवाद, सोंग सादर करतात. म्हणाल तर एक प्रकारचे 'नाटक'ही तेथे सादर होते. 'मांदोळ' नृत्य करणारी काही गावे-पाडे सुरगाणा भागात सर्वश्रुत आहेत. रगत विहिर, महालपाडा, हडकाईचुंड, केळीपाडा, पांगारणे, उद्‌माळ या पाड्यांवर सर्रास मांदळ नाच चालतो. या मांदळ नाचात संवाद, नाटक सोंग आणि कसरती नकला यांचा अवलंब केला जातो. भाद्रपद, अश्विन, कार्तिक या महिन्यात या प्रकारच्या नृत्याला उधाण येते. डांग/गुजराथ सीमारेषाही आहे. या भागात वनवासींनी ही नृत्यकलाविष्कार संस्कृती आजपावेतो जतन केलेली आहे. या नृत्यात गोलाकार, अर्धगोलाकार भ्रमराच्या रुंजी घालण्याप्रमाणे अथवा सर्पाकृती फेर धरून लोक नाचतात. 'कावळ्याचे' सोंग घेतात. हिंदू कोकणा, हिंदू महादेव कोळी, हिंदू वारली या जनजाती 'बोरी'पाड्याला बोरी पिकल्या दोन' सारखी गीतं 'मांदळ' मध्ये म्हणतात. या नाचात स्त्रियांचाही सहभाग असतो. ढोलाला दोन्ही बाजूने मेणाचे गोळे लावलेले असतात. त्यामुळे त्या ढोलाचा घुमणारा आवाज वेगळाच ध्वनित होतो. मांदळासाठी संबंधितांना आवतन म्हणजे निमंत्रण दिले जाते आणि मग रात्रभर 'मांदोळ' नाच चालतो.

अशा या जनजातींच्या नृत्य संस्कृतीचे भारतीय नृत्याच्या संदर्भात बहुमोल, फार मोठे योगदान आहे. वनवासी नृत्यकलेचे दालन मूळातच खूप समृद्ध आहे. या जनजातींच्या लोकगीतांचे फार मोठे वरदान लाभलेले आहे. या प्रत्येक नृत्य प्रकारात लोकगीतांची रेलचेल असते. मौखिक परंपरेने चालत आलेली ही लोकगीतें नृत्य सादर

करताना किनऱ्या आवाजात म्हटली जातात.

### लोकनृत्याचा मनसोक्त आविष्कार

भारतीय जनजातींचा सदैव सामूहिक, सामुदायिक सगळ्यांचा मिळून एकत्रित असाच कलाविष्कार असतो. सामूहिक भावनेला जपणारा हा समाज आणि एकंदरच या जनजातीची उदात्त संस्कृती आहे.

नाच-गाणे लोकगीत सदोदित गुणगुणणे ही जणू या जनजातीची जीवनशैलीच होऊन बसली आहे. मांदळ, बोहडा, ढोलनाच, तारपानाच यासारख्या लोकनृत्याचा मनसोक्त मुक्त आविष्कार या जनजातींच्या जीवनात अनुभवता येतो. जनजातीचा जीवनातील हा आनंदाचा ठेवा आहे. विरंगुळा आहे.

वनवासींची ही लोकनृत्यकला म्हणजे लोकनृत्य वैभव आहे. नृत्यकलेचा हा समृद्ध भारतीय वारसा चालत आलेला आहे. भारतीय जनजातीची ही मांदळ सारखी लोकनृत्ये निसर्गाशी सुसंवाद साधतात. त्यांची लय, ताल, ठेका, वाद्यसंगीत, नि:संकोच मुक्त नृत्य, कसरत, चमत्कृती, संवाद, सोंग, वाघ, सिंह, मोर अशा पशूपक्षांची वेषभूषा रंगभूषा सारेच अपूर्व आहे. सगळ्यांना सामावून घेऊन त्यांचा सहभाग वाढविणारे आहे. तरुण, बाल, वृद्ध सगळे या नृत्यात गुंतून जातात. रंगात आलेल्या नृत्यात घोषणा, हुर्योऽऽ असे आवाज, चित्कार, आरोळ्या त्या नृत्याची लज्जत वाढविणारेच असतात.

लोकनृत्याला पूरक अशी लोकगीतेही ठरतात! तात्पर्य, वनवासींच्या या पारंपारिक लोककला नृत्याच्या कलात्मक आविष्काराचा, लोकनृत्य शैलीचा शास्त्रीय अभ्यास झाल्यास या नृत्यकला सुविकसित होतील.

❋ ❋ ❋

# वारली लोकसंस्कृतीचे विशेष

**वनवासी मुलुख**

महाराष्ट्राच्या आदिवासी प्रदेशाचा विचार केला तर नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, ठाणे, पालघर, वाडा, जव्हार, विक्रमगड, मोखाडा, खोडाळा, नाशिक, पेठ, सुरगाणा, दिंडोरी, सटाणा, बागलाण, कळवण, मालेगाव, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, किनवट इत्यादी वनवासी समाजाच्या वास्तव्याची स्थाने आहेत. वारली समाज हा तुलनेने महादेव कोळी आणि कोकणा यांच्या मानाने अधिक मागासलेला आहे. वनवासी जमातीमध्ये महादेव कोळी, कोकणा, क ठाकूर, म ठाकूर, मल्हार कोळी, ढोर कोळी, कातकरी, भिल्ल, गोंड, तडवी, वळवी, गावीत, आंध, पावरा, धानका, कोरकू कोलाम आणि वारली अशा अनेक जमाती आहेत. भारतात या जमातींची संख्या ४२७ इतकी नोंदविली आहे.

**वारली समाज**

प्रामुख्याने डहाणू, तलासरी, जव्हार, वाडा, मोखाडा या भागातील पाड्यावर सर्वत्र विखुरलेला हा वारली समाज आहे. मुख्यत्वे ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक वास्तव्य वारली या जमातीचे आहे. १० लाखाहून अधिक या वारली जमातींची लोकसंख्या आहे. महाराष्ट्राप्रमाणेच, गुजराथ, कर्नाटक, सिलवासा, दादरानगर हवेली भागातही ठाणे-नाशिक जिल्ह्याप्रमाणेच वारल्यांची वस्ती आहे. या वारली लोकसंस्कृतीच्या अभ्यासासाठी त्यांच्या जमातीचा एक आलेख मांडला पाहिजे. सकाळपासून तो झोपेपर्यंतची त्यांची दिनचर्या तपासली पाहिजे. वारली समाजाच्या चालीरिती, परंपरा, सणवार, उत्सव, लोकसमज, अपसमज, प्रथा, रूढी जाणून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी, त्यांच्या लोकसाहित्याचा सर्वांगीण अभ्यास आणि संशोधन करावे लागेल. लोकगीते, लोककथा, म्हणी आणि वाक्प्रचार, प्रहेलिका आणि कोडी उखाणे नुसते संकलन, जतन करून भागणार नाही, तर त्याचे नव्या काळाच्या संदर्भात

परिशीलन, मूल्यांकन आणि महत्त्वमापनही झाले पाहिजे. त्याचे मोल लक्षात आले, तर संवर्धन आपोआप होईल.

**वारली जीवनशैली**

वारल्यांच्या जीवनशैलीवर प्रकाश टाकणारे एक लोकगीत मोठे बोलके आहे. त्यात नमूद आहे.

**'बामणाच्या जल्माला जाशी**
**त लिखू लिखू मरशी ।**
**मारवाडी होशी**
**त तोलून तोलून मरशी ।**
**चमार होशी**
**त नाड्या जाती करून मरशी ।**
**पण वारल्याच्या जल्माला जाशी**
**त 'जंगलचा राजा' होशी ।'**

असे हे जंगलचे राजेपण वारली समाजाच्या लोकसाहित्यात आलेले आहे. अशा गीतामधून वारल्यांची अस्मिता आणि स्वाभिमान नजरेत भरतो आणि ती वस्तुस्थिती आहे. वारली अगदी लग्नाला पैसा नसेल तर 'घरोंदा' घरजावई म्हणून भले सासऱ्याकडे ठराविक काळ २/३ वर्षे राहील पण मुदत कालावधी संपताच बायकोला घेऊन त्याच दिवशी आपल्या घरी जाईल. मिंदे जिणे त्याला पसंत नाही. करार संपला, की झाले.

दुसरे कदाचित मातृभूमीबद्दलची भावना जाणीवपूर्वक तेथे नसली तरी धरतीबद्दल त्याच्या मनात श्रद्धा आहे. धरित्री आपली देवता आहे. तिला येता जाता नाचताना आपले पाय लागतात म्हणून या काळ्या आईबद्दलची कृतज्ञता एका अशाच वारली लोकगीतातून समर्थपणे अभिव्यक्त झालेली दिसून येते.

**'अथ नाचू का, कोठ कोठ नाचू**
**धरतीच्या पाठीवर,**
**धरतरी माझी मायूर**
**तिला मी पाय कसा लावू रं,**

**अथ नाचू का कोठ कोठ नाचू**
**कणसरी माझी मायूर**
**तिला मी पाय कसा लावू रं'**

असे हे वारल्यांचे उत्कट धरणीमातेबद्दलचे प्रेम केवळ अजोड असे आहे. या वारली समाजाबद्दल ते अडाणी आहेत, अंधश्रद्धाळू आहेत असे अपसमजही पसरलेले आहेत. पण यातील तथ्य जीवन मूल्यांच्या संदर्भात समजून घ्यावे लागेल. 'वारली' शब्दाची वि.का. राजवाडे यांनी वरूडाई > वारुली > अशी व्युत्पत्ती सांगितलेली आहे. तर कात्त्यायनाने वार्तिकात निषाद, व्यास आणि वरूड या तीन जमातींचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे डॉ. विल्सन यांनी 'वारली, शब्दाची व्युत्पत्ती सांगताना नमूद केले आहे, की दक्षिणेतील सात कोकणांपैकी 'वरलाट' कोकणात राहातात ते 'वारली' होय.

पण या व्युत्पत्तीवर एकमत होईलच असे नाही. मात्र वारली लोकगीतात मांडलेले तत्त्वज्ञान स्वीकारार्ह अंतर्मुख करणारे आहे. त्यातून त्यांच्या जीवनमान, राहणीमान यापेक्षा उदात्त विचारसरणीवर अधिक प्रकाश पडतो त्याचे उदाहरण पहा-

**'कच्च्या घड्याचा दाटू काहितरी**
**कायेचा दादू, नाही काही दिस'** म्हणजे माणूस एखाद्या कच्च्या घड्यासारखा आहे. थोड्या काळाचा तो सोबती, पण नश्वर आहे. पण आहे तोवर कौटुम्बिक जीवनातील आनंद, नात्यातील उदात्त भावनांसह व्यक्त करतो.

**'माझा गो जावाय**
**पुनवेचा चांदू ग**
**माझी ग सूनस**
**दारची तुळस ।।'**

आता वारली समाजातील मंत्रातंत्रावरील विश्वासाचे उदाहरण नमुन्या दाखल पाहावे. एखाद्याला जखम झाली तर वाहणारे रक्त बंद होण्यासाठी अथवा जखम भरून निघण्यासाठी पुढील मंत्र आहे तो 'सीताराम इंपाळ'कडून प्राप्त झाला आहे. कोरा कागद घेऊन पाहणी

करण्याचा हा मंत्र आहे. पण त्यातही रामायण आहे. **'राम लक्ष्मण वनात गेले, तेनी कहाडली काळी सरमा, सरमा खेवळता लागाल घाय, भरत सीता वनसापद घाय आहे, समून जाऊ दे, जमून जाऊ दे, नाय तर माज्या गुरुची आई न रे'**

वस्तुत: अत्यंत खडतर जीवन वारल्यांच्या वाट्याला आलेले आहे. परंतु वन-निसर्गाचे वरदान त्यांना लाभलेले आहे. त्याचे प्रतीक म्हणजे वारली स्त्रिया! मिळेल त्या रानफुलांना माळतात तेही मोठ्या आवडीने. असेच त्यांचे सणवार उत्सव. आहे त्या परिस्थितीवर मात करून, आनंदात साजरे होतात. सुगीच्या दिवसात तारपा नृत्याला रात्र जागविणारा बहार येतो. अत्यंत लयबद्ध, धुंद, बेहोष करणारे हे नृत्य आहे. जसजसी रात्र चढत जाते तसतशी तारपा नृत्याची रंगत संगत वाढत जाते. वयाचे, स्त्री पुरुष असल्याचे भान विसरून नृत्य तारपा आणि घुंगरूच्या काठीच्या ठेक्यावर चालते.

**वारली विवाहपद्धती**

समाजाचा विकास पाहायचा तर त्या समाजाची विवाह आणि कुटुम्ब पद्धती लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. त्या त्या विशिष्ट समाजाचे खास नियम असतात. बंधने असतात. हा समाज अनिर्बंध, मुक्त स्वातंत्र्य देताना उत्सुक नसतो. सांस्कृतिक मूल्ये व्यक्तिवर्तनाला मर्यादा घालतात. वारली समाजातही हेच दिसून येते. वारली विवाह पद्धतीत विचार विनिमयातूनच बहुसंख्य विवाह ठरतात. काही वेळा मुलगा नाही म्हणून किंवा वरमुलाची गरिबी आहे म्हणून घरजावई ठेवून घेण्याची एक पद्धत रुढ आहे. तो मुलगा दहेज देता येत नाही म्हणून सासऱ्याच्या शेतात प्रामाणिक कष्ट करतो. त्याला घरोंदा, घरोरी, खंदाड्या शब्द रूढ आहेत. हे गरीब वरांबद्दल; पण काही बाबतीत मुलीच्या बापाला ठराविक रक्कम देऊन, वर वधूला स्वगृही आणतो. तिच्याशी संसार करतो. त्याला कोरड्यावरचे लग्न म्हणतात. आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यावर विवाह न करता एकत्र राहून वारली एकत्र वैवाहिक जीवन जगू शकतात. त्यांना मुले ही होतात. नंतर सोयीसवडीने ते विवाहबद्ध होतात. साखरपुड्याला वारली 'पेण',

'बोलवे' म्हणतात. असे विवाह अनैतिक नसून समाजमान्य आहेत. वारलींच्या विवाहात त्यांचे कुलदैवत 'हिरवादेव' याला फार महत्त्व आहे. त्याखेरीज विवाहनिर्विघ्न पार पडत नाही. हळद लावणे, बाशिंग मोडणे म्हणजे लग्नाला जमलेल्या विवाहित मंडळींच्या कपाळाला आधी बाशिंग धरून, अक्षता वाहून मग नवरा-नवरीला बाशिंग बांधतात. मग 'लोण लखण' म्हणजे एक तांबड्या रंगाच्या चिंधीत हळकुंड, तांदूळ, सुपारी, उडीद, खारीक अशा ७ पदार्थांना एकत्र करून वधुवरांच्या गळ्यात बांधतात.

ओटी भरणे, घाना गाठी म्हणजे काळीगाठी नवरानवरीच्या गळ्यात घालतो हेच मंगळसूत्र. विवाहानंतर स्वत: फेरे, उंबर लावतात, सुडकी म्हणजे साड्या वाटतात. आहेर पद्धतीही यथाशक्ती या वारलींमध्ये आहे. एरव्ही आठवडाभर चालणारा विधी बदलत्या काळानुसार अनुकरण करून नव्या पद्धतीने एका दिवसातही विवाह उरकतात. **वारली चित्रकलेलाही** विवाहात महत्त्व आहे. भिंती सारवूनच त्याला सुरुवात होते. विवाहात पहिला बोल हा 'लहान बोल' असतो. त्याला फारसे महत्त्व नसते. दुसऱ्या म्हणजे मोठ्या बोलानंतरच (वाङ्‌निश्चय) लग्न होते. 'देज' म्हणजे आजच्या भाषेत हुंडा, वारलींचा देज; दोन मण भात एक पायली तुरी आणि १२॥ रुपये मुलीच्या आईवडिलांना वरातीचा खर्च म्हणून दिला जातो. भाऊबंद आणि ग्रामस्थ यांचाही काही रक्कम देऊन मानसन्मान केला जातो.

हळद लावलेला तांदूळ सगे सोयरे आप्तेष्टांच्या दारी ठेवून निमंत्रण करतात. याला 'नोत्र' असे म्हणतात. लग्नाच्या कार्यासाठी माणसे निश्चित करणे याला 'विडा बांधणे' म्हणतात. 'बस्ता' बांधताना दोन्ही वधुवर पक्षातील लोक एकत्र येतात आणि लग्नाचे सामान घेतात. लग्न मंडपावर भातारी वा 'पावली' किंवा 'कासर' ठेवून आंबा व कडू लिंबाच्या तोरणांनी पानांनी मांडव सजवतात. पूर्व दिशेला मंडपाचे द्वार ठेवतात. त्या दारानेच नवरदेव येतो. लग्नात 'धववेरी' स्त्री गाणी म्हणते. हीच गाणी धवळे म्हणजे मंगलाष्टक होत. असा हा वारलींचा विवाह साजरा होतो. आजही या परंपरा चालू आहेत.


**वारली चित्रकला**

'वारली चित्रशैली' ही वारली लोकसंस्कृतीची एक जगप्रसिद्ध श्रेष्ठ अभिव्यक्ती आहे. मौलिक कमाई आहे. जणू वारली समाजाला लाभलेले ते एक खास वरदान आहे. वारली चित्रकलेच्यामध्ये अग्रभागी डहाणूच्या 'जीवा सोमा म्हसे' याचे नाव आज आहे. त्याचप्रमाणे आता कृष्णा जेठ्या, पसारी, बाळ लाडक्या दुमडा, नथुदेऊ सुतार, राजेश वेत्या वनगड, मंकी बापू वोडा इत्यादी वारली चित्रकारही प्रसिद्ध झाले आहेत.

वारली चित्रशैली, वारली जीवनाचा एक परम श्रेष्ठ धर्म आहे. त्यातील सूक्ष्म गोष्टींतूनही त्याचा प्रत्यय येतो. वारल्यांची तंबाखू खाण्याची / ठेवण्याची पिशवी, डबा, स्त्रीयांच्या केसांची 'फणी' यातही त्याची कलाकुसर दृष्टीस पडते. त्यांच्या सर्वच कलांच्या बाबतीत आणि विशेषत: चित्रकलेच्या बाबतीत निसर्ग हाच खरा गुरू आहे. गाईच्या शेणाने सुबकपणे सारवलेला गोठा, त्यांच्या भिंतीवरसुद्धा ही चित्रकला शोभायमान दिसते. तांदळाच्या पीठाने, फार तर तांबूस रंगाच्या गेरूने ही चित्रकला सजलेली आहे. त्यांच्या धार्मिक कार्यक्रमात विवाहप्रसंगी खास करून ही चित्रे रंगविलेली असतात. एका अर्थाने त्यांच्या देवदेवतांचे ते वारली समाजाने केलेले आराधन आहे. त्यात माणसं, पशू-पक्षी, रंगरेषा यांचे ते अप्रतिम प्रतीकात्मक आरेखन असते.

सुप्रसिद्ध चित्रकार रवीजी परांजपे यांनी या वारली चित्रकलेला 'आदिम अभिजात कला' म्हणून संबोधले आहे. त्यांच्या 'आदिवासी कला : छे छे ! आदिम अभिजात कला' या लेखात त्यांनी म्हटले आहे की, 'ही आदिमकला जर घडली नसती तर आजची सुबोध, सुंदर भावपूर्ण चित्रकला शक्य झाली नसती हे सांगायला हवे.' पुढे त्यांनी असे लिहिले आहे की, "१९६४ साली या वारली चित्रकलेचा परिचय भास्कर कुळकर्णी या चित्रकाराने घेतलेल्या शोधामुळे घडला. परंतु १९६४ नंतरच्या मराठी चित्रकारांनी वारली चित्रकला पुढे नेण्याचे प्रयत्न यशस्वी केले नाहीत. त्यामुळे वारली चित्र परंपरा गोठलेली राहिली. आजच्या मराठी जनमानसात कलाविषयक जागृती पुरेशी नसल्यामुळेच वारली चित्रकलेचं भ्रष्ट अनुकरण शिकविणारे वर्ग गल्लोगल्ली वाढले आहेत." (आम्ही आदिवासी विशेषांक, पान क्र.९)

अशी ही जन्मजात परंपरेनं जोपासलेली वारली चित्रशैली त्यांच्या सांस्कृतिक जीवनाचा भाग बनली आहे. श्रद्धा,भक्ती, मनोरंजन, श्रमपरिहार यांची जोड असलेली वारली 'चित्रशैली' ही एक मूलभूत कला ठरते. ती सुखद अनुभूती देते. लग्न चौक, देव चौक, देवता पूजन, पंच, ग्रामदेवतापूजन या सगळ्यांनाच वारली संस्कृतीजनित चित्रकलेत मोठा सूचक अर्थ आहे. वारल्यांच्या जीवन जगतातील अदम्य उत्साह त्यात आहे. त्यांच्या संवेदनशील सकारात्मक मनाची ती उत्तम अभिव्यक्ती आहे. तारपा नृत्य, लग्नाची वरात, शेती संस्कृती याचे मुक्त चौकात, त्रिकोण, वर्तुळ, रेषा यांनी साधलेली ही चित्रकला. त्यात सूर्य, चंद्र, माणसं, प्राणी, झाडं, पक्षी, वृक्ष, टेकड्या, जंगल, पर्वत, नद्या, मंदिरं इत्यादी आहेत. त्यातून वारली जीवनाशी संवाद साधता येतो. वनवासी भोगत असलेला प्रतिकूल परिस्थितीवरील हा उतारा, तोडगा आहे. प्रांजल चित्रण आहे. धार्मिक पार्श्वभूमी लाभलेली ही कला समजून घ्यावी लागते. सापांचे आकार, कोळीष्टक, धरणी माता सांभाळणारा सूर्य, सुगीचे दिवस, हिरवा देव, नारन देव, मानव आणि निसर्ग हे सारे वारली चित्रकलेचं दीपवून टाकणारं वैभव आहे.



अशी ही जन्मजात परंपरेने जोपासलेली वारली चित्रकला म्हणजे वारली लोकसंस्कृतीचा, लोक जीवनाचा एक अनोखा आविष्कार आहे.

❋ ❋ ❋

# वनवासींची पर्यावरण जाण

समाजात आज स्वातंत्र्य, समता, समरसता आणि बंधुत्वाची भावना निर्माण होणे ही आजच्या काळाची गरज आहे. Libralisation, Privatisation आणि Globalisation, (LPG) च्या आजच्या काळात सर्वसामान्य माणसाला खंबीरपणाने उभे राहावयाचे आहे. त्यासाठी आपण वनवासी बांधवांना अज्ञ, अडाणी, दुर्बल, दरिद्री, अशिक्षित समजून मार्गदर्शन करण्याची जशी गरज आहे त्याचप्रमाणे त्यांनी आजवर जपलेल्या परंपरा, रीती रिवाज, त्यांचे आडाखे हेही समजावून घेण्याची गरज आहे. विचार संस्कृती परंपरांचे वस्तुतः आदानप्रदान करावयाचे असते.

**'रिव्हर्स' गिअरही आवश्यक**

आपल्याला असे वाटेल, की आपण मागे जातो आहोत, पूर्वीचे जुने तेच चांगले असे मानीत आहोत. या वनवासींपासून आपण काही शिकावे असे आहे का? पण लोकसंस्कृतीच्या अभ्यासकाला असे म्हणून चालत नाही? जे जे उन्नत, उदात्त ते ते आपण स्वीकारले पाहिजे. चांगल्याचा स्वीकार केला पाहिजे. हे मागे येणे नसते. गाडीला अन्य चार गिअर्सबरोबर पाचवा रिव्हर्स गिअरही असतो, तो आपल्या सुरक्षिततेसाठी हिताचा संरक्षक म्हणून असतो अन्यथा आपण भयंकर अडचणीत येऊ शकतो. त्याच दृष्टीने आपले चांगल्यासाठीच हे मागे वळून पाहाणे आहे. पर्यावरणाच्या संदर्भात आज आपण सावध झालो आहोत, जागरूक होत आहोत. कारण Global warming ची भीती निर्माण झाली आहे. हे सगळेच प्रश्न गंभीर बनत आहेत. अशावेळी पारंपरिक आणि अपारंपरिक अशा दोन्ही प्रकारच्या गोष्टींची सांगड घालावी लागते. वनवासी बांधव वैदिक काळातील हिंदू संस्कृती जपणारे आहेत. वेदात जशी उषासूक्त, वरूणसूक्त, मंडूकसूक्त आहेत त्याचप्रमाणे वनवासी देखील निसर्ग पूजक आहेत. देव, पशू, पक्षी, प्राणी, वृक्ष, धरतीचे पुजारी आहेत.

**लोकसंस्कृतीचा अभ्यास व्हावा**

वनवासी कला, साहित्य आणि संस्कृतीची जोपासना व्हावी आणि त्यांच्या नितळ जीवन शैलीचा सर्वांगीण विकास घडून यावा हा सद्भाव आपण सगळ्यांनी मनोमनी बाळगला पाहिजे.

हे खरे आहे, की अंधश्रद्धेचा प्रभाव आणि विज्ञाननिष्ठेचा अभाव वनवासींमध्ये आहे. तथापि, त्यांच्या त्या अंधश्रद्धाही कारणमीमांसेसह आपण नीट समजून उमजून घेतल्या पाहिजे.

वनवासी धार्मिक कामकाजात आणि परंपरागत नृत्यगानात मग्न होऊन विविध सणवार, उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे करतात. होळी धुलीवंदनाचा सण, दिवाळी, आखाती (अक्षयतृतीया), दसरा, पोळा, नागपंचमी, कवळीभाजी, बीजा या सणांचे वनवासींच्या जीवनात वेगळेपण आहे. त्यात पर्यावरण संवर्धनाची व निसर्गाशी एकरूपतेची जाणीव आहे. बोहाड्यासारखे उत्सवही त्याला पूरक आहेत. वनवासींची जंगलगीतं संख्येने विपुल आणि 'जंगलची छाया' जपणारी आहेत. त्यांच्या काही गीतांची शीर्षके पाहा- 'हळदीनं भरलंय पातळ बायचं', 'काजळया डोहो माजविला', 'दर्याच्या किनाऱ्याला उगवेला चंद्र', 'शेवंतीची फुले' या त्यांच्या लोकगीत सदृश गीतामधून निसर्गाची ओढ आणि जिव्हाळा प्रगट होतो. त्यातील काव्य आणि कल्पनाविलास लक्षवेधी आहे. वनवासींच्या लग्न, काज, नव्या धान्य पिकाचे वाजतगाजत पूजन करून ते देवाला वाहणे, लक्ष्मीला सोनकमळ वाहणे या प्रथाही निसर्गप्रेमाची साक्ष आहेत. वनवासींच्या या जीवनसरणीकडे आता प्रगत पौर्वात्यांचे आणि पाश्चिमात्यांचेही लक्ष वेधले आहे. त्यांच्या म्हणी, त्यांचे वाक्प्रचार यातही, पर्यावरणशास्त्र Ecology/Environmental science भरलेले आहे असा प्रत्यय या अभ्यासकांना येत आहे. पॅरीसच्या अभ्यासकाचे उदाहरण या संदर्भात लक्षात घेण्याजोगे आहे. मुद्दाम मराठी भाषा मोडकी तोडकी शिकून त्याने वनवासी पाड्यांवर जाऊन त्यांच्या म्हणी व वाक्प्रचार संग्रहीत केले.. तेवढ्यासाठी तो पॅरीसहून जव्हारला आला होता. झाडपाल्याची वस्त्रेही अतिग्रामीण भागात वनवासी वापरीत तसा वनौषधींचा उपचार हाच त्यांचा निसर्गोपचार होता. वनवासींइतकी वनस्पतींच्या जातकुळींची ओळख कोणाला नाही

आणि त्यांच्यातील औषधी गुणधर्मही त्यांनाच माहिती आहेत. त्याचे संकलन व शास्त्रशुद्ध प्रयोगशाळेतून सिद्धता करणे, निष्कर्ष काढणे सर्वांनाच हिताचे आहे. अन्यथा 'पेटेंट'च्या या जमान्यात आपण फार मोठा वारसा आणि हा ज्ञानाचा ठेवा गमावून बसण्याची भीती आहे. आपल्या भारत देशात नानात्वा बरोबरच एकत्व सामावलेले आहे.

## विविधतेतून सुसंवाद

आपल्या देशातील ही विविधता कोणत्याही प्रकारची विषमता निर्माण करण्यात असमर्थ ठरली. उलट, त्यातूनच सुसंवादाची निर्मिती झाली. सर्व राज्यातून याच भारतीय संस्कृतीच्या अंत:प्रवाहाची जाणीव होते. कालभान आणि परिस्थितीनुसार त्यात काही वेगळेपण, बदल जाणवत असले, तर मुख्य स्रोत एकसंध व मूलतत्त्वे अबाधित राहिली आहेत. हा संस्कृतीचा ओघ अखंडपणे प्रवाही आहे. प्रत्येक राज्याला, जिल्ह्याला एक अदृश्य चेहरा असतो त्याची ओळख आपल्याला मुद्दाम करून घ्यावी लागते. आपल्या महाराष्ट्रात देखील वनवासी पट्टा फार मोठा आहे. त्यांच्या परंपरा आणि अनोखे अद्‌भुत जतन केलेले आजवरचे 'शहाणपण' आपण आवर्जून जाणून घेण्याची आवश्यकता आहे.

## वनवासींचे 'काज'

वनवासी वर्षातून एकदा काज घालतात म्हणजे सामुदायिक श्राद्ध. आपण असे सामुदायिक विवाह, व्रतबंध पाहतो पण ही 'काज' प्रथा अत्यंत लक्षणीय आणि अनुकरणीय आहे. 'काजा'मध्ये वर्षभरात मृत झालेल्या व्यक्तींचे एकत्रित सांत्वन कार्य-पार पाडले जाते. भले मातीचे पिंड ते करतात पण सगळ्यांचे एकत्र श्राद्ध घातले जाते. आणि तेथेच पुन्हा कुटुम्ब पुनर्वसनाचा प्रयत्न होतो. विधवा स्त्री आणि विधुर पुरुष यांच्या अनुरूप जोड्या जमविल्या जातात. शेतीकामासाठी कुटुम्ब उभारणी गरजेची ठरते. त्यावर त्यांनी हा काढलेला तोडगा आहे.

तसेच लग्न करण्याची ऐपत नसेल तर स्वखुषीने एकत्र राहतात. पती पत्नी एकनिष्ठा जपतात. मुले होतात. काळ अनुकूल झाल्यावर विवाह करतात ही तडजोडही गरिबीतून घडत राहते. फार तर घरजावई होऊन गरीब मुलगा सासऱ्याची शेती ठराविक वर्षे करतो

आणि ऋण फेडून मुलीला घेऊन स्वत:चा संसार थाटतो. अशा या प्रथा आहेत. त्या परमार्थाने समजून घेतल्या पाहिजेत.

**मर्यादित खर्चात अमर्याद आनंद**

गव्हाची पोळी हे वनवासींचे सणाचे पक्वान्न आहे. फार तर भाताबरोबर गूळ भरून कणकीची उकडलेली 'उंडी' यावर सणवार आणि पाहुणे पाहुणचार साजरा होतो. एरव्ही नागलीची भाकरी आणि मडक्यात शिजवलेले उडीदाचे वरण हेच त्यांचे खाणे असते. भातशेती पिकली तर भात!

तारपा, ढोलनाच, मांदोळनाच, थाळगान, दंडार, बोहाडा, जागरण, गोंधळ, सोंग, मुखवडे खेळ तरीही साजरे होतातच अमर्याद आनंदातच मात्र मर्यादित खर्चात.

**पर्यावरण जाणिवेची झलक**

चोरी नाही, भीक नाही, गैरवर्तणूक नाही असा हा आपला वनवासी समाज पर्यावरणाची मूळातच जाणीव ठेवून जपवणूक करणारा आहे. याचे सोपे उदाहरण म्हणजे झोपडी बांधताना प्रथम आपल्या गुराढोरांची जागा घरात निश्चित करतात; मग उरलेल्या जागेत स्वत:चे घर बांधतात; असा हा पशुधनाबद्दलचा कळवळा आहे. स्वत: कोरा चहा पितात कारण दूधावर वासरांचा हक्क आहे; माणसाचा नाही ही जाणीव आहे. नाचतानाही आधी धरणी मातेला वंदन करतात. कारण धरतीमाता आहे. नाचताना तिच्यावर पाय ठेवावा लागतो. तिला पाय लागतो म्हणून नाचामध्ये भूमी मातेला त्यांचे पहिले नमन असते. म्हणजे मातीचे मोल ते जाणतात. 'काळी-आई' जपतात. जनावर सांभाळतात. वृक्ष, वनराई तर त्यांच्या उपजिविकेचे साधन आहे. या वनराजाला या वनोपजावर निर्भर राहावे लागते. केवळ झाडाची राब तोडून जमीन जाळून पिकवितात त्यामध्ये कृषिशास्त्रही दुजोरा देते. 'जळो पण पिको' त्यामुळे अधिक पीक यायला मदत होते.

**रावण पळवितो ती सीतामाई कथा**

रावण सीतेला पळवून नेत असताना तिला वनवासींनी सोडविले नाही. तो त्याची राब जाळण्यासाठी पाने तोडण्यात गर्क असतो म्हणून

सीता त्याला शाप देते 'जळो तुझी जमीन'. पण मग आपली चूक कबूल करून हा वनवासी उ:शाप मागतो तेव्हा सीतामाई प्रसन्न होऊन त्याला उ:शाप देते 'जळो पण पिको' म्हणजे तू जमीन जाळतो पण ती चांगली पिकत जाईल. ती प्रथा चालू आहे. त्याला कृषी संशोधनाचाही आधार आहे. वनवासी झाड तोडीत नाही, वाढवतात कारण 'झाड तठ वारा' 'पडती पाण्याच्या धारा' अशी म्हण रूढ आहे. हिरवा देव, जांभूळपाडा, नीळमाती, मेट म्हणजे घोडे बांधतात ती 'पागा', जांबसर, पिंपळगाव, डोंगरगाव या नावात झाड, डोंगर, मातीचे प्रेम अभिव्यक्त झालेले आहे. 'कवळी भाजी'चा सण सगळे मिळून नवीन भाजी समारंभपूर्वक 'सिलेब्रेट' करून खातात. 'होळी जळाली, थंडी पळाली', 'तण खाई धन' या म्हणीत पिकांची निगा राखली जावी ही कल्पना आहे. 'वावरात पिकू दे, आमचे पोट भरू दे' 'माय माझी तू, घरात सोन पडू दे'.

'फडका घे मडका घे....सूट' एवढ्याच काटकसरीत वनवासी राहतो. 'जेढ अन् पाण्याची भेट', 'पुस करी हुस', 'पडतील स्वाती तर पिकतील मोती.'

'चैत म्हणजे दैत', 'पडल्यानाही मघा तर वरती बघा' अशा अनेक म्हणी पर्यावरणाशी संबद्ध आहेत. असे हे वनवासींचे पर्यावरणाचे भान आहे. ही वनवासींची पर्यावरणाची जाण, पर्यावरण रक्षण करते ही वस्तुस्थिती आहे.

❋❋❋

# नाशिक : वनवासींचे लोकसाहित्य

नाशिक जिल्ह्यातील वनवासी लोकसाहित्याचे विशेष नोंदवीत असताना या लोकसाहित्यातही विपुल अक्षरधन लोकसाहित्याच्या सर्वच प्रकारांमध्ये आढळते. मौखिक परंपरा म्हणूनच हा वारसा आजतागायत आपल्यापर्यंत येऊन पोहोचलेला आहे, त्यात दिंडोरी, पेठ, सुरगाणा, इगतपुरी, हरसूल या सर्वच तालुक्यांचा आणि परिसराचा वाटा फार मोठा आहे.

लोकगीते, लोककथा, उखाणे, म्हणी, कोडी, लोकसंवाद विविधस्वरूपी लोकविद्या, यातुविद्या, चित्रकला, लोककला, लोकवाद्ये इत्यादींचा समावेश त्यात आहे. लोकसाहित्याचे हे सारे रचनाप्रकार प्रभावी तर आहेतच पण त्यात लवचिकताही आहे. पांगूळ, वासुदेव, गोंधळी, भराडी, वाघ्या-मुरळी, भांड, बहुरूपी यांनी या परंपरा आजतागायत खेडोपाडी टिकवून लोकसंस्कृतीचे खऱ्या अर्थाने जतन केले आहे. कोकणा, भिल्ल, महादेव कोळी, धनगर, वंजारी, बंजारा या समाजाने कृषिसंस्कृती, विवाह, सणवार, विधी नाशिक संस्कृतीला जोडून आपल्या लोकवाङ्मयात जतन केलेले आहे. त्याची नमुन्यादाखल उदाहरणे आवर्जून नमूद करावीत अशीच आहेत. अहिराणी प्रमाणेच भिल्ली, कोकणी, धनगरी, दखनी, गुजराथी, प्रमाण मराठीच्या प्रभावाखालील मराठी बोली भाषिक विचारात अंतर्भूत आहेत.

नाशिकच्या परंपरेतील लोकवाद्ये विविध प्रकारची आणि अत्यंत कमी खर्चात तयार व्हावीत अशीच आहेत. एकतारी-चिपळी, ढाक, घांगरी, भांगसर भाळ, हलगी, तुतारी, डफ, ढोल, पायसरी, पखवाज, टाळ, ढोलताशा, संबळ, दिमडी, तारपा, तुणतुणे, पुंगी, भीलसाई अशी ही लोकवाद्ये वापरात आहेत.

वनवासी लोकसाहित्याचे भाषिक विशेष पाहता अत्यंत उत्तम व सुलभ शब्दसंपत्ती मराठीला समृद्ध करणारी आहे. पूर्व दिशेला

'उगवती', पश्चिम दिशेला 'मावळती', ऋतुप्राप्तीचे वय असलेल्या स्त्रीला 'आंगळती', 'आक्रीत' म्हणजे विचित्र, अघटीत, चोरटे प्रेम व्यक्त करणाऱ्या युगुलांचे संकेत स्थळ 'गोडा दिवस' म्हणजे सोमवार आणि 'मोडा दिवस' म्हणजे मंगळवार अशीही अप्रतिम शब्दकळा, लोकपरिभाषा रूढ आहे.

बोहडा, काज, कवळी, भाजी, मांदोळनाच, भक्तिगीत, लगीन-गौरी गीत, भोंडल्या-टिपऱ्या नाच, मर्तिकनाच, तोरण बसविणे, डोंगरच्या मावल्या, तारपा नाच, ढोलनाच, हस्तकला यांचा समावेश या वनवासींच्या लोककला विचारात होतो.

वनवासींच्या भाषेत महादेव किंवा शिव हाच 'डोंगरदेव' म्हणून ओळखला जातो. डोंगराच्या गाभाऱ्यातील 'डोंगऱ्या' हे शिवस्थान आपण समजून घ्यावे लागते. महादेव-पार्वतीचा विवाह 'धवलगिरी'वर लागला त्यावेळी पाळलेली प्रथा म्हणून 'धवलगाणे' जे 'आडा', 'धवळी' स्त्री विवाह समयी म्हणतात ते थेट 'शिव-पार्वती'शी नाते सांगणारे आहे. वनवासींनी वेताळ, झोटींग, मावल्या, वाघोबा, हिरवा देव, म्हसोबा, कान्होबा, कणसरी, साती आसरा, मुंड्या, चेडा, वाघदेव या आपल्या देवता मानून त्यांना पूजेसाठी देव्हाऱ्यात स्थान दिले आहे.

अवर्षण आणि ओला कोणताही दुष्काळ असो; वनवासी परस्परांना सहकार्य करतात. देणगी देता येत नसेल तर चांगले कार्य म्हणून श्रीमंत घरी मजुरी करून ते पैसे वळते करतात. गाईचे दूध वासरासाठी असते या भावनेने ते स्वत: कोरा काळा चहा पितात. वनौषधीचे उपचार परोपकार म्हणून करतात. मुलीच्या बापाला देहज देण्याची प्रथा आहे. हे धान्य, दागिने स्वरूपात दिले जाते अन्यथा त्या नवऱ्या मुलाला 'घरोंदा' म्हणून काही वर्षे सासऱ्याच्या घरी शेतीत राबावे लागते. योग्य वेळी पैसे जमा झाल्यावर विवाह होतो पण तत्पूर्वी ते दाम्पत्य म्हणून एकत्र राहू शकतात. मातृसत्ताक पद्धतीची छाप वनवासी जीवनावर अद्यापही पक्की आहे. आखाडा, भाया बसविणे, कंदोरी करणे, बाघबारस, काज करणे, पडकाई, कणसरी कथा हे वनवासींचे महत्त्वाचे सण, उत्सव, प्रथा आहेत. रांगोळी, चौक

काढणे, बांबूकाम, चटया, टोपल्या, चित्रकला, हस्तकला, भरतकाम, भांड्यावरील नक्षीकाम यात त्यांची सौदर्यदृष्टी प्रगट झाली आहे. निसर्गाचे ऋण मानून वनवासींनी त्यातून प्रेरणा घेऊन निरागस सौंदर्यदृष्टी जोपासली आहे.

लोकसाहित्याच्या आविष्कारात म्हणींना महत्त्व आहे.

**'फडके घे मडके घे सूट'** या म्हणीत मर्यादित गरजांचा निर्देश आहे.

**'वाघ्याची माय दूधभात खाय'**
**'खाशील तर खाय । नाहीतर उपाशी राहाय ।।'**
**'कणगीत दाणा त भील उताणा'**
**'बोलायला फुटाणा अन् काम काही रेटाना'**
**'निलाजऱ्या दिला पिढा त म्हणे बसाया दिला'**
**'बोलून बोलून सारी, माझं नव पारी'**
**'लाज मरे तो भुके मरे'**

वनवासी संस्कृतीत रामायण रुजलेले आहे, हे पुढील गीतातून उलगडते,

**'सीता गेली वारुळे तळैला सोनु कंबळायला ।**
**हाक मारिते दशरथाला गं तिच्या सासऱ्याला ।**
**हाक मारिते कौसल्याला गं तिच्या सासूला ।**
**हाक मारिते मारिते लक्ष्युमणाला गं तिच्या दिराला ।**
**हाक मारिते रामरायाला गं तिच्या नवऱ्याला ।।'**

माहेरवाशीण सासरी जाते तेव्हा ती व्याकुळ होते. तिला आपले घर आणि नातीगोती आठवतात. त्यावेळी पुढील गीतातून मौलिक उपदेश केला आहे.

**'सासरच्या घरी गं बाई मी, बाबा कुणाला म्हणू ।**
**म्हण गं म्हण गं लेकी, तुझ्याच गं सासऱ्याला ।।**
**'सासरच्या घरी गं बाई मी, आई कुणाला म्हणू ।**
**म्हण गं म्हण गं लेकी, तुझ्याच गं सासूला ।।**

महादेव कोळी समाजातील लोकगीतात 'नाशिकचे गाणे'

ही आहे.

**नाशिकच्या शहरात वस्ती झाली गं रेटून ।**
**रामाच्या पायरीला गंगा चालली खेटून ।।**
**रामाचे दर्शन चार महिने ते दुरून ।**
**गंगा तुझे पाणी पडे सांड्याच्या वरून ।।**
**अल्याड नाशिक पल्याड पंचवटी ।**
**मधून चालली गंगा शिरजोर मोठी ।।**
**अल्याड नाशिक पल्याड कोण गावू ।**
**रामलक्ष्मण नांदती दोघं भाऊ ।।**
**अल्याड नाशिक पल्याड तुझं काय ।**
**'राम' माझे भाऊ 'सीता' भावजय ।।**
**नाशिकच्या शहरात कशाचा गलबला ।**
**रामजीच्या आधी रथ गरुडाचा आला ।।**
**सीताला सासुरवास ऐका मंदोदरी बाई ।**
**वनवास आला पापी रावणाच्या पाई ।।**
**सीता शोधीला मारुती गेला रंगानी ।**
**रामाच्या मुद्रक सीतेला हिंगानी ।।**
**रागट सीतामाई कुंकू कपाळी भरून ।**
**राम देखीले दुरून, आले नेत्र भरून ।।'**

नाशिक जिल्ह्यातील लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीचा अमोल ठेवा आहे. काळाच्या प्रवाहात हे लोकसाहित्य विस्मृतीच्या कोशात जात आहे. हा मौलिक वारसा जपणे गरजेचे आहे. डॉ, रा.चिं. ढेरे म्हणतात त्याप्रमाणे, वस्तुनिष्ठेच्या निकषावर अस्सल विश्वासार्ह साधनातून उभा राहणारा इतिहास हा शुष्क, रुक्ष आणि चैतन्यहीन होण्याचा धोका असतो म्हणून या लोकपरंपरेशी सर्वच संशोधकांची, रसिकांची जवळीक आणि संपर्क असणे आवश्यक आहे. त्यातूनच नाशिकच्या सांस्कृतिक इतिहासाचे दर्शन घडू शकते.

❋ ❋ ❋

# ठाणे : वनवासी लोकसंस्कृती

आपल्या भारतीय संस्कृतीचे अंत:प्रवाह भारतातील सर्व राज्यांमधून, राज्यातील जिल्ह्या-जिल्ह्यातून प्रवाहित झालेले आहेत. या संस्कृतीच्या प्रवाहात विविधता आहे, पण विषमता नाही. परिस्थिती आणि कालमानानुसार काही वेगळे बदल जाणवत असले तरी मूलस्रोत एकसंधच राहिला आहे. हा संस्कृती ओघ अखंडित प्रवाही आहे. फारतर त्या त्या ठिकाणचे जीवनमान आणि राहणीमान यात भिन्नता, वेगळेपण भरून राहिला आहे. या दृष्टीने आपण महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यांचा विचार केला असता प्रत्येक जिल्हा आपल्या विशेषांनी युक्त असतो. महाराष्ट्रातील वनवासी बहुल ठाणे जिल्हा आहे. या ठाणे जिल्ह्याचा एक अनोळखी आणि अदृश्य चेहरा आहे. त्याची मुद्दाम ओळख करून द्यावी लागते. ज्यांना ठाणे जिल्ह्याची ओळख आहे असे वाटते ते स्वत:च अनभिज्ञ असतात.

प्रस्तुत ठिकाणी ठाणे जिल्ह्यातील वनवासी पुरताच विचार करणार आहोत. ठाणे जिल्ह्याचे नागरी-शहरी स्वरूप शहरवासीयांना ठाऊक आहे. तथापि ठाणे जिल्ह्याचा बहुतांश भाग तसा अदृश्य आहे. तो चेहरा फारसा लोकांना माहिती नाही. औद्योगिकीकरण, तंत्रज्ञानाचा विचार, व्यापारी-शैक्षणिक भरभराट, लोकसंख्येची वाढ हे सगळं शहरी वातावरण नजरेत भरते. वाहतूक आणि दळण-वळण वेगही लक्षात येतो. पण याच ठाणे जिल्ह्याचा एक फार मोठा भाग वनवासी-गिरिजनांच्या वसाहतींनी व्यापला आहे. हे मात्र फारसे परिचित नाही.

डहाणू, पालघर, वाडा, जव्हार, तलासरी, मोखाडा, शहापूर अशा सात तालुक्यांचा विस्तृत पट्टा हा वनवासी वस्तीचा ठाणे जिल्ह्यातील भाग आहे. आता पालघर तालुक्याचा तेवढ्यासाठीच स्वतंत्र जिल्हा झाला आहे. या ठाणे जिल्ह्यात विक्रमगड, सूर्यानगर या सारखी महत्त्वाची गावे आहेत. वनवासी एक स्वतंत्र जिल्हा असावा म्हणून पालघर हे ठिकाण निवडले. शिवाय डहाणू ते नाशिक अशी एक रेल्वे खेळविल्यास या भागाचे दळण-वळण वाढेल आणि वनवासी

विकासाला हातभार लागेल. जव्हार, मोखाडा, सूर्यमाळ, देवबांध, विक्रमगड, वाडा, तलासरी, शहापूर, डहाणू, सूर्यानगर, कासा, मनोर या वनवासी भागांना एकत्र गुंफणारे स्वतंत्र वनवासी विद्यापीठ शिक्षण विकासासाठी असावे अशीही एक विचार धारा ठाण्यात रूढ आहे. याच कारणाने वनवासी संस्कृती, लोकजीवन, शिक्षण, ललितकला यांच्या संशोधन-अभ्यासाचे स्वतंत्र दालन त्यामुळे खुले होईल.

ठाणे जिल्ह्यातील वनवासींचं जीवन, त्यांची संस्कृती विशेष लक्षणीय म्हणून अभ्यासनीय आहे. ठाणे जिल्ह्यात वनवासींच्या एकूण आठ जाती आहेत. महादेव कोळी, कोकणा, वारली, ढोर कोळी, मल्हारकोळी, क ठाकूर, म ठाकूर आणि काथोडी किंवा कातकरी. त्यांची संख्या कमी-अधिक आहे. या अनुसूचित जमातीमध्ये शिकलेले आणि नोकरीमध्ये वर्ग १,२,३ मधील जागा पटकावणारे पदवीधर आढळतात. पण हे आहेत मोजकेच. बहुतांश लोक याच जातीतील कमालीचे मागासलेले आहेत. विशेषत: कातकरी-काथोडी ही जमात शिक्षणापासून वंचित आहे. अजूनही मृत जनावरांचे मांस खाण्याची प्रथा चालूच आहे. एकदा मागास वर्गीय जात म्हटली, की निदान या जातीत तरी एकोपा आपल्याला अपेक्षित असतो पण तशी मात्र वस्तुस्थिती नाही. वनवासी जातींमध्येही उपजाती आणि पोटभेद आजही अस्तित्वात आहेत. त्यात आपण मिसळलो तरच ते लक्षात येते अन्यथा नाही. पण या अनावश्यक जातभेदाची पाळंमुळं खोलवर रुजलेली दिसतात.

आजही ठाणे जिल्ह्यातील एखाद्या अति ग्रामीण आणि दुर्गम पाड्यावर, जिथे एकही एस्.टी. बस दिवसभरात एकही फेरी करीत नाही तिथं अठरा विश्व दारिद्र्य कशाला म्हणतात ते पाहायला मिळाले. केवळ एक लंगोटी लावून उघडेबंब लोक झाडावर चढून विळ्याने सरपण काढताना दिसतील. जाळण्यासाठी 'राब' काढतील. नदीवर बाया-बापड्या उघड्यानं आपले एकुलते एक वस्त्र वाळत घालून आंघोळ करताना दिसतील. पुन्हा ही आंघोळही सवड जेव्हा मिळेल तेव्हाचीच. प्यायला पाणी नसते म्हणून मग आंघोळी नदी, विहिरीवरच होतात. एखाद्या झऱ्यातील आटत चाललेल्या पाण्यात आणखी खोल खड्डा करून तिथे गाडग्या-मडक्यात थोडे थोडे पाणी भरायचे. गाडगं-

भांडे भरले, की २-४ मैलावरून चढ-उतार पार करीत पाणी आणायचं अशा या अडचणी आहेत. पाड्यावर अद्यापही वनवासींची फसवणूक बोहरी आणि कच्छींच्या दुकानातून होत आहे. अगदी साधा साबणही सुगंधी स्नानाच्या साबणाच्या भावात विकला जातो. पिळवणूक आणि शोषण चालूच आहे. अजूनही मोठ्या साहसाने, मधमाशा डसत असूनही मधाचं पोळं होरपळून काढलेला मध बाटलीभर असूनही अवघ्या ५ रुपयात त्यांच्याकडून विकत घेतला जातो. गावठी बाभळीचा अस्सल डिंक भारंभार देऊन मीठ, कांदे बटाटे विकत घेणारे वनवासी बांधव आहेत. पाच रुपयात घेतलेल्या मधाचे दुकानदार १०० रुपये करतो.

वन संपत्ती आणि वनौषधी हिरडा, बेहडा, डिंक, जांभूळ, करवंद, बोर, भोपळा, काकड्या, कैऱ्या मिळेल त्या भावात विकतात. त्या पैशातूनच मग जीवनावश्यक पदार्थ तेल, मीठ, गूळ, कांदे विकत घेतात. शिवाय वनवासींना मिळणाऱ्या नोटाही धड मोजता येत नाहीत. एक हिरवी म्हणजे पाचाची, एक लाल म्हणजे दोनची नोट मिळून ७ रुपये होतात. असा या वनवासींचा एखाद्या ओट्यावर बसून हिशोब चालू राहतो. शिवाय पाड्या-पाड्यात खाजगी, हात उसना, वनवासींना कर्जबाजारी करणारा व्यवहार चालतोच. गाय-म्हैस घ्यायला पैसे देऊनही स्वत: कमी भावाने दूधाचा रतीब या वनवासींना घालावा लागतो. त्यामुळे पाड्यावर सावकाराच्या दावणीला हा वनवासी सहज बांधला जातो. रेशनकार्डावरची साखर घ्यायला त्याच्याकडे पैसे नाहीत. म्हणून ती साखर बोहरी घेऊन ज्यादा भावाने विकतात.

वनवासी पालकांचे आपल्या पाल्याकडे कमालीचे दुर्लक्ष झाले आहे. दरीतून ते वर यायलाही उत्सुक नाहीत. ठाणे जिल्ह्यातील पालकांचा मुलामुलींच्या शिक्षणातील सहभाग अपवादात्मकच आहे. एखाद्या बेरिस्ते वा मेढे या सारख्या अती दुर्लक्षित पाड्यावरील मुलांना शेती कामामुळे शाळा सोडून गुरे वळावी लागतात. आपल्या धाकट्या भावंडांना सांभाळण्यासाठी शाळा सोडावी लागते. शिक्षणाने मुलांना नजर लागते, करणी केली जाते, तो मुलगा जगत नाही, आजारी पडतो, अशा समजुती आहेत. एक किस्सा असा आहे. पालकाने मुलाला शाळेत आणून घातले, की तो मुलगा पोट दुखतं म्हणायचा. पालकांना काही कळायचे नाही म्हणून कॉटेज हॉस्पिटलच्या डॉक्टरांना

दाखवल्यावर ते म्हणतात, 'खरं म्हणजे पोट दुखतं यातलं खरं काही कळतच नसतं म्हणून ही मुलं शिक्षण टाळण्यासाठी असे बहाणे करतात.' घरी बसतात आणि मग मोकळ्या रानात नदीकाठी उनाडक्या करीत बसतात. शिक्षणापेक्षा निसर्ग सान्निध्यातच वनवासींना खरा रस आहे. रानचा वारा पीत हुंदडायची त्यांची मुळात संस्कृती आहे.

ठाणे जिल्ह्यात एक प्रश्न लक्षवेधी आहे. शेतातील नवीन धान्य निघाले, की ते देवाला/देवीला वाहायचे. त्यासाठी वाजत-गाजत मिरवणूक निघते, मग मात्र दरीतील वनवासी सुगीच्या सगळ्या सणवारात मोठ्या उत्साहात आपले दारिद्र्य बाजूला ठेवून सहभागी होतो. याच शेती पायी वनवासी आपल्या विखुरलेल्या पाड्याला-वाडीला चिकटून आहे. रस्त्याच्या कडेला जवळ येऊन एकत्र वस्ती करायलाही तो तयार नाही. जर शेतीवर आपण राहिलो नाही तर शेती आपली राहाणार नाही असा या वनवासींचा समज आहे. म्हणून तो पाडा सोडायला तयार नाही. शहरात तर तो रमतच नाही. ठाणे जिल्ह्यातील प्रदूषित पाण्यामुळे जणु काही अनारोग्याचे वरदानच मिळाले आहे. खरुज, हगवण, त्वचारोग, गॅस्ट्रो, नारू व कुपोषण सगळंच ठाणे जिल्ह्यात ठाण मांडून बसलेले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र नावालाच आहे. त्यांची रुग्णवाहिनी सहसा नादुरुस्तच असते. स्वयंसेवी सेवाभावी संस्था आणि त्यांचे काही उमेदीचे डॉक्टर्स मात्र कार्यरत आहेत. सराव म्हणूनही काही भागातील दवाखाने तेवढ्यापुरतेच चालतात. औषधांचा तुटवडा नेहमी जाणवतो आणि सर्पदंशाच्या केसेस अधिक आढळतात. त्यांच्या पायी गमबुट नाही, मग हे होणारच. सोयीनुसार गाजावाजा करणारी आरोग्य शिबिरं होतात पण शेवटी वनवासींना 'भगत' हाच जवळचा वाटतो. हा भगतच मग त्यांचा डॉक्टर बनतो.

वनवासींची मानसिकता विचित्र आहे. अजुनही ठाणे जिल्ह्यातील वनवासींमध्ये विपुल अंधश्रद्धा आहेत. भगत, गंडेदोरे, कोंबडे, बकरे इ. सगळं झाल्यावर शेवटच्या अवस्थेत दवाखान्यात नेतात. भगताला त्याचे पैसे मिळतात. काही अपवादात्मक ठिकाणी डोळ्यातील मोतीबिंदू बाभळीच्या काट्यानेही काढतात असे ऐकायला मिळते. वस्तुतः ठाणे जिल्ह्यातील वनवासींजवळ, जुन्या जाणत्या वनवासींकडे वनौषधींची भरपूर माहिती आहे. ते चांगले वैद्य आहेत. गुळवेल, गोखुर, टणटणीचा

पाला इत्यादी वनस्पतींतून त्यांना असाध्य अशा रोगांवरील उपचार करता येतात. विशिष्ट झाडाची पाने गोड लागली तर सर्पाने दंश केला आहे व कडू लागली तर सर्पाने दंश केला नाही हे ते सांगतात. ठाणे जिल्ह्यातील वनवासी फक्त आजचा विचार करूनच जीवन जगतात उद्याचा विचार करीत नाहीत. त्यामुळे आत्महत्येचे प्रमाणही किरकोळ गोष्टीतून वाढते. त्याच पाऊलवाटेने प्रवास होत राहतो.

ठाणे जिल्ह्यातील वनवासींमध्ये सुगीच्या दिवसात तारपा नृत्य मोठ्या उत्साहात सादर केले जाते. आपली तहान-भूक विसरून, बेभान होऊन धुंद करणारे असे नृत्य ते सादर करतात. आपले अर्धपोटी जगणे, नागडे, उघडे राहणे या साऱ्याचा त्याला विसर पडतो. स्त्री-पुरुष हा भेदही शिल्लक राहात नाही. तारपा गाल फुगवून पुंकणारा, न थांबता वाजविणारा कसदार, बलदंड तरुण असतो. त्याच्या वाजविण्याच्या तालावर वनवासी फिदा असतात. मोठ्या खुषीत तारपाच्या नादात त्या गुंगतात. असा हा ठाणे जिल्ह्यातील तारपा नाच वनवासींच्या सभोवताली वर्तुळाकार फड उभवितो, खूप प्रसिद्ध आणि लोकप्रिय आहे. तारपा नाचात वनवासी स्त्री-पुरुष आपल्या व्यथा, दु:ख, कष्ट विसरून मोठ्या आनंदात गुंग होऊन नाचतात. बर्ट्रांड रसेल हे पाहून उद्‌गारले होते, 'वनवासींनो, तुम्ही मला तुमची ही बेहोशी द्या. मी माझी सारी ग्रंथ संपदा तुम्हांला समर्पित करायला तयार आहे.' वनवासींची ही हजारो वर्षे चालत आलेली परंपरा मनोज्ञ आहे. या वनवासींच्या सांस्कृतिक परंपरेनेच, नृत्यगान या उत्सवांनीच त्यांचे कष्टमय जीवन सुसह्य आणि रोचक बनविले आहे. त्याचा परामर्श घेणे उद्बोधक आहे. वनवासींच्या ठाणे जिल्ह्यातील अशा या विविध कलांचे मोल फार मोठे आहे. त्यात निसर्गाशी नाते प्रस्थापित झालेले आहे.

ठाणे जिल्ह्यातील लक्षवेधी उत्सव म्हणजे 'बोहाडा' असतो. जगदंबेचा उत्सव. या उत्सवात विविध देवादिकांची वेषभूषा करून, मुखवटे घालून सोंगे सादर केली जातात. कोणते सोंग कोणाकडे याचीही परंपरा रूढ आहे. प्रत्येक सोंग आपापल्या वेगळ्या चालीने/ पद्धतीने नाचते. त्याच्या वाद्यांचीही एक वेगळी ढब असते. गणपती, बहिरोबा, हिरवादेव, अहिरावा, वेताळ, नृसिंह, दुंदुभी, म्हसोबा,

नारद, सारजा, गावदेव आणि पहाट होते तेव्हा शेवटी जगदंबेचे सोंग नाचते. ही सोंगं रात्रभर क्रमाने नाचतात. प्रेक्षकांची तोबा गर्दी असते. या निमित्ताने जत्रा भरते. त्यात माणुसकीचा पाझर आहे. कौटुंबिक सुखदुःखे वाटून घेऊन तरुण-तरुणींची लग्ने जुळण्यालाही हीच संधी असते.

ठाणे जिल्ह्यातील ढोल नाचही प्रसिद्ध आहे. त्यात पिरॅमिड सदृश्य कसरती आहेत. नाचणारे काटक असतात. घामाघूम होईपर्यंत ढोलनाचात न उलगडणारे गाणे गात धूम करतात. कोलांट्या उड्याही मारतात. संबळ, डाका, ढोल, झांज वाजवत रात्र-रात्र जागवितात. देवीचा गोंधळ, आखातीजा, नवीन धान्य, कवळी भाजी हे सगळे सणवार साधेपणाने चालूच असतात. सणाच्या दिवशी भाताबरोबरच गूळ-कणिकेची उंडी टाकून ते शिजवतात. गव्हाची पोळी हेच त्यांचे पक्वान्न असते. अत्यंत काटकसरीने माफक खर्चात कला-क्रीडा यात हा वनवासी अमर्याद आनंद उपभोगतो. ठाणे जिल्ह्यातील 'थाळगान' ही कला यादृष्टीने वाखाणण्याजोगी आहे. काशाचा थाळा, मेण, सनकाडी सारोट्याची एवढे पुरे. ती काश्याच्या थाळीतल्या मेणात रोऊन त्यावरून खालपर्यंत कथेकरी बोट फिरवून सुस्वर कंपन निर्माण करतो आणि त्या कंपनांच्या सूरात कथा कथन करतो. जेवढा वेळ ऐकणाऱ्यांना आहे तेवढा वेळ ही कथा चालू राहते. ठाणे जिल्ह्यात वनवासींचे सामुदायिक विवाह स्वयंसेवी संस्था लावतात तसेच एक 'काज' नावाचा सामुदायिक श्राद्धविधीही साजरा होतो. त्यात महत्त्वाचे म्हणजे विधवा स्त्रिया आणि विधुर पुरुष यांचे पुनर्विवाह जुळवून पुनर्वसन केले जाते. त्यातून शेतीसाठी लागणारे संसार पुन्हा उभे राहातात. वेळप्रसंगी गरोदर स्त्रीशीही लग्न करून कमालीचे स्त्री दाक्षिण्य व मनाचा मोठेपणा दाखविण्याची क्षमता या वनवासींमध्ये आहे. पूर्वीच्या घरोब्यातून झालेल्या मुलाला ते 'ओढ्या' म्हणतात पण स्वीकारतात.

ठाणे जिल्ह्यातील वनवासींच्या म्हणी, वाक्प्रचार, उखाणे यात साहित्य गुणापेक्षा पर्यावरण शास्त्र भरलेले आहे. हे मोठे आस्वाद्य भांडारच आहे. उदाहरणार्थ पहा 'झाडतठं वारा....पडती पाण्याच्या धारा' हा वनवासी शेत जमिनीला 'काळी आई' म्हणतो. 'जळो पण पिको' ही सीतामाईची उःशापवाणी आहे. रावणाने पळवून नेताना

तिला शेतीत मग्न राहिलेल्या वनवासींनी सोडविले नाही म्हणून 'जळो तुझी जमीन' हा शाप दिला. मग वनवासींनी प्रार्थना करून हा उ:शाप मिळविला. राब जाळून मग शेतात तो पेरणी करतो.

'तण खाई धन', 'वावरात पिकू दे, आमचे पोट भरू दे', 'माय माझी तू, घरात सोनं पडू दे', 'फडका घे मडका घे....सूट' एक फडकं आणि एक मडकं जगायला माणसाला पुरे होते. 'होळी जळली, थंडी पळाली' अशा त्यांच्या म्हणी, वाक्प्रचार आहेत.

पूर्व दिशेला 'उगवती' आणि पश्चिम दिशेला 'मावळती' सारखे चपखल शब्द येथे रूढ आहेत. महिने आणि नक्षत्र यांच्याबद्दल ठाणे जिल्ह्यातील वनवासींच्या जाणिवा पर्यावरण तज्ज्ञांचे लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. उदा. 'जेठ अन् पाण्याची भेट', 'भादवा अन् हंडी मडकी वाजवा', 'पुस करी हुस', 'माही बीजा कोंबडी शिजा' - पोशापोशांनो उगाच निजा', 'चैत म्हणजे दैत', पाणी आबादाणी - शेतकऱ्याला सोन्यावाणी', 'पडल उतरा त हाल खाईना कुतरा', 'पडतील स्वाती त पिकतील मोती', 'पडल्या मघा नाही तर वरती बघा', 'अरदडा त नयी भरती गरदडा' 'हाती करील अन्नाची माती'. असे हे आडाखे निसर्गाशी निर्माण झालेल्या नात्यातून आढळतात. उदा. मुंग्या आपली अंडी घेऊन वर चालल्या, की समजावे यंदा भरपूर पाऊस पडणार, कारण मुंग्या सुरक्षित जागी अंडी हलवतात. कावळ्याने घरटे शेंड्यावर बांधले तर समजावे यंदा पाऊसपाणी कमी आहे. जमिनीत कीडे, कीटक झाले, पिंपळ हिरवा गर्द झाला, पळसाला केसरी रंगाची फुलं आली, की पावसाळा सुरू होणार आहे. वारुळाच्या वरच्या भागातील कंगोऱ्यावरून होकायंत्राप्रमाणे ठाणे जिल्ह्यातील वनवासी उत्तर-दक्षिण दिशा ओळखतो. ठाणे जिल्ह्यातील वनवासींचे कौटुंबिक जीवन हालाखीचे असते. हा वनवासी उपाशी राहतो पण भीक मागत नाही. तो मुळात भिकारी नाही. वनवासी प्रमाणिक आहे तो चोरी करीत नाही. या वनवासींमध्ये वेश्या व्यवसाय नाही. सामान्यत: ठाणे जिल्ह्यातील वनवासींचे हे वेगळेपण आहे. पैशाअभावी विवाह न करता तो सर्व संमतीने एकत्र, एकनिष्ठ राहू शकतो. आजच्या नव्या युगात ठाणे जिल्ह्यातील वनवासींचे हे सांस्कृतिक धन आपण जपले पाहिजे.

❋❋❋

# वनवासींचा होलिकोत्सव

प्रत्येक समाजामध्ये विशिष्ठ उत्सवांना, सणांना फार मोठे महत्त्व असते. आपल्या वनवासी बांधवांचा सर्वात आवडता आणि सर्वात महत्त्वाचा सण शिमगा-होळी ! हा रंगोत्सव मानला जातो. यात धुलिवंदनालाही महत्त्व आहे. लोक दसरा-दिवाळीला जेव्हढे महत्त्व देतात त्यापेक्षाही होळी-शिमग्याला जास्त देतात. फाल्गून महिना सुरू होण्याच्या आधीपासूनच म्हणजे माघ महिन्यापासूनच त्यांना होळी साजरी करण्याचे वेध लागतात.

**एक स्वानुभव**

वनवासींच्या होळीच्या सणाच्या कमालीच्या ओढीचे प्रत्यक्ष विलक्षण अनुभवाचे उदाहरण प्रारंभी द्यावेसे वाटते. मी सहज प्रवासाच्या निमित्ताने हरिहरेश्वर-श्रीवर्धन गावाकडे गेलो तेव्हा रस्त्याने सहज फिरताना मला वनवासी बंधू-भगिनींचा ताफा भेटला, नव्हे ती झपझप चालणारी वनवासींची टोळी भेटली होती. योगायोगाने त्या वेळी मी जव्हारमध्येच (ठाणे जिल्हा) कार्यरत होतो तेव्हा जव्हार - मोखाडा मला नवखा नव्हता. तेथील वनवासी स्त्री पुरुष जवळून ओळखीचे होते. तेव्हा न राहावून मी परिचय नसतानाही त्यांना थांबवून बोललो. या वनवासींनाही जाता येता कोणी बोलले तर त्यांनाही बरे वाटते; आणि काय आश्चर्य ही सर्व मंडळी जवळच्या मोखाडा तालुक्यातील होती. आमच्यात मी जव्हारचा म्हटल्यावर सुख संवाद सुरू झाला तो असा -

"एवढ्या घाईने पायी-पायी तुम्ही कुठे निघालात?" मी विचारले.

"आम्ही आता मोखाड्याला पायी-पायीच जाणार आहोत." त्यांचे उत्तर मिळाले.

"अरे बाबांनो! कुठे श्रीवर्धन - हरिहरेश्वर आणि कुठे मोखाडा, एवढ्या लांब पायी-पायी असे कसे निघालात?"

"आमच्या ठेकेदार मालकाने आमचा रोजगार/पगार पण दिला नाही; कारण आम्ही होळीची सुटी मागितली."

"तरी तुम्ही एवढ्या लांब पायी-पायी कसे जाणार?"

"हो, आम्ही गावी जावू नये म्हणूनच त्याने पगार केला नाही." पगार नाही तर नाही, पण होळी आली ना जवळ, कसेही का होईना, आणि कोठून का होईना पण होळीला आपल्या पाड्यावर गेलेच पाहिजे, असा आमचा रिवाज चालत आला आहे."

मला आश्चर्य वाटले म्हणून मी विचारले, "मग तुमच्या बंधारा बांधण्याच्या कष्टाच्या पगाराचे काय? तो बुडेल."

तेव्हा उत्तर आले, " पगार कोठे जातो? तो आम्ही परत आल्यावर सगळे मिळून वसूल करू. पण गावचा होळी सण चुकवायचा नाही."

वनवासींच्या उद्‌गाराने त्यांची गावी जाण्याची तळमळ, तगमग सगळे उमगले.

**बोरगावची होळी**

मग मुद्दामच पुढे रामदास कोल्हे या माझ्या विद्यार्थ्याच्या गावी जावून, रात्रभर जागून वनवासी बंधूंची होळी अनुभवली.

नाशिक जिल्ह्यातील वणी गावाजवळची सापुतारा रस्त्यावरील त्याचे ते छोटेसे बोरगाव होते. तेथे सर्व पाड्यांची मिळून "एक गाव-एक होळी" अशी चांगली प्रथा होती. एरंडाचे मोठे खोड अथवा बांबूचा दांडा गावाच्या चौकात मध्यभागी रोवून सगळे गावकरी कुटुंबियांसहित सामायिक होळीला पाच-पाच गोवऱ्या मिळेल तेवढा लाकूड-फाटा असे उपलब्ध जळण देतात. मध्यरात्रीला पेटवलेली ती होळी भडकते. अगदी विजेच्या तारांना पोहचेल एवढा जाळाचा भडका उडतो. सगळेच पुरुष-महिला होळीभोवती फेर धरून बसलेले असतात. ढोल-ताशे, वाजंत्री, डाका मध्यरात्री वाजवून बेहोश धुंदीत नाचतात. घरा-घरातून पेटलेल्या होळीला नैवेद्य येतो. नारळ फोडतात, मनोभावे होळीची पूजा करतात. अंगारे धुपारे लावतात, यात खरी-खुरी श्रद्धा

आढळते.

मग ते होळीला प्रदक्षिणा घालतात. घरातले सगळे सान थोर फेऱ्या मारता-मारता मोठमोठ्याने बोंबा मारतात, आरोळ्या देतात. असा आनंदाचा एकच जल्लोष होतो, मात्र त्या जल्लोषात पोटभर नाचणाऱ्यांचे, गाण्याचे बोल कोणालाच उमगत नाहीत. अशा बोरगावच्या प्रातिनिधिक होळीमध्येसुद्धा मान-पान सांभाळून वनवासींच्या होळीच्या सणाचे मोठे अपरूप आहे.

**खानदेशी होळी**

खानदेशातही वनवासी होळीची जय्यत तयारी करतात. महिला पारंपरिक वेषभूषा करून पारंपरिक दागदागिने घालून रिबिनी, रानफुले माळून नटून थटून बाहेर पडतात. वनवासींच्या या होळीसाठी सातपुड्याच्या भागात भोंगऱ्या बाजार भरतो.

होळीसाठी वनवासी, साखरेचे नक्षीदार दागिने घालतात. हे दागिने परस्परांमध्ये भेट म्हणून वाटतात. वनवासींमध्ये लोकसंगीताला खूप जोर चढतो. त्या तालावर नाच-नाचून वनवासी बंधु-भगिनी आसमंत त्या वातावरणाने भारून टाकतात. सगळा संकोच आणि बुजरेपणा सोडून सर्व स्त्री-पुरुष मनसोक्त सहभागी होतात. काही वनवासी मुखवटे लावून विविध सोंगे वठवतात. ती प्रामुख्याने वनातील प्राण्यांची, पशु-पक्ष्यांची, देव-देवतांची सोंगे असतात. त्यावर श्रद्धा ठेवून नवसही बोलले जातात आणि पुन्हा ते फेडण्यासाठी पुढच्या वर्षी होळीच्या सणात सहभागी व्हावेच लागते.

होळीच्या या आनंदाच्या उधाणात त्यांची खरी जीवन संस्कृती आपल्याला अनुभवता येते.

या खानदेशी होळीत प्रामुख्याने पावरा, तडवी, गावीत, भिल्ल याबरोबरच कोकणा, महादेव कोळी, कातकरी, ठाकूर, मल्हार कोळी, ढोरकोळी, वसावी, बिलाली असे सगळेच सहभागी होतात.

असा हा त्यांचा सण विविध पाड्यांवरच्या सगळ्यांना एकत्र आणतो. जणू तो वनवासींचा मेळावा भरतो. वनवासी दाम्पत्य मुलाबाळांसह

या होळीच्या जत्रेत सहभागी होतात.

"फाग म्हणजे देणगीची प्रथा", होळीच्या सणासाठी फाग - म्हणजे देणगी हे वनवासी दारोदार हिंडून मागतात. त्याच देणगीतून होळीचा सण साजरा होतो. अशा या होळीच्या सणाशी निगडीत एक लोककथा आहे.

**होळीची वनवासी लोककथा**

पोरब राजाची मुलगी होळी या नावाची होती. ती एका भोंगडा नावाच्या युवकाच्या प्रेमात पडते. त्याचे कारण या भोंगडाजवळ बांबूपासून विविध कलात्मक वस्तू तयार करण्याचे कसब असते. त्याच्या या कलाकौशल्यावर राजकन्या होळी पुरती भाळते. राजा पौरबाला तो राजा असल्याने हे पटत नाही. पण भोंगडावर - त्याच्या बांबूकलेवर नितांत प्रेम असल्यामुळे होळी अग्निकाष्ठ भक्षण करून त्यातून सही सलामत बाहेर पडून आपले दिव्य प्रेम सिद्ध करते. राजाला हा चमत्कार स्तिमित करतो आणि तो गरीब-श्रीमंती भेदभाव विसरून त्या दोघांचे लग्न लावून देतो.

याच अपेक्षेने वनवासी तरूण-तरूणी होळी-भोंगड्या सारखा मनाजोगता जीवन सोबती मिळावा म्हणून होळीच्या सणाला जास्तीतजास्त संख्येने जमतात.

यातच वनवासींच्या पर्यावरण रक्षणाचा महत्त्वाचा भाग आहे. पंचमहाभूतांपैकी 'अग्नी' या निसर्ग देवतेची होळीच्या माध्यमातून पूजा बांधली जाते आणि वातावरणाची शुद्धी होते, पावित्र्य वाढते. असा हा होळीचा सण वनवासी लोककला आणि लोकसंस्कृतीचे मनोज्ञ दर्शन घडविणारा, पर्यावरण राखणारा होतो.

❋ ❋ ❋

# वनवासींच्या पाऊलखुणा

वनवासींच्या इतिहासाचा अभ्यास कोणत्याही मानव समाजाच्या, जातीच्या, भाषा, बोलभाषांच्या इतिहासाइतकाच जटिल (Complicated) गुंतागुंतीचा असतो. भरपूर वर्षे आणि काळ उलटल्यानंतर तर्क-वितर्क करणे, अर्थाचे अनर्थ आपल्या स्वत:च्या सोयीनुसार करणे हे घडू शकते. 'वनवासी' राजकारणाच्या कचाट्यातही सापडला आहे. सोयीस्कररित्या राजकारण्यांनी वनवासींना आपल्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न चालविलेला असतो. त्याला आपल्या जाळ्यात ओढून आपली पोळी कशी भाजता येईल याचा विचार तो करीत असतो. या सगळ्याचा परिपाक आणि परिणाम म्हणजे आज वनवासींच्या खऱ्याखुऱ्या इतिहासाला अनेक फाटे फुटलेले आहेत. त्याची विविध परिमाणे तयार झाली आहेत. त्यातून नवी समीकरणे मुद्दामच निर्माण करण्यात आली आहेत.

## मानववंश शास्त्रीय अभ्यासाची गरज

वस्तुत: वनवासींच्या कुळाचा आणि मुळाचा शोध घ्यायचा असेल तर आपण मानववंशशास्त्राचा (Anthropology) आधार घेतला पाहिजे. मौखिक परंपरेने चालत आलेल्या वनवासींच्या लोक वाङ्मयाचा, लोक साहित्याचा (Folklore) अभ्यास केला पाहिजे. केवळ कर्णोपकर्णी आणि तोंडी (Oral Transmission) मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोकगीतामधून वनवासींची आगळी संस्कृती जीवनशैली आपण समजून घेऊ शकतो. वनवासी संस्कृतीची खरी पाळेमुळे या मौखिक साहित्यात दडलेली आपण उलगडून घेतली पाहिजेत. तरच आपल्याला योग्य तो बोध होऊ शकतो.

## अज्ञानाचा-दारिद्र्याचा लाभ

वनवासी अडाणी आणि कमालीचा दरिद्री राहिल्याने त्याचा स्वार्थी भावनेने लाभ उठविण्याचा प्रयत्न व्यक्तिगत पातळीवरून आणि

सामूहिकरित्या होत आहे. त्यामुळे अनेकदा ज्ञात असलेला इतिहास पुसण्याचा प्रयत्न होतो. सत्य दडविले जाते आणि चुकीच्या, अनैतिहासिक, अयोग्य दिशेने वनवासींबद्दल हेतु पुरस्सर गैरसमज पसरविणारे लेखन केले जाते. विचार प्रस्तृत केले जातात. यासाठी सावधानता बाळगून या प्रतिपादनांचा सखोल अभ्यास करून मगच निष्कर्षाप्रत आले पाहिजे, अन्यथा अज्ञानी व गरीबीत होरपळणाऱ्या, दुर्गम पाड्यात (Remote Villages) अति ग्रामीण भागात राहणाऱ्या वनवासींना खरा न्याय कधीच मिळू शकणार नाही. जेव्हा वनवासी स्वत: उच्च शिक्षित होऊन स्वत:चा इतिहास प्रामाणिकपणे शोधू लागेल तेव्हाच स्वार्थ प्रणित इतिहास गळून पडतील. वनात तयार झालेली त्याची परिभाषा, संकल्पना त्यालाच समजावून सांगण्याची वेळ येईल.

## वनवासींच्या ऐतिहासिक वाटचालीतील पाऊल खुणा

वनवासी स्वत:च्या वाटा (Shortcuts) खेड्यापाड्यात स्वत:च निर्माण करून जवळच्या रस्त्याने शहरात मुख्य प्रवाहात कसाबसा पोहोचतो. डोंगर दऱ्या आणि चढ उतारातील त्याच्या या खडबडीत बळे बळे रुळविलेल्या वाटा असतात. तसेच काहीसे त्याच्या इतिहासाबद्दलही चित्र दिसते. काहीसा धूसर, पुरेसा न उलगडणारा त्याचा इतिहास सकृत दर्शनी वाटतो. तेव्हा तरीही प्रयत्नपूर्वक आपण या वनवासींच्या जीवनाचा परंपरेने चालत आलेल्या वाटेने जाऊन इतिहासाच्या काही ठळक पाऊलखुणा शोधू शकतो. स्पष्टपणे उमटलेल्या या पाऊलखुणांचा मागोवा घेऊ शकतो. तोच वनवासींचा खरा इतिहास, त्यांच्याच जीवनशैलीच्या आधाराने आपल्याला शोधणे शक्य होईल.

## लोकसंस्कृती वनवासींची

वनवासींच्या लोकसंस्कृतीतच त्यांच्या इतिहासाची पाळेमुळे खोलवर रुजलेली आहेत. वनवासींची अगदी आजची वनातल्या पाड्यावरची संस्कृती आपण न्याहाळली तर आपल्याला भारतीयत्व (Indianisation) एकात्मता (Integrity), समरसता (Oneness), अतिथ्यशीलता (Hospitality), माणुसकीचा (Humanism) प्रत्यय येतो. नि:संशय

ही व्यापक, वैश्विक, मानवतावादी हिंदुत्वाची सुलक्षणे आहेत. स्वामी विवेकानंदांना अभिप्रेत असलेला हिंदू धर्म, महात्मा गांधींचा अध्यात्मनिष्ठ हिंदू धर्म, साने गुरुजींची भारतीय संस्कृती, राष्ट्र आणि संस्कृती सूचक हिंदू धर्म तो हाच आहे. पांडुरंगशास्त्री आठवले यांनी याच विशाल हिंदूधर्माचे प्रतिपादन केले. सगळ्याच नद्या शेवटी सागराला मिळतात तसे जगन्नियंता परमेश्वराकडे अंतीमत: ही धाव आहे. वनवासी बांधवांच्या भाषेत हाच 'महादेव, शिव, 'डोंगऱ्या देव' म्हणून फारतर ओळखला जात असतो. डोंगराच्या गाभाऱ्यातील महादेवाचे हे 'डोंगऱ्या' नामकरण आपण समजून घेतले तरच एकात्म भावनेची जाणीव होईल. वनवासी लोकांशी एकरुप समरस होऊनच हा बोध होईल. वनवासींच्या चालीरीती, प्रथा, रुढी, तथाकथित श्रद्धा-अंधश्रद्धा अभ्यासूनही आपण याच निष्कर्षाप्रत येतो की, वनवासी हा आमचाच हिंदू बांधव आहे. त्याला अहिंदू ठरविणे अयोग्य आहे. वनवासी संस्कृती विशेष म्हणून कै. गंगाराम आवारी गुरुजी यांनी वेळोवेळी केलेल्या नोंदी या संदर्भात महत्त्वाच्या आहेत. त्या संदर्भातील एक महत्त्वाची नोंद म्हणजे वनवासींच्या विवाह संस्कारात विवाहापूर्वी गायले जाणारे गाणे ते 'ढवळ गाणे' व गाणारी 'ढवळी' स्त्री असते. 'ध' ऐवजी 'ढ' वापरला जातो. बोलीतील हे अपभ्रष्ट रूप आहे. वनवासींची मूळ समजूत अशी आहे की, या जगात सर्वप्रथम महादेव-पार्वतीचे लग्न 'धवल गिरी' पर्वतावर झाले. त्यावेळी जे गाणे म्हटले गेले ती ही प्रथा 'शिव-पार्वती'शी थेट नाते सांगणारी आहे.

## 'वनवासी' संज्ञा संदर्भात

भारतीय राज्य घटना १९५० साली तयार झाली. त्यात १६ वा भाग हा सवलतींचा आहे. त्यातील प्रारंभीच्या ३३०व्या कलमात सवलतदारांचे वर्ग दिले आहेत. त्यात अनुसूचित जमातींचा समावेश आहे. राज्यपालांच्या सल्ल्याने राष्ट्राध्यक्ष ही यादी जाहीर करतात. त्यात वर्गीकृत (sheduled) भटक्या अथवा अनुसूचित जमातींना, रानटी-डोंगरी टोळया, आदिवासी, वनवासी, वन्य जाती जमाती

गिरिजन, भूमिजन, भूमिवासी, आरण्यक इत्यादी नावांनी संबोधिले जाते. जनजाती हा शब्द उत्तरेत रुढ आहे. 'aboriginal' या इंग्रजी शब्दाचा कडक निषेध ते करतात. कारण 'आपल्या स्थानी मूळचा नाही' असा त्याचा अर्थ आहे. मुळापासून म्हणजे नेमके काय? पृथ्वीची उत्पत्ती की 'मानव' साकारला तेव्हापासून असे हे अनिर्णितच राहते. आदिवासी शब्द कालवाचक आहे. तो जमाती दर्शक नाही. त्यातून दुरावा, वेगळिक आणि अलिप्तपणाच वाढविला जाण्याची शक्यता आहे. शिवाय अकारण आदिवासी या शब्दाला मागासलेपणा चिकटलेला आहे.

संघ परिवाराने वनात वास्तव्य असल्याने 'वनवासी' ही संज्ञा शोधली. अनेक प्रकारांनी विचार केला तर हा प्रयोग उचित वाटतो. मात्र त्याचाही नीट अर्थ आपण लावला पाहिजे. आदिवासी शब्दाने त्याचा 'आर्यपूर्व भारतीय लोक' वगैरे चुकीचा अर्थ लावला जातो तो दुजाभाव वाढविणारा आहे. म्हणून सर्वत्र 'वनवासी' शब्द वापरून अधिक जवळीक साधता येईल व वनवास संपवून मुख्य प्रवाहात सामीलही करून घेता येईल. कोणत्याही प्रकारे या वनवासी शब्दाचा रामाच्या अथवा पांडवांच्या वनवासाशी संबंध दूरान्वयानेही नाही.

❋ ❋ ❋

# समाज विकासक

गोल वर्तुळात उभे राहून एक खेळ खेळला जातो. बर्फाचा खडा पहिल्या व्यक्तीच्या हातावर दिला जातो. वर्तुळ पूर्ण होताना १०/२० माणसांच्या हातावर तो क्रमाने दिला जातो. शेवटच्या माणसाच्या हातात नुसते बर्फाचे पाणी शिल्लक राहते. अशी स्थिती वनवासी समाजाच्या विकासाबाबत घडली असे म्हणायला वाव आहे, कारण अगदी आजही या वनवासी बांधवांची स्थिती शोचनीय आहे. २० वे शतक संपले २१सावे लागले. पण स्थिती २०व्या शतकातली जाणवते. स्वातंत्र्याचा आता सुवर्ण महोत्सव संपून हीरक महोत्सवही झाला आहे. पण वनवासींच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण आणि मनोरंजन या मूलभूत गरजा सर्वार्थाने पूर्ण झाल्या असे म्हणता येत नाही. पाड्या पाड्यात विखुरलेल्या वनवासींच्या वस्तीला भेट दिली म्हणजे याची प्रचीती येते.

**महाराष्ट्रातील वनवासी भाग**

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यात डहाणू, पालघर, तलासरी, वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा हा भाग संपूर्णपणे वनवासी आहे. त्यांच्या उत्थानावर अधिक लक्ष पुरविता यावे म्हणूनच ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाची मागणी पुढे आली होती. नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, कळवण, दिंडोरी, त्र्यंबकेश्वर, मालेगाव, बागलगण-सटाणा, देवळा, इगतपुरी, हरसूल हा भाग वनवासींचा आहे. रायगड जिल्ह्यात माणगाव परिसर, नांदेड जिल्ह्यातील किनवट परिसर, नागपूर विभागातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा हे जिल्हे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर, नगर जिल्ह्यातील अकोले, शिर्डी, राजूर, लिंगदेव, भंडारदरा हा भाग अद्यापही वनवासींचे जीवनमान लक्षात आणून देणारा आहे. कुपोषण, बालमृत्यू, अनारोग्याची समस्या वनवासी पाड्यामध्ये भीषण स्वरूपात आहे.

१९/२०व्या शतकात १५० वर्षे ब्रिटिशांनी आपली अधिकारशाही "फोडा व झोडा" या घातक प्रश्नांची जुलमी राजवट लादली. त्याकाळात वनवासी बांधवांच्या शोषणाला सुरुवात झाली. विशेषत: आपल्या महाराष्ट्रातील लघु उद्योग, हस्तकला आणि ग्रामोद्योग व्यवसाय यांना उतरती कळा लागली. ग्रामीण, अतिग्रामीण भागातील, खेड्या पाड्यातील जनता त्यामुळे दरिद्रीच राहिली. दारिद्र्याबरोबरच बेकारी विषमता, बेरोजगारी यांनी ती ग्रासली.

## वनवासींच्या उत्थानाचा वसा

अशा या गोरगरीब वनवासी जमातींच्या विकासाचे, उत्थानाचे काम होणे अगत्याचे होते. त्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या वनयोगींनी (हाच शब्द चपखल वाटतो) कल्पनातीत खस्ता खाल्ल्या, त्यातही ज्ञात थोडे, अज्ञात फार आहेत. 'असू पत्थर आम्ही पायातील' हे वचन सार्थ करणारेच अधिक आहेत. वनवासी समाजाच्या जडण-घडणीत या कर्मयोग्यांचा सहभाग इंग्रजी आमदानीपासूनच चालू राहिला. महाराष्ट्राच्या अति दुर्गम, डोंगराळ भागात या वनयोग्यांची खडतर तप:साधना झालेली आहे. वनवासी बांधवांना मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी ही तपश्चर्या काही प्रमाणात कारणी लागली आहे. त्यामुळे वनवासींचे जीवन सुखकर (निदान काही प्रमाणात) होऊ शकले. त्यांना स्थैर्य लाभले. वनवासी क्षेत्रातील, कर्मयोग्यांची महाराष्ट्र समाज घडणीत नोंद होणे तेवढेच गरजेचे आहे.

## महात्मा गांधी-गोळवलकर गुरूजींची प्रेरणा

महात्मा गांधी यांच्यापासून प्रेरणा घेऊन ठक्करबाप्पा, आचार्य भिसे गुरुजींसारखे वनवासी क्षेत्रात कार्य करू लागले. यात प्रि.टि.ए. कुलकर्णी यांच्या शैक्षणिक कार्यातही या जाणीवेचा आणि प्रेरणेचा प्रत्यय येतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक बेलूरमठाच्या स्वामी अखंडानंदांचे शिष्य मा.स.गोळवलकर गुरुजी यांना या समस्येची उत्तम ओळख आणि पारख होती. त्यांच्या प्रेरणेने वनवासी कल्याण आश्रमाची स्थापना झाली. आद्य संस्थापक होते श्री. बाळासाहेब

देशपांडे. गुरुजींच्या सांगण्यावरूनच त्यानी वनवासी कल्याण कार्याची भक्कम उभारणी केली. विकासाच्या वाटेला डोळे लागलेला हा वनवासी त्याला गुरुजींच्या प्रेरणेने असंख्य कार्यकर्त्यांनी प्रेमाने, आत्मीयतेने प्रतिसाद दिला. ते वनवासींना सहाय्यभूत झाले. ही यादी मोठी आहे. त्याखेरीज समाजवादी, साम्यवादी विचारांनी भारलेले बाबा आमटे, शिवाजीराव पटवर्धन, गोदावरी परूळेकर यांचेही वनवासी विकासाचे कार्य लक्षवेधी आहे.

## 'दया' नव्हे तर 'सेवा'

वनवासी बांधवांची कीव येऊन दया बुद्धीने हे काम झालेले नाही तर सेवा भाव मनात वागवून कार्य केलेले हे कार्यकर्ते आहेत. स्वामी विवेकानंदांना अभिप्रेत असलेला हा सेवा भाव आहे. उपकाराची जाणीव येथे नाही. 'बहुजन सुखाय-हिताय' हे कार्य झालेले आहे. जनजातींच्या उत्थानासाठी विविध सेवा प्रकल्प त्यांनी राबविले आहेत. या सेवा प्रकल्पांच्या माध्यमातून अनेक सक्षम कार्यकर्ते घडले. आजही ते आपापल्या परीने परिश्रम-प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत. वनवासी मुला-मुलींचे छात्रावास, वनवासींना उत्तम शिक्षण आणि भारतीयत्वाचे सुसंस्कार घडविणे, धर्मार्थ दवाखाने, आरोग्यरक्षक आणि चिकित्सालये, खेलकूद या क्रीडापटूंना घडविण्यासाठी प्रकल्प संवर्धन, ग्रामसभा, महिला बचतगट, स्वयंरोजगार क्षेत्र, वनवासी मेळावे, कार्यशाळा-संमेलने इ. या बहु आयामी क्षेत्रात वनवासी क्षेत्रातील कार्यकर्ते वनवासींचा स्वाभिमान जागविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांना स्वावलंबन शिकवीत आहेत.

## अ- सरकारी कामच खरे, असर कारी

चित्रकूटचे शिल्पकार समाजशिल्पी नानाजी देशमुखांनी, गोळवलकर गुरूजींनी, अशा हाडाच्या समाज सेवकांनी एकमुखाने हे मान्यच केले आहे, की शासन सरकारवर अवलंबून राहून कधी कार्य पुढे जात नाही तर प्रभावी कार्य हे समाजाच्या, जन सामान्यांच्या सहकार्यातून खरे उभे राहते. म्हणूनच असर कारी म्हणजे परिणामकारक

काम स्वयंसेवी संस्थांनी आणि स्वयंसेवकांच्या जथ्यानीच होऊ शकते. हा अनुभव येतो. आजही निम्मी लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली दिसते. अन्यथा ती दिसली नसती.

वनवासी समाज पुरता संघटित नाही. त्यात कमालीचा न्यूनगंड आहे. त्याला ढळढळीत धर्मविहीन ठरविण्याचा बळेबळे प्रयत्न होतो. त्याच्या जीवनात असंख्य समस्या आहेत. हे सारे दूर करण्यासाठी मानसिक, बौद्धिक आणि क्रियाशिलतेच्या पातळीवर विविध कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले आहेत. वनवासी समाज बुद्धिमान आणि सद्‌गुणी आहे. त्याला योग्य संधी प्राप्त करून देण्याचा प्रयत्न या समाजसेवकांनी मनापासून केला. एकसंध समाज घडविण्याचा, वनवासींच्या सुखदु:खात सहभागी होऊन त्यांनी प्रयत्न केला त्यांची ही नामावली कार्याची जाणीव करून देणारी आहे.

ठक्करबाप्पा, आचार्य भिसे गुरूजी, बाळासाहेब देशपांडे, मोरूभाऊ केतकर, गोदुताई परूळेकर भास्करराव कळंबी, अनुताई वाघ, ताराबाई मोडक, शिवाजीराव पटवर्धन, माधवरावजी काणे, दादासाहेब बीडकर, बाळासाहेब दीक्षित, गंगाराम आवारी गुरूजी, रेवजीभाऊ चौधरी, आमदार भाई कडू, चिंतामण वनगा, विष्णू सावरा, अप्पाजी जोशी, लहानू कोम, नवसू दळवी, वसंतराव साठे इत्यादी अनेक कार्यकर्त्यांची कृतज्ञतापूर्वक दखल घेणे उचित ठरेल.

❋ ❋ ❋



# मा. बाळासाहेब देशपांडे जन्मशताब्दी स्मरण

वनवासी समाजाचे अग्रेसर सुधारक म्हणून आज कै. बाळासाहेब देशपांडे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वनवासी कल्याण आश्रम या आज देशभर कार्यरत असलेल्या संस्थेची स्थापना मा. कै. माधव सदाशिव गोळवलकर गुरुजींच्या प्रेरणेने झाली. आज या वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्याने आपल्या कर्तव्यनिष्ठ कार्याची ६५ वर्षे पूर्ण केली आहेत. ही वनवासींच्या हितरक्षणासाठी स्थापन केलेल्या संस्थेच्या दृष्टीने गौरवाची आणि समाधानाची बाब आहे. स्थापनेपासूनच्या आणि तत्पूर्वीही केलेल्या महान खडतर अशा बाळासाहेब देशपांडे यांच्या साधनेला, तपस्येला हे श्रेय निर्विवादपणे द्यावे लागते. स्वतः ठक्करबाप्पा आणि गुरुजींनी त्यांना मार्गदर्शन केले, आशीर्वाद दिले. कार्याची व्याप्ती वाढल्यावर पुन्हा एकदा ठक्करबाप्पा स्वतःहून बाळासाहेबानी वनवासींच्या मूलभूत गरजा पूर्तीचे आणि विकासाचे केलेले कार्य पाहायला आले होते. बाळासाहेब देशपांडे वकील होते. त्यांना त्या काळात उत्तम वकिली करता आली असती. पण वकिली बाजूला ठेवून वनवासी बांधवांचा अंतःकरणापासून त्यांना कळवळा आला आणि मोठ्या तळमळीने या 'कंटकाकीर्ण' मार्गाने आपले आयुष्य वेचण्याचा त्यांनी निर्धार केला.

**वनवासी कल्याण आश्रम**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक महत्त्वपूर्ण आयाम म्हणून वनवासी बंधू-भगिनींच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी सिद्ध झालेली ही संस्था म्हणजे स्व. बाळासाहेब देशपांडे यांचे नवनिर्माण कार्य आहे. बाळासाहेब देशपांडे यांनी दि. २६ डिसेंबर, १९५२ मध्ये या संस्थेची स्थापना केली. स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे सर्वच सेवाकार्य श्रेष्ठच आहेत, पण अत्यंत व्यापक आणि विशाल दृष्टिकोन स्वीकारून

बाळासाहेब देशपांडे यांनी वनवासींचे शिक्षण, आरोग्य, आर्थिक विकास, श्रद्धा जागरण, हितरक्षा, सुसंस्कार यांसारख्या विषयात काम करून परिवर्तन घडवून आणले आहे. याची प्रचिती आज वसतिगृहे, शिक्षणसंस्था, खेलकूद, आश्रमशाळा, फिरते दवाखाने, आरोग्य रक्षक, बालसंस्कार केंद्र, भजनी मंडळे यामधून येते.

या विविध क्षेत्रात उभ्या राहिलेल्या अनेकानेक सेवा प्रकल्पांच्या माध्यमातून वनवासींची एक जबरदस्त संघटना, एक प्रबळ शक्ती निर्माण झाली आहे. भारतीयत्वाचे संस्कार देण्यासाठी भारताच्या गौरवशाली परंपरेचे पाईक म्हणून आत्मनिर्भर आणि स्वावलंबी करण्यासाठी या वनवासी कल्याण आश्रम संस्थेचे कार्य गेली ६५ वर्षे चालू आहे. त्याचे सारे श्रेय निर्विवाद बाळासाहेब देशपांडे यांचेच आहे. त्यांनी इ.स. १९७९ पासून महाराष्ट्रात वनवासींचे कार्य सुरू केले. आपल्या महाराष्ट्र प्रांताचा विचार केला तर गेल्या ३० वर्षांत वनवासींची सशक्त, सुसंघटीत, कर्तबगार नवी पिढी निर्माण झाली आहे हे लक्षात येते.

**महाराष्ट्र प्रांत स्थिती : २००९**

बाळासाहेबांनी देशभर वनवासी विकासाचा कार्यक्रम हाती घेतला. त्यात त्यांना अनेक सहकारी लाभले. आपण नुसत्या महाराष्ट्र प्रांताच्या सद्य:स्थितीचा विचार केला तरी याची कल्पना येऊ शकेल. महाराष्ट्रात एकूण १६०२ प्रकल्प आहेत. त्यात महाराष्ट्रात शैक्षणिक प्रकल्प जे चालू आहेत त्यात वसतिगृहे १९, प्राथमिक शाळा ०२, माध्यमिक शाळा ०२, बालसंस्कार केंद्रे १२, लाभार्थी १६०० तर आरोग्य प्रकल्पात साप्ताहिक आरोग्यकेंद्रे ४, दैनिक केंद्रे १, आरोग्यरक्षक ५७६, लाभार्थी ४ लाख तर इतर प्रकल्पांमध्ये खेलकूद केंद्रे १५, श्रद्धा जागरण केंद्रे एकूण प्रकल्प १,१२३ पूर्ण वेळ कार्यकर्ते ८१ पुरुष, ६५ महिला, ग्रामसमिती २१८ आणि महिला समिती ६५ इत्यादी अशी ही एका प्रांताची स्थिती. असेच काम चालू आहे. वनवासींची प्रगती झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने भारत देश हा महासत्ता होणार नाही, हे बाळासाहेबांनी हेरले होते. म्हणून त्यांनी वनवासी सर्वांगीण विकासाचे स्वप्न खरे करून दाखविले. 'इवलेसे रोप लावियले द्वारी । तयाचा वेलु गेला गगनावरी ।' अशी त्यांच्या वनवासी कल्याण

कार्याची आज स्थितीगती आहे. 'परम वैभवन्नेतुम एतत् स्वराष्ट्रम्'। ही दृढभावना या कार्याच्या मुळाशी होती म्हणूनच हे शक्य झाले. अदम्य आत्मविश्वासाने आणि 'नर सेवा हीच नारायण सेवा' मानून त्यांनी अहोरात्र ध्यास घेऊन वनवासींची उन्नती साधली. राष्ट्र उभारणीच्या कार्यात भारतीय हिंदू संस्कृतीचे अविभाज्य, अभिन्न अंग असलेल्या वनवासींनाही योगदान देता यावे म्हणून त्यांच्या सर्वांगीण उन्नतीचे व्रत बाळासाहेबांनी अंगिकारले होते.

## फळे रसाळ गोमटी

'शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी' असे विशुद्ध हेतूने बाळासाहेबांनी सुरू केलेले कार्य असल्याने त्याला आता रसाळ, गोड चांगली फळे लागत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रापुरता विचार केला तरी वनवासींचे जीवनमान आणि राहणीमान आता बदललेले दिसते. अक्षरश: हजारो सुशिक्षित, सुसंस्कारित आणि सुप्रतिष्ठित युवकांची पिढी तयार झाली आहे. वनवासींमध्ये आता डॉक्टर, इंजिनिअर, वकील, प्राध्यापक, लोकसेवा आयोग, केंद्रीय सेवा आयोग, मंत्रालय, या माध्यमातून सुपर क्लासवन अशा विविध पदांवर वनवासी युवक आपल्या तेजाने तळपू लागले आहेत. क्रीडा क्षेत्रातही त्यांचा नावलौकिक सतत वाढत आहे. ऑलिंपिकही त्यांना आता दूर नाही. वनवासी कल्याण आश्रमातून घडलेल्या युवकांच्यामध्ये आपणच आता आपल्या समाजाचा, स्वत:चा विकास साधला पाहिजे हे तत्त्व उमगले आहे. भगवद्गीतेत 'उद्धरेत आत्मना आत्मानं । न आत्मानं अवसा येत ।' 'उद्धार करावा आपला आपणच, स्वत:ला कधी कमी लेखू नये' असे म्हटल्याप्रमाणे आता वनवासी बांधवांना उमजले आहे. या दिशेने वनवासींची वाटचाल चालू झाली आहे. आपल्या वनवासी कार्यकर्त्यांना त्यांचे सांगणे होते, की 'मी तुमचा आहे' या भावनेने वनवासी क्षेत्रात काम करावे, मग तुम्हालाही वनवासी, त्यांचे म्हणून अवश्य स्वीकारतील. त्यांची सादरी बोलीभाषा आत्मसात करून त्यांच्यातले एक व्हावे, हे बाळासाहेबांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. आपले तन-मन-धन त्यांनी तर अर्पण केलेच; पण त्यांच्यात आत्मविश्वास, आत्मनिर्भरता आणि स्वावलंबन निर्माण केले. कार्यकर्त्यांनी ३६५ दिवसांतून जरूर

वनवासी कार्यासाठी वेळ द्यावा, असे कार्यकर्ते जोडून गंगोत्रीचा प्रवाह रुंदविला.

## देशकार्य हेच देवकार्य

स्व. बाळासाहेब देशपांडे यांनी देशपूजा हीच देवपूजा मानून वनवासी समाजाचे दु:ख, दारिद्र्य, अनारोग्य, अज्ञान दूर केले. अद्यापही हे कार्य अधिक जोमाने लाखोंच्या संख्येतील कार्यकर्त्यांनी करण्याची गरज आहे. बाळासाहेबांचा जन्म अमरावतीमध्ये झाला. लहानपणी डॉ. हेडगेवार यांची प्रेरणा त्यांना लाभली होती. पुढे गुरुजींनी प्रत्यक्ष दिशा दाखविली. पुढे १९४२च्या आंदोलनातील तुरुंगवासानंतर १९४८ मध्ये मध्यप्रदेश शासनाने वनवासी बांधवांसाठी त्यांच्या उन्नतीचे कार्य बाळासाहेबांवर सोपविले. ते त्यांनी स्वत: यशस्वी करून दाखविले. एका वर्षात १०० शाळा वनवासी भागात सुरू केल्या. १९५२च्या २६ डिसेंबरपासून सुरू केलेल्या वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्याचा व्याप वाढविला-विकास केला.

आज देशभरात ३२ विश्वस्त संस्था असून १२५०० स्थानांमधून १७७७० सेवा प्रकल्प सुरू आहेत. एकूण ३३८ वनवासी जिल्ह्यांत हे काम होत आहे. त्यात विद्यार्थ्यांसाठी १८१ छात्रावास आणि विद्यार्थिनींसाठी ४४ वसतिगृहे चालविली जातात. त्यामधून देशभरातील हजारो विद्यार्थी शिक्षण आणि सुसंस्कार घेत आहेत. ही संख्या ८००० हून अधिक आहे. वनवासी भागातील युवकांना प्राथमिक वैद्यकीय शिक्षण देऊन २७००हून अधिक आरोग्य रक्षक तयार केले. ३१४ आरोग्य केंद्रे, ४ रुग्णालये आणि अक्षरश: हजारो वैद्यकीय चिकित्सा शिबिरातून १५ लाखांवर वनवासींनी आरोग्यसेवेचा लाभ घेतला. या कार्यातून सुशिक्षित वनवासी सुसंस्कारीतही झाला. वनवासी बांधवांना आरोग्य रक्षण करता आले. श्रद्धाजागरण व हितरक्षेतून अराष्ट्रीय कारवायांना, धर्मांतराला मतांतराला आळा बसला. क्रीडा विभागात वनवासी बांधव चमकू लागले. महिलांना स्वावलंबी होता आले.

## वनयोगी बाळासाहेब यांचा जीवनालेख

श्री. बाळासाहेब देशपांडे यांचा जन्म २६ डिसेंबर १९१३ला अमरावतीच्या एका मध्यम वर्गीय परिवारामध्ये झाला. त्यांचे वडील

श्री. केशवराव देशपांडे अमरावतीला शासनामध्ये कर्मचारी होते. देशपांडे यांचे घराणे हे मूळच्या वर्धा जिल्ह्यातील 'आर्वी' तहसीलमधील आहे. श्री. केशवराव देशपांडे यांचे वडील श्री. खंडेराव यांच्या साधू प्रकृतीमुळे त्यांचे श्रम-संपत्तीकडे व शेतीकडे ध्यान नसायचे. त्यांना आर्वीचे सिद्धपुरुष अप्पा महाराजांनी दीक्षा (उपदेश) दिली होती.

रूढी-परंपरेने आध्यात्मिक व तपस्वी जीवनाने त्यांच्या मुलांना सुयश प्राप्त झाले. श्री. बाळासाहेब यांना आध्यात्मिक तपस्वी जीवन प्राप्त झाले होते. श्री. बाळासाहेबांची आई श्रीमती लक्ष्मीबाई ही देवरस कुटुंबातली होती.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तिसरे सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस श्री. बाळासाहेब देशपांडे यांचे मामेभाऊ होते. श्री. बाळासाहेबांचे दोन मोठे भाऊ श्री. श्रीधरराव आणि श्री. प्रभाकरराव हे होत. परिवार मोठा होता. चारही भाऊ वकिलीची परीक्षा पास होते. श्री. श्रीधरराव उपाख्य श्री. अण्णाजी देशपांडे हे नागपूरचे प्रसिद्ध फौजदारी वकील होते. श्री. नीलकंठराव सावनेरमध्ये वकिली करीत होते. छोटे भाऊ श्री. प्रभाकरराव शासकीय नोकरी करीत होते. श्री. बाळासाहेब जीवनभर एक सामाजिक कार्यकर्ताच राहिले. वनवासी समाजासाठी वकिली, त्यांची हितरक्षा करण्याचा त्यांचा ठाम हेतू होता. त्यासाठी आपले जीवन त्यांनी अर्पण केले होते.

श्री. बाळासाहेबांचे प्राथमिक शिक्षण अमरावती, अकोला व नरसिंहपूर येथे झाले. वडिलांनी नागपूरला कायम निवास केला. तसेच श्री. बाळासाहेबानी काशी हिंदू विद्यापीठाची माध्यमिक (मॅट्रीक) परीक्षा पास केली. श्री. बाळासाहेब यांचा परिचय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक पूजनीय डॉ. हेडगेवारांशी १९२६ला झाला. ज्यावेळेस ते आपल्या मोठ्या भावाबरोबर नागपूरला शिक्षण घेत होते. त्या दिवसांमध्ये ते वॉकररोड या ठिकाणी व्यायाम शाळेत लाठी-काठी शिकायला जात होते. त्यावेळेस त्यांची कृष्णराव जोशी यांच्याशी भेट झाली. तेव्हा त्यांनी बाळासाहेबांचा परिचय डॉ. श्री. हेडगेवार यांच्याशी करून दिला. डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या संपर्कात येताच ते संघाचे स्वयंसेवक बनले.

स्वभावत: बाळासाहेबांच्या मनात देशभक्ती, अनुशासन व हिन्दुत्व यांचे संस्कार झाले. १९३०ला त्यांनी नागपूरला हिस्लॉप कॉलेजमध्ये वकिली अभ्यासाला सुरुवात केली. १९३८ला बच्छराजजी व्यास यांच्याबरोबर ते एम.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर व्याख्यात्याची नोकरी प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केला पण यश आले नाही. म्हणून आपले मामा श्री. गंगाधरराव देवरस यांच्या बरोबर रामटेकला वकिलीला सुरुवात केली. पाच दिवसामध्ये ते संघाचे रामटेक तहसील कार्यवाह बनले. श्री. दादा बन्डे, श्री. अण्णा ढोबळे व श्री. जतिराम बर्वे हे त्यांचे मित्र बनले.

श्री. बाळासाहेबांचे आदरणीय गुरुजी मा. गोळवलकर, यांच्याशी त्यांची प्रथम भेट नागपूरला धन्तोली शाखा, बौद्धिक वर्ग चालू असताना झाली. श्री. गुरुजी त्या दिवसांमध्ये 'वुई' नावाच्या इंग्रजी पुस्तकाचे रूपांतर करत होते. त्यांची पाण्डुलिपी वाचण्याचे काम श्री. बाळासाहेब यांच्यावर सोपविले त्यामुळे त्यांची चर्चा श्री. गुरुजींशी होत होती.

सुप्रसिद्ध (अंध) वंशीवादक श्री. सावलाराम यांच्या घरी त्यांची भेट होत होती. त्यावेळेस श्री. गुरुजींचा मुक्काम रामटेकला होता. त्यांच्या घरी एक पुस्तकालय होते. श्री. बाळासाहेबांनी तेथील सर्व पुस्तके वाचून काढली. यामुळे श्री. गुरुजी व त्यांचे परस्पर संबंध जुळले. श्री. बाळासाहेबांनी भावी राष्ट्र सेवा जीवनाची पृष्ठभूमी तेथेच निर्माण केली.

श्री. बाळासाहेबांचे जीवन सुरुवातीपासूनच संघर्षाने परिपूर्ण व आव्हानात्मक बनले होते. एक प्रसंग १९४२चा. जेव्हा महात्मा गांधींनी इंग्रजांना 'भारत छोडो' असे सांगितले होते तेव्हा त्यांना इंग्रज सरकारने पकडले होते. साऱ्या भारत देशात लोकांचा कल्लोळ, राग आवरेना म्हणून लोकांनी मोडतोड सुरू केली होती. पोलीस चौक्यांवर मोर्चे नेले जाऊ लागले आणि डौलात तिरंगा फडकवला गेला. त्यामुळे संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली होती. मोर्चाचे नेतृत्व स्वत: बाळासाहेब यांनी केले. तेथील तहसील कार्यालयावर तिरंगा फडकावला व तेथेच इंग्रजांचे रामटेक सरकार समाप्त झाले. त्यावेळचे रामटेक पोलीस

अधिकारी सजावर अली खाँ यानी बाळासाहेबांना अटक केली होती. लोक घाबरावे म्हणून बाळासाहेबांना हातकडी लावून सडकेवरून फिरवले गेले. दुसऱ्या दिवशी नागपूर जेलमध्ये पाठविले. लुटमार करणाऱ्यांना फाशीची शिक्षा सुनावली होती. बाळासाहेब व त्यांच्या सहकाऱ्यांवर हा आरोप लावला होता. त्या दिवसामध्ये नागपूर जेलमध्ये आचार्य विनोबा भावे, पं. रविशंकर शुक्ल, रामभाऊ रूईकर हे स्वातंत्र्य सैनिक होते. १९४२ला भारत छोडो आंदोलन झाले होते. हिंसक घटना, प्राणहानी झाली होती. त्याच्या सुनावणीसाठी इंग्रजांनी तिकडे स्पेशल न्यायाधीशाची नियुक्ती केली होती. बाळासाहेबांचा मामला त्यांच्याच न्यायालयात होणार होता.

श्री. बाळासाहेबांच्या बाजूने त्यांचे मोठे भाऊ श्री. श्रीधरराव श्री. बारलिंगे व श्री. एन.टी. मंगलमूर्ती वकील होते. सारे पुरावे बाळासाहेबांच्या विरुद्ध बाजूने जात होते. घटनास्थळी श्री. बाळासाहेब उपस्थित होते. अशी सर्व पुरावे देणाऱ्यांनी ग्वाही दिली. पण रामटेकचे तहसीलदार श्री. हरकरे व कवी श्री. देशपांडे यांनी श्री. बाळासाहेब यांच्याविरुद्ध पुरावा देण्यास इन्कार केला. तेव्हा श्री. बाळासाहेब निरापराधी आहेत अशी घोषणा करून त्यांना सोडून दिले.

श्री. बाळासाहेबांचे कार्य चालू असतानाच त्यांचे भाऊ श्री.नीलकंठराव मृत्यू पावले. जेलमधून सुटताच कुटुंबाची जबाबदारी श्री. बाळासाहेबांवर आली. त्यावेळेस १९४३मध्ये त्यांचा विवाह अचलपूरच्या श्री. अप्पासाहेब जहागिरदार यांची मुलगी प्रभावती हिच्याशी झाला.

आर्थिक दृष्टीने परिवाराची स्थिती ठीक नव्हती. म्हणून त्यांनी रॅशन विभागामध्ये नोकरी धरली. आपले कार्य करीत असताना त्यांनी एका मोठ्या व्यापाऱ्याला गैर व्यापारामध्ये पकडले. अपेक्षा ही होती, की त्याला कडी सजा मिळेल पण वरच्या दबावामुळे प्रकरण दाबून टाकले. त्यामुळे त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. या घटनेमुळे कठोर कर्तव्यनिष्ठा व अन्याय यांच्या समोर वाकायचे नाही असा त्यांचा स्वभाव निर्माण झाला.

१९४५ ते १९४८ या वर्षांचा कालावधी त्यांनी शांतपणे

घालवला. १९४८ला महात्मा गांधींची हत्या झाली. तेव्हा नागपूरला हाहा:कार निर्माण झाला होता. स्वयंसेवकांच्या घरावर आक्रमण झाले. तेव्हा त्यांचे मोठे भाऊ पुढे आले. तेव्हा ते प्रसिद्ध वकील होते. त्यांना गर्दीतील नेत्यांनी पाहिले तेव्हा हे तर आपले वकीलसाहेब आहेत त्यांनीच मदत केली होती. आपल्याला सोडविले होते. म्हणून त्यांना काही करू नका. अशाप्रकारे आक्रमकांची गर्दी कमी झाली. त्यावेळेस मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री श्री. रविशंकर शुक्ल होते.

श्री. ठक्करबाप्पाने श्री. बाळासाहेब यांच्या कार्याची सुरुवात व यश पाहून त्यांना २५१/- रु.चा पुरस्कार दिला. १९४९ला ठक्करबाप्पांचा दौरा जयपूरला झाला तेव्हा त्यांनी ठिक-ठिकाणी प्रचारकार्य केले. वनवासींना त्यावेळेस सांगितले, की 'पादरींना घाबरू नका. आपला देश स्वतंत्र झाला आहे.' अशाप्रकारे वनवासी बांधवांत साहस व जागृती निर्माण केली. आनंदी वातावरण निर्माण झाले. जय हिन्दची घोषणा केली गेली. ह्यावेळेस बाळासाहेब आपल्या पत्नीबरोबर होते.

श्री. बाळासाहेबांवर त्या वेळेस कारवाई झाली होती. ती कारवाई त्यावेळेस पंडित जवाहरलाल नेहरू यांनी बंद करायला लावली. सन १९७८-९३ पर्यंत श्री. बाळासाहेबांनी देशामध्ये कानाकोपऱ्यात जाऊन प्रत्येक कार्यकर्त्याला भेटून मार्गदर्शन केले.

१९९५ला स्वामी रंगनाथनन्दजी महाराज रामकृष्ण आश्रम यांना हैदराबादला पत्र पाठवून आशीर्वाद मागितले. पत्रात हे सांगितले होते, की माझी तब्येत बिघडली आहे. शरीर कमजोर झाले आहे. आता वनवासी आश्रमाचे कार्य करण्यासाठी कार्यकर्ते तयार झाले आहेत. रामकृष्ण, विवेकानंद यांच्या आदर्शाने सारे जीवन वनवासींची सेवा करण्यात त्यांनी अर्पण केले होते.

२१ एप्रिल १९९५ला ते स्वर्गवासी झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८२ वर्ष होते. शेवटच्या दिवशी आपल्या कुलदेवतेचा प्रसाद ग्रहण केला व अर्धाकप दूध घेतले. शेवटपर्यंत ते शांतचित्त राहिले. ११ वाजेपर्यंत बोलत राहिले. शेवटच्या क्षणाला त्यांच्या परिवारातील सर्व माणसे जवळ होती.

वनवासी कल्याण आश्रम ही संस्था राष्ट्रीय स्तरावर गेली.

अर्धशतकाहून अधिक वर्षे वनवासी बांधवांसाठी त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणून, एकसंघ राष्ट्र निर्माण करण्याच्या उद्देशाने कार्यरत आहे. एकीकडे किमान जीवनावश्यक, मुलभूत सुविधांपासूनही वंचित असा वनवासी समाज तर दुसरीकडे नगरवासी समाज ही दरी कमी होण्यासाठी अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाचे अटोकाट प्रयत्न चालू आहेत. त्यासाठी वनवासी कल्याण आश्रम आपल्या विविध सेवा भावी योजना राबवित आहे. त्यामध्ये छात्रावास-वसतिगृह, आरोग्यकेंद्र, आरोग्यरक्षक योजना, कुटीरोद्योग, ग्रामोद्योग, लघुउद्योग केंद्र ग्रामविकास प्रकल्प, बचत गट, हितरक्षा आणि श्रद्धाजागरण, खेलकूद प्रकल्प, कृषी विकास, पूरक-पोषक आहार आणि पर्यावरण संरक्षण, बालवाड्या, संस्कार केंद्र इत्यादींचा समावेश होतो. अशा या वनवासी कल्याण आश्रमाच्या महोदात्त कार्यामध्ये आपण सक्रीय सहभाग दिला पाहिजे.

या वनवासी क्षेत्रातील कर्तबगार माणसाचा जीवन आलेखही एक फार मोठे आव्हान आहे. तो पाहिला म्हणजे याची कल्पना येते. त्यांनी शाळा, छात्रावास, आश्रमशाळा काढल्या त्या वनवासींच्या संघटन सामर्थ्यासाठीच. म्हणून ती शक्तिकेंद्रे बनली. बाळासाहेब देशपांडे यांच्या स्वीकृत कार्यपूर्तीनंतर वयाच्या ८२व्या वर्षी त्यांचे महानिर्वाण झाले. १९७५ साली आणिबाणीत बाळासाहेबांना 'मिसा' कायद्यांतर्गत अटक करण्यात आली. तेव्हा ते आपले बंदिवासातील एक सहकारी मोरूभाऊ केतकरांना म्हणाले होते, तेच खरे ठरले. 'कल्याण आश्रमाचे कार्य ईश्वरीय असल्यामुळे, पुढेसुद्धा ईश्वरकृपेने जनसहकार्याने वाढेल' आणि ते प्रत्यक्षात वाढलेही.

❋❋❋

# भास्करराव शिवराम कळंबी

कै. भास्करराव कळंबी हे मूळचे कोकणातील घराणे. पिता डॉ. शिवराम आणि माता राधाबाई. दिनांक ५ ऑक्टोबर १९१९ला त्यांचा जन्म रंगून जवळील "डास" येथे झाला. त्यांचे पूर्वज मंगेशाचे मूळ निवासी होते. त्यांचे वडील ब्रह्मदेश इथे शासकीय डॉक्टर असल्याने त्यांचे प्राथमिक शिक्षण तेथेच झाले. वयाच्या ११व्या वर्षीच दुर्दैवाने त्यांच्या मातु:श्री निर्वतल्या. तर वयाच्या १२व्या वर्षीच त्यांचे पितृछत्र हरपले. त्यामुळे मोठा भाऊ आत्माराम व बहिण अमुलीसह ते मुंबईला आत्या काकाकडे राहावयास आले.

पुढे त्यांनी रोबेर्टमनी मधून हायस्कूल शिक्षण आणि सेंट झेविएर कॉलेजमधून बी.ए. पदवी प्राप्त केली. नोकरी सांभाळून त्यांनी १९४५ मध्ये एल.एल.बी. पदवी मुंबई विद्यापीठातून मिळवली. १९४६ साली एम.ए.ला प्रवेश घेतला पण श्री गुरुजींच्या इच्छेनुसार आदर भावाने ते पूर्णत: प्रचारक झाले.

संघ कार्य पसरत पसरत १९३४ ला मुंबईपर्यंत येऊन पोहचले होते. इथे त्यांना येरकुंटवार व महत्त्वाचे म्हणजे प.पू. डॉ. हेडगेवार यांचा जवळून सहवास लाभला. स्वत: डॉक्टर घरोघर एकेक रुपया मागून संघ कार्यालयाचे भाडे भरीत. ते भास्करराव कळंबी यांना घेऊन फिरलेले आहेत. या त्यांच्या ५ वर्षातील सेवेत भास्कररावांना संघ कार्य हे देश सेवा कार्य आहे, हे पुरतेपणी उमगले. देश सेवेसाठी उभे जीवन व्यतीत करण्याचा त्यांनी निर्धार केला. संघ कार्याचे एक तप पूर्ण झाले तेव्हा ते केरळ प्रांत प्रचारक होते. केरळमधील संघ कार्य म्हणजे एक कसोटी, नव्हे तर सत्त्व परीक्षा होती. त्यात भास्करराव कळंबी यशस्वी झाले. उत्तर केरळमधील मुस्लिम बहुल, दक्षिणेकडील खिस्ती बहुल भागात त्यांनी हिंदुत्त्व जगविले. ही त्यांची फार मोठी

ऐतिहासिक कामगिरी म्हणावी लागेल.

के. भास्करराव नावाने केरळीय परिवेश धारण करून कळंबी यांनी अभूतपूर्व विक्रम केला. आपल्या ३८ वर्षांच्या सुदीर्घ काळात त्यांनी प्रांत प्रचारक म्हणून सव्वा कोटी संख्या असलेल्या, केरळच्या १३ जिल्ह्यात एकूण २००० शाखा सुरू केल्या. व्यापक जनाधार, दृढनिश्चय या जोरावर भास्कररावजींनी संघ शक्तीचा विस्तार, सामाजिक परिवर्तन, धार्मिक सुधार केरळसारख्या कम्युनिस्ट प्रांतात घडून आणल्या. हिंदुत्त्व नवजागरणाचा एक इतिहास त्यांनी घडविला. हृदयावरील शस्त्रक्रियेमुळे भास्कररावजींना डॉक्टरांनी एका जागी बसून राहायला सांगितले. पण एका जागी बसून राहायचे तर जगायचे कशासाठी? पर्याय म्हणून संघाने त्यांच्या प्रकृतीनुरूप उत्तरदायित्व दिले. तृतीय सरसंघचालक पूज्य बाळासाहेब देवरस यांच्या प्रेरणेने सन १९७७ मध्ये वनवासी कल्याण आश्रमाला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले होते. वनवासी कल्याण आश्रमाचे काम संपूर्ण देशात तीव्रतेने वाढत होते. भास्कररावजींना सहसंगठन मंत्री नियुक्त केले गेले. सन १९८४च्या अखिल भारतीय संमेलनात या उत्तरदायित्वाची घोषणा पूज्य बाळासाहेब देशपांडे यांनी केली. नंतर १९८६मध्ये मा. रामभाऊ गोडबोले यांनी प्रकृती कारणास्तव सतत ८ वर्षे जबाबदारी पेलून थांबल्या नंतर मा. भास्करराव अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाचे अखिल भारतीय संगठन मंत्री झाले. १४ वर्षे ही जबाबदारी त्यांनी प्रभावी रूपात सांभाळली. या क्षेत्रात संपूर्ण अनभिज्ञ असल्याने त्यांनी प्रथम वनवासी समाज, कार्यकर्ता, कार्यपद्धती, कार्य संस्कृती नीट जाणून घेतली. पहिली ३/४ वर्षे खेड्यापाड्यातून वनवासींमध्ये प्रवास केला म्हणूनच १९८४ ते २००० अशी १६ वर्षे हा कालखंड वनवासी कल्याण आश्रमाच्या उत्कर्षाची समाजाला ओळख करून देणारा ठरला.

मा. भास्कररावजी बहुभाषीय होते. त्यांचा प्रवास जिथे जिथे होई तेथील लोकभाषा शिकून त्याच भाषेत ते कार्यकर्ते-लोकांशी बोलत. त्यामुळे त्यांना १४ भाषा येत होत्या. त्यांचे व्यक्तित्व पारदर्शी होते. त्यांचा मनसा-वाचा-कर्मणा एक व्यवहार असे.

वनवासी समाजाचे हित कसे होईल? आपल्या धर्माची-संस्कृतीची रक्षा तो स्वतः कशी करू शकेल? स्वाभिमानपूर्वक आणि आपली अस्मिता सांभाळून वनवासी आपले जीवन कसे जगू शकेल? याचीच अहोरात्र चिन्ता ते वाहात होते.

त्यांच्या संघटन कौशल्यामुळे वनवासी कल्याण आश्रमाचे कार्य उत्तर-पूर्वांचलात संपूर्ण गिरीकंदरात सर्वत्र व्यापले गेले. अखिल भारतीय कार्यकर्ता संमेलन सिलिगुडी येथे भरले असता, त्यात ते म्हणाले, "हमारे साथ पूरा भारत है। यह भावना जब हमारे अंदर जागृत हो जायेगी, तब इस अनुभूतीसे हमारा कार्य और भी विस्तार प्राप्त कर सकेगा।"

त्यांनी भारतीयांच्या मानसिक विकासाला प्राधान्य दिले.

वयाच्या ८३व्या वर्षी दि. १२ जानेवारी २००२ला या महान वनयोगी महापुरुषाने आपली इहलोक यात्रा संपविली.

(**संदर्भ :** 'हमारे महान वन नायक' भाग - २ प्रो. त्रिलोकी नाथ, सिंहना)

❋❋❋

# स्व. रामभाऊ गोडबोले

कै. रामभाऊ गोडबोले हे मूळचे पुण्याच्या कसबा पेठेतील निवासी. त्यांचे वडील बिन्दुराव हे भारतीय सेनेत होते. रामभाऊंचा जन्म १९२० सालचा. त्यांनी एम.ए. संस्कृत पर्यंतचे सगळे शिक्षण विशेष प्राविण्यासह पूर्ण केले. १९३६मध्ये प.पू. डॉ. हेडगेवार यांच्या एका बौद्धिकातून प्रेरणा घेऊन ते संघ स्वयंसेवक झाले. रामभाऊ यांना संघाची गोडी लावण्याचे श्रेय जगन्मित्र मा. अंनतराव देवकुळे यांनाही जाते.

प. पू. डॉ. हेडगेवार यांच्या महानिर्वाणानंतर द्वितीय सरसंघचालक श्री गुरुजी यांनी ज्यांचे शिक्षण पूर्ण झाले त्या सर्वांना संघ समर्पित होण्याचे आवाहन केले. त्याला भरघोस मिळालेला प्रतिसाद म्हणजे २०० पूर्णवेळ संघ प्रचारक संघ जीवनव्रती बनले. महाराष्ट्रातील या प्रचारकासह रामभाऊही सन १९४२ पासून पूर्णवेळ संघ प्रचारक झाले. रामभाऊ प्रथम सांगली जिल्ह्याचे प्रचारक झाले. त्यानंतर पुणे जिल्हा प्रचारक म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. संघ प्रचारकाची साधी, स्वच्छ नेटकेपणाची त्यांची राहणी जीवनभर होती. धोतर, हाफ शर्ट असाच त्यांचा पेहराव कायम होता. प्रचारक असताना त्यांनी काही पथ्ये कटाक्षाने पाळली होती. प्रवासात असताना आपल्या स्वयंसेवकाकडेच निवास करावयाचा, कुटुंब परिचय करून घ्यायचा, आत्मीयता निर्माण करावयाची. त्यामुळे त्यांचा संपर्क घराघरात पोहोचला होता. याचप्रमाणे संघचालकांना प्रत्येक गावी भेटणे हा जणु त्यांचा दंडकच होता. ते कुशल संघटक होते. त्यामुळे त्यांनी असंख्य कार्यकर्ते घडविले. याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे जनसंघाचे प्रभाकरपंत पटवर्धन होय. रामभाऊंना ते आपल्या गुरुस्थानी मानीत असत.

कार्यकर्ता निर्माण म्हणून त्यांनी प्रांत आणि जिल्हा स्तरावर अनेक अभ्यास वर्ग घेतले. त्यात त्याग, बलिदान, देशभक्ती, देशसेवा हेच बौद्धिकांचे प्रेरक विषय असत. त्या प्रेरणेतून डॉक्टर, वकील, अभियंता, व्यावसायिक, कलावंत, विद्यार्थी, महिलावर्ग असे सगळेच जोडले गेले. ते प्रचारक-सक्रीय कार्यकर्ते झाले. त्याची यादी मोठी

आहे. जनसंघाच्या कामातून त्यांनीच प्रचारक म्हणून सिद्ध केलेल्या श्री. वसंतराव भागवत यांनी संघटन मंत्रिपद स्वीकारून रामभाऊ यांना मोकळीक दिली. रामभाऊ म्हाळगी नंतर ते जनसंघाचे संघटन मंत्री होतेच. महाराष्ट्रात जनसंघ वाढविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. वडाळा येथील चंचल स्मृती कार्यालय याची साक्ष आहे.

नंतर रामभाऊ यांना पूर्वांचलाचे पूर्वोत्तर राज्यात वनवासीचे काम करण्याचे दायित्व आले. पूर्णकालीन कार्यकर्त्याचे जीवन कमलपत्रवत असावे अशी त्यांची धारणा आणि आग्रह असे. मा.मोरोपंतजी पिंगळे त्यांना आदर्श कार्यकर्ते म्हणत असत. व्यक्तिगत ओळख, स्नेह, आत्मीयभाव, चिन्तन, अजोड वक्तृत्व, संघटन कौशल्य यावर भर देऊनच त्यांनी वनवासींचे कार्य सातत्याने चालू ठेवले. भाषा, प्रांत, लोक यांच्या समस्या त्यांना कधी भेडसावत नसत. कोणत्याही क्षेत्रात ते कार्य करण्यास तत्पर असत. कारण ते हाडाचे कार्यकर्ते होते. ते प.बंगालमध्ये असताना नागालँड आदी भागात त्यांचा संपर्क होता.

त्याचवेळी त्यांना उत्तर पूर्वांचलाचे दायित्व देण्यात आले. नागनेता श्री एलसी जेलीपांग यांच्याशी त्यांचा परिचय झाला. वनवासी समस्यांविषयी त्यांचे चिंतन-मनन दांडगे होते. १९७७च्या काळात वनवासी कल्याण आश्रमाचे संघटन मंत्री म्हणून त्यांनी प्रचंड काम उभे केले. वनवासींच्या श्रेष्ठ संस्कृतीचे आणि अस्मितेचे संरक्षण व्हावे असे त्यांना प्रकर्षाने जाणवले होते. म्हणूनच त्यांनी मा.दत्तोपंत ठेंगडी, बाळासाहेब देशपांडे, प.पू.तृतीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांच्याशी चर्चा करून वनवासी कल्याण आश्रमाचे कार्य अंगिकारले होते. अखिल भारतीय संघटन मंत्री म्हणून व.क.आ.चे संस्थापक बाळासाहेब देशपांडे यांचे सहकारी म्हणून त्यांची नियुक्ती झाली. मा. रामभाऊ यांचे मुख्यालय मुंबई होते. तेव्हापासूनच वनवासी कल्याण आश्रमाचे कामकाज मुंबईहून होऊ लागले. रामभाऊ यांना मुंबई सुपरिचित होती. त्यांचा कामाचा झपाटा आणि आवाका विलक्षण असल्याने व.क.आ.चे काम वाढले. चंचल स्मृतीतच मग केंद्रीय कार्यालय आले. त्यांच्या मार्गदर्शनाने धनुर्धारी वनवासी असे बोधचिन्ह निश्चित केले गेले. तसेच प्रचार-प्रसार म्हणून 'वनबंधू' मासिक सुरू झाले. १९७५च्या

आणीबाणीच्या काळात दिल्ली येथे रामलीला मैदानात आणिबाणी लादणाऱ्या सरकार विरोधात भव्य सभा आयोजित करून त्यांनी लोकजागृती केली. तसेच १९८१ मध्ये दिल्ली येथे पहिले अखिल भारतीय कार्यकर्ता संमेलन घेण्यात आले. नागालँडचे नागा नेता एन.सी.झेलीयांग केवळ रामभाऊ यांच्या संपर्कामुळे अध्यक्ष झाले. तेव्हापासून ते हिंदुत्ववादी नेता आणि वनवासी कल्याण आश्रमाचे कार्यकर्ते झाले याचा दूरगामी परिणाम पूर्वांचलाच्या कार्यात झाले.

देशाची अर्धी लोकसंख्या महिलांची असल्यामुळे महिला संघटन उभारावे असा रामभाऊ यांचा विचार सर्वमान्य झाला. त्यादृष्टीने वनवासी महिला संघटनकार्य त्यासाठी संपर्क सुरू झाला. मध्यप्रदेश आणि छत्तीसगड भागात या कामाला प्रारंभ झाला. १९८५ साली 'भिलाई'येथे पहिले महिला संमेलन घेण्याचे ठरले. रामभाऊ यांनी प्रकृती अस्वस्थ असूनही या संमेलनात सर्व जबाबदारी घेतली. विशेष म्हणजे या संमेलनात नाग संस्कृतीची रक्षक इंग्रजांच्या राजवटीत १६ वर्षे तुरुंगवास भोगणारी नागालँडच्या स्वातंत्र्यासाठी झगडणारी "राणी मा.गायडीनलू" पूर्ण वेळ उपस्थित होती.

तसेच वनवासी युवकासाठी त्यांच्या मानसिक आणि शारीरिक विकासासाठी, युवकांच्याही संघटनकार्य, खेळातील आवड वाढविण्यासाठी १९८७ साली मा.रामभाऊ यांच्या नेतृत्वाखाली खेळकूद स्पर्धा यशस्वी झाल्या. वनवासी युवकातील उपजत धाडसी, बळकटपणाला वाव मिळाला. त्यातूनच आज विश्वजेते मेजर माथुर, अशोक साठे, लीम्बाराम यासारखे खेळाडू, कविता राऊत सारखी महिला क्रीडापटू गाजत आहेत.

पुढे प्रकृती खालावत गेल्यामुळे १९८८ पासून रामभाऊ आपल्या भाचीकडे विश्रांतीसाठी राहावयास गेले. अखेर सन २००३ साली वनवासी कल्याण आश्रमाच्या या श्रेष्ठ कुशल संघटकाची जीवनज्योत मालवली.

❋ ❋ ❋

# वनवासी लोकसाहित्याची जपणूक करणाऱ्या आक्का म्हणजे सरोजिनी बाबर

डॉ. सरोजिनी बाबर यांचे कौटुंबिक नाव जरी आक्का असले तरी सर्वार्थाने लोकसाहित्याच्या व्यासंगी किंबहुना सर्वच अभ्यासकांच्या संदर्भातही त्या आक्काच होत्या. आक्का म्हणजे मोठी बहीण. तिचा मान आणि अधिकारसुद्धा मोठाच असतो. असाच लोकसाहित्य संशोधन, संकलन, परिशीलन कार्यात डॉ. सरोजिनी बाबर यांचा मान आणि अधिकार मोठा आहे. अधिकाराच्यादृष्टीने लोकसाहित्य संदर्भात हा ज्येष्ठत्वाचा सन्मान डॉ. सरोजिनी बाबरांचा आहे.

**अस्सल देशी वाण**

डॉ. सरोजिनी बाबर म्हणजे गेल्या पिढीतील अस्सल देशी वाण म्हणावे लागेल. त्यांच्या अंतर्बाह्य स्वरूपावरूनही याची कल्पना येऊ शकते. एखाद्या ग्रामीण महिलेसारखी ही विदुषी, पीएच.डी./ डी.लीट् असून वावरली. हे महाराष्ट्राच्या मराठी बाण्याला भूषणावह वाटावे असेच आहे. कपाळी ठसठशीत कुंकू, डोक्यावरून पदर, सदा हसतमुख चेहरा, बोलताना भरभरून आनंद ओसंडविणारे संभाषण सारेच देखणे. आज ते सारे 'रानजाई' या दूरदर्शनच्या प्रेक्षकांनाही आठवत असेल.

**विपुल लेखन - संपादन**

डॉ. सरोजिनी बाबर यांनी विपुल लेखनाबरोबरच संपादनेच अधिक प्रमाणात केलेली आहेत, त्यात कमालीचे वैविध्य आहे. समाज शिक्षणाची तळमळ त्यात आहे. किंबहुना समाजशिक्षण मालाच त्यांनी विस्ताराने गुंफली आहे. स्वतः विपुल लेखन त्यांनी केले पण त्याबरोबरच भेटणाऱ्या प्रत्येक लेखकालाही त्यांनी लिहिते केले. लेखनाचे विषय दिले आणि प्रेरणाही दिली. लेखन करून घेण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावाही केला. थोडेथोडके नव्हे तर सुमारे चार तपे किंबहुना अर्धे शतक त्यांनी लोकसंस्कृतीचे चिंतन मनन केले, त्यातून हे साहित्य जन्मलेले आहे.

दिवा इकडून तिकडे नेताना विझू नये म्हणून खेड्यात आपल्या पदराने झाकून नेतात व दीप ज्योत प्रज्वलित राहते त्याचप्रमाणे डॉ. सरोजिनी बाबरांनी या लोकवाङ्मयाच्या दीपाला जपले आणि उज्ज्वल ठेवले.

विपुल भटकंती करून लोकसाहित्याचे क्षेत्रीय संशोधन आणि प्रचंड प्रमाणातील संकलन त्यांनी केले. त्यांची प्रत्येक प्रस्तावना आणि ठिकठिकाणी ग्रंथात दिलेल्या टीपा अत्यंत मोलाच्या आणि महत्त्वाच्या आहेत. कारण प्रत्येक अनुभवातून-भेटीगाठीतून हे लेखन संकलन त्यांनी केलेले आहे.

शासनाच्या महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीच्या त्या अध्यक्षा होत्या. या माध्यमातून त्यांनी लोकसाहित्य संकलनाबरोबरच अभ्यासकांनाही संघटित केले. डॉ. ग.मो. पाटील, डॉ. यू.म. पठाण, डॉ. गंगाधर मोरजे, डॉ. प्रभाकर मांडे, प्रा. द.ता. भोसले, प्रा. तारा भवाळकर, डॉ. रा.चिं.ढेरे आणि डॉ. अरुणा ढेरे इ. अशी कितीतरी नावे सांगता येतील.

माझ्या खुणा माझ्या मला (आत्मकथा), तीर्थांचे सागर, कुलदैवत, एक होता राजा, दसरा-दिवाळी, नादब्रह्म, आदिवासींचे सण व उत्सव, जाई-मोगरा, महाराष्ट्र लोकसंस्कृती व साहित्य, साज शिणगार, झोळणा, लोकसाहित्याचा जागर, भारतीय स्त्रीरत्ने, नंदादीप, भारतीय स्त्री, असू दे मी खूळी, भूकलाडू - तहानलाडू, आजोळघरची शाळा, राधाई, वडिलांचे सेवेसी, वनिता सारस्वत, बाळराजा, जा माझ्या माहेरा, कारागिरी, जनलोकांचा सामवेद, लोकसाहित्यमाला, भाषा आणि संस्कृती, लोकसाहित्याचा शब्दकोष, राजविलासी केवडा, बालनाटिका (भाग १ ते ४) कमळीचं जाळं, अजिता, तू भेटायला नको होतास, आणि इथे गोष्ट संपली, हिरवा चुडा, आठवतंय तेवढं सांगते, चिंचेची पत्रावळी, नव्याची पुनव, सुंबरान मांडिलं, झालं गेलं सांगते, राही रुक्मिणी, माहेरचा चंद्र, डोंगरची मैना, रुखवत, देवदर्शन इत्यादी. ही त्यांची ग्रंथसंपदा प्रचंड आणि समृद्ध आहे. त्यात कथा, कादंबऱ्या, आत्मकथानक, संपादित बालसुलभ अशा सर्वच प्रकारचे साहित्य आहे. त्यात या लेखनाने मराठी वनवासी लोकसंस्कृतीचे एक बावनकशी मराठमोळे दालन बहरले आहे, असे म्हणता येईल.

**संपन्न व्यक्तिमत्व**

डॉ. सरोजिनी बाबर परमार्थाने एक संपन्न वाङ्मयीन व्यक्तिमत्व

होते. डॉ. बाबर यांचा जन्म ५ जानेवारी १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वांगणी येथे झाला. त्यांचे प्राथमिक आणि शालेय शिक्षण इस्लामपूर, सातारा आणि नगर येथे झाले. मुंबई विद्यापीठातून बी.ए., एम.ए. पदव्या त्यांनी उत्तम गुणवत्तेसह संपादन केल्या. ग्रामीण भागातील एक मराठमोळी मुलगी आश्चर्यकारकरित्या उच्च शिक्षण घेतच राहिली. पुढे त्यांनी पीएच.डी. पदवीसाठी संशोधन पूर्ण केले. त्यांचे वडील श्री. कृष्णराव बाबर हे पुरोगामी विचाराचे असल्याने त्यांनी उच्चशिक्षण तर घेतलेच, पण समाजप्रबोधनाचे कार्य हाती घेऊन पिताजींचा वारसा सातत्याने पुढे चालविला.

कर्मवीर भाऊराव पाटलांच्या संस्थेत त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळाले. मराठी विषयातल्या नरसिंह चिंतामण केळकर पारितोषिकाच्या त्या मानकरी ठरल्या. पुढे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने १९९४मध्ये व पुणे विद्यापीठाने १९९७ साली त्यांना डी. लीट. ही सन्मानाची पदवी दिली.

## विविध गौरव पुरस्कारांच्या मानकरी

त्यांच्या कार्याचा उचित गौरव म्हणून त्यांना पुणे विद्यापीठाने 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान केला. यापूर्वी राहुरी कृषि विद्यापीठाच्या वतीने डॉक्टरेट ऑफ सायन्स, भारती विद्यापीठाचा जीवन साधना गौरव पुरस्कार, कोल्हापूर येथील भद्रकाली ताराराणी पुरस्कार, पुणे महापालिकेचा पठ्ठे बापूराव पुरस्कार, मराठा सेवा संघातील विश्वभूषण पुरस्कार, राज्य साहित्यसंस्कृती मंडळाची गौरवकृती, राज्य लोकसाहित्य मंडळाचे अध्यक्षपद इत्यादी .

## लोकप्रतिनिधी

स्वातंत्र्य चळवळीच्या आंदोलनाच्या काळात त्या सहभागी झाल्या. वाट्याला आलेला तुरुंगवासही त्यांनी भोगला. १९५२ ते १९५७ या काळातील मुंबई प्रांताच्या विधानसभा सदस्या, १९६४ ते १९६६ या कालावधीत महाराष्ट्र विधान परिषदेच्या सदस्या आणि १९६८ ते ७४ या काळात त्या राज्यसभेच्या सदस्या होत्या. त्यांनी लोकाभिमुखवृत्तीनेच सर्व कार्य केले.

## सहृदय समीक्षक

राजकारणापेक्षा समाजकारणात त्यांना खरे स्वारस्य होते म्हणून

त्यांचे मन खऱ्या अर्थाने रमले ते समाज शिक्षणातच. लोकशिक्षणासाठी लोकसाहित्याचे संशोधन, संकलन, समीक्षण, पुनर्मूल्यांकन होणे त्यांना खूप गरजेचे व रूचीचे वाटले म्हणून उभी हयात त्यांनी लोकसाहित्यासाठीच वेचली. महाराष्ट्रात सर्वत्र प्रवास करून लोकसाहित्याबरोबरच लोकसाहित्याचे अभ्यासकही गोळा केले. दुर्गा भागवत, इरावती कर्वे, डॉ. ना.गो. नांदपूरकर, वि.का. राजवाडे, साने गुरुजी यांची पूर्वीची परंपरा पुढे चालविली. हा अनमोल वारसा जपायला शिकविला. त्याचे महत्त्व जाणकारांच्या लक्षात आणून दिले. याचा सुपरिणाम महणजे आता सर्वच विद्यापीठात स्वतंत्रपणे लोकसाहित्याचा अभ्यास एम.ए., एम.फिल., पीएच.डी. पदव्यांसाठी आवर्जून होत आहे.

स्त्रीयांच्या ओव्या, लावण्या, गाणी, म्हणी, वाक्प्रचार, बोली, पुरुषांचे लोकजीवन, संस्कृती, विद्या सारेच जतन केले जाऊ लागले. त्यात पर्यावरण आहे. ते लोकसाहित्यात सामावलेले आहे. वरवर गावठी म्हणी - अंध समजुती वाटतात पण त्यात विज्ञान असते. धार्मिक पूर्वपरंपरा असतात. श्रद्धा आणि मानस असते. कवी हृदयाच्या, रसिक आणि आस्वादक भूमिकेतून त्यांनी वनवासी, ग्रामीण लोकसाहित्याचे प्रसंगोपात्त महत्त्व मांडले आहे.

## एक ऋणानुबंध

योगायोगाने मला पुण्याच्या बालचित्रवाणीचे निमंत्रण होते. माझ्या कल्पनेतही नव्हते. नैतिकमूल्यांची शिक्षणात आवश्यकता या विषयावर भूमिका मांडायची होती आणि माझ्या समवेत होत्या डॉ. सरोजिनी बाबर आणि डॉ. रा.शं. वाळिंबे. या दिग्गजांबरोबर एका चर्चेचं चित्रण केले गेले. त्याही वेळी सरोजिनी आक्का म्हणाल्या, 'मला मेकअपची गरज नाही.' अशा त्या नैसर्गिक, सहज सुंदर जीवनात रमलेल्या होत्या. मी जव्हारला होतो तेव्हा त्यांच्या लोकसाहित्य विषयक पुस्तकात लिहायची संधी मिळाली. मला आठवते, त्यांनी संपादित केलेल्या दसरा-दिवाळीमध्ये मी जव्हारच्या दसऱ्यावर लिहिले. 'नादब्रह्म'मध्ये वनवासींच्या कलाविष्कारावर व ग्रामदैवतावर लिहिले. त्यांच्या कार्यालयात आणि घरीही त्यांना भेटण्याचा योग आला. हा ऋणानुबंध आज आठवतो.

❋❋❋

# बीडकर द.न. उपाख्य दादासाहेब

**जन्म :** दि. १९ मार्च १९१०, जन्मस्थळ : कोल्हापूर
**मृत्यू :** दि. १२ मार्च २००५ स्थळ - नाशिक.

दादासाहेब बीडकर यांचे शालेय शिक्षण कोल्हापूरला आजोळी व महाविद्यालयीन शिक्षण हैद्राबाद येथे झाले. १९३० च्या स्वातंत्र्य चळवळीत सहभागानंतर दादासाहेबांनी नाशिक, मनमाड, बागलाण येथे ग्रामसेवा समिती माध्यमातून काम चालू केले. त्यावर इंग्रजांनी बंदी घातली. दादांना १ वर्षे कारावास झाला. १९३४ मध्ये जेलमधून सुटल्यावर बिहार येथे ६ महिने राहून भूकंपग्रस्तांची त्यांनी ६ महिने सेवा केली. स्वातंत्र्य लढे, त्यासाठी तुरुंगवास शिक्षण आणि समाजातल्या वनवासी घटकांचे उत्थान घडविणे, कार्यकर्ते निर्माण करणे, लोकसंग्रह वाढविणे यात त्यांचे आयुष्य खर्ची पडले. केवळ समाससेवेसाठी आणि वनवासींच्या विकासासाठी त्यांची 'डांग सेवा मंडळ' ही संस्था आजतागायत कार्यरत राहिली आहे. नाशिक जिल्ह्यात त्यांनी केलेली वनवासींची सेवा सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील लक्षवेधी आहे. वनवासी बांधवांच्या विकासासाठी त्यांनी डोंगरदऱ्या खेडोपाडी हिंडून त्यांच्या जागृतीचे कार्य केले. जंगलतोडीत राबणाऱ्या वनवासींचे शोषण थांबवावे म्हणून त्यांनी जंगल कामगार सोसायटी निर्माण केली. आयुष्यभर वनवासी सुधारणेचा ध्यास घेऊन त्यांच्या सेवेचा स्त्रोत प्रवाही ठेवला होता. कलानृत्याच्या आवडीतून त्यांनी कलापथके उद्‌बोधनासाठी तयार करून गाजविली. अतिदुर्गम भागात आश्रमशाळा, वसतिगृहे, शिक्षणसंस्था काढल्या. पेठ, अभोणा येथे त्यांनी महाविद्यालयांची स्थापना केली. त्यांनी आमदारपदही भूषविले. पण ज्ञानगंगा घरोघर पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य केले. म्हणूनच त्यांना वनवासी सेवक, थोर स्वातंत्र्य सैनिक, दलितमित्र, कर्मवीर, तपस्वी, नाशिकभूषण या समाजाने बहाल केलेल्या पदकांबरोबरच पुणे विद्यापीठाने मानाची 'जीवन गौरव' उपाधीही बहाल केली आहे.

❋❋❋

# डॉ. भीमराव गस्ती

डॉ. भीमराव गस्ती हे त्यांच्या 'बेरड' या आत्मकथनामुळे सुपरिचित आहेत. त्यानंतर 'बेरड'चा पुढचा भाग 'आक्रोश' हाही आपल्यापर्यंत येऊन पोहोचलेला आहे आणि लवकरंच 'सांजतारा' हा कथासंग्रह आणि 'कौरव' ही कादंबरी आपल्याला वाचावयास मिळणार आहे. असे हे ४ पुस्तकांचे लेखक डॉ. भीमराव गस्ती साहित्यिक म्हणून नावारूपाला आलेले आहेत. पण भीमराव गस्ती केवळ लेखक आहेत असे नव्हे तर ते एक समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व आहे. डॉ.भीमराव गस्ती यांनी आपल्या कार्यातून मूर्तिमंत समाजकार्याचा वस्तुपाठ आपल्यासमोर ठेवलेला आहे.

डॉ. भीमराव गस्ती जबरदस्त सामाजिक जाणीव असलेले कणखर व्यक्तिमत्त्व आहे. ज्या समाजात ते जन्मले तशाच बेडरपणे/ निर्भयपणे ते समाजकार्यात उतरलेले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनपर भाषणात या गोष्टींचा उल्लेख सर्वत्र झाला आहे.

त्यांची शैक्षणिक गुणवत्ता चकित करणारी आहे. ते बी.एस्सी./ इंजिनिअरिंग (B.Sc. with Engineering) असून एम.टेक. (M.Tech.) आहेत. रसायनशास्त्र (Chemistry) हा त्यांचा विशेष संशोधनाचा विषय आहे. त्यांनी मास्को येथील पार्टिक लोमॅम्बो (Paretic Lomabo) विद्यापीठातून डॉक्टरेट इन केमिकल इंजिनिअरिंग म्हणजे पीएच.डी पदवी मिळवली आहे.

उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता असूनही ते आज ज्या कार्यात पूर्णपणे झोकून देऊन उतरलेले आहेत, ते कार्य म्हणजे भटक्या विमुक्तांचा विकास, दीन-दुबळ्या मागासवर्गीयांचा विकास, देवदासींचा विकास होय. त्यासाठी ते वसतिगृह चालवितात. ग्रामीण विकासाचे काम त्यांनी हाती घेतलेले आहे.

माझ्या माहितीप्रमाणे जवळपास दोनशे ते तीनशे खेड्यांमध्ये त्यांचे हे कार्य चालू असून त्यांनी पर्यावरण रक्षणासाठी अतुलनीय

असे काम केलेले आहे, जेव्हा त्यांनी लावलेली व वाढवलेली झाडे दिमाखाने हिरवीगार होऊन डोलू लागतील तेव्हा त्यांच्या कार्याचे मूल्य आपल्या समाजाला कळेल.

आज ते देवदासींसाठी स्थापन केलेल्या 'उत्थान' संस्थेचे अध्यक्ष असून महाराष्ट्रातील आणि कर्नाटक राज्यातील 'बेरड' व रामोशी जमातीच्या विकासासाठी कार्य करीत आहेत. हैदराबाद येथील प्रयोगशाळेत संशोधक पदाचा राजीनामा देऊन त्यांनी पूर्णवेळ समाजकार्याला वाहून घेतले हे खास वैशिष्ट्य आहे. १९७४ पासून गेली २८ वर्षे सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात त्यांनी सक्रिय सहभागी होऊन आपले व्यापक कार्य सिद्ध केलेले आहे. पुण्याच्या 'साधना', मुंबईच्या 'पूर्वा' तसेच अनेक वर्तमानपत्रात 'बेरड', 'रामोशी' जमातीच्या संबंधात आणि समाजाच्या समस्यांबाबत त्यांनी लेखन केलेले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणूनच त्यांना श्री संत गाडगेबाबा समरसता पुरस्कार, डॉ. हेडगेवार सेवा पुरस्कार, अंधश्रद्धा निर्मूलन समिती पुणे यांचा डॉ. अरुण लिमये पुरस्कार, पुण्याच्या साधवी ट्रस्टचा डॉ. विल्सन पुरस्कार, हैदराबाद येथील आंध्रप्रदेश सरकारचा आदिवासी सेवा पुरस्कार, निपाणी जैन युवा ग्रुपचा अरिहंत सेवा पुरस्कार, मुंबईच्या लेखक सेवा महासंघाचा समाजसुधारक आगरकर पुरस्कार इत्यादी लाखांच्या पुरस्कारांनी त्यांना आजपर्यंत गौरविण्यात आलेले आहे.

त्यांच्या कामाचा थोडक्यात तपशील सांगावयाचा तर उत्तम संघटन कौशल्य त्यांच्या ठिकाणी आहे. 'उत्थान', बेरड-रामोशी सेवा समिती यासारख्या संस्थेचे ते संस्थापक आहेत. पंतप्रधानांपर्यंत आपल्या समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी निवेदने दिली. देवदासींच्या, रामोशींच्या विकासाचा व पुनर्वसनाचा प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यांनी निमूटपणे भोगलेल्या वेदना साकार करण्याकरिताच लेखन केलेले आहे. त्याचबरोबर आपल्या समाजाची ओळख व्यापक समाजाला व्हावी त्यासाठी 'बेरड' व 'आक्रोश' या आत्मकथनाचा जन्म झालेला आहे. हजारो भूमिहीन शेतकऱ्यांना ५ हजार एकर शेतजमीन मिळवून दिलेली आहे. त्यामुळे ३२० कुटुंबांचे पुनर्वसन झालेले आहे. सेवा समितीमार्फत दोन हजार बेरड-रामोशी युवकांना सुरक्षित नोकरी मिळवून

दिली आहे.

महिलांसाठी स्वयंरोजगार व उत्पन्नाची साधने निर्माण करणे, मुलांसाठी बालवाडी चालविणे, प्रौढ शिक्षण, मुलांसाठी वसतिगृह, महिला-बालकांसाठी आरोग्य शिबिरे आयोजित करणे, देवदासी होण्यापासून तरुण मुलींना वाचविणे व समाजाच्या विविध कलांच्या जोपासनेसाठी व विकासासाठी जोरदार प्रयत्न केले. रोजगाराच्या दृष्टीने डेअरी प्रोजेक्ट, तर स्वच्छतेच्या दृष्टीने स्वच्छतागृह प्लॅण्ट त्यांनी ग्रामीण भागात उभारले आहेत. बेळगावातील यमुनापूर येथील उत्थान संस्था याची साक्ष देत राहील.

त्यांच्या पुस्तकांचे कन्नड, हिंदी, इंग्रजीमध्ये अनुवाद झालेले आहेत आणि विविध विद्यापीठांच्या पदवीधर अभ्यासक्रमात ती पुस्तके नेमलेली आहेत. त्यांच्या ग्रंथांना एकूण १५ पुरस्कार मिळाले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार, कर्नाटक राज्य साहित्य पुरस्कार, अखिल भारतीय मराठी साहित्य पुरस्कार, बा.सी. मर्ढेकर महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार हे त्यातील काही उल्लेखनीय पुरस्कार आहेत. आपला समाज वाचीत नाही मग लेखन करून उपयोग नाही असे त्यांचे मत होते. नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानने त्यांना गोदागौरव पुरस्काराने सन्मानित केले होते. सोलापूर येथे भरलेल्या सामाजिक समरसता साहित्य परिषदेच्या संमेलनाचे ते अध्यक्ष होते. प्रसिद्धी विन्मुख असूनही हे सर्व मान सन्मान त्यांच्याकडे चालत आले होते.

भीमराव गस्ती यांचे दि. ८ ऑगस्ट २०१७ रोजी मंगळवारी कोल्हापूर येथे दु:खद निधन झाले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, ज्ञान प्रबोधिनी, स्वरूपवर्धिनी, समरसता मंच साहित्य परिषद आदी संस्थांशी त्यांचा अतिशय जवळचा संबंध होता. एक संवेदनशील साहित्यिक, प्रखर सेवाव्रती, निर्मोही कार्यकर्ता, सुविद्य संशोधक आणि उदार मनाचे भीमराव गस्ती होते. त्यांची स्मृती कृतिशील होऊन आपण जपावी आणि त्यांचे कार्य त्यांच्या पाश्चात चालू ठेवावे हीच खरी त्यांना आदरांजली होईल.

❋❋❋

# अपूर्व पूर्वांचल वनयात्रा

दि.१० ते २२ मार्च, २०१४ (१३ दिवस) ह्या कालावधीच्या वनयात्रेत एकूण ३७ वनयात्री व वनवासी क्षेत्रातील २-३ कार्यकर्ते सहभागी झाले होते. आम्ही दि.१० मार्चच्या रात्री १०.०० च्या सुमारास पुण्याहून बसने निघालो व मुंबईला पहाटे ४.०० वाजता पोहोचलो. तेथून सकाळी ७.२५ च्या सुमारास मुंबई-बागडोग्रा या विमानाने प्रवास करून १२.१० ला बागडोग्रा येथे पोहोचलो. तेथे भोजन करून सिलीगुडीला गेलो व गंगटोक येथे मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशी गंगटोकहून बाबाजी हारभजन यांची समाधी आणि चीनच्या सीमेजवळ नाथुला पास पाहिला. येथील हवामान अतिशय उत्तम होते. विमानतळावर एक चहा रू. १२५.०० असल्याने चहाची तल्लफ मारावी लागली. पुरेशी तयारी केलेली असल्याने सामानाची तपासणी व निरनिराळ्या परवानग्या घेण्यात अडचण आल्या नाहीत. गारांचा पाऊस व कडा यांच्या थंडीचा अनुभव सिक्कीम येथे घेता आला. आजूबाजूचे सृष्टी सौंदर्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असे होते. रस्त्यात सर्वत्र रंगीबेरंगी फुलांचे ताटवे दृष्टीस पडले. 'चांगुलेक'मध्ये अर्धे पाणी व अर्धा बर्फ आहे. या परिसरातील माणसे स्वाभिमानी वाटली. आम्ही ज्या ज्या वाहनातून प्रवास केला ते वाहनचालक कुशल व कष्टाळू होते. या भागातील सीमांवर महाराष्ट्रातील नाशिक, सातारा, कऱ्हाड व अकोले येथील जवान तैनात आहेत. त्यांना व आम्हाला एकमेकांना भेटण्याचा आनंद झाला. बाबाजी हरभजनदासची कहाणी अतिशय अद्भूत व रम्य अशी वाटली. सुमारे १७,४०० फूट उंचीवरील हे स्थान आहे. बाबाजी अजूनही जिवंत आहेत असा समज येथे आहे. महामहिम राज्यपाल श्रीनिवास पाटील यांनी जवळ जवळ दोन तास वनयात्रींशी गप्पा मारल्या. आमचा सर्वांचा 'खादा' हे मानाचे वस्त्र देऊन त्यांनी सत्कार केला. त्यांच्या आदरातिथ्याने सर्व वनयात्री भारावून गेलो होतो. त्यांचे व्यक्तिमत्व कायम स्मरणात राहील. कऱ्हाडच्या श्री. ताम्हणकरांनी ही एका कऱ्हाडच्या सुपुत्राची भेट घडवून आणली. सि कीम येथील रानीपूल भागात आपले सिद्धार्थ हे मुलींचे वसतिगृह आहे. हे वसतिगृह अतिशय उत्कृष्ट, पण उंच अशा टेकडीवर आहे. कोलकत्ता येथील वनवासी कल्याण आश्रमाच्या

महिला कार्यकर्त्यांनी एक कोटी रूपयांचा निधी या छात्रावासाला मिळवून देऊन वैभव प्राप्त करून दिले आहे. श्रीमती बुद्धिमाया या येथील व्यवस्थापिका आणि त्यांचा भाऊ तेथे वसतिगृह प्रमुख आहे. इयत्ता ३री ते ९वीतील विद्यार्थी व प्रामुख्याने २५ नेपाळी विद्यार्थी तेथे होते. अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाच्या पदाधिकाऱ्यांची चिंतन बैठक १४ जानेवारी २०१४ रोजी येथे आयोजित करण्यात आली होती. सन २००२मध्ये स्थापन झालेले हे एक आदर्श वसतिगृह ठरले आहे. गंगटोक दर्शनात एनर्जी पार्क पाहिले. तसेच, फ्लॉवर व्हॅली पाहिली. नंतर जलपायगुडीपासून रेल्वेने आम्ही गुवाहाटी गाठले. तेथे श्री. मनोज भट, श्री. रमेशबाबू आणि श्री. मोहनलाल दास या ३ कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य देऊन आगत-स्वागत, निवासाची व स्थळदर्शन व्यवस्था केली.

डाकिणी नावाचा डोंगर आणि त्यात १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असे भीमाशंकर, महागणपती मंदिर दाखविले. 'डाकिण्याम् भीमाशंकरम्' असे म्हणलेले असल्याचे पटते. त्यानंतर कामाख्या देवीचे दर्शन घेतले. तेथे संघप्रणित आसाम प्रांत वनवासी कल्याण आश्रम कार्यकर्त्यांची बैठक झाली. आमचे प्रतिनिधी म्हणून सर्वत्र श्री पांडुरंग भांदककर यांचा सत्कार करण्यात आला. त्याचा सगळ्यांना आनंद झाला. सगळ्यांचा विश्वास 'जब जागो तब सवेरा है। देर है मगर सही है।' या गीताद्वारे प्रकटला. हे सर्वच कार्यकर्ते २०-२५ वर्षांपासून तेथे कार्यरत आहेत. नंतर काझिरंगा अभयारण्यात हत्तीवरून गेंडे पाहिले. तसेच, मोसमाई गुंफा पाहिली. सेव्हन सिस्टर्स पॉइंट पाहिला. बडापानी कॉर्नर पाहिला. उदालगुडी येथील मुलींचे वसतिगृहात तेथे राहणाऱ्या १८ मुलींनी जे आदरातिथ्य दाखविले त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. त्यांचा निरोप घेताना सगळ्यांच्याच डोळ्यात पाणी आले. ऊर भरून आले. सदैव हसतमुखाने व समर्पित भावनेने कष्ट करण्याचा संदेश त्यांनी आम्हाला दिला. नंतर मुलांचे वसतिगृह पाहिले. येथे १४ मुले आहेत. नंतर तेजपूर (शोणितपूर) व चित्रलेखा गार्डन पाहिले. तेथे वीज नसताना जंगलात झोपडी बांधून २३ वर्षे एकटा राहणारा कार्यकर्ता आम्हांला भेटला. डोळे दीपवून टाकणारे सागरासारखे ब्रह्मपुत्रा नदीतील माजोली बेट पाहिले. तेथे विभाग कार्यवाह/प्रचारक योगेशजी भेटले. माजोलीमध्ये शंकर देव, माधव देव, कमलाबारी उत्तर व दक्षिण पाहिली आणि स्वामी विवेकानंद केंद्राची प्रशाला पाहिली. श्री. वासुदेवानंद उपाध्याय तेथे प्राचार्य

आहेत. श्री. रविंद्र सवदीकर आता दिब्रुगडला आहेत. श्री. सवदीकर हे १ल्या इयत्तेत असलेला मुलगा १० वीची परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत येथेच राहण्याच्या अटीवर येथे आले होते. माजोली बेटावरच 'मिसिंग' नावाची अत्यंत गरीब अशी जमात आहे. त्यांची घरे बांबूची असतात. पूर आला तरी घरात पाणी शिरू नये म्हणून ती उंचावर बांधलेली असतात. नंतर जोरहाटमार्गे नागालँडला गेलो. सगळे लष्कराचे जवान हातात एके ४७ घेऊन नागालँड व मणिपूर येथे दिसले. कोहिमा येथे प्रवेश पत्रे घेतली. लष्कराचे जवान, पोलीस व वनविभागाच्या तपासणीतून आम्हाला जावे लागले. दिमापूर येथे दुर्गामाता मंदिर पाहिले. नागा जमातीमध्ये १७ जनजाती आहेत. राणी गायडीनल्यू यांनी शिलाँगच्या तुरुंगात स्वातंत्र्यवीर सावरकरांसारखे जे आयुष्य कंठले त्याची कहाणी कळली. त्या सन १९३२ ते १९४७ पर्यंत तुरुंगामध्ये होत्या. वयाच्या १७व्या वर्षी इंग्रज सरकारने त्यांना तुरुंगात डांबल्यानंतर तब्बल १७ वर्षे त्या तुरुंगातच होत्या. 'वर्ल्ड वॉर सिमेटरी' त्यांच्या त्याग व हौतात्म्य याची साक्ष देत होते. मोईरंगचे नेताजी सुभाषचंद्र बोस स्मारक संग्रहालय पाहण्यास मिळणे हे आमचे मोठे भाग्यच होते.

लोहटक रिसॉर्ट व गार्डन पाहिले. नेताजींचे हस्ताक्षर, पत्रे व मूळ छायाचित्रे पाहिली. नंतर काकचिंग मुलांचे वसतिगृह पाहिले. येथे २३ छात्र आहेत. येथे १२ पूर्णवेळ कार्यकर्ते काम करीत आहेत.

पूर्वांचलची ही वनयात्रा जवळ जवळ ३००० कि.मी. ची होती. सर्व प्रकारच्या वाहनातून, खडतर अशी आव्हाने पेलत वनयात्रींचा हा प्रवास सुखरुपपणे पार पडला. या वनयात्रेत चीन, म्यानमार व भूतान या देशांच्या सीमा, पाच राज्ये व पाच राजधान्या बघता आल्या. होळी, रंगपंचमी, धूलीवंदन, शिवजयंती व नाथषष्टी इत्यादी सण या वनयात्रेच्या कालावधीत आले. राजकारणापासून १३ दिवस अलिप्त राहिलो. तहान भूक विसरून आनंद घेतला. राजकारणातले रूसवे-फुगवे मात्र आमच्यात नव्हते, याचा आम्हांला कायम आनंद वाटत राहील. मा. श्री. संजयराव कुलकर्णी व श्री. अतुलजी जोग यांची बौद्धिके, कार्यकर्त्यांची मनोगते थरारक व अंतर्मुख करणारी अशी होती.

❋ ❋ ❋

# वनवासी कोकणा शब्दकोश : प्रस्तावना

वनवासी कल्याण आश्रमाच्या महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष कै. गंगाराम जानू आवारी उपाख्य आवारी गुरुजी यांची मुळात ही शब्दकोशाची संकल्पना होती. त्यांचा या क्षेत्रातला अधिकार आणि परिचय फार पूर्वीपासूनच सर्वश्रुत होता. पेठ भागात कोणी एक गुरुजी फार अभ्यासू आहेत. त्यांनी अनंत गोष्टींचा संग्रह आणि जमवाजमव केलेली आहे. त्यांचे मार्गदर्शन घेण्यासाठी ते वनौषधी तज्ज्ञ असल्याने आयुर्वेदाचे आणि इतर डॉक्टरही जातात. त्यांना भेटतात.

अनेकांनी त्यांच्या या संग्रही आणि अभ्यासू वृत्ती आणि बुद्धीची लोकविलक्षण चमक ते फारसे शिकलेले नसूनही अनुभवलेली आहे. आयुर्वेदतज्ज्ञ, निसर्गप्रेमी मंडळी जशी त्यांच्याकडे जात तसे साहित्य आणि भाषेचे अभ्यासक, संशोधकही त्यांची भेट घेऊन चर्चा करीत, मार्गदर्शन घेत असत.

## सावध गुरुजी

मात्र गुरुजी स्वत: सावध असायचे. आपल्या संकलनाचा, ज्ञानाचा कोणी स्वत:च्या नावावर आयता वापर करून मोठेपणा मिरवित नाही ना, ही त्यांची शंका असे. कारण त्यांनी आयुष्य वेचून कमावलेले त्यांचे ज्ञान आणि विचार-चिंतन अन्य भाषांत भाषांतरित करून तथाकथित सुशिक्षित मंडळी ते वापरीत तर नाही ना, अशी त्यांना चिंता वाटे. आपल्या अभ्यासाचे आधार आणि संदर्भ न सांगणारे त्यांच्या जाणिवेत होते म्हणून ते काळजी घेत. 'झेरॉक्स' सुविधा नव्हती तेव्हाही आपल्या सुंदर, स्वच्छ, रेखीव हस्ताक्षरात ते कष्ट सोसून स्थळप्रत किंवा हस्तलिखिताची प्रत ठेवीत असत. आपल्या नोंदवहीला ते फार जपत. समक्ष दाखवून लगेच परत घेत. फार तर इतरांना अलीकडच्या काळात झेरॉक्स पाने देत.

## अपुरे संशोधन : अर्धवट संकल्प

कै. गुरुजींना खूप काही संशोधन करायचे होते. विविध विषयांत त्यांना गम्य होते आणि गती होती. पक्ष्यांच्या पिसांची औषधे, फुलांचे विविध गंध, वेलींच्या जाती, कीटकांची गणती यांसारख्या निसर्ग, पर्यावरण, जैविक विविधतेच्या अंगाने आणि त्या संदर्भात त्यांचे संशोधन, अभ्यास अमृतमहोत्सवी वर्ष पार

पाडल्यावरही चालूच होते. त्यांचा दांडगा उत्साह तरुणांनाही दीपवणारा होता. त्यांचे अनेक संकल्प वनवासी संस्कृतीचे गूढ उलगडून दाखवणारे होते. सांस्कृतिकदृष्ट्या वनवासी बंधू हा हिंदू संस्कृतीतच वाढलेला आहे आणि त्याची खरी नाळ हिंदू संस्कृतीशीच जोडलेली आहे या मताशी ते अखेरपर्यंत ठाम होते. त्यादृष्टीने त्यांचे शोधसंकल्प होते पण आता ते सारे अपुरे आणि अर्धवटच राहिले आहेत.

## गुरुजींचे वाङ्मय प्रकाशन हेच पुण्यस्मरण

दि. ८ जुलै २००४ला गुरुजींचे वर्षश्राद्ध आहे. त्यांचे श्राद्ध खऱ्या श्रद्धेने वनवासी कल्याण आश्रमाने भक्तिभावाने करण्याचे ठरविले आहे. अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाच्या तीन कार्यकर्ता संमेलनाला, वयोवृद्ध गुरुजींना कानपूर, रायपूर, आणि वाराणसी एवढ्या लांबच्या प्रवासात मला सोबत करता आली. त्यांचे मार्गदर्शन, वाचन, व्यासंग याची प्रचीती या सहवासात आली. त्यांचा विश्वास संपादन करता आला. केवळ त्यामुळेच त्यांनी त्यांच्या वनवासी शब्दकोशाची वही मला भाषिकदृष्ट्या व प्रकाशनयोग्य मुद्रण प्रत करण्यासाठी दिली होती. मी ती संपादून पुन्हा त्यांना सुधारणा सुचविल्या होत्या. त्यांनी ते अकारविल्हे क्रम लावणे आणि त्याचे योग्य ते करा म्हणून ते हस्तलिखित पुन्हा माझ्याकडे सोपविले. माझ्या कामात त्यांची नोंदवही तशीच प्लॅस्टिकच्या कागदात गुंडाळलेली राहिली. सावकाश गुरुजींच्या जवळ बसूनच अंतिम फेरफार करू अशा विचारात असतानाच आवारी गुरुजी गेल्याची दुःखद वार्ता हृदयाला स्पर्शून गेली. काम अपुरे राहिल्याचे काळजात सलत होतेच. मग सुदैवाने महाराष्ट्र प्रांत वनवासी कल्याण आश्रमाची प्रांत कार्यकारिणी आणि कार्यवाह प्रमोदराव कुलकर्णी यांना व्यथा सांगितली. त्यांनी शब्दकोष पुस्तक रूपात सिद्ध करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले. प्रकाशनाचा बोजा मात्र वनवासी कल्याण आश्रमानेच पेलला आहे.

## प्रल्हाद कुलकर्णी यांची साथ

श्री. प्रल्हाद कुलकर्णी यांची मोलाची साथ मी घेतली. कारण ते शुद्धलेखन, संगणक अक्षरजुळणी आणि ग्रंथनिर्मिती क्षेत्रातील तज्ज्ञ जाणकार मित्र होते. त्यांनी ते काम कर्तव्य व एक पुण्यकर्म म्हणून स्वीकारले. मलाही आठवले, जव्हारमधील वास्तव्यात माझ्याकडेही सुमारे एक हजार शब्दांचा संग्रह होता. तोही त्यात समाविष्ट करण्याचे ठरविले. त्याची जुळणी अर्थ पडताळून

केली. आवारी गुरुजी व माझे काही शब्द असा मिळून हा 'वनवासी कोकणा शब्दकोश' आम्ही सिद्ध केला आहे. तो वनवासी कल्याण आश्रम प्रकाशित करीत आहे.

## या शब्दकोशाची उपयुक्तता

वनवासी शब्दकोशाची ही केवळ नांदी आहे. वनवासी शब्दांचा स्वतंत्र असा छोटेखानी स्वरूपात का होईना पण हा पहिलाच प्रयत्न म्हणावा लागेल. मात्र याचे खास वैशिष्ट्य म्हणजे यातील २० टक्के शब्द मराठीतून आलेले असे आहेत. वनवासी क्षेत्रात आज प्रमाण मराठी बोलणारे अनेक जण कार्य करतात. त्यांना तर याचा उपयोग होईलच, पण वनवासी कला, साहित्य आणि संस्कृती जाणकारांना, जाणून घेऊ इच्छिणाऱ्यांना याची खचितच मदत होणार आहे. यातून पुढे भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यासाला प्रेरणा मिळेल. उदा. वनवासी म्हणी, वाक्‌प्रचारांचा कोश, आहाणे, उखाणे-प्रहेलिका, व्याकरण असे स्वतंत्र कोश तयार करणे शक्य होईल. लोकभ्रम, संकेतकोशही करता येईल. एवढी प्रेरणा यातून मिळाली तरी या प्रकाशनाचे सार्थक झाले असे म्हणता येईल.

आपण साधे ठाणे जिल्ह्याचे उदाहरण घेतले तरी तेथे वारली, कोकणा, महादेव कोळी, क-म-ठाकूर, मल्हार कोळी, दुबळा, धोडी, कातकरी, ढोर कोळी, पारधी, फासेपारधी, कुणबी अशा बारा प्रकारच्या जाती आढळतात. मग त्यांच्या बोलीभाषेतही फरक पडतोच. त्यांचे शब्दसंग्रहसुद्धा काहीसे विभिन्न मराठी असून होतातच. याचा सविस्तर खोलात शिरून गंभीरपणे अभ्यास करणे यापुढे शक्य होईल.

भाषा आणि भाषक यांच्यात नाते निर्माण होते ते अशा शब्दकोशांमुळे. मातृभाषेसाठीही प्रसंगी कोश पाहावयाचा असतो ही कल्पनाही आपल्या गावी नसते. परभाषेसाठी मात्र शब्दकोश शब्दांच्या उच्चारासह पाहणे आपल्याला अनिवार्य वाटते. वस्तुत: आपण आपली मराठी शब्दकळा परमार्थाने समजून घेतली पाहिजे. त्यादृष्टीने वनवासींच्या मराठी बोलीभाषेतील रूढ शब्दांचा हा कोश विशेष पथदर्शक होईल. परस्परांना समजून घेण्यासाठी, सांस्कृतिक अभिसरणासाठी तो उपयुक्त ठरेल याची खात्री आहे.

(वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र प्रांत १५, कृषिनगर, नाशिक ४२२००५ येथे हा कोश उपलब्ध होईल).

❋❋❋

# 'रिंगण' : प्रस्तावना

**शुभास्तु ।**

श्री. उल्हास रहाणे यांची 'रिंगण' ही कादंबरी प्रस्तावनेसाठी माझ्याकडे आली, ही सुखदायी गोष्ट आहे. कारण जव्हार येथील नऊ वर्षांच्या वास्तव्यात खरोखर प्रत्यक्षात वनवासी समाजाशी माझा अत्यंत जवळून जिव्हाळ्याचा संबंध आला.

या कादंबरीच्या प्रस्तावनेनिमित्त एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते की, लोककला क्षेत्रातील जाणकार श्री. अशोक जी. परांजपे यांच्यासमवेत मला वनवासी पाड्यातील मुक्कामात 'वनवासी काज' हा विधी प्रत्यक्ष मुक्काम ठोकून अनुभवायला मिळाला. त्यावेळी खरोखर एका वेगळ्या दृष्टीचे, उदात्त व उदार संस्कृतीचे दर्शन घडले. वनवासींच्या 'काज' या विधीशी संलग्न अशी उल्हास रहाणे यांची 'रिंगण' कादंबरी आहे.

वनवासी 'काज' म्हणजे एका अर्थाने सामुदायिक विवाहासारखाच सामुदायिक श्राद्धाचा विधी आहे. त्यामध्ये परिसरातील खेड्या-पाड्यावरील एखादा श्रीमंत पाटील हा मध्यरात्री 'डाका/ढोल'सारखे वाद्य वाजवून आपण 'काज' घालणार असल्याचे जाहीर करतो. या 'काजा'साठी काही पोती तांदूळ आणि काही व्यवस्था करावी लागते. एवढ्यावर त्या गावामध्ये 'काज' होणार असल्याचे जाहीर होते. साधारणपणे वर्षभरात ज्याच्या घरी कोणाचा मृत्यू झाला असेल अथवा कोणी जवळचे नातेवाईक वारले असल्यास अशा लोकांनी त्या मृतांच्या आठवणींना एकत्रित येऊन उजाळा देण्याचा, शोक करण्याचा हा विधी आहे. त्यामध्ये वीर नाचतात, त्यांच्या अंगात येते आणि आपल्या मृत व्यक्तीचा संचार त्यांच्यामध्ये होतो, अशी भावना आहे. आपल्या नातेवाईक मृत व्यक्तीला आवडणाऱ्या सर्व वस्तू, आवडीचे पदार्थ हे

सर्व त्या वीराच्या अंगात संचार झाल्यावर 'आहेर' स्वरूपात त्याला दिले जातात. त्यानंतर हे वीर स्वतःच्या डोक्यावर धारदार कट्यारीने वार करतात. त्याचे रक्त पायाच्या अंगठ्यावर सांडावे एवढा तो क्रूर वर्मी घाव असतो. हे रक्तांनी न्हालेले वीर शांत झाल्यावर विधी पार पडल्यावर, वनस्पती औषधाने तात्काळ आपली जखम पूर्ण बरी करून घेतात.

या 'काज' विधीकडे अंधश्रद्धेने पाहिले जाते; परंतु गरिबाला परवडेल अशी ही समाजव्यवस्था आहे. जेथे तांदळाचा पिंड परवडत नाही, तेथे मातीचा पिंड करून 'काज' करतात. हा विधी सगळे मिळून, एकत्रित, सामुदायिक असल्यामुळे खर्च व्यक्तिगत वाट्याला जवळजवळ येतच नाही आणि यातील सगळ्यात जमेची बाजू म्हणजे एखाद्या स्त्रीचा पती मृत पावल्यास विधवा स्त्रीला तेथे उपस्थित विधुराशी विवाह करता येतो किंवा एखाद्या पुरुषाची पत्नी वारल्यावर त्यालासुद्धा जिचा पती मेला आहे, अशा स्त्रीशी, त्या विधवेशी तो विवाह करू शकतो. तेही केवळ पदरात रुपया बांधून तात्काळ विवाह ठरविले जातात. याचा अर्थ हे एका गरीब कुटुंबाचे पुनर्वसन आहे. त्या स्त्रीला, विधवांना संरक्षण व भावनिक आधार मिळतो. शिवाय स्त्रीच्या पहिल्या पतीकडून झालेल्या मुलांच्या संगोपनाची जबाबदारी मिटते. हेच पुरुषाच्या बाबतीत आहे. ज्यांच्या पत्नीचे निधन झालेले आहे, त्याच्या घरची, घरदार सांभाळण्याची किंवा संसाराची सर्व जबाबदारी ती स्त्री घेते. हे कुटुंबाचे पुनर्वसन अनिवार्य आहे. अत्यल्प श्रमात कोणताही प्रचार, प्रसार, दळणवळण साधने हाती नसताना अशी ही 'काज' प्रथा म्हणजे सामुदायिक श्राद्धाची प्रथा अद्यापही वनवासी समाजात चालू आहे. या प्रथेचा धागा पकडून सन्मित्र श्री. उल्हास रहाणे यांनी 'रिंगण' या कादंबरीचे कथानक लिहिले आहे. कादंबरी म्हटली की, त्यात कल्पित व वास्तव यांचे आगळे रसायन आपोआपच तयार झालेले असते. त्या दृष्टीने एका आगळ्या-वेगळ्या विषयावरील ही वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी वाचकांना निश्चितच आवडेल, याची खात्री ही

कादंबरी वाचून पटते.

'रिंगण' या कादंबरीत 'देवू', 'सोनू' ही पात्रे महत्त्वाची आहेत. देवू हा 'काज'च्या अमानूष प्रथा बंद करण्यासाठी निघालेला सुशिक्षित तरुण आहे. जव्हारसारख्या वनवासी भागातील हे कथानक आहे. त्यामुळे या कादंबरीत जव्हार परिसर जिवंत झाला आहे. त्याचे वास्तव चित्रण कादंबरीत केले आहे. देवूचा एक सुशिक्षित तरुण म्हणून समाजसुधारणेचा प्रयत्न आहे. शिक्षणाने हे परिवर्तन त्याच्या मनात जागवलेले आहे. देवूला आश्रमशाळेतील वातावरणाचा अनुभव शिक्षण घेता घेता आलेला आहे. त्याच्यावर आचार्य भिसे यांच्या वनवासी सेवेचे आणि वनवासी हिताच्या विचारांचा पगडा आहे. म्हणूनच तो अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न करतो. यातील 'काज'चे गाव धारणगाव असून न्याहाळेपाड्याचे वातावरण जिवंत करण्यात लेखक यशस्वी झालेला आहे. पाड्यावरील इत्थंभूत माहिती लेखकाने यशस्वीपणे चित्रित केली आहे.

देवूचा शेतमजुरी करणारा बाप रामा हा सालदार म्हणून मालदाराकडे राहतो. तेच त्याच्या चरितार्थाचे एकमेव साधन होते. रामाचा मुलगा सोनू हा नुसता नावाचा सोनू होता. रामाचे सगळे आयुष्य अडाणीपणात पोटाची टीचभर खळगी भरण्यात गेलेले आहे.

ओघामध्ये भयंकर वेठबिगारी प्रथेचे चित्रण या कादंबरीत आलेले आहे. यमनीच्या लग्नासाठी कुशाबाला दोन हजार रुपये कर्ज घ्यावे लागते आणि त्याच्या पायी (बदल्यात) स्वत:ची जमीन गमवावी लागते.

विशेषत: 'क'ठाकूर आणि वारली या जातींमध्ये ही 'काज' प्रथा आहे. 'गाज' वरून 'काज' शब्द आलेला असावा, असा अंदाज लेखकाने केला आहे. पौष महिन्यात हा तीन दिवसांचा 'काज' सोयीनुसार केव्हाही केला जातो. हे वर्षश्राद्ध गरिबीमुळे दोन-चार वर्षांतून एकदा केले जाते. स्त्री-पुरुषाची विलापिकासदृश शोकगीते मृताच्या नावे गाण्याची पद्धत 'काज'मध्ये आहे. वीराला 'भावया'

किंवा 'भगत' असेही म्हटलेले आहे. मृतांच्या शांतीसाठी हा 'काज' आहे. त्यात रक्तपाताशी संबंध असल्यामुळे कायद्याने त्याला बंधन घालण्याचेही प्रयत्न झालेले आहेत. 'काज' हे एक अघोरी कृत्य आहे, असे येथे सुचविलेले आहे. 'काज' प्रथेत दारूला महत्त्व आहे, असे लेखक म्हणतो. अर्थात्, त्यातील रक्तपाताचा व अतिरंजित भाग वजा केला, तर ही प्रथा समर्थनीय होऊ शकेल. देवूचा एवढ्यासाठी 'काज'ला विरोध आहे.

काही मान्यवर मंडळी हे 'काज' पाहण्यासाठी उपस्थित असतात. देवूला 'काज' प्रथेतील दारूण अर्धसत्य समजल्यावर त्याने त्याविरुद्ध बंड पुकारले. सोनू, देवू या दोन भावांत अंतर आहे. या प्रथेत स्वतःची कामवासना पूर्ण करून घेण्याची सवय सोनूला जडलेली आहे, असे जे लेखकाने नोंदविले आहे, ते प्रत्यक्षात आढळत नाही आणि कदाचित् असे काही अपवादात्मक वातावरण लेखकाच्या निदर्शनास आलेले असावे; पण त्यात फारसे तथ्य नाही, असे दिसते.

एकूण या कादंबरीत वर्णन केलेल्या 'काज' विधीसंदर्भात आगळी स्थिती असली, तरी 'रिंगण' या कादंबरीने 'वनवासी काज' या महत्त्वाच्या प्रथेकडे समाजाचे लक्ष वधले आहे आणि म्हणून ही कादंबरी एक वेगळे दर्शन घडविणारी आहे. जर 'काज'च्या नावाखाली कामपूर्तीची अनिष्ट प्रथा अस्तित्वात असेल, तर या अंधश्रद्धेच्या रिंगणातून बाहेर पडलेले चांगले. या कादंबरीचे स्वागत मराठी वाचक करतीलच. माझ्या शुभेच्छा !

❋ ❋ ❋

# जांभूळपाडा - प्रस्तावना

वनवासी कल्याण आश्रमाच्यावतीने चालविल्या जाणाऱ्या भारतभरच्या अनेक वसतिगृहांपैकी 'गुही' वसतिगृह नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील जुने आणि वनवासी विद्यार्थी संख्या-बहुल असे आहे.

या वसतिगृहाची गरज, त्याच्या निर्मितीची पार्श्वभूमी, त्यावेळचे वातावरण याचे अत्यंत बारकाईने अवलोकन करून लिहिलेली 'जांभूळपाडा' ही कादंबरी आहे. एका ध्येयवादी, निष्ठावंत माणसाच्या कार्याचा परामर्श घेणारी ही कथा आहे. उद्योजक रमेश पटवर्धन यांनी एका तपापूर्वी, म्हणजे १९९८ साली, वनवासी क्षेत्रातील सामाजिक कार्याला उजाळा देण्यासाठी 'जांभूळपाडा' ही कादंबरी लिहिली होती. तिला 'लघुकादंबरी' असे संबोधले गेले, तरी ती आशयघन आहे. मोठा आवाका असलेली स्वत:च्या खास शैलीत लिहिलेली ती बहुगुणी कादंबरी आहे. म्हणूनच वनयात्री प्रकाशन समितीने नवी दुसरी आवृत्ती प्रसिद्ध करण्याचे ठरविले. आजकाल प्रकाशनात येणाऱ्या सर्व अडचणींवर मात करून हे काम हाती घेतले आहे. भावी काळातही 'वनयात्री प्रकाशन' अशी दुर्मिळ वनवासीविषयक ग्रंथसंपदा, होणारे संशोधन आणि सर्जनशील ललित प्रकाशित करणार आहे. त्यामधील उचललेले हे एक पाऊल आहे.

**मराठी साहित्यातील जोरकस प्रवाह**

मराठी सहित्यात विविध प्रवाह रूढ आहेत. त्यात ग्रामीण, दलित व वनवासी प्रवाह समाविष्ट होतात. अलीकडील १९८० नंतरच्या मराठी साहित्यात 'वनवासी साहित्याचा प्रवाह' हा एक जोरकस प्रवाह मानला जातो. त्यामध्ये प्रामुख्याने ललित साहित्य, कविता, कथा, कादंबरीप्रमाणेच वैचारिक साहित्यही मोठ्या प्रमाणात लिहिले जात असल्याचे दिसून येते. वनवासी साहित्यिकांची प्रतिवर्षी विविध साहित्यसंस्था सम्मेलनेही भरवीत आहेत. त्यासाठी लेखनविकास

कार्यशाळाही आयोजित केल्या जातात. त्यातूनच स्वतंत्रपणे 'वनयात्री प्रकाशन' हे वनवासी साहित्य प्रकाशनार्थ स्थापन करण्यात आले आहे. वनवासींचे व्यासपीठ निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. लिहू पाहणाऱ्या, अनुभवसंपन्न वनवासी बांधवांच्या लालित्यपूर्ण अविष्काराला मूर्तस्वरूप प्राप्त करून देण्यासाठी 'वनयात्री प्रकाशन' कार्यरत राहील. 'जांभूळपाडा' कादंबरीची दुसरी नवी आवृत्ती प्रकाशित करण्याचे वनयात्री प्रकाशनाचे नेमके हेच प्रयोजन आहे. सर्वच वनवासीविषयक साहित्याला प्रकाश दाखविण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न राहील.

### समर्थ भारत होण्यासाठी

साने गुरुजी आणि माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या अपेक्षेप्रमाणे जर खरोखरच आपला भारत देश बलसागर आणि समर्थ व्हावयाचा असेल तर समाजातील सर्वच घटकांचा, शहरांबरोबर, अलक्षित, उपेक्षित खेड्यापाड्यांचा विकास झाला पाहिजे. वर्ग, वर्ण, जातिविरहित समग्र उन्नती साधली पाहिजे. अशाच दुर्गम आणि ग्रामीण 'जांभूळपाडा'सारख्या गावी एका कार्यकर्त्याने आपले जीवन झोकून दिले. अनेक बांके कठीण प्रसंग झेलले त्यावरच ही कादंबरी बेतलेली आहे.

### थंडावलेला सर्वांगीण विकास

दहशतवादाच्या मुळाशी बऱ्याचदा नक्षलवाद आणि नक्षलवादाच्या मुळाशी थंडावलेला सर्वांगीण विकास हेच कारण आढळले. याचाच अर्थ आपला देश स्वतंत्र होऊन सहा दशके उलटून गेली तरी समग्र विकासाकडे आपण अद्याप जाऊ शकलो नाही. दहशतवाद हटविण्यासाठी ग्रामीण, दुर्गम अशा 'जांभूळपाडा'सारख्या भागाचा विकास आवश्यक आहे. 'जांभूळपाडा' या कादंबरीचे लेखक रमेश पटवर्धन यांना खेड्यापाड्यातील वनवासी लोकांचे कष्टमय जीवन समाजमनस्वी कार्यकर्ता म्हणून अनुभवता आले. या शहरी वातावरणातील लेखकाच्या मनाला संवेदनशीलतेमुळे वनवासी क्षेत्रातील समस्यांनी भंडावून सोडले. ते भारावले. तेथील विरोधकांच्या कारवायाही त्यांच्या लक्षात आल्या. 'जांभूळपाडा' आणि त्यानंतर 'घरवापसी' या कादंबऱ्यांचे

लेखन या चिंतनातूनच झाले.

**वनवासी क्षेत्रातील प्रश्नांची सोडवणूक**

वनवासी क्षेत्रातील युवकांना रोजगार मिळावा, ते स्वावलंबी व्हावेत म्हणून त्यांचे प्रशिक्षण होणे गरजेचे आहे. योग्य त्या ठिकाणाहून प्रशिक्षण घेऊन आल्यावर ते स्वत:च्या पायावर उभे होतील. जो कच्चा माल व्यवसायासाठी, ज्या भागात तो उपलब्ध आहे, त्यावर आधारित प्रशिक्षण जास्त फायद्याचे ठरते. उदा. बांबूची बने जिथे दाट असतील तेथील तरुणांना 'आगरताळा' येथे नेऊन प्रशिक्षण देणे फलदायी ठरणारे आहे. कोकम, टोमॅटो यांचे उत्पादन जास्त तेथे कोकम सरबत आणि टोमॅटो केचपचे प्रकल्प उभे करता येतील. पाऊस ज्या भागात भरपूर पडतो, पण जर ते पाणी नुसतेच खळाळून वाहून जात असेल तर तेथे श्रमदानाने विहिरी बांधल्या पाहिजेत. नदीचा गाळ काढून खोली वाढविली पाहिजे. पाणी अडवणारे बंधारे, शेततळे, जमिनीचे सपाटीकरण, संरक्षक भिंती, पाझर तलाव, पाणी अडवा-पाणी जिरवा अशा पाणलोट क्षेत्र विकासाची कामे हाती घेतली पाहिजेत. अशा मूलभूत विकासकामांची महती अतिग्रामीण भागात वावरलेल्या या लेखकाला तीव्र जाणवली. तेवढ्यासाठी त्याने वनवासी क्षेत्र पिंजून काढले. तेथील जीवन समजून घेतले. कम्युनिस्ट, साम्यवादी, ख्रिश्चन धर्मप्रचारक यांचे विधायक कामातही येणारे अडथळे अनुभवले. वनवासी क्षेत्रातील त्यांचे उपद्रव सतत वाढतच होते. 'डॉ. सुधीर शास्त्री'सारख्या नायकाच्या, अन्य पात्रांच्या निर्मितीतून त्यांनी या प्रतिकूल स्थितीवर तोडगे शोधण्याचा प्रयत्न केला. पात्रे काल्पनिक असली तरी रचनात्मक कार्याचा संदेश 'जांभूळपाडा' मध्ये आहे. आधुनिक पद्धतीने शेतीव्यवसाय करणे, संस्कार केंद्रे, बालवाड्या, बचतगट, रोजगारनिर्मिती, स्त्रीशक्ती, प्रबोधन, आरोग्यसेवा, प्रशासन, साक्षरता या गोष्टींमधूनच खेडेपाडे घडतील. त्यांची विकासाकडे वाटचाल होईल.

**वनवासींचे भारतीयत्व**

शासनाने स्वयंसेवी संस्थांमधील जीवनव्रती सेवाभावी कार्यकर्त्यांकडून कामाची दिशा आणि स्वरूप समजावून घ्यावे. कारण

आपले सगळे आयुष्यच झोकून देऊन, अंत:प्रेरणेने, दृढनिश्चयाने आणि आपला हेतू स्वच्छ ठेवून हे कार्यकर्ते स्वकार्यमग्न असतात. खरे भारतीयत्व वनवासींनीच जपले हे त्यांच्या रूढ जीवनपद्धतीवरून, आचार-विचार विहारावरून लक्षात येते. पण वनवासींच्या अज्ञानाचा, गरिबीचा आणि अडाणीपणाचा लाभ घेऊन देशद्रोही चळवळी आणि कारवाया त्यांच्यात आणखी न्यूनगंड निर्माण करतात. ख्रिश्चन धर्मप्रसारकांकडून त्यांची फसवणूक चालू आहे. यातून सुटका करण्याची, सोडवणूक करण्याची प्रेरणा देणारी ही 'जांभूळपाडा' कादंबरी आहे.

हा वनवासी बांधव हिंदूच आहे, हे महात्मा गांधी यांनी 'यंग इंडिया' मधील लेखात मांडले आहे. त्यांच्या या मताचा आदर आणि स्वीकार आपण केला पाहिजे. वनवासींमध्ये रूढ असलेली पारंपारिक हिंदू जीवनपद्धती, उलट आपण ती अनुकरणीय आहे म्हणून टिकविली पाहिजे.

आपण सगळे शेवटी एकाच स्तरावरील आहोत. त्यातून आपण बंधुभाव टिकवावा. उत्तम भाग्यासाठी, उन्नतीसाठी आपले सर्वांचेच प्रयत्न असावेत म्हणजे प्रगतीचा परमवैभवाप्रत जाण्याचा मार्ग खुला होईल, असा बोध वाचकांना करून देणारी प्रेरणादायी अशी ही 'जांभूळपाडा' कादंबरी नव्या पेहरावात वनयात्री प्रकाशन सादर करीत आहे. चोखंदळ रसिकवाचक या कादंबरीच्या नव्या दुसऱ्या आवृत्तीचे मोठ्या आनंदात स्वागत करतील आणि भरघोस प्रतिसाद देतील, असा वनयात्री प्रकाशन समितीला विश्वास वाटतो.

❋ ❋ ❋



# क्रांतिवीर राघोजी भांगरे : प्रस्तावना

संपूर्ण मायाजाल (Inter net) शोधले. परंतु वनवासी क्रांतिकारक 'राघोजी भांगरे' यांच्याबद्दल एक जुजबी परिच्छेदाच्यावर मजकूर आढळला नाही. त्यात कोळी समाजातला 'डाकू' असाही उल्लेख आहे आणि फक्त १८४५ ते १८४७ या कालखंडातील घटनांचा तपशील गॅझेटमध्ये आहे. त्यात २ मे १८४८ला या महान क्रांतिकाराला हौतात्म्य पत्कारावे लागले अशी नोंद केलेली आहे.

वनवासी क्रांतिकारकांच्या कार्याचे मोल जाणून डॉ. गोविंद गारे आणि डॉ. प्रभाकर मांडे यांनी अलिकडे लेखन केलेले आहे. त्याचप्रमाणे डॉ.सौ.सरल धारणकर यांनी १८५७ चे स्वातंत्र्य समर आणि वीर भागोजी नाईक या पुस्तकात 'आद्य क्रांतिवीर राघोजी भांगरे' यांचा संशोधनात्मक दृष्टीने परामर्श घेतला आहे. अखिल भारतीय इतिहास संकलन समिती, नाशिक जिल्ह्याने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. त्यात नाशिक जिल्ह्यातील उपलब्ध क्रांतिकारकांची मोठी उद्‌बोधक माहिती दिलेली आहे.

या पार्श्वभूमीवर आमचे स्नेही श्री. भाऊसाहेब नेहेरे यांनी परिश्रमपूर्वक संशोधन करून लिहिलेल्या 'सह्याद्रीचा वाघ' अर्थात् राघोजी भांगरे या पुस्तकाला पुरस्कार लिहिताना अतिशय आनंद होत आहेत. त्यांनी सर्व स्थळांना प्रत्यक्ष भेटी देऊन संबंधितांकडून सर्व राघोजी भांगरे विषयक माहिती घेतली. राघोजी यांच्या संपर्कातील गोष्टींची सर्व प्रकाश चित्रेही या पुस्तकात दिली आहेत. यावरून त्यांनी या छोटेखानी ऐतिहासिक दस्तवेजाचीच जणू एक निर्मिती केली आहे. अतोनात कष्ट घेऊन पुराव्यानिशी या क्रांतिकारकाला प्रकाशात आणले आहे.

श्री. भाऊसाहेब नेहरे यांनी केलेले हे कार्य निश्चितच गौरवास्पद आणि इतिहासाच्या अभ्यासकांना प्रेरणा देणारे ठरेल. या प्रकाशनाबद्दल त्यांना अंत:करणपूर्वक धन्यवाद द्यावेसे वाटतात. स्वत: भाऊसाहेब हे इतिहासाची आवड असलेले द्वि पदवीधर असून जनजाती समाजातील

आहेत. त्यामुळे स्वाभाविकच अत्यंत आस्थापूर्वक, आत्मीयतेने सतत दोन वर्षे या विषयाला वाहून घेऊन राघोजी भांगरे या क्रांतिकारकाला पुस्तक रूपाने अभिवादन केले आहे. जनमानसात आणि समाजातही राघोजींच्या या कार्याबद्दल आदरभाव रुजावा अशा एका कृतज्ञता बुद्धीने त्यांनी हे काम पूर्ण केले आहे.

१८५७ च्या भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य समरात वनवासी बांधवांचाही फार मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. आपल्या महाराष्ट्रात प्रामुख्याने खानदेश, नगर, नाशिक, दक्षिण महाराष्ट्र इत्यादी भागांमध्ये कोळी, भिल्ल, रामोशी इत्यादींचे लढे विशेष गाजले. त्यांची तपशीलवारपणे ऐतिहासिकदृष्ट्या दखल घेणे गरजेचे आहे. 'चणकापूर'चे हुतात्मास्मारक याची साक्ष आहे.

वीर भागोजी नाईक, महिपत नाईक, यशवंत नाईक, म्हारडिया ह्या हुतात्म्यांच्या बरोबरच अनेकांना काळ्या पाण्याची शिक्षा आणि जन्मठेपेच्या शिक्षाही भोगाव्या लागल्या. कित्येकांना कैदी म्हणून इंग्रजांच्या जुलमी राजवटीत यातना सोसाव्या लागल्या. त्यांचे अतोनात छळ झाले हा सगळा इतिहास शोधण्याची आवश्यकता श्री. भाऊसाहेब नेहरे यांच्या पुस्तकाने दाखवून दिली आहे. हौतात्म्याबरोबर आणि जन्मठेपेच्या शिक्षांनी लढे थांबत नसतात. लढाऊ वृत्तीच्या वारसदारांनी ते इंग्रजांविरुद्धचे लढे पुढे चालूच ठेवले त्याचीही नोंद अभ्यासपूर्वक संशोधनातून होणे आवश्यक आहे, हे या पुस्तकाने इतिहासाच्या अभ्यासकांच्या लक्षात आणून दिले आहे. भारतात आपले एकछत्री राज्य स्थापन करावे असे इंग्रजांनी ठरविले पण स्वातंत्र्यप्रिय, स्वच्छंद, मुक्त जीवन जगणाऱ्या झुंझार लढाऊ वृत्तीच्या वनवासी भिल्ल, रामोशी, महादेव कोळी यांना ते रुचणारे नव्हते. त्यांनी एकत्रित येऊन गटागटाने संघर्षाला तोंड फोडले. त्यांच्यातला कणखर, करारीपणा इंग्रजांनाही प्रत्ययाला आला. नगर जिल्ह्यातील अकोल्याच्या रामा किरवा याला १८३०मध्ये फाशी दिली. इंग्रज भ्रामक समजुतीत होते, की आता महादेव कोळी डोके वर काढणार नाहीत, त्यांना जरब बसेल. पण ही त्यांची चूक ठरली. त्या रामा किरवालाचा सोबती राघोजी भांगरे पेटून उठला. त्याने पोलीस अधिकारीपणाची बढती

नाकारली. इंग्रजांच्याबद्दल त्याच्या मनामध्ये धुमसणारा राग उसळून आला. त्याला अन्यायाची चीड होती. त्याने स्वत:ची टोळी बनवली आणि इंग्रजांविरुद्ध उठाव केला. महादेव कोळी समाजाचा तो नेता बनला. १८३८ मध्ये त्याने रतनगड व सनगर किल्ल्याच्या टापूमध्ये क्रांतिकार्य आरंभले. त्यांचा संघर्ष मोडून काढण्याचा प्रयत्न मॅकिन्टोशने त्याच्यापरीने केला. रामजी भांगरे व गोविंदराव खाडे या किल्लेदाराने रतनगड सांभाळला. रामजी भांगरे राघोजीचे वडील होते. वडिलांचा क्रांतिकार्याचा वसा राघोजीने जणू जीवनव्रती बनून जपला. मारवाडी, वाणी सावकारांनी शेतसारा वसूलीचा जाच केला. वनवासींना कर्जबाजारी करून जमिनी हिसकावून घेतल्या. चिडून राघोजीने इंग्रजांचा आणि मारवाड्यांचा बंदोबस्त केला. त्याचा दरारा फार मोठा होता. त्यांना त्याने चांगला धडा शिकविला. ब्रिटिशांना राघोजी भांगरेला पकडून देणाऱ्यास रुपये ५०००/-चे इनाम १८४३ साली घोषित करावे लागले. राघोजीच्या कुटुंबियांना इंग्रजांनी आतोनात छळले. राघोजीचा हा लढा १८४८ पर्यंत अव्याहतपणे चालला. ब्रिटिशांना त्याने जेरीस आणले. कॅप्टन 'गेल'च्याही हाती तो लवकर लागेना. पण शेवटी २ जानेवारी १८४८ला रक्तपात आपल्यासाठी होतो हे लक्षात घेऊन त्याने स्वत:ला कॅप्टन गेलच्या स्वाधीन केले. राघोजीला एकतर्फी सुनावणीत फाशीची शिक्षा झाली. २० वर्षांचा हा लढा अखेरी थांबला. राघोजीने वीराचे मरण पत्करले आणि २ मे १८४८ला या महान लढवय्या क्रांतिकारकाला फाशी दिले.

अशी या सह्याद्रीच्या वाघाची अदम्य झुंझार कहाणी श्री. भाऊसाहेब नेहरे यांनी तुम्हा आम्हा सर्वांसाठी सादर केली आहे. वाचक, अभ्यासक, इतिहास संशोधक आणि संपूर्ण समाज त्यांच्या प्रयत्नाचे खुल्या मनाने स्वागत करतील असा मला विश्वास आहे. श्री.भाऊसाहेब नेहेरे यांचे मी मनापासून या प्रथम प्रकाशनाबद्दल अभिनंदन करतो. आणि फारसा अधिकार नसूनही मला प्रस्तावना लिहिण्यास उद्युक्त केले त्याबद्दल त्यांचे ऋण मान्य करतो.

❋❋❋

# जंगल बोलीचा वेध : प्रस्तावना

## शुभाऽस्ते

मराठी साहित्यात नव्याने मुखरित झालेल्या जंगलच्या बोलीचा वेध, वनवासी साहित्य म्हणजेच "आदिवासी जगण्याचा हा आरसा" या ग्रंथातून डॉ. उल्का शेवकर-निंबाळकर यांनी साकल्याने घेतला आहे. मराठी साहित्याच्या विविध प्रवाहातील मौलिक आणि जोरकस ठरू लागलेल्या या वनवासी साहित्य प्रवाहाचा उदय आणि विकास येथे नोंदविला आहे. वनवासी साहित्याच्या मूलगामी प्रेरणा प्रारंभी विस्ताराने जाणून घेऊन त्याची चर्चा डॉ. उल्का यांनी केली आहे. वनवासींनी वैपुल्याने आणि प्राधान्याने आपल्या जगण्याचा हुंकार आणि आलेख कविता लिहूनच मांडला, त्याचा यथोचित परामर्श ग्रंथातील बहुसंख्य पानांतून स्वाभाविक म्हणूनच घेतला आहे. त्याचप्रमाणे वनवासी ललित साहित्यालाही त्याच्या मोजक्या आवाक्या प्रमाणे मोजक्याच पृष्ठात मार्मिक न्याय दिला आहे.

"आदिवासी साहित्य आणि दिशा" या ग्रंथाच्या जुळ्या भावंडात संकलित, माहितीपर वैचारिक साहित्यधनाच्या अभ्यासपूर्ण विवेचनाबरोबरच लेखिकेने भाषा, जागतिकीकरण, देशीवाद, पर्यावरण या मुद्द्यांच्या संदर्भात वनवासी साहित्याचे योगदान अधोरेखीत केले आहे. त्याचप्रमाणे वनवासी साहित्याच्या पुढील वाटचालीचे सकारात्मक भाकीतही पटण्याजोगे मांडले आहे.

डॉ. उल्का शेवकर-निंबाळकर यांनी वनवासी या विषयाच्या निवडीपासूनच आपली चोखंदळ दृष्टी दाखविली आहे. वस्तुतः स्पर्धात्मक परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केलेल्या संशोधकाला आपल्या अभ्यासासाठी विविध विषय आवाहन करतात, आणि आव्हाने देत असतात, परंतु डॉ. उल्का यांनी सर्वसामान्य, मागे राहिलेल्या, अलक्षित समाजाची

जाणीव ठेवून सुदूरदृष्टीने वनवासी जीवनाचा आणि साहित्याचा परिश्रमपूर्वक, सखोल व अत्यंत मूलगामी अभ्यास या दोन्ही ग्रंथातून केला आहे. वनवासी लोकसंस्कृती, लोकसाहित्य, लोकविद्या या विषयात अनेकदा संकलन- फार तर विश्लेषण या पलीकडे अभ्यास होताना दिसत नाही. वृत्ती गांभीर्याने वनवासी साहित्याचा विमर्श घेणारी मांडणी झालेली दिसत नाही. डॉ. उल्का यांनी आस्वादक आणि साहित्यिक-कलात्मक अंगाने हे सारे लेखन केले आहे.

वनवासी साहित्याची प्रेरणा, स्वरूप आणि चिकित्सा या विषयांची मांडणी येथे विस्ताराने पण नेमक्या स्वरूपात केली आहे. या ग्रंथात वनवासी साहित्य विषयक विविध मुद्दे अधोरेखीत झाले असून डॉ. उल्का यांनी त्याचे सूत्रबद्ध केलेले विवेचन वाचकांनी मुळातून वाचण्याजोगे आहे. वनवासी साहित्याच्या प्रेरणा वैयक्तिक, हेतुजन्य, परिस्थितीजन्य, मनोरंजनपर आणि सर्जनशीलही आहेत. या साहित्याच्या आशय आणि अभिव्यक्तीचा समीक्षा दृष्टीने विचार येथे केला आहे.

वनवासी वैचारिक साहित्याची ही सुरुवात आहे. तरीही त्यातून वनवासी विचारधारा सुस्पष्ट होऊ लागली आहे. वंचित विकासाच्या नव्या वाटा त्यातून धुंडाळाव्या लागताहेत, लागणार आहेत. वनवासी बोलीतील - भाषिक वैशिष्ट्ये त्याची साहित्यातील योजना लेखिकेने विचारात घेतली आहे. बोलीचा वापर संवादासाठी आणि निवेदनासाठी केलेला आहे. डॉ. गोपाल गवारी यांची "कोळवाडा" ही कादंबरी संपूर्ण बोली भाषेत आहे हे आवर्जून नमूद केले आहे. हा बोली भाषेतील अपूर्व शब्दसंग्रह निश्चितच प्रमाण मराठीला समृद्ध करील, करणारा आहे. वनवासी साहित्यात आत्ममग्नतेची बीजे आढळतात. आत्म शोध आणि त्याला प्राप्त झालेले समूह निष्ठेचे रूप हे लेखिकेने वनवासी साहित्याच्या दिशा दिग्दर्शनात स्पष्ट केले आहे. पुढील पिढ्यांमध्ये समाज समरसता वाढीला लागेल, तसा तसा या साहित्याचा आविष्कारही बदलत जाईल.

या ग्रंथातील देशीवादाचा मुद्दा मला विशेष लक्षणीय वाटतो. तो नव्याने मांडला जात असून त्याकडे समीक्षेच्या भूमिकेतून अधिक

लक्ष दिले गेले पाहिजे. वनवासींच्या आगळ्या शब्दकळेतून, प्रतिमांमधून त्यांच्या पारंपरिक वारशाचा उलगडा होतो. तेही या लेखनातून दिसून येते. भविष्यात वनवासी साहित्य प्रवाह समृद्ध व जोरकस होईल. मानव मुक्तीचे आणि सर्वांगीण विकासाचे सूत्र त्यांना गवसेल. या लेखिकेने व्यक्त केलेल्या विश्वासाशी माझी सहमती आहे. तसेच मराठी साहित्याला वनवासी साहित्याचे योगदान मौलिक-समृद्ध करणारे आहे हा आशावादही सार्थच आहे.

मराठी वा अन्य साहित्यातील, प्रदेशातील प्रवाहांशी येथे तुलना केली नाही, फक्त महाराष्ट्रातीलच मराठी साहित्याचा विचार या ग्रंथात केला आहे या मर्यादेतच याचा विचार व्हावा.

तथापि, लेखिकेने वनवासी साहित्याचा समरसून, अभ्यासपूर्ण, परिश्रमपूर्वक पुस्तकरूपात सादर केलेला हा प्रयत्न मराठी साहित्याला नुसता भूषणावह ठरणारा नाही तर अंतर्मुख होऊन चिन्तन करायला लावणारा निर्विवाद झाला आहे. मराठी जगताला सादर केलेल्या या परिपूर्ण ग्रंथ निर्मितीसाठी डॉ. उल्का निंबाळकर या खचितच अभिनंदनास पात्र ठरतील.

❋ ❋ ❋



# वनवासी महिला शिक्षण संशोधन : संकल्पचित्र

(वनवासी विभागापर्यंत अजून शिक्षण पुरेशा प्रमाणात पोचले नाही. या क्षेत्रावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता नवीन शैक्षणिक धोरणातही प्रतिपादन करण्यात आली आहे. या क्षेत्रातील शिक्षणाच्या समस्या अनेक आहेत. स्त्रियांच्या बाबतीत तर त्या अधिकच आहेत. या समस्या संशोधनातून जाणून घेतल्या व त्या दृष्टीने शैक्षणिक योजनांची आखणी व अंमलबजावणी केल्यास त्या अधिक फलद्रूप होतील. अशाच संशोधनाच्या एक संकल्पचित्राचा नमूना पुढे देण्यात येत आहे. विविध वनवासी विभागातही संशोधनासाठी तो प्रेरक व मार्गदर्शक ठरू शकेल.)

**१) प्रकल्पाचे शीर्षक**

"लोकसंख्या शिक्षण आणि वनवासी महिला शिक्षण"

**२) प्रकल्पाचे स्वरूप**

साधारणपणे १५ ते ४५ या वयोगटातील महिलांच्या शैक्षणिक परिस्थितीचा परामर्श घेणे. वनवासी क्षेत्रातील महिलांच्या शिक्षणातील समस्या सांस्कृतिक अडसर यांचा विचारपूर्वक शोध घेऊन त्याचा तपशीलाने अभ्यास या प्रकल्पात करावयाचा आहे. शक्य झाल्यास वनवासी महिलेची आर्थिक दु:स्थिती, परावलंबन, अंधश्रद्धा यांच्या निर्मूलनावर शिक्षण हा महत्त्वाचा उपाय आहे. हे लक्षात आणून देऊन एकंदरीत लोकसंख्या शिक्षणात वनवासी ग्रामीण महिलांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून घ्यावयाचे आहे.

**३) प्रकल्पाची गरज**

महिला शिक्षणाबद्दल आकडेवारीनिशी विपुल प्रमाणात बोलले, लिहिले जाते, पण प्रत्यक्षात महिला शिक्षणातील अडचणी कोणकोणत्या

आहेत, त्या कशा रीतीने दूर करता येतील, प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून जाणीवपूर्वक याची नोंद घेतली गेलेली फारशी आढळत नाही. म्हणून या प्रकल्पात लोकसंख्या शिक्षणात असलेले महिला शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन, त्यातही पुन्हा अतिग्रामीण वनवासी महिलांच्या शिक्षणाची आजवर झालेली व होत असलेली हेळसांड, प्रत्यक्ष पाहून वनवासी महिला शिक्षणाकडे विशेष लक्ष वेधण्याची आवश्यकता आहे हे मांडावयाचे आहे. ही मांडणी आजच्या नव्या काळाची महत्त्वाची गरज आहे.

## ४) या क्षेत्रात पूर्वी झालेली संशोधने

लोकसंख्या शिक्षणाच्या तात्त्विक भूमिकेतून नव्या दृष्टिकोनातून ग्रामीण वनवासी महिलांच्या शैक्षणिक परिस्थितीवर स्वतंत्र संशोधन झालेले फारसे आढळत नाही. त्यामुळे हा प्रकल्प लोकसंख्या शिक्षणाच्या नव्या दृष्टिकोनातून वनवासी महिला शिक्षणाचा विचार नव्याने मांडू शकेल असे वाटते.

## ५) व्याप्ती

या प्रकल्पात फक्त जव्हार तालुक्यातील बहुसंख्य (९०%) वनवासी असलेल्या खेड्यापाड्यातील माध्यमिक, उच्चमाध्यमिक महाविद्यालयातून शिक्षण घेत असलेल्या १५ वर्षावरील वयोगटातून वनवासी मुलींच्या शैक्षणिक स्थितीची पहाणी करायची आहे. त्याचप्रमाणे विविध संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या अनौपचारिक शैक्षणिक कार्याचा विचार करता येईल. या महिलांचे मार्गदर्शक, पालक, शिक्षक काही शिक्षणतज्ज्ञ व लोकप्रतिनिधी त्यांच्या मुलाखती, चर्चा, प्रश्नावलीला मिळणारा प्रतिसाद एवढाच विचार या छोट्याशा प्रकल्पात करता येईल.

## ६) मर्यादा

फक्त जव्हार तालुका एवढ्यापुरताच हा अभ्यास मर्यादित आहे. प्राथमिक शाळांचा विचार यात केला जाणार नाही.

## ७) प्रकल्पाचे महत्त्व

उपलब्ध जनगणना सांख्यिकी माहितीवरून महिला शिक्षणाचे

प्रमाण अत्यल्प आहे. त्यातही पुन्हा वनवासी ग्रामीण क्षेत्रातील महिलांच्या विकासासाठी त्यांच्या शिक्षणाचा अग्रक्रमाने विचार होणे अगत्याचे आहे. प्रस्तुत प्रकल्पातून जर या वनवासी महिलांच्या शिक्षणाची पाहणी करून त्यातील अडीअडचणी व समस्या यावर प्रकाशझोत टाकता आला; त्याचबरोबर काही मूलभूत उपाययोजना सुचविता आल्या तर महिला शिक्षणाच्या दृष्टीने एकूण समाज सुधारणेच्या दृष्टीने आणि देशहिताच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरणार आहे. नमुना म्हणून जरी जव्हार तालुक्यापुरती माहिती असली तरी कमी अधिक प्रमाणात धुळे जिल्हा, गडचिरोली जिल्हा, चंद्रपूर जिल्हा अहमदनगर जिल्हा यातील वनवासी तालुक्यांची अशीच महिलांच्या शिक्षणाची स्थिती असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे हा प्रकल्प ठिकठिकाणच्या वनवासी क्षेत्रातील महिलांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी महत्त्वाचा ठरू शकेल. महिला शिक्षणातून समाजविकास व समाजविकासातून महिला शिक्षण यांना वाव देता येतो. या दोन्हीही प्रक्रियांचे महत्त्व या निमित्ताने लक्षात आणून देता येईल.

**८) उद्दिष्टे**

१) वनवासी भागातील माध्यमिक, उच्चमाध्यमिक महाविद्यालयातील महिलांच्या शिक्षण स्थितीचा अभ्यास करणे.

२) वनवासी महिलेच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा (सुशिक्षित, अशिक्षित) अभ्यास

३) वनवासी भागातील महिलांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचा परामर्श घेणे.

४) वनवासी महिला समाजातील अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, गैरसमजूती यांचा विचार करणे.

५) वनवासी महिलामधील चालीरीती, सणवार, धार्मिक जीवन यांचा आढावा घेणे.

६) वनवासी भागातील महिलांचा शिक्षण दर्जा समजावून घेणे.

७) महिला शिक्षणातील अडसरांची क्रमशः नोंद घेणे.

८) महिला शिक्षणांवरील अडसरांवर क्रमशः उपाययोजना सुचविणे.

९) प्रकल्पाचे निष्कर्ष व उद्दिष्ट यांचा समन्वय साधणे.

१०) वनवासी महिला शिक्षण विषयाच्या संदर्भात महत्त्वाच्या शिफारशी करणे.

## ९) कार्यपद्धती

**अ) निवड** : निवडक पाच शैक्षणिक संस्था पाहणीसाठी घेऊन त्यातील फक्त वनवासी महिलांना वा विद्यार्थिनींना प्रश्नावली दिली जाईल. त्यातून त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक स्थितीचा शोध घेता येईल.

**आ) साधने** : प्रश्नावली, मतावली, मुलाखत, चर्चा, निरीक्षण, चाचणी या साधनातून उद्दिष्टांशी समन्वय साधून माहिती उपलब्ध करून घेण्यात येईल. शक्यतो अनौपचारिक पद्धतीने माहिती मिळवून हा प्रकल्प सिद्ध होऊ शकेल.

**इ) माहितीचे संकलन व पृथक्करण** : उपरोक्त साधनातून हाती आलेली माहिती क्रमशः मुद्देसूदपणे संकलीत करण्यात येईल व त्यातून वनवासी महिला शिक्षणाचा अंदाज घेता येईल.

उपलब्ध माहितीच्या संकलनाबरोबरच उद्दिष्टानुरूप क्रमवार अनुमाने काढता येतील.

## १०) निष्कर्ष

अनुमानावरून हाती आलेले निष्कर्ष सादर केले जातील.

## ११) शिफारशी

प्रकल्पाचे सार शिफारशीत आलेले असेल, उद्दिष्टांची व अनुमानांची या शिफारशींशी सुसंगती राहील. प्रकल्पातील शिफारशी वनवासी ग्रामीण महिला शिक्षणाच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरतील हीच या प्रकल्पाची जमेची बाजू असेल.

वनवासी महिला शिक्षण अभ्यासाची दिशा या निमित्ताने स्पष्ट व्हावी एवढाच प्रस्तुत लेखाचा हेतू आहे.

❋❋❋

# वनवासी विद्यार्थी मराठी सुधार : संकल्पचित्र

## संशोधन प्रकल्प (१९८५-८६)

**संशोधन क्षेत्र** : वनवासी विद्यार्थ्यांच्या संदर्भात मराठी भाषेच्या कौशल्य वाढीचा विचार.

**प्रकल्पाचे शीर्षक** : वनवासी विद्यार्थी मराठी सुधार.

**अभ्यासकाचे नाव** : भास्कर व्यंकटराव गिरधारी
एम्.ए. पीएच.डी.
गोखले एज्युकेशन सोसायटीचे,
कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
जव्हार (जि. ठाणे) ४०१६०३.

**प्रकल्पाची उद्दिष्टे**

प्रकल्पाचा मुख्य हेतू वनवासी विद्यार्थ्यांची मराठी भाषेची श्रवण, संभाषण, वाचन, लेखन ही कौशल्ये वाढविण्याची आवश्यकता प्रस्थापित करणे आणि वनवासी बोली बोलणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाण मराठी भाषेकडे शक्य तेवढ्या लवकर आकर्षित करणे हा आहे. प्रकल्पाच्या विशिष्ट उद्दिष्टांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) इयत्ता पहिली ते सातवीच्या मराठी पाठ्यपुस्तकाचा वनवासी विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून विचार करणे.

२) पाठ्यपुस्तकाचे या दृष्टीने विश्लेषण करून वनवासी विद्यार्थ्यांच्या संदर्भात त्यांची पाहणी करणे व त्यावर उपाय सुचविणे.

३) वनवासी भागातील मराठी विषयाच्या अध्यापकांच्या दृष्टीने अध्यापनात आणि अध्ययनात येणाऱ्या अडचणी आणि वनवासी विद्यार्थ्यांकडून त्यांना मिळणारा प्रतिसाद.

४) वनवासी विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यातील अडचणी पाहणे व त्यावर उपाय सूचविणे.

५) वनवासी विद्यार्थ्यांच्या श्रवण, संभाषण, वाचन, लेखन या कौशल्यामध्ये वाढ करण्याच्यादृष्टीने सर्वसाधारणपणे होणाऱ्या चुका शोधणे व त्यांची कारणमीमांसा करणे व त्यावर मात कशी करता येईल यादृष्टीने विचार करणे.

६) मराठी विषयाची गोडी लावून वनवासी विद्यार्थ्यांची मराठी भाषा समृद्ध करण्याचा विचार करणे.

## संशोधन प्रकल्पाची आवश्यकता

वनवासी विद्यार्थ्यांची मायबोली मराठी असूनही प्रमाण मराठी आत्मसात करणे त्यांना अवघड वाटते. मराठी सारखा परिचित विषय असूनही त्यांना कमी गुण मिळतात. यासाठी वनवासी विद्यार्थ्यांची मराठी विषयातील गुणवत्ता वाढविणे गरजेचे वाटते. महाराष्ट्राची राज्यभाषा मराठी आहे व प्रामुख्याने महाराष्ट्रातच आपल्या जीवनाचा व व्यक्तिमत्वाचा विकास वनवासींना करून घ्यावयाचा असल्यामुळे महाराष्ट्रातल्या वनवासींच्या विकासासाठी अशा प्रकारच्या संशोधनाची गरज आहे. वनवासी विद्यार्थ्यांना आपल्या भावी आयुष्यात उभे राहण्यासाठी भाषिक कौशल्ये वाढविणे अगत्याचे आहे.

वनवासी विद्यार्थ्यांना निसंकोचपणे मराठी उत्तम तऱ्हेने ऐकता, बोलता, वाचता, लिहिता आले पाहिजे. नेमक्या या भाषिक कौशल्यांचा अभाव वनवासी विद्यार्थ्यांच्या सहवासात वावरताना आज जाणवतो. मुळातच विविध वनवासी बोली बोलणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्टसंमत मराठी, जे सर्वत्र बोलले जाते त्याकडे वळविणे अत्यावश्यक आहे. म्हणूनच अशा प्रकारच्या वनवासींची मातृभाषा मराठी सुधारण्यासाठी प्रयत्न सुचविणाऱ्या संशोधनाची मुळात गरज आहे. प्राथमिक वयोगटातील वनवासींचा मराठी भाषेचा पाया पक्का घातला गेला, की मग पुढे आपोआप माध्यमिक व उच्च शिक्षणात त्यांची मराठी भाषा समृद्ध होईल व जीवनात ते ताठ मानेने वावरू शकतील. म्हणून वनवासी

विद्यार्थ्यांची मराठी भाषा सुधारण्यासाठी अशा संशोधनाची आवश्यकता भासते.

**व्याप्ती आणि मर्यादा**

मराठी बालभारती इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचाच विचार या प्रकल्पात केला आहे. साधारणपणे सहा ते चौदा या वयोगटातील विद्यार्थ्यांपुरताच विचार येथे केला आहे. भौगोलिकदृष्ट्या ठाणे जिल्हा आणि त्यातही प्रामुख्याने जव्हार तालुक्यातिल काही मोजक्या निवडक प्राथमिक - माध्यमिक शाळा यातील मराठी विषयाच्या अध्यापन-अध्ययन कार्याचा विचार प्रस्तुत ठिकाणी केला आहे.

**नमुना निवड**

नमुना म्हणून प्रकल्पासाठी एकूण दहा शाळांची निवड केली आहे. प्रत्यक्षात मात्र अधिक शाळांची पाहणी केली. त्यामध्ये माध्यमिक, प्राथमिक, आश्रमशाळा यांचा समावेश आहे. त्यातही शहरी वातावरणातील प्राथमिक, माध्यमिक शाळा, ग्रामीण वातावरणातील माध्यमिक, प्राथमिक आश्रमशाळा यांची निवड केली. प्रामुख्याने प्राथमिक शाळातील विद्यार्थी व शिक्षक, मुख्याध्यापक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षणतज्ज्ञ व पालक यांच्याशी चर्चा, मुलाखती, प्रश्नावली यातून संवाद साधला. साधारणपणे शंभर शिक्षक, तीनशे विद्यार्थी, दहा शिक्षणतज्ज्ञ, दहा प्रशासकीय अधिकारी, दहा पालक यांचेशी प्रश्नावली, अनौपचारिक चर्चा, भेटी गाठी, संवाद यातून व्यक्तिगत, सामुदायिक पातळीवर संवाद साधण्यात आला. विद्यार्थी व पालकांमध्ये केवळ वनवासींचाच समावेश होता तर शिक्षकांमध्ये पन्नास टक्के आदिवासी होते.

**साधन सामुग्री आणि पद्धती**

यामध्ये विशेष भर अध्यापक प्रश्नावलीवर देण्यात आला. या प्रश्नावलीत इयत्ता पाचवीसाठी दहा प्रश्न होते तर इयत्ता सहावीसाठीही दहा प्रश्न होते तर इयत्ता सातवीसाठी आठ प्रश्न विचारले होते व तीन प्रश्न मराठी विषयाच्या अध्यापकांना मराठीचे परिणामकारक अध्यापन आणि त्यातील अडचणी, त्या दूर करण्यासाठी केलेले प्रयत्न या विषयीच्या प्रश्नांचा समावेश होता. अशी ही एकूण एकतीस प्रश्नांची ही प्रश्नावली शंभर अध्यापकांकडून भरून घेण्यात आली. त्या आधारे

उपलब्ध झालेल्या माहितीचे संकलन व विश्लेषण करण्यात आले, त्याचा फार मोठा आधार या सादर केलेल्या अभ्यासाला आहे, याशिवाय वनवासींच्या भाषेतील वेगळेपण लक्षात घेण्यासाठी प्रमाण मराठी व वनवासी बोलीतील शब्दांचा संग्रह करण्यात आला. वनवासी बोली व प्रमाण मराठी यातील तफावत लक्षात घेण्यासाठी शब्दांचा संग्रह याचा उपयोग करण्यात आला. एक प्रकारे ही भाषिक व्याप्ती म्हणता येईल.

अध्यापकांना याच हेतूने प्राथमिक शाळेतील लहान मुलांशी सुसंवाद साधताना नित्य उपयोगी पडतील अशी सुमारे पंच्याहत्तर प्रमाण मराठीतील वाक्ये निवडून वनवासी बोलीत रुपांतर करून घेतले. ग्रामीण वनवासी भागातील शिक्षकांना त्याचा प्रत्यक्षात उपयोग व्हावा अशी अपेक्षा आहे. पण त्याबरोबरच प्रमाण मराठी आणि वनवासी बोलीतील शब्दसंग्रह व वाक्य रचनेचे स्वरूप व भेद लक्षात यावा हा ही हेतू होता.

वनवासी व प्रमाण मराठी यातील तफावत या वाक्यांनी लक्षात आली. एका प्रमाण मराठीतील वाक्याचे कोकणी, वारली, ढोरकोळी, मल्हार कोळी या भाषेत रूपांतर येथे केले आहे. प्रकल्पाच्या अखेरी परिशिष्टात त्याचा समावेश केला आहे. त्याची उपयुक्तता प्रत्येकाला जाणवल्याशिवाय राहणार नाही.

या शिवाय वनवासी पालक, शिक्षक, विद्यार्थी यांचे मराठी अध्यापन व अध्ययनाच्या संदर्भात प्रदीर्घ भेटीतून, मुलाखतीतून निरीक्षण केले. प्रत्यक्ष विद्यार्थ्याकडून निबंध लिहून घेऊन, पत्रातून वा समक्ष भेटी-गाठीतून माहिती मिळवली.

इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या मराठी विषयीच्या शासनाने प्रकाशित केलेल्या सुधारित अभ्यासक्रमांचा आधार घेतला. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या बालभारती पुस्तकांचे वनवासी विद्यार्थ्यांच्यादृष्टीने विश्लेषण केले. निरीक्षण केले. प्रत्यक्ष वयोगट व वर्गनिहाय फक्त वनवासी विद्यार्थांची भाषिक कौशल्ये वाढविण्याच्यादृष्टीने पहाणी केली.

**निष्कर्ष**

प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या सहा ते चवदा ह्या वयोगटातील

वनवासी विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्ये वाढीच्या दृष्टीने केलेल्या अभ्यासातून खालील गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत.

१) इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत ग्रामीण, वनवासी प्राथमिक शाळातून वर्गातील बहुसंख्य वनवासी विद्यार्थांची बोली जाणून घेऊन तिच्या आधारे शिकविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. हळूहळू बोलीकडून प्रमाण मराठीकडे या विद्यार्थ्यांना नेण्याचे उद्दिष्ट मात्र सतत डोळ्यासमोर ठेवले पाहिजे. या दृष्टीने वनवासी विद्यार्थांची एकूण शिक्षणाची रूची वाढेल व त्याचा प्रतिसादही वाढेल.

२) वनवासी विद्यार्थांना शाळेकडे आकर्षित व्हावे व पुढे ते शाळेत टिकून रहावेत यासाठी अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके या गोष्टी महत्त्वाच्या असतात. त्यासाठी पाठ्यपुस्तके आणि अभ्यासक्रम वनवासींना आपला वाटेल, जवळचा वाटेल असा असावा, म्हणजे निसर्ग, वनवासींचे सण, उत्सव, कृषिजीवन, संस्कृति, गरीबीशी झुंज या बाबींवर त्यात विशेष भर दिलेला असावा. याचा सुपरिणाम म्हणजे वनवासी विद्यार्थ्यांना अननुभूत परके असे काही त्यात वाटणार नाही. उलट, त्यांच्या ओळखीच्या खुणा या पाठ्यपुस्तकात त्यांना उमटलेल्या आढळतील व त्यांचा शिकण्यातील उत्साह वाढेल.

३) इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या मराठी भाषेच्या पुस्तकांचा या दृष्टीने विचार केल्यास त्यामध्ये काही त्रुटी राहून गेल्याचे लक्षात येईल. निसर्ग सान्निध्यात रमविणारे मराठीच्या पाठ्यपुस्तकातील काही पाठ अप्रतिम आहेत. त्यांचा अपवाद वगळता अशा पाठात ग्रामीण वनवासी भागातील मुलांवर करण्याच्या संस्काराचा, त्याच्या विषयीच्या आत्मीयतेचा, त्यांना पुढे नेणाऱ्या सामाजिक प्रबोधनाचा एकंदरीत अभाव जाणवतो.

४) वनवासी भागात वनवासींची घरगुती बोली भाषा आणि शाळेत वापरात असलेली प्रमाण मराठी भाषा यांचा मेळ बसत नसल्यामुळे शिष्टसंमत मराठी लवकर आत्मसात करता न येणे हा ही एक त्यांच्या शिक्षणातील मोठा अडसर होऊन बसतो.

५) नव्या शैक्षणिक धोरणात मुलांना मातृभाषेतून शिक्षण दिले गेले तर त्यांचा सर्वांगीण विकास चांगल्या प्रकारे होत जातो, हे सर्वमान्य तत्त्व गृहीत धरले आहे. तेव्हा वनवासी मुलांना त्यांच्या बोलीतून शिकवित

हळूहळू प्रमाण मराठीकडे नेऊन श्रवण, संभाषण, वाचन, लेखन ही भाषिक कौशल्ये निश्चितपणे वाढविता येतील.

६) प्राथमिक शाळेपर्यंत तरी वनवासी विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या बोलीतून खास तयार केलेली पाठ्यपुस्तके नेमली जाण्याची आवश्यकता आहे.

७) विद्यार्थ्यांसाठी प्रगत व सामान्य असे दोन अभ्यासक्रम असून त्यातील वनवासी विद्यार्थ्यांना सामान्य अभ्यासक्रम अभ्यासण्यासाठी निदान सुरुवातीच्या काळात तरी देणे आवश्यक आहे.

८) शैक्षणिक साहित्य, ग्रंथालये, वाचनालये यांचा अभाव हा शिक्षणाच्या मराठीच्या अध्यापनात वस्तुत: फार मोठा अडसर आहे. या बाबत पालक शिक्षक यांनी विशेष रस घेऊन तो दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज साधे मराठी शब्दकोशही ग्रामीण शाळांच्या ग्रंथालयात नाहीत. तेव्हा याबाबत विचार होऊन योग्य पूर्तता व्हायला पाहिजे.

९) वनवासी विद्यार्थ्यांना मुळात आवांतर वाचनाची गोडी नाही, अभिव्यक्तिसाठी पुरेशी शब्द संपत्तीही नाही. एक प्रकारची ही अनावस्था आढळते. भाषा सौष्ठवाचा अभावही जाणवतो.

१०) मातृभाषा अध्यापन उद्दिष्टांची जाणीव एकंदरीत शिक्षकांमध्ये दिसून येत नाही. भाषिक उद्दिष्टे पुस्तकातच छापली तर पालक व इतरजणही त्याबाबत जागरूक राहतील.

क्रमिक पुस्तके, व्यवसाय मार्गदर्शक, अध्यापन, पुस्तिका इत्यादी अध्यापन सामग्री अभ्यासपूर्वक वापरली पाहिजे. परंतु केवळ या गोष्टींवरच शिक्षक, पालक, विद्यार्थ्यांनी संपूर्ण अवलंबून राहू नये. शिक्षकांची संदर्भ साधने निश्चित विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असली पाहिजेत, म्हणजे मराठी भाषा चांगल्या प्रकारे आत्मसात केलेला विद्यार्थी तयार होईल. तारतम्याने स्थानिक परिस्थितीनुसार भाषिक उद्दिष्टे अबाधित राखून त्यातील साचेबंदपणा सोडून आवश्यक ते फेरफार करायला हरकत नाही.

११) अध्यापकांनी दिलेल्या प्रश्नावलीतील श्रवण कौशल्यावर भर आढळला नाही. श्रवण कौशल्याबाबत काहीही प्रतिसाद मिळाला नाही. याचा अर्थ श्रवण कौशल्य वाढीबाबत एकूण संदिग्धता शिक्षक आणि विद्यार्थी यांच्याही मनामध्ये असली पाहिजे. संभाषण कौशल्याच्या

संदर्भातही अध्यापक, विद्यार्थ्यांच्यामध्ये विशेष जाणीव आढळली नाही याचा अर्थ संभाषण कौशल्य वाढीसाठी विशेष प्रयत्न प्राथमिक शिक्षणाच्या पातळीवर केले जात नाही असे निदर्शनास येते.

**सूचना**

अ) प्रस्तूत ठिकाणी सादर केलेला हा अभ्यास जव्हार तालुका फार तर ठाणे जिल्ह्यापुरताच मर्यादित असल्याने हाती आलेले निष्कर्ष यांच्यावरही मर्यादा येऊन पडते, तथापि, विद्यार्थ्यांचा दर्जा, कुवत आणि वातावरण, परिसरातील भिन्नता लक्षात घेऊनही थोड्याफार फरकाने हे विवेचन सर्वत्र लागू पडावे व उपयुक्त ठरावे असेच आहे. वनवासी भागात, वनवासी बोलीत आणि प्रमाण मराठीत विद्यार्थी बोलू शकतील असे द्वैभाषिक होण्यासाठी विशेष लक्ष पुरविण्याची आवश्यकता आहे. भाषा वैज्ञानिकांना हे जणु एक नवे आव्हान आहे. याकडे त्यांनी लक्ष पुरविण्याची गरज आहे.

ब) वनवासी विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्ये सर्वार्थाने विकसित होणे गरजेचे आहे. प्राथमिक शिक्षण बोली भाषेमधून घ्यायला महाराष्ट्र शासन जागरूक असून अनुकूलही आहे, ही गोष्ट निश्चितच लाभदायक ठरणार आहे. अपेक्षित असलेली भाषिक उद्दिष्टे शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांना कळण्यासाठी पुस्तकातच छापलेली असावीत. म्हणजे सहज उपलब्ध होतील.

बोली भाषेच्या वापरातूनच प्रमाण मराठी आत्मसात करायला निश्चितच फार मोठी चालना मिळेल. नागरी जीवन आणि संस्कृती यांच्यापासून दूर राहिल्याने वनवासी विद्यार्थ्यांना घरीदारी सर्वत्र मराठी बोली भाषाच ऐकू येते. पुढे जेव्हा नोकरी व्यवसायानिमित्ताने त्यांना शहरात राहवे लागते त्यावेळी प्रमाण मराठी त्याला वापरता येईल. त्यामुळे वनवासी मुलांचे प्रमाण मराठी सुधारू शकेल व विद्यार्थ्यांचा न्यूनगंड संपून जाईल.

क) पाठ्यपुस्तके, साधन-सामग्री यांची उत्तम अध्ययन, अध्यापन यासाठी पूर्तता झाली पाहिजे. या सगळ्या मर्यादा लक्षात घेऊन वनवासी विद्यार्थी शक्य तेवढ्या लवकर दृक्‌श्राव्य माध्यमे विपुल

प्रमाणात वापरण्याची योजना झाली पाहिजे.

रेडिओ, टी.व्ही., कॅसेटस् यांचाही वापर सर्वत्र मोठ्या प्रमाणावर झाला पाहिजे. व्यक्तिगत लक्ष पुरवून शिक्षकांनी उच्चार, लेखन, आवाज यांच्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वत: शिक्षकांनी फलक लेखन अधिक प्रमाणात केले पाहिजे. नमुना म्हणून का होईना अभ्यासक्रमावर आधारित निबंध, रसग्रहण, संदर्भलेखन केले पाहिजे. न रागवता, आत्मीयतेने वनवासी विद्यार्थ्यांच्या चुका समजावून देणे महत्त्वाचे आहे. निबंधासारखे दिर्घोत्तरी प्रश्न भाषिक कौशल्याच्या वाढीला उपकारक ठरतील म्हणून ते विचारले पाहिजेत.

ड) बोलीकडून प्रमाण मराठी भाषेकडे वनवासी विद्यार्थ्यांना आणण्यासाठी विशेष प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांचे गृहपाठ नीट तपासणे, चुका समजावून देणे या बारीक गोष्टींवरही लक्ष दिले तर वनवासी विद्यार्थ्यांची भाषिक प्रगती होऊ शकेल.

इ) श्रवण, वाचन, लेखन, कौशल्य-सुधारण्यासाठी प्रयत्न झाल्यास व्यक्तिमत्व विकास आणि वनवासींमधील स्वावलंबन, आत्मविश्वास वाढण्यास मदत होईल.

***

(हा प्रबंधाचा संक्षिप्त सारांश संपादित करून दिला आहे. मूळ प्रबंध ८१ पृष्ठांचा असून त्यात एकूण प्रकरणे ११ आहेत. व चार परिशिष्टे जोडलेली आहेत.)



# वनवासी विद्यार्थ्यांशी सुसंवाद

शिक्षक आणि प्राथमिक शाळेतील वनवासी विद्यार्थी यांच्या सुसंवादासाठी वनवासी बोलीतील काही निवडक नित्योपयोगी वाक्ये दिलेली आहेत. ती वनवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लावण्यासाठी उपयुक्त आहेत. तीन बोली भाषेत ही निवडक ७० वाक्ये आहेत.

१. प्रमाण मराठी : तुझे संपूर्ण नाव सांग.
कोकणी : तुझा आखा नाव सांग.
वारली : तुझा सगळा नाव सांग.
ढोरकोळी : तुझा सगळा नाव काय?

२. प्रमाण मराठी : तुझे गाव कोणते?
कोकणी : तुला गाव कणचा?
वारली : तुझा पाडा कोणता?/ कणचा?
ढोरकोळी : तुझा पाडा कणचा?

३. प्रमाण मराठी : तालुका कोणता?
कोकणी : तालुका कणचा?
वारली : तालुका कोणता?
ढोरकोळी : तालुका कणचा?

४. प्रमाण मराठी : तुझ्या घरात एकूण माणसे किती?
कोकणी : तुझ्या घरात आखली माणसं?
वारली : तुझे घरात एकूण माणसं किती?
ढोरकोळी : तुझ्या घरात कोहडिक माणसां आखात?

५. प्रमाण मराठी : मी बोलतो हे तुला कळले का?
कोकणी : मी सांगू ते तुले समजतं का?
वारली : मी सांगतो ते तुला कळला का?
ढोरकोळी : मी सांगतो ते तुला कळला?

६. प्रमाण मराठी : घाबरू नको.
कोकणी : भिवस नको.
वारली : भिवू नको.
ढोरकोळी : घाबरस.

७. प्रमाण मराठी : सावकाश सांग. शांतपणे सांग.
कोकणी : वज सांग. मुकाटेच सांग.
वारली : आस्ते सांग. वज सांग.
ढोरकोळी : आस्ते सांग. हळू सांग.

८. प्रमाण मराठी : तुला आई बाप आहेत ना?
कोकणी : तुल आस बाहास आहे काय?
वारली : तुला आय बाप आहेत का?
ढोरकोळी : तुझे आईस बास आहे का नाय?

९. प्रमाण मराठी : भाऊ किती?
कोकणी : भाऊस किती?
वारली : भाऊ किती?
ढोरकोळी : कोठक भाव?

१०. प्रमाण मराठी : बहिणी किती?
कोकणी : बहण्यास किती?
वारली : बहिण किती?
ढोरकोळी : बहिणीस कोहडी?

११. प्रमाण मराठी : बाप काय काम करतो?
कोकणी : बाहस काय काम करतो?
वारली : बाप काय काम करतो?
ढोरकोळी : बास काय काम करतो?

१२. प्रमाण मराठी : आई काय काम करते?
कोकणी : आईस काय काम करते?
वारली : आया काय काम करते?
ढोरकोळी : आईस काय काम करते?

| | | |
|---|---|---|
| १३. प्रमाण मराठी | : | भाऊ काय काम करतात? |
| कोकणी | : | भाऊस काय काम करत? |
| वारली | : | भावस काय काम करतो? |
| ढोरकोळी | : | भाव काय काम करतो? |
| १४. प्रमाण मराठी | : | तुझी शेती किती एकर आहे? |
| कोकणी | : | तुझी शेती कोठीक एकर आहे? |
| वारली | : | तुझी जमीन किती एकर आहे? |
| ढोरकोळी | : | तुझी जागा किती एकर आहे? |
| १५. प्रमाण मराठी | : | घरात आणखी कोण शिकलेले आहे? |
| कोकणी | : | घरात आखुन कोण शिकेल आहे? |
| वारली | : | घरात तुझी किती माणसा शिकेल आहेत? |
| ढोरकोळी | : | तुझा घरात आजून कोण शिकेल हाय? |
| १६. प्रमाण मराठी | : | कोण कोण किती शिकलेले आहेत. |
| कोकणी | : | कोण कोण किती शिकेल आहे. |
| वारली | : | कोण कोण किती पुस्तक शिकेल आहात. |
| ढोरकोळी | : | कोण कोण किती पुस्तक शिकेल आहात. |
| १७. प्रमाण मराठी | : | तुला समजले का? |
| कोकणी | : | तुलं समजला काय? |
| वारली | : | तुला समजत काय |
| ढोरकोळी | : | तुले समजल काय? |
| १८. प्रमाण मराठी | : | कोणता विषय तुला आवडतो. |
| कोकणी | : | तुल कणचा विसय आवडतो |
| वारली | : | कोणता विषय तुला आवडतो. |
| ढोरकोळी | : | कणचा विषय तुल जास्त आवडतो. |
| १९. प्रमाण मराठी | : | का बर? कारण काय? |
| कोकणी | : | काय जण? काय कारण आहेत. |
| वारली | : | कशा बर? काय कारण. |
| ढोरकोळी | : | कशा बर? काय कारण. |

| | | |
|---|---|---|
| २०. प्रमाण मराठी | : | तुला मी कधीच मारणार नाही. |
| कोकणी | : | तुलं मी कधीच सोडत नाय. |
| वारली | : | तुलं मी कध्धीच मारणार नाय. |
| ढोरकोळी | : | तुलं मी कध्धीच कुटणार नाय. |
| २१. प्रमाण मराठी | : | मी मारणारा मास्तर नाही. |
| कोकणी | : | मी झोडपणारा मास्तर नाय. |
| वारली | : | मी मारणारा मास्तर नाय. |
| ढोरकोळी | : | मी कुटणारा मास्तर नाय. |
| २२. प्रमाण मराठी | : | पाटी काढा, पाटीवर लिहा. |
| कोकणी | : | पाट्या काहडा. पाट्यावर लिहा. |
| वारली | : | पाटी काढ पाटीवर लिह. |
| ढोरकोळी | : | पाटी काडपोरा तेवर लिह. |
| २३. प्रमाण मराठी | : | पुस्तक काढा, पान नऊ उघडा. |
| कोकणी | : | पुस्तक काहडा, पान नऊ उघड. |
| वारली | : | पुस्तक काढ, पान नऊ उघड. |
| ढोरकोळी | : | पुस्तक काडदोस, पान नऊ काडदोस. |
| २४. प्रमाण मराठी | : | गडबड करू नका, शांत बसा. |
| कोकणी | : | गाज नको करा, उगाच बसा. |
| वारली | : | गडबड करू नको, उगाच बस. |
| ढोरकोळी | : | गाज करओ नको, उगाच बस. |
| २५. प्रमाण मराठी | : | आता मी तुम्हाला लिहून देणार आहे. |
| कोकणी | : | आता मी तुम्हाला लिहून दीन. |
| वारली | : | आता मी तुम्हाला लिहून देईन. |
| ढोरकोळी | : | आता मी तुम्हाला लिहून दिणार आहे. |
| २६. प्रमाण मराठी | : | तू वाच बरं वाचून दाखव. |
| कोकणी | : | तू वाच बर, वाचून दाखव. |
| वारली | : | तू वाच बर वाचून दाखव. |
| ढोरकोळी | : | तू वाजजोत वाचून दाव माला. |

२७. प्रमाण मराठी : मला हा शब्द लिहून दाखव.
कोकणी : माले सब्ध लिहून दाखव.
वारली : मला हा शबद लिहून दाखव.
ढोरकोळी : मालं लिहून दावजोस.

२८. प्रमाण मराठी : मी तुझी वही तपासून देतो, आण.
कोकणी : मी तुझी वही तपासून देवू, आणं.
वारली : मी तुझी वही तपासून देईन आणं.
ढोरकोळी : मी तुझी वही तपासतोच.

२९. प्रमाण मराठी : आता तुझ्या लक्षात चुका आल्या ना.
कोकणी : आता तुझे लक्षेत चुका आल्या ना.
वारली : तुला आता समजेल आहे ना का चुकेल आहे ते.
ढोरकोळी : आता तुले माहिती पडला का.

३०. प्रमाण मराठी : पुन्हा अशा चुका करायच्या नाही, लक्षात ठेव विसरायचे नाही.
कोकणी : परत आजून चुका करशिल नको, लक्षेत ठेव. वसरशील नको.
वारली : अजून अशा चुका करायच्या नाही पाय, ध्यानात ठेव विसरू नको.
ढोरकोळी : अजून अशा चुका करायच्या नाही पाय, ध्यानात ठेव विसरू नको.

३१. प्रमाण मराठी : तू बोलत का नाहीस नेहमी.
कोकणी : तू बोलत कश्या नाय. सारखा.
वारली : तू बोलत कस नाहीस. सदा बोलत जाव.
ढोरकोळी : तू बोलत कसा नाहीस, सदा बोलत जाव.

३२. प्रमाण मराठी : तुला कोणी मारले का?
कोकणी : तुल कोणी झाडेलाय काय?
वारली : तुलं कोणी मारला का?
ढोरकोळी : तुलं कोणी कुटला का?

| | | |
|---|---|---|
| ३३. प्रमाण मराठी | : | मग कशाला रडतो, असे रडू नये. |
| कोकणी | : | मग कसेल रडतोस, असा रडायचा नाय. |
| वारली | : | मग कसेला रडतो, असा रडू नाय. |
| ढोरकोळी | : | मग कशा रडतो, असा रडे नये. |
| ३४. प्रमाण मराठी | : | मला त्याच नाव सांग. |
| कोकणी | : | मालं त्येचा नाव सांग. |
| वारली | : | मालं त्याच नाव सांग. |
| ढोरकोळी | : | मालं तेचा नाव सांग. |
| ३५. प्रमाण मराठी | : | कोण तुझ्या वाटी गेला. |
| कोकणी | : | कोण तुझे वाटलं गेला. |
| वारली | : | कोण तुझे वाटी गेला. |
| ढोरकोळी | : | कोण तुझे मागा लागलाय. |
| ३६. प्रमाण मराठी | : | मी त्याला शिक्षा करतो. |
| कोकणी | : | मी त्येलं शिक्षा करतू. |
| वारली | : | मी त्याला मार देईन. |
| ढोरकोळी | : | मी तेला अटक करतो. |
| ३७. प्रमाण मराठी | : | मी त्याला खूप खूप रागावतो. |
| कोकणी | : | मी त्येलं बराच रागवीन. |
| वारली | : | मी त्याच्यावर खुप खुप रागावेन. |
| ढोरकोळी | : | मी तेचेवर आता रागवीन. |
| ३८. प्रमाण मराठी | : | वेडे, मूर्ख अभ्यास करीत नसतात. |
| कोकणी | : | वेडी, मुर्ख दोषा अभ्यास करत नाय. |
| वारली | : | वेडा, मुर्ख मुल अभ्यास करीत नाही. |
| ढोरकोळी | : | वेडी, मुर्ख मुला अभ्यास करीत नसतात. |
| ३९. प्रमाण मराठी | : | शहाणी मूले अभ्यास करतात. |
| कोकणी | : | सेहनी पोषा अभ्यास करलेत. |
| वारली | : | हुषार मुलगा अभ्यास करतो. |
| ढोरकोळी | : | सहाणे मुला अभ्यास करतात. |

| | | |
|---|---|---|
| ४०. प्रमाण मराठी | : | खूप शिकून मोठी होतात. |
| कोकणी | : | बरीच शिकून मोठी होत्यात. |
| वारली | : | खूप शिकून मोठी होतात. |
| ढोरकोळी | : | खूप शिकून मोठी होतात. |
| ४१. प्रमाण मराठी | : | तू काय काय जेवतो. |
| कोकणी | : | तू काय काय जेवतोस. |
| वारली | : | तू काय काय खातो. |
| ढोरकोळी | : | तू काय काय खातो. |
| ४२. प्रमाण मराठी | : | आज काय जेवला सांग? |
| कोकणी | : | आज काय जेवलास सांग? |
| वारली | : | आज काय खाल्ल सांग? |
| ढोरकोळी | : | आज काय खाल्ला सांग? |
| ४३. प्रमाण मराठी | : | तुला बरं वाटत नाही का? |
| कोकणी | : | तुलं बेस नाय का? |
| वारली | : | तुल बर वाटत नाय का? |
| ढोरकोळी | : | तूलं बेस आहे का नाय? |
| ४४. प्रमाण मराठी | : | काय तुझ दुखते सांग. |
| कोकणी | : | काय तुझ दुखतं सांग. |
| वारली | : | तुझ काय दुखत आहे काय, काय? |
| ढोरकोळी | : | काय तुझा दुखतं? सांग. |
| ४५. प्रमाण मराठी | : | कोणाला तब्येत दाखविली. |
| कोकणी | : | कोणालं तबेत दावली. |
| वारली | : | कोणालं तब्येत दाखविली? |
| ढोरकोळी | : | कोणालं तब्येत दाखिवलीस? |
| ४६. प्रमाण मराठी | : | औषध घेतल का? कोणी दिल? |
| कोकणी | : | औषध घेतलास काय कोणी दिल्हा? |
| वारली | : | दवा घेतलात का? कोणी? |
| ढोरकोळी | : | औषध घेतल का? |

४७. प्रमाण मराठी : आज तुला कोणी रागावले का?
कोकणी : आज तुला कोणी झगडला काय?
वारली : आज तुला कोणी रागावलं काय?
ढोरकोळी : आज तुला कोणी रागावल काय?

४८. प्रमाण मराठी : तू मला आज नाराज का दिसतोस?
कोकणी : तूल आज बेस नाही का?
वारली : तू माल आज दु:खी का दिसतोस?
ढोरकोळी : तू आज मालं नाराज का दिसतोस?

४९. प्रमाण मराठी : तू अभ्यास नीट करत जा बरे.
कोकणी : तू अभ्यास बेस करतोस.
वारली : तू अभ्यास नीट करत जा बरं.
ढोरकोळी : तू अभ्यास चांगला करत जा बरं.

५०. प्रमाण मराठी : तुला शिकून खूप मोठ व्हायच ना.
कोकणी : तुलं शिकून मोठा व्हायचा ना.
वारली : तुलं शिकून खूप शहाणे व्हायचे आहे ना.
ढोरकोळी : तुलं शिकून खूप मोठ व्होयाच ना.

५१. प्रमाण मराठी : आपण आता थोड्या गप्पा मारू.
कोकणी : आता आपले गोठ करू.
वारली : आपण आता थोड्या गोष्टी करू.
ढोरकोळी : आपण आता बसून गोठी करू.

५२. प्रमाण मराठी : जरा मन मोकळ करून खरे सांग.
कोकणी : जराक मन मोकळ करून सांग.
वारली : जरा मन मोकळा करून खरा सांग.
ढोरकोळी : जरा मन मोकळा सांगून खरा बोल.

५३. प्रमाण मराठी : चला आपण फिरायला जाऊ
कोकणी : चल आपले हिंडायले जांव.
वारली : चल आप हिंडायला जाऊ.
ढोरकोळी : चला आपण जरा हिंडून येवू.

५४. प्रमाण मराठी : सहलीला तुम्ही सगळे येणार ना?
कोकणी : सहली तुम्ही आंखी येसालना?
वारली : सहलीलं तुम्ही सगळे जण येणार ना?
ढोरकोळी : सहलीलं तुम्ही सगळे जण येणार ना?

५५. प्रमाण मराठी : आज किनई मी तुम्हाला खूप छान गोष्ट सांगणार आहे.
कोकणी : आज मी तुम्हालं फार बेस गोठ सांगीन.
वारली : आज काय नाही तुम्हाला मी चांगल्या गोष्टी सांगणार आहे.
ढोरकोळी : आज तुम्हाला खरी गोठ सांग तू.

५६. प्रमाण मराठी : नेहमी कोणत्याही मोठ्या शिकलेल्या माणसाचे ऐकत जावे.
कोकणी : कधीही मोठ्या शिकेल माणसाचा आयकाचा.
वारली : हमेशा कोणत्याही शहाणा सिकलेला माणसाचे ऐकाव.
ढोरकोळी : नेहमी कोणत्याही मोठ्या सिकलला माणसाचे ऐकाव.

५७. प्रमाण मराठी : घरातल्या माणसाचे ऐकत जावे.
कोकणी : घरातले माणसाचा आवकायचा.
वारली : घरातले माणसाचा ऐकत जाव.
ढोरकोळी : घरातले माणसाचा आयकत जाव.

५८. प्रमाण मराठी : खोट कधी बोलू नये.
कोकणी : खोटा कधी बोलायचा नाय
वारली : खोटा कधीही बोलू नाही.
ढोरकोळी : खोटा कधी बोलायचा नाय.

५९. प्रमाण मराठी : चोरी कधी करू नये.
कोकणी : चोरी कधी करायची नाय.
वारली : चोरी कधी करू नये.
ढोरकोळी : चोरी कधी करायचा नाय.

| | | | |
|---|---|---|---|
| ६०. | प्रमाण मराठी | : | चुगली कधी करू नये. ऐकू नये. |
| | कोकणी | : | चहाडी कधी करायची नाय, आयकायची नाय. |
| | वारली | : | वाईट कधी करू नको, ऐकू नको. |
| | ढोरकोळी | : | चुघली कधी करायची नाय, ऐकायची नाय. |
| ६१. | प्रमाण मराठी | : | शिकल्याने खूप फायदे होतात. |
| | कोकणी | : | शिकशिल तर फायदा हूल. |
| | वारली | : | शिकल्यानं खरेच फायदे होतात. |
| | ढोरकोळी | : | शिकलेल्या माणसाचा फायदा होतो. |
| ६२. | प्रमाण मराठी | : | आपल्याला मान मिळतो. |
| | कोकणी | : | आपलेलं मान मिळतत. |
| | वारली | : | आपलेले मान मिळतो. |
| | ढोरकोळी | : | आपल्याला मान मिळतां. |
| ६३. | प्रमाण मराठी | : | आपल्याला पैसा ही मिळतो. |
| | कोकणी | : | आपलेले पैसेही मिळतत. |
| | वारली | : | आपलेलं पैसे भेटतो. |
| | ढोरकोळी | : | आपल्यालं पैसे मिळतात. |
| ६४. | प्रमाण मराठी | : | आपण मग गरीब राहात नाही. |
| | कोकणी | : | आपण मग गरीब राहाणार नाही. |
| | वारली | : | आपले गरीब राहात नाय. |
| | ढोरकोळी | : | आपण मग गरीब राहत नाय. |
| ६५. | प्रमाण मराठी | : | आपल्याला चांगले कपडे घालून ऐटीत फिरता येते. |
| | कोकणी | : | आपलेलं चोघलं कपडं घालून रूबाबात हिंडता येते. |
| | वारली | : | आपलेलं चांगलं कपडं घालून रूबाबात फिरता येते. |
| | ढोरकोळी | : | आपल्यालं चांगले कपडे घालून पद्धतशीर हिंडाय मिळतं. |

| | | |
|---|---|---|
| ६६. प्रमाण मराठी | : | पण तुम्ही त्यासाठी शिकायचे मनावर घ्या. |
| कोकणी | : | पण त्येसाठी तुम्ही शिकायचा मनावर घ्ये. |
| वारली | : | पण त्यासाठी तू शिकायच मनावर घे. |
| ढोरकोळी | : | पण त्यासाठी तू शिकायच मनावर घ्या. |
| ६७. प्रमाण मराठी | : | माझे जर तुम्ही ऐकल नाहीतर पुढे तुम्हाला पश्चाताप, दुःख होईल. |
| कोकणी | : | माझा जर तुम्ही आयकला नाय तर पुढा तुम्हालं पकाताप, दुःखी हुईल. |
| वारली | : | माझा जर तुम्ही आयकला नाय तर पुढ तुम्हाल दुःख होईल. वाईट वाटल. |
| ढोरकोळी | : | माझा तुम्ही आयकल नाय तर पुढा तुम्हाल दुःख होईल. |
| ६८. प्रमाण मराठी | : | आता तुम्ही सरळ घरी जा. |
| कोकणी | : | आता तुम्ही नीट घरी जा. |
| वारली | : | आता तू सिधा घरी जा. |
| ढोरकोळी | : | आता तुम्ही सरळ घरी जा. |
| ६९. प्रमाण मराठी | : | सकाळी लवकर उठत जावे. |
| कोकणी | : | सकाळचे लौकर उठत जेस. |
| वारली | : | सकाळी लवकर उठत जा. |
| ढोरकोळी | : | सकाळी लवकर उठत जा. |
| ७०. प्रमाण मराठी | : | दिवसभर चांगले काम करीत जावे. |
| कोकणी | : | दिसभर चांगला काम करत जाय. |
| वारली | : | दिवसभर चांगल काम करत जा. |
| ढोरकोळी | : | दिसभर चांगला काम करायचा. |

यातून संबंधित शिक्षकांना समाजातील वनवासींना ग्रामीण विद्यार्थ्यांशी चांगला सुसंवाद साधता येईल याची खात्री वाटते. शिक्षकांनी हे भान राखल्यास निश्चितच वनवासी समाजातील मुलांना शिकावे वाटेल. म्हणून हा प्रयोग केला आहे.

❋❋❋

# लोकसाहित्याच्या अभ्यासाची नवी दिशा

लोकसाहित्याचे अध्यापन आणि अध्ययन आज सर्वच विद्यापीठातून होत आहे. या अभ्यासातून विविध लोकसाहित्यविषयक ग्रंथ आणि नियतकालिकातून स्फूट लेख प्रकाशित होत आहेत. त्याची फार मोठी लांबलचक यादीही देता येईल. पण अगदी अलिकडे 'लोकप्रज्ञा', लोकगंगा', 'लोकधाटी', 'लोकसाहित्यदर्शन', 'आदिवासी साहित्य विचार' या नव्याने प्रकाशित झालेल्या ग्रंथांचा उल्लेख करावा लागेल. हे बहुतेक गौरवग्रंथ किंवा अनेकांचे संकलित केलेले लेखांचे संग्रह आहेत. त्यातूनच आपल्यापुढे प्रश्न निर्माण होतो, की हे लिखाण पुरेसे आहे का? हा लोकसाहित्याचा तात्त्विक, सैद्धांतिक पातळीवरील नव्याने सिद्धांत (Theory) मांडणारा अभ्यास होतो का? त्यात केले गेलेले लोकसाहित्याचे चिंतन, विश्लेषण लोकसाहित्याच्या समग्र, साकल्याने करावयाच्या आकलनास पुरेसे आहे काय? एक गोष्ट स्पष्ट आहे, की लोकसाहित्याच्या आकलनाला, विश्लेषणाला आणि सिद्धांताला ही सर्व सामग्री निश्चित पूरक आहे. पण त्यातून लोकसाहित्याचे समग्र सिद्धांत, विश्लेषण आणि मूल्यमापन झाले आहे असे म्हणता येत नाही. त्यासाठी लोकसाहित्याची, त्यांच्या संकलनाची, विश्लेषणाची, मूल्यमापनाची आणि सैद्धांतिक मांडणीची नवी दिशा आपण चोखाळली पाहिजे. त्या दृष्टीने येथे जो प्रयत्न केला आहे असे प्रयत्न होण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

**लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे काय?**

लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे विविध लोकसाहित्य प्रकारातील सामग्री गोळा करणे, जमविणे हा त्यातला पहिला प्राथमिक स्वरूपाचा टप्पा म्हणता येईल. अनेकदा पीएच.डी., एम.फील. अभ्यासासाठी

लोकसाहित्यविषयक, लोकसाहित्यावर आधारित विषय घेतले जातात. त्यात प्रामुख्याने 'लोकगीत' हा गीत/पद्य प्रकार विपुल प्रमाणात अभ्यासार्थ उपलब्ध होत असतो. त्यानंतर 'लोककथा' ऐकायला भरपूर प्रमाणात मिळतात. त्याचप्रमाणे म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, कोडी, प्रहेलिका याही विपुल प्रमाणात उपलब्ध होतात. आज खेड्या पाड्यात ग्रामीण, अतिग्रामीण भागात ही सर्व सामग्री विखुरलेल्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात आढळते. तुलनेने लोकनाट्य, लोकरंगभूमीवरील प्रयोग, त्याच्या संहिता कमी प्रमाणात उपलब्ध होतात. किंबहुना त्याचे सादरीकरण करणारी पिढी आता विरळ झाली आहे. अस्तंगतही होण्याची शक्यता आहे.

परंतु लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे लोकगीत, लोककथा, म्हणी, उखाणे, प्रहेलिका, कोडी आणि लोकरंगभूमी एवढ्यापुरताच मर्यादित नसतो आणि तसा अभ्यासकांनी तो ठेवू नये. तर त्यात आणखी लोककला, लोकवैद्यक, लोकाचार, लोकसंस्कृती याचा तपशीलवार शोध घेऊन, त्याचाही समावेश करणे अत्यंत गरजेचे, महत्त्वाचे आणि अत्यावश्यक आहे. फार मोठा अलक्षित राहिलेला भाग, म्हणजे सर्वत्र फरकाने आढळणाऱ्या लोक बोलींचा अभ्यास होय. ऐतिहासिक आणि वर्णनात्मक नव्या भाषा विज्ञानाच्या पद्धतीनुसार हा अभ्यास झाला पाहिजे. बोलींचे भाषिक, भाषाशास्त्रीय अभ्यास माय मराठीच्या समृद्धीसाठी होणे आवश्यक आहे. तेव्हा लोकसाहित्याचे अध्यापन, अध्ययन आणि संशोधनात या काहिशा अलक्षित राहिलेल्या क्षेत्राला प्राधान्य देऊन हा अभ्यास झाला पाहिजे. लोकसाहित्याच्या क्षेत्रीय, प्रादेशिक अभ्यासातही अनेक दालने / क्षेत्रे अद्यापही आपल्याला अस्पर्शित आणि अलक्षित राहिलेली आढळतील. त्याकडेही आपले लक्ष वेधले गेले पाहिजे. स्वतंत्र बोलीभाषेचे शब्दकोष निर्माण व्हावेत; एवढे सामर्थ्य या अभ्यासात आढळेल. शिवाय विविध जाती जमातींचा ऐतिहासिक, दैनंदिनीचा, आचार धर्माचा, राहणीमान आणि जीवनमानाचा 'मोनोग्राफ' (Monograph = a treatise on a subject) या

अभ्यासातून साकार करण्याचा प्रयत्न करता येण्याजोगा आहे.

**लोकसाहित्य म्हणजे लोकसंस्कृतीचा अभ्यास**

या लोकसाहित्याच्या अभ्यासात लोकसंस्कृतीचा म्हणजेच लोकजीवनाचा अभ्यास अनस्यूत आहे. लोकजीवनापासून लोकसाहित्य अलग करता येत नाही. त्यात सारी लोकसंस्कृती सामावलेली असते; म्हणून लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी, संशोधकांनी लोकसाहित्याच्या विविध प्रकारांच्या निमित्ताने होणाऱ्या अभ्यासातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडविले पाहिजे. लोकजीवन संस्कृती हे त्यांचे लक्ष्य असले पाहिजे. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचे अतूट नाते जाणून घेऊनच हा अभ्यास होणे अपेक्षित आहे. अशा प्रकारच्या अभ्यासातून आज समाजात, जीवनात निर्माण झालेल्या किंवा होणाऱ्या कितीतरी प्रश्नांचा उलगडा होऊ शकेल. लोकजीवनाची खऱ्या अर्थाने उकल होऊ शकेल. ही या अभ्यासाची खरी महती आणि गुणवत्ता आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे खरे खुरे उद्दिष्ट हेच आहे. यामुळे त्या त्या काळातील समाजामध्ये रूढ असलेल्या ज्ञानाचा शोध घेता येईल. आजच्या नव्या संदर्भात त्या ज्ञानाचा पाठपुरावा करून त्यात नवी भर टाकता येईल. ते ज्ञान पुढे वाढवता येईल आणि त्याचा सांप्रत समाजाला लाभ होऊ शकेल. आजच्या विज्ञान विषयक ज्ञानालाही नवी दिशा प्राप्त होऊ शकेल. याचे एकच उदाहरण महणजे लोकसाहित्यातून प्रतीत होणारे महत्त्वाचे 'पर्यावरण रक्षणाचे भान'. आज 'पर्यावरण संरक्षण' हा परवलीचा शब्द झाला आहे. याचे अगाध ज्ञान या लोकसाहित्यात साठविलेले बाहेर काढता येईल. खुले होईल.

यासाठीच केवळ 'लोकसाहित्या'साठी विविध संज्ञा वापरलेल्या आसाव्यात. लोकसाहित्याला 'लोकसंस्कृती', 'लोकविद्या', 'लोकवाङ्मय', folk culture'-'folk literature', 'folk-Art' म्हणून ओळखले जाते. त्यामागचे रहस्य हेच आहे. या प्रकारच्या संज्ञांमधून लोकसाहित्याची व्याप्ती, सर्वसमावेशकता आपल्याला कळू शकते. लोकवैद्यक, लोकनृत्ये, लोकचित्रकला, लोककला, नक्षीकाम, वारली पेंटींग्ज, वाद्ये, रंग,

आरोग्यदायी राहणी, समज, संघटनशक्ती याचे वेगळेपण ध्यानात येते. आरोग्यरक्षणाचे काही आडाखे, मनोरंजनाच्या सुलभ परी इत्यादी गोष्टी लक्षात येतात.

## लोकसाहित्य अभ्यास पद्धती

लोकसाहित्याच्या अभ्यासाची कोणतीही एकच एक अशी ठरीव पद्धत आहे असे म्हणता येणार नाही. लोकसाहित्याचे संशोधन हे अनेक तऱ्हेने, अनेक अंगांनी, आशयलक्षी प्रकारचेही आपल्याला करता येईल. हा अभ्यास आपापल्या विविध उद्दिष्टांनुसार आपल्याला करता येईल.

लोकसाहित्याचा अभ्यास म्हटले, की तो एका जागी टेबलखुर्चीवर बसून करावयाचा अभ्यास नाही. उपलब्ध पुस्तकांच्या आधारेही हा अभ्यास होणे अशक्य आहे. त्यासाठी प्रत्यक्ष त्या त्या निवडलेल्या क्षेत्रात, प्रदेशात, जिल्ह्यात, तालुक्यात, खेड्यापाड्यात संशोधकाला शब्दशः जीवाचे रान करून हिंडावे फिरावे लागेल. नसलेल्या ओळखी निर्माण कराव्या लागतील. वारंवार त्या त्या भागाला भेटी देऊन आपुलकी, आत्मीयता जिव्हाळा आणि जवळीक निर्माण करावी लागेल. मोठ्या विश्वासाचे वातावरण निर्माण केल्यावर मग मौखिक परंपरेतील अस्सल लोकसाहित्य बाहेर येईल. मग ते संकलित संपादित करणे शक्य होईल. विशेषतः ग्रामीण महिलांच्या, गतकाळातील मागच्या पिढीतील वृद्धांच्या मुखातून ते स्त्रवेल. त्या संबंधितांना बोलके करावे लागेल कारण मूळातच ग्रामीण भागातील मंडळी आपल्या बाबतीत अबोल असतात.

सुदैवाने आता दृक् श्राव्य माध्यमे, सामग्री घेऊन खेड्या पाड्यात जाऊन पोहचता येते, म्हणून कॅमेरा, टेपरेकॉर्डर, व्हीडीओ शुटींग, डिजीटल सुविधांसह मोबाईलमधूनही आता फोटो आणि ध्वनी संग्रह करणे शक्य झाले आहे. प्रत्यक्ष पुरावा म्हणून या साधन सामग्रीसह या अभ्यास संशोधनासाठी पायपीट करणे आवश्यक झाले आहे. एका अर्थाने त्यामुळे हा अभ्यास संग्रहित करणे सुलभ झाले

आहे. पण एवढ्यावर भागत नाही. त्या उपलब्ध लोकसाहित्याची संगती लावणे, त्यावर चिंतन, सखोल होणे आवश्यक आहे. नुसते संकलन, संपादन हे संग्राहकाचे काम आहे. संशोधकाचे नाही. त्याला नवा अन्वयार्थ, सिद्धान्त आणि सामग्री याचे विश्लेषणासह नाते निर्माण करून दाखवावे लागते. जरी हा अभ्यास पूर्वी झालेला नसला आणि तुम्हीच ते संकलन केल्यामुळे अधिकारी ठरत असाल तरी अभ्यास विषयाचे उद्दिष्ट, संशोधन पद्धती, समीक्षा दृष्टी, विश्लेषण-संश्लेषण सामर्थ्य, नव्या अभूतपूर्व अशा विचारांची मांडणी येथे अपेक्षित आहे. त्यासाठी ही संकलित सामग्री केवळ आधार आहे. त्यानंतरच खरी अभ्यासाची सुरुवात होते.

प्रादेशिक पद्धतीने लोकसाहित्याच्या अभ्यासाचा विचार करावयाचा झाल्यास ठळक प्रदेश वैशिष्ट्यांसह, लक्षात घ्यावे लागतील. विदर्भ, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, वऱ्हाड असे ते भाग कल्पून मर्यादित, कमी व्याप्तीचे विषय घेऊन हे संशोधन करता येईल. त्यात लोकसाहित्याचा विशिष्ट प्रकार, एखादाच अभ्यासाला घ्यावा किंवा बोली म्हणून त्याचा अभ्यास करावा. त्यासाठी सर्वेक्षण, पाहणी, संख्याशास्त्रीय माहितीच्या आधारे करावी लागेल. त्यातच मग एखादा विशिष्ट जिल्हा घेऊन अथवा संशोधनाला वाव असलेला तालुका घेऊनही तेथील लोकसाहित्याच्या सर्व प्रकारांचा अभ्यास सिद्ध करता येईल. विशिष्ट जात, जमात घेऊनही त्याचा सगळा तपशील नोंदवून नव्याने माहिती प्रकाशात आणता येईल. उदा: कातकरी, वारली, महादेव कोळी, कुणबी, बेलदार, भिल्ल इत्यादी. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोकसाहित्याचा अभ्यास, सटाणा बागलाण तालुक्यातील भिल्ली लोकसाहित्याचा अभ्यास, गोपाळ, गोल्ला जमातीचा अभ्यास, कन्नड, हिंगोली, निफाड तालुक्यातील लोकसाहित्याचा अभ्यास असे हे अभ्यास प्रारंभिक म्हणून यशस्वी झालेले आहेत. लोककला, लोकवैद्यक आणि बोलींच्या संदर्भात आजवरच्या अभ्यासात प्रकरणे आहेत. म्हणी, उखाणे, वाक्प्रचार, कोडी यांचे संकलन या निमित्ताने झालेले आहे.

पण स्वतंत्रपणे हेच प्रकरणांचे उपविषय घेऊन अधिक सखोल आणि शोधक दृष्टीने काम होणे महत्त्वाचे व उपयुक्त ठरू शकेल. कित्येक बोली, त्यातील शब्दकळा संशोधक दृष्टीने अभ्यासण्याची गरज तीव्र आहे. मराठी भाषेचा प्रवाह रुंद आणि संथ-समृद्ध होण्यासाठी या अभ्यासाची गरज आहे. त्याची उदाहरणे देता येतील. उदा: उगवती म्हणजे पूर्व दिशा, मावळती म्हणजे पश्चिम दिशा. सोमवार गोडा दिवस, मोडा दिवस मंगळवार, फार मोठे शब्दभांडार या बोलींमध्ये साठवलेले आहे. स्वदेशी धन म्हणून तर आपल्याला या लोकसाहित्याचे जरूर कुतूहल आहे पण आता विदेशी अभ्यासकही मराठी शिकून या लोकवाङ्मय क्षेत्रात पर्यावरण रक्षणाच्या पूर्वापार चालत आलेल्या संकेतांचा - संशोधक दृष्टीने अभ्यास करीत आहेत कारण या सामग्रीतून पर्यावरण, कृषि व्यवस्थापन, हस्तकला, नृत्यकला, संस्कृतीची उदात्तता इत्यादी विषयांवर मौलिक बोध करून घेता येईल याची संशोधकांना खात्री पटलेली आहे.

### मान्यताप्राप्त संशोधन : काही विषय

लोकसाहित्याचे आंतरज्ञानशाखीय अभ्यासही होऊ शकतात. ते वाङ्मयीन, समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, भाषाशास्त्रीय, तत्त्वज्ञानविषयक, सौंदर्यशास्त्रीय, देशीवादी, लोकतत्त्वीय अशा विविध अंगांनी करता येणे संभवते. या अभ्यास संशोधनाची उपयुक्तता विशेष आहे.

i) महादेव कोळी समाजातील लोकसाहित्याचा वाङ्मयीन दृष्टिकोणातून अभ्यास. (गोपाळ गवारी : २००९)

ii) मालेगाव तालुक्यातील भिल्ली लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास. (जीजा सोनवणे, २००६)

iii) जागरण, गोंधळ : एक चिकित्सक अभ्यास. (संगीता कढणे, २००७)

iv) महादेव कोळी समाजातील (दिंडोरी तालुका) लोककथा : एक अभ्यास (संगीता गवारी, २००९)

v) आदिवासी समाजातील ढोलनृत्याची गाणी : एक अभ्यास (पेठ तालुक्याच्यां संदर्भात) (बाळू घुटे)

vi) कळवण व सुरगाणा तालुक्यातील कोकणा जमातीतील लोकनृत्य संस्कृतीचे दर्शन : सर्वांगीण अभ्यास (रामदास कोल्हे)

vii) ठाणे जिल्ह्यातील आदिवासी ठाकूर समाजाच्या लोकगीतांचा चिकित्स अभ्यास (प्रा. हिरालाल लोखंडे/२००९)

viii) आदिवासी साहित्याची प्रेरणा स्वरूप व चिकित्सा : उल्का निंबाळकार

असे अनेक विषय संशोधनात मान्यता पावले आहेत. महाराष्ट्रातील बरेच जिल्हे आणि तालुके यादृष्टीने अभ्यासता येतील. लोकसंस्कृतीचे प्रतिनिधी किंवा उपासक यांचे अभ्यास या लोकसाहित्याच्या दृष्टीने अभ्यसनीय आहेत. मराठवाड्यातील किनवट, पुणे, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, ठाणे, पालघर, जव्हार, नाशिक, नंदूरबार या जिल्ह्यातील तालुक्यांपर्यंत अद्याप पोहचावयाचे आहे. आदिवासीमधील 'क' ठाकूर, 'म' ठाकूर जमातींच्या बोलींचा अभ्यास वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे. या लोकसाहित्य आणि लोकविद्यांच्या अभ्यासाच्या निमित्ताने लोकसंस्कृतीचा फार मोठा वारसा जपला जाईल. त्यातून अनेक फलदायी गोष्टी निष्पन्न होतील. भारतीय आणि महाराष्ट्र संस्कृतीचा हा अमोल (आणि अनमोल) ठेवा आहे. त्याच्या विचिकित्सक बुद्धीने अभ्यासाची खरी गरज आहे. या होणाऱ्या अभ्यासाचे निष्कर्ष संकलित झाल्यावर त्याचा एक चांगला प्रभाव जनमानसावर उमटू शकेल. लोकसाहित्याची समृद्ध परंपरा, वनवासी जमातींच्या लोकसाहित्याचे वेगळेपण, एकेका जमातीचा विषयवार अभ्यास हे विषय अभ्यासले गेले पाहिजेत. त्यातून भारतीय संस्कृतीचा समृद्ध वारसा हाती येईल आणि विशाल मानवी सौहार्दाचा माणुसकीचा प्रत्ययच घडेल.

## 'लोकसाहित्य' अभ्यासाची निष्पत्ती

लोकसमूहमनाने जागवलेले, मौखिक परंपरेने स्मृतीत जतन केलेले अलिखित स्वरूपातील हे वाङ्मय आहे. त्यात सामुदायिक कृती आहे. परंपरेने चालत आलेले, लोकभाषेत व्यक्त केलेले ते लोकमानस आहे. 'लोक' म्हणजे एकाच प्रकारच्या सांस्कृतिक जडण घडणींचा मानव समूह. लोकसाहित्याचा अभ्यास बहुस्पर्शी आहे. त्यामध्ये शब्द, लोककला, क्रीडा आणि लोकविधी आहेत. पर्यावरण वाचक म्हणी, कृषिसंस्कृती जपणाऱ्या आहेत.

**उदा. :** 'झाड तठ वारा । पडती पाण्याच्या धारा'
'तण खाई धन',
'जळो पण पिको'
'वावरात पिकू दे, आमचे पोट भरू दे'
'माय माझी तू । घरात सोनं पडू दे'
'होळी जळली, थंडी पळाली'
'फडका घे सूडका घे....सूट ।
'कणगीत दाणा त भील (गडी) उताणा ।
'पोट हाय संग त काय पडल मांग.

**उखाणे :** आरवत कोंबडा, तरंगत जाय
चार शिंग - आठ पाय (नांगर)
(शेतकरी, (२बैल) ४ शिंग, ८ पाय)

## मराठी नक्षत्रावरच्या म्हणी

**मृग** : मृगाच पाणी, आबादाणी
**आद्रा** : पडतील अर्दडा त भरतील नदी गरदडा (नदी डोह)
**(पौष) पुष्य** : पूस, करी हूस । पाडीन थंडीन भूस
**मघा** : पडतील मघा, नाहीतर वरती बघा
**उत्तरा** : नाही पडतील उतरा, त हाल खाईना कुतरा
**हस्त** : पडला हाती, त करील अन्नाची माती

**स्वाती** : पडतील स्वाती, त पिकतील मोती.

**मराठी महिने**

**चैत्र :** 'चैत' म्हणजे 'दैत'

**ज्येष्ठ :** 'जेठ' अन् 'पाण्याची भेट'

**भाद्रपद :** 'भादवा' अन् 'हांडी मडकी' वाजवा

**पौष :** 'पूस' करी 'हूस' । थंडीन पाडीन भूस

**माघ :** माही करी जीवाची लाही । महो हिवाचा लाहो.

'माही बीजा, कोंबडी शिजा ।
पोशा पोशांनो, उगाच निजा ॥'

आजही सर्वत्र -

पिंपळ, वड, आंबा, बेल, औदुंबर, आवळा, तुळस यांना वंद्य मानण्याची प्रथा आहे. पिंपळाचे झाड तिथे पाणी असते.

लोकसाहित्यात सामाजिक परंपरा पिढ्या न् पिढ्या जतन केल्या जातात. तो माणसांच्या जीवनातील आविष्कार असतो. लोकसाहित्यात कालपरत्वे आणि प्रदेश परत्वे थोडा बहुत फरक होत असतो. आजच्या ललित साहित्याच्या आकलन मूल्यमापनालाही लोकतत्त्वीय दृष्टिकोणाची नितांत गरज आहे. कारण 'लिपी'चा शोध लागेपर्यंत लोकमनाचे सगळेच आविष्कार मौखिक होते. केवळ Oral Transmission मधून सगळे लोकसाहित्य आपल्यापर्यंत येऊन पोहचलेले आहे. त्यामध्ये लोककला, लोकनृत्ये, लोकविद्या, लोकगायक, लोकक्रीडा, लोकवाद्ये, लोकविधी आणि लोकसमज, लोकवैद्यक, लोकजाती, लोकदैवत आदींचा समावेश होतो. उदाहरणार्थ-

**१) लोककला**

गोंधळ, देवीचा जोगवा, खंडोबाचे जागरण, पांगूळ, भारूड, ललित, कहाण्या, दशावतार, नमन, खेळे, यक्षगान, विदर्भातील दंडार, मराठवाड्यातील खडी गंमत, कळसूत्री बाहुल्या, चित्रकथी, तमाशा, पोवाडा, पथनाट्य, कीर्तन इत्यादी.

**२) लोकनृत्ये**

तारपा, ढोलनाच, थाळगान, बोहाडा, कोंबडनाच, अभिचार नृत्ये त्यात देवतासंचार, अष्टमीच्या घागरी फुंकणे, गजीनृत्य, मांदोळ, गौरीनाच, आंबानाच, लगीननृत्ये, डोंगरच्या भावल्या, डिंडण इत्यादी.

**३) उत्सव सण**

नागपंचमी, पोळा, दिवाळी, दसरा, आखातिजा, शिमगा, होळी, कवळी भाजी, बीजा, गुढीपाडवा इत्यादी.

**४) लोकगायक**

संबळ वाजविणारा 'गोंधळी', डमरूच्या साथीने भैरवाची स्तुती करणारा 'भराडी', सूर्योदयी पावा वाजविणारा 'वासुदेव', विविध सोंग वठविणारा 'बहुरूपी', खंजिरी, तुणतुणे-पुतळी वाजविणारे 'वाघ्या-मुरळी', भोपे, कडक लक्ष्मी, पोतराज, लावणी, पोवाडे गाणारे शाहीर, जोगते, भुत्या, सोंग, भांड इत्यादी.

**५) लोकविद्या**

यात भगताला, जाणकाराला अवगत असलेले औषधोपचार वनौषधीचे ज्ञान यालाच 'लोकवैद्यक' म्हणतात. आजीचा बटवा, घुटी, मूर्तिकला, विणकाम, भरतकाम, कशिदा, नक्षीकाम, हात न उचलता रांगोळी काढणे इत्यादी.

**६) लोकवाद्ये**

डाका, नाल, तुणतुणे, संबळ, डफ, खंजिरी, वाजंत्री, सनई, वेणू, पावा (बासरी), शिंग, तुतारी, चिपळ्या, ढोल, ढोलकी, ताशा, तबला, डग्गा, मृदुंग, डमरू, तारपा, पावरी, नगारा, घांगळी, तिलबुली, हिरोबाई, किंझरी, राजेंगी बाणा इत्यादी.

**७) लोकक्रीडा**

सूरपारंब्या, विटीदांडू, चेंडूफळी, आट्यापाट्या, झिम्मा, फुगडी, आगोटा-पागोटा, गोफ, पिंगा, तळ्यात-मळ्यात, दहिहंडी, लेझीम,

काठखेळ, धांदरी, घुसारी, दांडिया रास इत्यादी.

### ८) लोकसमज

मंत्रतंत्र, जादुटोणा, साप विंचू उतरविणे, कावीळ, मूठ मारणे, दूध उडविणे, पायरव होणे, घास उतरविणे, दृष्ट काढणे, काळी विद्या इत्यादी.

### ९) लोकविधी

विवाह, मौज, काज, आसरा, पाचवी, षष्ठी, ग्रामदैवत विधी इत्यादी.

### १०) आदिवासींच्या जाती

वारली, कोकणा, महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी, क ठाकूर, म ठाकूर, कातकरी, कोलाम, माडिया गोंड, कोरकू, परधान, धोती, पावरा, तडवी, दुबळा, मावची, भिल्ल, पारधी इत्यादी.

### १०) आदिवासींचे देव

कडेवर बाळ घेतलेली **'मेठू'**, हातात कणिस नागलीचे घेतलेली **'कणसरी'**, घागळी वाद्यासहित **'कनसऱ्या'**, हातात चाटू म्हणजे लाकडी ओगराळे घेतलेली **'काळी लक्ष्मी'**, हातात दिवा असलेली **'गोरी लखमी'**, हातात मुसळ असलेली **'मुसळखांबी'**, हाती काठी, पाठी ढोल, डोकी टोपी **'बरमा'**, पाचनंदी, पाच बंजारा **'नंदिपट्टा'**, मोरपिसांचा मोठा गुच्छ त्याला कळंबाचा खुंटा **'हिरवा देव'**, तीन लिंगी आंगठी शेपूट **'चिता'**, सोन्याची उभी लहान मूर्ती **'बालवीर'**, उभी मूर्ती **'रघ्या, हरिभगत'**, हातात काठी **'बाळदी'**, घोड्यावर स्वार, हाती लांब तलवार **'बहिरोबा'**, घोड्यावर स्वार सोबत स्त्रिया **'खंडेराव'**, वाघावर बसलेली **'भवानी'**, पार्वतीसह नंदीवर स्वार **'महादेव'**, एका हातात काठी दुसऱ्या हातात लोटा **'रानवा'**, गावा शेजारी लाकडी खुंट **'चटा'**, **'पांढरदेव'**, **'नारायणदेव'**, **'दुल्हादेव'**, **बडादेव'**, **'मुंजा'**, **'रानेताण'**.

शिवाय वारुळाच्या टोकांवरून होकायंत्रासारखी उत्तर दक्षिण दिशा ओळखणे, पक्षाने झाडावर घरटे बांधले यावरून पावसाचा कमी, मध्यम, भरपूर असा अंदाज घेतात. धान पेरून किती, कसे उगवते, यावर पावसाचा, पीकचा अंदाज घेतात किंवा मुंग्या अंडीवर नेऊ लागल्या, की भरपूर पाऊस पडेल हे समजते. असे त्यांचे काही खास आडाखे अभ्यसणीय आहेत. या काही नव्या दिशेने संशोधन होणे गरजेचे आहे.

**लोकगीतांचे काही नमुने**

**i) अंगण (अकोला) येथील आदिवासी लोकगीत :**

जनी जाते ओ शेणाला । उभा पाठिमागे काना ।
जने येऊ दे गं मला । शाण वेचू लागेन तुला ।
घालून पितांबराची काच । शाण येच चहु बाज ।
शाण वेचून बांधली म्वाट । काना देता मोटला ग्वाट ।

**ii) संत तुकोबा जीजाईचा हा संवाद :**

तुकाराम बोल - । जीजा कुकू लाव उभा ।
आला विमाईन । बसून जाऊ दोघा ।
तुकाराम बोल । जीजा कुकू लाव टिकला ।
आला विमाईन । कसा जाऊ मी एकला ।
तुकाराम बोल । जीजा तू माझी बायकू ।
इमानात जाया । नको जनाच आयकू ।
तुकाराम बोल । जीजा इमानात चाल ।
माग राहिल्यान । होतील तुझे हाल

**iii) ठाकरांचे नृत्य गीत :**

उलुशी माडी बांधली मला राहायला
दिवा लावायला
उलुशी गाय घेतली, जीव लावायला
दूध खायाला

वाळुटी झिरा खोदला पाणी प्यायला
तहान भागवायला
खिल्लारी जोडी घेतली शेती करायला
धान वाढवायला
उलुशी गाडी घेतली माल वाहायला
बसुनी हिंडायला.

**iv) पेरणी नृत्य गीत**

नांगराचा फाळ जमिनीचा काळु
फोडली धर्तरी कन्सरी
पेरली कन्सरी पिकवा येवली नागली
पिकाना लोवली हारडाना (पाखरानी) खादली
गेवनी गोफनी करितो राखणी

अशी असंख्य उदाहरणे लोकगीताच्या संदर्भातील आपल्याला निर्देशित करता येतील. असा हा लोकसाहित्याचा सर्वांगीण अभ्यास करता येईल. या लोकसाहित्यात वनवासी लोकसंस्कृती समावलेली आहे.

❋❋❋



# वनवासी समाज : रामायण आणि महाभारत कथा

आपली भारतीय संस्कृती वनामध्ये उपजली, पोसली आणि सुविकसित झाली. जगाची निर्मिती झाली तेव्हा सुरवातीपासूनच लोक वनात राहत होते. वन हाच त्यांचा सर्वार्थाने आधार होता. निसर्ग हाच त्यांचा देव होता. अध्यात्मिक आधार होता.

युगानुयुगे हा वनवासी समाज भारतीय समाजाचा आणि संस्कृतीचा अभिन्न अंग बनलेला होता. भारतीय साहित्य, वेद, पुराण, रामायण, महाभारत यामध्ये त्याला विशेष स्थान आहे.

आपण जर रामायण आणि महाभारत याचा अभ्यास केला तर वन आणि वनवासी यांच्या विना ही दोन्ही आर्ष महाकाव्ये अपूर्ण आणि अर्धवटच वाटतील. राजा दशरथाला तीन राण्या होत्या. कौशल्या, कैकयी आणि सुमित्रा. कौशल देशाची कौशल्या तर कैकेय देशाची कैकयी होती. आज वनवासींमध्ये हीच प्रथा आहे. स्त्रियांना त्यांच्या गावाच्या नावावरून ओळखले जाते. वनवासींमध्ये सुनेला गावाच्या नावाने बोलावतात. त्यातून गावाचे विशेष जपले जातात. मुंडा भाषेत सीता याचा अर्थ सितन म्हणजे नांगर चालविणे आहे. त्यावरून नांगर चालविताना जनक राजाला सापडलेली कन्या म्हणून तिचे नाव सीता झाले. प्रथेनुसार जनकपूरहून सीता अयोध्येला विवाहानंतर आली. तेव्हा तिला जानकी नावाने ओळखले गेले. लग्नाआधी ती सीता या नावानेच परिचित होती. स्वयंवरानंतर मात्र जानकी झाली. रामायणात आधी सीता हेच नाव आले. जानकी असा उल्लेख विवाह पूर्वी रामायणात कुठेही आलेला नाही. वनवासी समाजात या गोष्टीला मान्यता आहे. रामायणात रामाला १४ वर्षे वनवास भोगावा लागला. त्या काळात त्याची हनुमानाशी झालेली भेट ही एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे. राम १४ वर्षे वनामध्ये राहिला म्हणूनच त्याला वनवासी

राम म्हणतात. रामाचे वनवासीतील दिवस हेच रामायणातील विशेष लक्षणीय होते. वनवासींच्या सहवासात हा सगळा त्यांचा काळ गेलेला आहे. त्यामुळे रामाने अगदी जवळून हे वनवासी जीवन निरखले आहे. वनबंधूंना जाणले आहे. त्यांचा प्रामाणिकपणा, सचोटी, आत्मीयता सरळ जीवन अनुभवले आहे. त्या जीवन संस्कृतीचा रामावर प्रभाव पडला आणि रामाने पुढे वनवास संपल्यावर त्याच इमानदारीने प्रजासत्ताक राज्य कारभार सांभाळला.

वनवासी समाजाच्या आचरणामध्ये माणसाला ईश्वर बनविण्याचे सामर्थ्य निश्चित आहे. तोच प्रभाव रामावर पडलेला दिसतो. रामाला भेटलेल्या हनुमंतानेही असेच मित्रत्वाच्या नात्याने प्रभावित केले होते. संपूर्ण वनवासात साहाय्य केले. परस्परांचा विश्वास संपादन केला म्हणूनच सीता शोध त्याच्यावर सोपविला होता. श्रीलंकेलाही पाठविले होते.

वनवासी समाजातील लोकही राजा झालेले आहेत. उदा:- मुंडा, गौंड, खासी या राजांचा इतिहास उपलब्ध आहे. या राजांमध्येही रामायणाशी मिळतीजुळती प्रथा आहे. राजाचा मोठा मुलगाच राजगादीवर बसतो. भरतानेही रामाच्या पादुका ठेऊन राज्य केले. मुंडा वनवासींमध्येही "मुंडा मानकी"पद्धत आहे. रामायणात आणि वनवासी यातील हे साम्य लक्षणीय आहे. रामाने प्रेमाने शबरीची उष्टी बोरे खाल्ली याचा अर्थ वनवासी-नगरवासी असा भेद नाही. त्यात सामाजिक समरसतेचा सद्भाव आहे. वनवासी समाजात अनेक उपजाती आहेत पण त्यांच्यात स्पृश्य-अस्पृश्य हा प्रकार नाही. राम लंकेवर चढाई करताना शिवलिंगाची पूजा करतो. वनवासींमध्येही शिवलिंगाची पूजा आहे. फार तर त्याची नावे वेगवेगळी आहेत. मरंग बुरु (= मोठा पहाड, झारखंड), गोरेया बाबा (त्रिपुरा) तर गौंड लोक यालाच बडा देव म्हणतात. शंकर हा वन देव आहे. तो वाघाचे कातडे नेसतो आणि गळ्यात नाग बाळगतो. वनवासी आपले गोत्र झाड, वृक्ष, प्राणी यांच्या नावात जपतो. रामायणातही लव कुश ही दर्भाचीच नावे आहेत. विशेष म्हणजे वनवासी, जर जुळी मुले झाली तर त्यांची नावे

राम-लक्ष्मण अशी ठेवतो. शिवाय वनवासींमध्ये पुरुषांची दशरथ, शत्रूघ्न, लक्ष्मण अशी तर स्त्रियांत कौशल्या, सुमित्रा, सीता अशी नावे लोकप्रिय आहेत.

रामायणातील जोहार म्हणजे नमस्कार या अर्थी वनवासी वापरतात. भिल्ल जातीत तो रूढ आहे. गावचा प्रमुख यालाही ते मुंडा म्हणजे गाव प्रमुख म्हणतात.

जन्मापासून मृत्यूपर्यंतचे सगळे वनवासींचे संस्कार हिंदू जीवनपद्धती प्रमाणेच आहेत. दोन्हीमध्ये समानता आहे. नामकरण, कान टोचणे, विवाह, एवढेच काय अंत्यसंस्कार यात साम्य आहे. वनवासींनी राम, कृष्ण, शिव आदि सर्वच देव देवतांना आत्मसात केले आहे.

त्यांची व्यक्तिनामे पहा, उदा:- रामदयाल मुंडा, कार्तिक ऊराव, कृष्ण मार्डी या महापुरुषांची ते पूजा करतात. हा रामायण-महाभारताचा प्रभावच आहे.

हिंदू विश्वातील अलौकिक अदृश्य शक्तीला ईश्वर मानतात. त्याच्या साकार रुपाची पूजा बांधतात. आमचे वनवासी बांधवही असाच विचार करून परमेश्वराची निराकार रुपात पूजा करतात. त्यात 'डोंगऱ्या देव' म्हणजे महादेव, राम, मारुती, कृष्ण, लक्ष्मी हे सगळेच येतात. वनवासींच्या लोकगीतातून-लोककथातून-लोकविद्येतून याची साक्ष पटते.

वनवासी देवीची श्रद्धेने अर्चना करतात. वनवासींमध्ये रामनवमी उत्सव रूढ आहे. ते भक्ती भावाने रामनवमीला रामाचा रथ पाड्यापाड्यातून मिरवतात. सीतेची हरणाची चोळी वनवासी महिला पूज्य मानतात. सीता वनात होती याचा या वनवासी स्त्रियांना अभिमान आहे. काही अनुसूचित जामातीत चोळी घालत नाहीत याचे कारण सीतामाईची आठवण आहे. दिवाळीत हरिणाची पूजा करतात.

वनवासी रामायण, महाभारत या महाग्रंथाना पवित्र मानतात. राम, लक्ष्मण, सीता, हनुमंत यांना आपले मानून ते रामायणात रमतात. त्यांचा राम शबरीची बोरे आवडीने खातो. त्यांचा लक्ष्मण वनाचे रक्षण करतो. सीता त्यांच्या सोबत गीते गाते. कंदमुळे हाच

रामाचा नैवेद्य असतो. ही निरागस मानव आणि निसर्ग याची प्रचिती आहे. असाच द्रोपदीचा वनवास वनवासी स्त्रियांना आपला वाटतो.

परकीय आक्रमणे होऊनही वनवासी जनांच्या मनामध्ये हे दोन्ही ग्रंथ रुजलेले आहेत. लोक गीतातील विविध ठिकाणी रुळलेल्या नुसत्या गौळणी पाहिल्या तरी रामायण व महाभारत किती खोलवर वनवासींच्या जीवनात पोहोचले होते याची कल्पना येते.

एक लोककथा पाहा. पांडव वनवासात असताना एका झोपडीत राहतात. तेथे त्यांना कृष्ण भेटायला येतो. मध्यरात्री भेटून झाल्यावर झोपायचे असते पण कृष्णाला त्या वनवासींच्या झोपडीत जागा नसते, तेव्हा कृष्ण एका झाडावर झोपतो. पाची पांडव तसेच दाटीवाटीने झोपतात. पहाट होताच कृष्ण सूर्यदेवाला सांगतो की, " या झोपडीतील पाडवांना प्रकाश दे आणि या वनवासींच्या घरात सोने उधळ." असा आशीर्वाद देतो. याचा अर्थ कृष्णाने झोपडीचे रात्रभर रक्षण तर केलेच पण सकाळी जाताना ती वनवासी झोपडी सोन्याची केली. तेव्हापासून वनवासी सूर्यभक्त झाले.

नागरी व आदिम वनवासींमध्ये अंतर्गत व्यवहार आपुलकीचे जिव्हाळ्याचे आणि रक्ताचे होते. जाती होत्या, पण जातीची बंधने नव्हती. हे रामायण महाभारतातील अनेक कथांमधून आणि व्यक्तिरेखांमधून दिसून येते. रामाने रावणाला पराभूत केले तेव्हा रामाला विविध जातीतील वनवासी बांधवांनीच साहाय्य केले होते. ते सगळे प्रामुख्याने दक्षिण भारतातील वनवासी होते. श्रीरामाने रावणावर चाल करण्यासाठी कातकरी समाजातील वनवासींना आपल्याबरोबर घेतले होते. श्रीरामाचा विजय झाला तेव्हा त्या श्रीरामाच्या आशीर्वादाने माकड वंशातील कातकरींना मानवी रूप प्राप्त झाले असे ते वनवासी मानतात.

महाभारतात उल्लेख केलेल्या 'पंचजन'पैकी असा हा वनवासी समाज आहे. रामायण काळापासून चालत आलेल्या भारतीय संस्कृतीचा वारसा वनवासी समाजाने जतन केला आहे.

❋ ❋ ❋

# अभिप्राय

**(डॉ. गिरधारी यांच्या 'आरसा आदिवासी जीवन शैलीचा' या पहिल्या वनवासीविषयक ग्रंथावरील अभिप्राय)**

"आपले २७ लेख पोटात घेणाऱ्या "आरश्या" (आरसा आदिवासी जीवन शैलीचा) मध्ये वनवासी जीवनाचे प्राय: सर्वांगीण चित्र दिसते आहे हे मात्र सत्य आहे.

आपण जव्हार परिसराचा विशेष केंद्र म्हणून अभ्यास केलात तर ठाणे जिल्ह्यातील वनवासी जातींचा सर्वांगीण परिचय आमच्यासारख्यांसाठी उपलब्ध करून दिलात.

वनवासींचे सण, उत्सव, त्यांचे संस्कार इत्यादींचे 'चक्षुर्वै सत्यं' दर्शन घडवेल असा आरसा वाचकांपुढे ठेवलात.

आपण अनेकानेक वनवासी विद्यार्थी घडवलेत, त्यांच्या साठी ग्रामीण परिसरात वर्षानुवर्षे राहिलात, त्यांच्या जीवनशैलीचा डोळसपणे अभ्यास करून समान धर्म्यांसाठी त्याचा सारांश ग्रंथबद्ध केलात हे सारे काम कोणी पगारी माणूस करू शकेल असे नाही. समाजपुरुषाची निरपेक्ष सेवा करण्याची आस ज्यांच्या मनात जागृत होते तेच कार्यकर्ते असले कार्य करू शकतात."

**(आदरणीय यशवंतराव लेले,**
**संस्थापक सदस्य, ज्ञान प्रबोधिनी यांच्या पत्रातून)**
२० राष्ट्रीय वैशाख, शके १९३९

❋ ❋ ❋

# डॉ. भास्कर गिरधारी यांचे प्रकाशित ग्रंथ

१) अभिव्यक्ती / प्रस्तावना : वि.वा. शिरवाडकर / १९७७

२) आलेख / १९८१

३) मराठी शुद्धलेखनाचा मार्ग / १९८५

४) मराठी साहित्यातील ययाती : प्रस्तावना : डॉ. गो.के. भट / १९८९

५) साप्ताहिक 'करमणूक'/प्रस्तावना : डॉ. भालचंद्र फडके / १९९१

६) कर्ण आणि मराठी प्रतिभा / १९९२

७) पंडिती साहित्य / १९९२

८) आरसा : आदिवासी जीवन शैलीचा / प्रस्तावना : केशव मेश्राम / २००४

९) मराठी लेखन शुद्धी/प्रस्तावना : डॉ. राजाभाऊ गायधनी/ २०१२

१०) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज : जनजागरण कार्य / २०१६

✶ महाभारत आणि मराठी ललित साहित्य: प्रस्तावना : राम शेवाळकर (अप्रकाशित)

## संपादित लेखन

११) पीएच.डी. प्रबंध : रुपरेषा आणि निष्कर्ष (१९८०)

१२) महाभारतातील दुर्गास्तोत्र (१९८२)

१३) नामदार गो.कृ.गोखले: जीवन परिचय (१९८३)

१४) मध्ययुगीन वाङ्मय प्रवाह (२००२)

१५) चळवळ्या माणूस (२००३)

१६) वनवासी कोकण शब्दकोश (२००४)



## प्राचार्य डॉ. भास्कर गिरधारी यांची ओळख

सध्या पुणे येथे वास्तव्य आहे. विविध महाविद्यालयात मराठीचे प्रदीर्घकाळ अध्यापन केले. प्राचार्य म्हणून २२ वर्षे सेवापूर्ती. बी.ए.एम.ए. परीक्षात विद्यापीठात प्रथम श्रेणीत सर्व द्वितीय क्रमांक प्राप्त. शासनाची दक्षिणा फेलोशिप मिळाली. पुढे ''महाभारतावर आधारित मराठी ललित साहित्य'' या विषयावर पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवी संपादन केली. विद्यार्थी दशेत अनेक नामवंतांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

ते पीएच.डी.चे मार्गदर्शक होते. त्यांचे २४ विद्यार्थी पीएच.डी. व १४ विद्यार्थी एम.फिल. झाले आहेत.

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे, आणि शासकीय, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांत त्यांनी विविध पदांवरून जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या.

त्यांनी आपल्या लेखनात सातत्य ठेवले असून १२ ग्रंथ, ५ संपादने प्रकाशित आहेत. त्यांनी आजवर २५ पुस्तकांना प्रस्तावना दिलेल्या आहेत. अनेक विषयांवरील एक अभ्यासू, उत्तम वक्ते म्हणून महाराष्ट्राला ते सुपरिचित आहेत.

आतापर्यंत २१ महनीय पुरस्काराने ते सन्मानित झाले आहेत. त्यांच्या वाचन, लेखन, समाजसेवा, व्याख्याने ह्या आवडीच्या कार्यक्षेत्रात ते नेहमीच सक्रीय आहेत.

---

**संपर्क पत्ता :-**

१) जे १२०२ आसावरी, नांदेड सिटी, सिंहगड रोड, पुणे ४११०६८

२) 'ए'विंग, ४०१, शुक्रतारा संकुल, सिंहगड पथ, पुणे - ४११०३०.

चलभाष : ९८२३०१२३०१

E-mail : bvgirdhari@gmail.com

Web : www.bvgirdhari.com